Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सामाजिक चळवळी :

काल आज व उद्या

X:958
155N4

संपादक

नागोराव कुंभार

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

X:958 6972
155N4
Kumbhar, Nagorao
ed.
Samajik chalchali:
kal, aaj va uddha

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

X : 958
155N.4
Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS
6972

SHRI JAGADGURU VISHWARADHYA JNANAMANDIR
(LIBRARY)
JANGAMAWADIMATH, VARANASI

Please return this volume on or before the date last stamped
Overdue volume will be charged 1/- per day.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सामाजिक चळवळी : काल, आज आणि उद्या

- संपादक -

प्राचार्य नागोराव कुंभार

लातूर

प्रबोधन प्रकाशन

'आई' शिवनगर, सूतमील रोड, लातूर ४१३५१२

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रकाशिका
सौ. प्रेमा कुंभार
शिवनगर, लातूर

X:958
155N4

मुद्रक
प्रगती मुद्रणालय,
शिवनगर, लातूर
४१३५१२.

सर्व हक्क प्रकाशकांच्या हाती

मूल्य ७० रुपये

प्रथमावृत्ती डिसेंबर १९९४

SRI JAGADGURU VISHWARADHYA
JNANA SIMHASAN JNANAMANDIR
LIBRARY
Jangamawadi Math
Acc. No. 6972

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

संपादकीय निवेदन - - - -

सामाजिक चळवळी समाज परिवर्तनाचा मुख्य आधार असतात. यास्तव त्यांचे यथार्थ मुल्यांकन करुन त्याच्या फलश्रुती व उणिवांची चर्चा करावी लागते. या मुल्यांकनातून चळवळींना नवी दिशाही प्राप्त होवू शकते. यामुळे विचारशलाकाच्या सौजन्याने महाराष्ट्रातील विविध सामाजिक चळवळीचे स्वरुप स्पष्ट करणारा हा लेखसंग्रह प्रकाशित करीत आहोत. वाचकांना याचा निश्चित लाभ होईल.

– प्राचार्य नागोराव कुंभार

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अनुक्रमणिका

अ. क्र.	संपादकीय	लेखक	पृ. क्र.
(१)	आमच्या प्रबोधनाची पार्श्वभूमी	डॉ. सुरेंद्र बार्लिंगे	१
(२)	सामाजिक प्रबोधनाची वाटचाल	कै. गं. बा. सरदार	७
(३)	आर्यसमाज : एक विश्लेषण	प्रा. डॉ. सूर्यनारायण रणसुभे	१७
(४)	आर्यसमाजाचा समाज सुधारणा विषयक दृष्टीकोन	प्रा. धनंजय बेडदे	२३
(५)	सर्वोदय चळवळ : काल, आज आणि उद्या	गंगाप्रसाद अग्रवाल	२९
(६)	महाराष्ट्रातील दलित चळवळ	प्रा. डॉ. पी. जी. जोगदंड	३२
(७)	स्त्री–मुक्ती चळवळीतील विचारप्रवाह	प्रा. विद्युत भागवत	४३
(८)	आंतरजातीय विवाह : चळवळीची शक्याशक्यता व दिशा	प्रा. डॉ. प्रदीप गोखले	५५
(९)	समाज प्रबोधन व परिवर्तन	डॉ. जनार्दन वाघमारे	६२
(१०)	सामाज परिवर्तनाच्या चळवळी : काल, आज आणि उद्या	ग. प्र. प्रधान	६७
(११)	सामाजिक चळवळी : बदलता संदर्भ	यदुनाथ थत्ते	६९
(१२)	सामाजिक बदलासाठी वृत्तीव्यवस्था बदलणे आवश्यक !	प्रा. गो. न. मग्गीरवार	७३
(१३)	समाजप्रबोधन, विज्ञान व फलश्रृती / क्रान्ती	वा. रा. जवाहिरे	७६
(१४)	स्वयंसेवी संस्था चळवळ : एक दृष्टीक्षेप	श्रीनिवास कुलकर्णी	७९
(१५)	प्रार्थना समाज आणि आर्यसमाज	स. मा. गर्गे	८५
(१६)	मुस्लिमातील समाज परिवर्तनाच्या चळवळी आणि प्रबोधनाचे प्रवाह : काल, आज आणि उद्या	प्रा. फ. हु. बेन्नूर	९३
(१७)	शेतकरी चळवळ : काल, आज आणि उद्या	अमर हबीब	११२
(१८)	छात्रभारती : एक प्रभावी युवक चळवळ	प्रा. अर्जुन जाधव	१२०
(१९)	परिवर्तन कोणाचे, कसले आणि कशाला ?	विश्वास नाईकनवरे	१३१
(२०)	समाज परिवर्तनाच्या चळवळी आणि मराठी साहित्य	प्रा. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले	१३२
(२१)	सत्यशोधक समाज : परिवर्तनवादी चळवळ	प्रा. डॉ. राम वाघ	१४१
(२२)	मुस्लिम सत्यशोधक चळवळ : काल, आज आणि उद्या	प्रा. एस. एम. तांबोळी	१४६
(२३)	कामगार चळवळ : काल, आज आणि उद्या	ॲड. भगवानराव देशपांडे	१५८
(२४)	अंधश्रद्धा निर्मूलन चळवळ : काल, आज आणि उद्या	डॉ. नरेंद्र दाभोळकर	१६६

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

॥१॥

आमच्या प्रबोधनाची पार्श्वभूमी

डॉ. सुरेन्द्र बारलिंगे

महम्मद पैगंबराच्या शिकवणीपासून प्रेरणा घेऊन अरब लोक विश्व-दिग्विजय करायला निघाले. ते पहिल्या शंभर वर्षातच सिंधू नदीच्या किनाऱ्यावर येऊन थडकले. त्यावेळी सिंधमध्ये दाहिर नावाचा राजा राज्य करीत होता. अरब सरदार महम्मद बीन कासीमने त्याचा पाडाव केला. तत्पूर्वी इराणमधल्या पारसी साम्राज्यालाही अरबांनी धूळ चारली होती.

त्या काळात हिंदुस्थान हा फार संपन्न देश समजला जात असे. तेथे विद्येचा सुकाळ होता. त्या काळात राजस्थानात बाप्पा रावळ नावाचा फार पराक्रमी राजा होऊन गेला. रावळपिंडी ही त्याची राजधानी होती आणि त्याच्या राज्याचा विस्तार मध्य एशियापर्यंत होता दुसरीकडे धारला म्हणजे माळव्यात भोज राजाचे राज्य होते. तो पराक्रमी तर होताच, पण विद्याव्यासंगीही होता. त्याच्या नावावर चौतीस पुस्तकांची नोंद आहे "श्रृंगार-प्रकाश" नावाचा काव्यशास्त्रावरील त्याचा ग्रंथ प्रसिद्ध आहे. त्याने "समरांगण-सूत्रधार" नावाचा स्थापत्य आणि शिल्पशास्त्रावरही ग्रंथ लिहिला होता, आणि आजही तो महत्वाचा ग्रंथ आहे असे म्हणतात. त्याचा आणखी एक महत्वाचा ग्रंथ म्हणजे "भोजप्रबंध". विक्रमाप्रमाणेच त्याच्याही दरबारी पंडित-श्रेष्ठ नवरत्ने होती. हिंदुस्थानातील सर्वच महत्वाची स्थाने 'काशी, कांची, अवंतिका' विद्येची माहेरघरे म्हणून प्रसिद्ध होती. पण अरब दिग्विजयाचा वरवंटा थोड्याच दिवसात भारतात सर्वत्र फिरला अरबांप्रमाणेच पैगंबरापासून प्रेरणा घेतलेल्या अफगाण तुर्कांच्या स्वाऱ्याही हिंदुस्थानावर होऊ लागल्या. गझनीच्या महम्मदाने हिंदुस्थानावर अठरा स्वाऱ्या करुन सोमनाथादि मंदिरे लुटली आणि गडगंज संपत्ती गझनीस नेली. घोरीच्या महम्मदाने तर १२१५ त दिल्लीचे तक्तच काबीज केले. पृथ्वीराज चव्हाणाचा वध केला आणि कुतुबुद्दीन ऐबक नावाच्या आपल्या गुलामास हिंदुस्थानचा सुभेदार नेमले. त्याने गुलाम राजघराण्याची स्थापना केली. त्यानंतर येथे जो घसरण

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सुरु झाली ती १९४७ पर्यंत कायम होती. खिलजी, तुघलक, सय्यद, लोधी, मोगल आणि शेवटी इंग्रज यांनी हा देश आपल्या अधिपत्याखाली आणला. या कळात विजयानगरचे साम्राज्य, वारंगळच्या पाळेगारांचा आणि राणा प्रतापसिंगाचा प्रतिकार आणि शिवाजी महाराजांनी केलेली स्वराज्याची स्थापना ही प्रकाशाची किरणेही मधूनमधून दृश्यमान होत राहिली. पण हा सारा कृष्णयुगाचाच काळ होता.

भारतातील समाजव्यवस्था ही समतेवर आधारलेली नव्हती. जाती–जमातींचे राज्य होते. अस्पृश्यता आणि सामाजिक शोषण यांच्यामुळे समाजात एकजिनसीपणाच राहिला नव्हता. लष्करी सत्तेच्या जोरावर राजे राज्य करीत. राज्य करणे म्हणजे करवसुली करणे. करवसुली केली की झाले. एरवी राजसत्तेने समाजाला आज सारखे जखडले नव्हते. पण इतर सामाजिक शक्तींकडून होणाऱ्या शोषणातून मात्र तो मुक्त नव्हता. तुर्कांनी ज्याप्रमाणे हिंदुस्थान काबीज केले तसेच त्यांनी बेझंटाईन साम्राज्य काबीज करुन १४५३ मध्ये इस्तंबूलचाही ताबा घेतला. तुर्कांचा हा विजय म्हणजे युरोपातील पुनर्जागरणाची सुरुवात होती. इटली, फ्रान्स, जर्मनी आणि इतर देशांत नवचैतन्याचे वारे वाहू लागले, प्रबोधनाचे युग सुरु झाले. अमेरिका खंडाचा शोध लागला. युरोपियनांच्या अमेरिका, आफ्रिका आणि ऑस्ट्रेलिया खंडात वसाहती निर्माण झाल्या आणि सागरी मार्गाचा शोध लागून इग्लंड, फ्रान्स, जर्मनी, हॉलंड यांचे साम्राज्यही हिंदुस्थानात व इतरत्र पसरले.

अठराव्या शतकाच्या सुमारास १७५६ च्या दरम्यान प्लासीची लढाई इंग्रजांनी जिंकली आणि सिराज उद्दौल्लाची सत्ता नष्ट होऊन इंग्रजांचा झेंडा बंगाल प्रांतात रोवला गेला. हीच गोष्ट हळूहळू इतरत्रही झाली. १७६१ च्या पानिपतच्या तिसऱ्या युद्धानतर मराठ्यांची सत्ता खिळखिळीत होत गेली. १८१८ त पुण्याचा पाडाव झाला. १८५४ मध्ये नागपूर इंग्रजांच्या ताब्यात आले. भारतातील विद्येची स्थिती आधीच खालावली होती. १८३५ मध्ये लॉर्ड मकॉले यांचे शिक्षणविषयक नवीन धोरण आचारात आणले गेले. या शिक्षणामुळे भारतीय लोक पाश्चात्य विद्या शिकायला लागले. त्यामुळे एका रीतीने नव्या युगाची सुरुवात झाली. पण त्याचबरोबर येथला समाज येथल्या पारंपारिक विद्येपासून तुटला गेला. पाश्चात्य अभ्यासूंनी मात्र भारतीय विद्येचा पुरेपूर फायदा घेतला. कालिदासाचे शाकुंतल आणि मेघदूत हे १७७० च्या आतच पाश्चात्य भाषांत भाषांतरित झाले. सर विलयम जोन्सने साऱ्या युरोपियन भाषा संस्कृतच्याच भाषा भगिनी आहेत असा शोध लावला. त्यातून वैश्विक भाषाशास्त्राची सुरुवात झाली. हळूहळू पाश्चात्यांनी लावलेल्या वैज्ञानिक शोधांचाही आपल्या देशात प्रवेश झाला. त्यांच्या चैतन्याचे वारे आपल्या देशातही वाहू लागले. त्यांच्या सामाजिक तत्त्वज्ञानाने आपले विचारवंत भारले गेले. विष्णूशास्त्री चिपळुनकरांनी तर इंग्रजी भाषेला वाघिणीचे दूध म्हणून संबोधले. आपल्या देशात

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तत्त्वज्ञान होते पण सामाजिक तत्त्वज्ञानाचा कुणी फारसा विचार केलेला दिसत नव्हता. जग ही एक माया आहे एवढेच आपण समजत होतो. पण मायेचा अर्थ मात्र आपणास पुरेसा उमगला नव्हता. पाश्चात्य संस्कृतीने ही दृष्टी आपणास दिली. बेन्थॅम, मिल, स्पेन्सर यांच्या तत्त्वज्ञानाची फार मोठी भुरळ आपणाला पडली. या नवीन मिळा–लेल्या ज्ञानाचा फार मोठा परिणाम आपल्यावर झाला. बंगालमध्ये राजा राममोहन रॉय यांनी ब्राम्हो समाजाची स्थापना केली. केशवचंद्रसेन, पडित ईश्वरचंद्र विद्या–सागर, देवेंद्रनाथ ठाकूर यांनी ती परंपरा वाढविली. स्वामी विवेकानंद हेही याच वातावरणात मोठे झाले. पण हे ज्ञान जर समाजाच्या शेवटच्या स्तरापर्यंत पोचवायचे असेल तर 'हिंदु' शब्दाचा विध्वंस न करता ते केले पाहिजे असाही विचार त्यांनी मांडला. महाराष्ट्रात ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले या दांपत्याने फार मोलाची कामगिरी बजावली. लोकहितवादी, रानडे, आगरकर, टिळक यांनीही निरनिराळचा क्षेत्रात महाराष्ट्रात चैतन्य उत्पन्न केले. विष्णूबुवा ब्रम्हचारी, राजा रामशास्त्री भागवत इत्यादींनीही समाजाच्या निरनिराळचा अंगांचा विचार केला. पाश्चात्यांच्या या विचारसरणीची प्रतिक्रिया पण देशात निरनिराळचा ठिकाणी उमटली. स्वामी दया–नंदांचा आर्यसमाज हे पण अशाच प्रतिक्रियेचे फलस्वरुप आहे. दयानंद हे गुजराथचे पण त्यांचे बहुतेक कार्य पंजाबमध्ये झाले. जी नवीन माहिती उजेडात येत आहे त्यावरुन असे दिसते की दयानंद हे १८५७च्या स्वातंत्र्य युध्दाशी निगडीत होते आणि स्वातंत्र्य युध्दाचा शेवट मनासारखा न झाल्यामुळे त्यांनी आपले मूळ व्यक्तिमत्त्व टाकून देऊन आर्यसमाजाला वाहून घेतले. आर्यत्वाची जाणीव झाल्यावाचून आपल्या देशाची धडगत नाही असे त्यांना वाटले असावे. महाराष्ट्रात अस्पृश्यांच्या आणि स्त्रियांच्या चळवळी पुष्कळ झाल्या असतील पण त्यांचे उगमस्थान हे ज्योतिबा व सावित्रीबाई हेच आहेत. या देशात अस्पृश्यता निवारणाची चळवळ चार दृष्टिकोणातून केली गेली. त्यांचे केंद्रबिंदु होते म. फुले, सावरकर, आंबेडकर व म. गांधी. याशिवाय महर्षि विठ्ठल रामजी शिंदे इत्यादीही अस्पृश्यता निवारणाच्या चळवळीच्या मागे होते. स्त्री–मुक्तीच्या चळवळीमध्ये महर्षी अण्णासाहेब कर्वे आणि त्यांचे पुत्र र. धों. कर्वे यांची नावे फार मोठी आहेत. पण या चळवळीचा जन्मही महात्मा फुलेंच्या पासूनच झाला.

या सामाजिक चळवळीबरोबरच राजकीय जागृतीचाही विचार केला पाहिजे. संपूर्ण भारतात एकछत्री राज्य असे कोणाचेच कधी झाले नाही आणि ब्रिटिश राज–वटीत जरी सर्व हिंदुस्थान एक झाला तरी निरनिराळचा प्रांतातील अंतःप्रवाह हे नेहमीच कायम राहिले. ब्रिटिश राज्याच्या सुरुवातीला तर महाराष्ट्र देखील अनेक भागात विभागला गेला होता. शिवाजी महाराजांची गादी शाहू महाराजांनी जरी सातारला हलवली असली तरी पुणे आणि पश्चिम महाराष्ट्रात पेशवेच सर्वे सर्वा होते.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कोल्हापुरात भोसल्यांच्या धाकट्या पातीचे राज्य होते. नागपुरकर भोसल्यांचा अंमल नागपुरच्या आसपास होता. हैदराबाद आणि वऱ्हाडमध्ये निजामाचे राज्य होते आणि याशिवाय शिंदे, गायकवाड, होळकर, प्रतिनिधी, पटवर्धन संस्थाने यांचीही हुकमत ठिकठिकणी होतीच. यापैकी बरीचशी संस्थाने ब्राम्हणी संस्थानें. इंग्रजी सत्तेची खरी झळ एका परीने या ब्राम्हण संस्थानांना लागली आणि जेथे ब्राम्हण सत्ता नव्हती तेथेही ब्राम्हणच कारभारी असल्यामुळे सत्तेचे लगामही ब्राम्हणांच्याच हाती होते. याचा एक महत्वाचा परिणाम मराठी मुलखात दिसू लागला. जेव्हा इंग्रजी शिक्षण या भागात सुरु झाले तेव्हा पहिली आंग्लविद्या विभूषित माणसे ही बहुतेक करुन ब्राम्हणच होती आणि त्यातही बहुतेक जण चित्पावन ब्राम्हण होते. १७०७ मध्ये औरंगजेबाचा मृत्यू झाला आणि मोगलांच्या कैदेत असलेल्या शाहू महाराजांची सुटका झाली. तोपर्यंत कोल्हापुरकरांचा अंमल मराठी राज्यावर होता. सर्व ब्राम्हण, मराठे आणि इतर त्यांच्याशी एकनिष्ठ होते. पण शाहू महाराजांची सुटका झाल्यावर दुफळीस आणि बेबंदशाहीस सुरुवात झाली. कोणाची निष्ठा कोठें आहे हे समजेनासे झाले. त्यावेळी श्रीवर्धनच्या बालाजी विश्वनाथ भट या कर्तबगार तरुण माणसाला शाहु महाराजांनी पेशवाईची वस्त्रे दिली. ही गोष्ट ई. स. १७१३ त घडली आणि तेव्हापासून महा- राष्ट्रातला समाज चित्पावन आणि देशस्थ ब्राम्हण यांच्यात विभागला गेला. तत्पूर्वी चित्पावन कोकणस्थ ब्राम्हणांना ब्राम्हण समाजातही महत्वाचे स्थान नव्हते. सारी सत्ता देशस्थ ब्राम्हणांच्या आणि मराठ्यांच्या हाती होती. पण बाळाजी विश्व- नाथांच्या हाती सत्ता आल्यावर ही परिस्थिती बदलू लागली आणि त्यातून सर्वप्रथम पेशवे विरुद्ध देशस्थ ब्राम्हण असे दृश्य दिसू लागले. प्रथम इतर जातींचे सरदार देशस्थ ब्राम्हणांची साथ करीत होते. पण हळूहळू हे दृश्य बदलू लागले. पेशव्यांचे आसन जसजसे भक्कम पायावर उभे राहिले तसतसे देशस्थ ब्राम्हण हतबल झाले. आणि कोकणस्थांच्या हाती राजसत्ता व धर्मसत्ता दोनी एकवटल्या. जातीय कलहाची बीजे रोवली गेली. ब्राम्हणेत्तर चळवळीच्या इतिहासाची सुरुवात ही अशी झाली. पेशवाईतील साडेतीन शहाण्यांपैकी पुण्याचे सखारामपंत बोकील, निजामाचे दिवाण विठ्ठल सुंदर आणि नागपुरकर भोसल्याचे सरदार चोरघडे हे तीनही जण देशस्थ ब्राम्हण पण त्यांची एकजूट झाल्याचे कोठे दिसत नाही. आणि शेवटी साडेतीन शहा- ण्यांचा लढा अर्धा शहाणा जो नाना फडणवीस याने जिंकला. पण पेशवाई संपल्या- बरोबर या अर्ध्या शहाण्या ब्राम्हणांची राजसत्ता आणि धर्मसत्ता दोन्ही सपुष्टात आल्या. पण परिणामी आंग्लविद्याविभूषित ब्राम्हणांची पहिली दुसरी पिढी कोकणस्थ ब्राम्हणांतच निघाली. त्याचबरोबर कोकणस्थ ब्राम्हणांना सैन्यात घेऊ नका आणि महत्वाच्या जागी त्यांना नेमू नका असा एक गुप्त फतवा पण निघाला. सैन्यात कोक- णस्थ ब्राम्हणांना घ्यायचे नाही ही गोष्ट दुसऱ्या महायुद्धाच्या सुरुवातीपर्यंत चालूच

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

होती. महत्त्वाच्या जागांवर सुद्धा पोचणे कोकणस्थ ब्राम्हणांना कठिण होऊन बसले. याला काही अपवाद नसतील असे नाही. पण सर्वसामान्य नियम हा असा होता. १८५७ च्या लढ्यात कोकणस्थ, देशस्थ आणि कऱ्हाडे अशा तिन्ही समाजाचे लोक दिसतात. नानासाहेब पेशवे हे कोकणस्थ. झाशीच्या राणी लक्ष्मीबाई (नेवाळकर) या कऱ्हाडे आणि तात्या टोपे हे देशस्थ. पण खरी सुत्रे ही कोकणस्थ बंडखोरांच्याच हाती होती. त्यामुळे सुरुवातीच्या काळात खासगी शिक्षणसंस्था या कोकणस्थ ब्राम्हणानीच काढल्या आणि १८५७ नंतरचे पहिले क्रांतिकारक कोकणस्थ ब्राम्हण समाजातूनच निघाले. वासुदेव बळवंत फडक्यांपासून ते चाफेकर, सेनापती बापट, सावरकर, गोगटे यांच्यापर्यंत सारेच कोकणस्थ. पश्चिम महाराष्ट्राबाहेर या परिस्थितीत थोडा फरक पडला, नाही असे नाही. पण त्यातून एक गोष्ट सिध्द होते की पहिल्या राष्ट्रीय चळवळी महाराष्ट्रात तरी बहुतांशी कोकणस्थ ब्राम्हणांनीच केल्या. गदर चळवळीतील पिंगळे आणि लाहोर कटातील राजगुरु हे त्याला अपवाद आहेत.

इकडे ब्रिटिशांच्या हातात सत्ता गेल्यामुळे भारतीयांच्या मूळ विचारसरणीवर पाश्चात्य विद्येचे कलम लागले आणि आपल्या सामाजिक विचारसरणीत आत्तापर्यंत नसणारा फरक जाणवला. सामाजिक पुनर्जागरणात हा फरक विशेष जाणवला· ब्रिटिशांचे आणि इतर पाश्चात्यांचे चांगले विचार आणि आचार आपण घेतले पाहिजेत असे लोकांना वाटू लागले आणि त्या दृष्टीने आमच्या समाज धुरीणानी पुढचे पाऊल उचलले. ख्रिश्चन मिशनरींनीही त्यांना मदत केली. त्यातून काही धर्मांतरेही झाली. उदाहरणार्थ गोरे शास्त्रींचे रेवरेंड गोरे झाले. नारायण वामन टिळकांचेही धर्मांतर असेच. पण अनेकांनी पाश्चात्यांचे चांगले ते उचलून आपल्या चालीरीतीत आणि विचारात ते उतरवले पाहिजे असाच पवित्रा घेतला. महाराष्ट्रापुरते बोलावयाचे झाल्यास फुले, रानडे आणि आगरकर यांचा उल्लेख या संदर्भात करावा लागेल. हेच समाज जागृतीचे तत्त्व केशवसुतांनी साहित्यात पण आणले. त्यांचे काव्य ही समाज जागृतीची तुतारीच आहे. अशी तुतारी पाश्चात्य विचार आपल्यात रुजल्यावाचून कुणाला फुंकता आली असती की नाही याची शंकाच आहे. उदारमतवादी पाश्चात्य तत्त्वज्ञान या विचाराच्या मुळाशी आहे हे सांगणे न लगे.

सामाजिक क्षेत्राप्रमाणेच राजकीय क्षेत्रातसुद्धा या उदारमतवाद्यांचा मोठा परिणाम झाला. अर्थात हा परिणाम सामाजिक क्षेत्रात झालेल्या परिणामाच्या उलट होता. सामाजिक क्षेत्रात पाश्चात्यांच्या विचाराने आपण प्रभावित झालो होतो आणि त्यांचे अनुकरण केले पाहिजे असे आवर्जून सांगत होतो. पण राजकीय क्षेत्रात उदारमतवादाचा स्वीकार केल्यावर त्यांच्या वागण्यातील विसंवाद आपणास अधिक स्पष्टपणे दिसू लागला आणि स्वतंत्रतेचा समतेचा विचार करणारे शासन आम्हाला मात्र पारतंत्र्यात ठेवते, हे कसे ही जाणीव आम्हाला झाली. उदारमतवादी इंग्रजांची येथेही आम्हाला मदतच झाली. अर्थात त्यामागील तत्त्वज्ञान होते की हिंदुस्थानात राज्य करावयाचे असेल तर तिथल्या लोकांना असंतुष्ट ठेऊन उपयोगी नाही. महापंडित

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मॅक्समुलरने सुद्धा आपल्या सिव्हिल सर्व्हिस कमिशनच्या रिपोर्टमध्ये अशाच प्रकारचा सल्ला दिला आहे. १८८३-८४ च्या सुमारास असे उदारमतवादी पाश्चात्य लोक हिंदुस्थानात पुष्कळ असले पाहिजेत. ह्यूम, वेडरबर्न, सर हेन्री कॉटन इत्यादि लोकांनीच राष्ट्रीय कॉंग्रेसशी स्थापना केली. ठिकठिकाणी बंड आणि उठाव करण्यापेक्षा आपणास जे पाहिजे त्याची विनंती शासनास करुया अशी ही उदारमतवादी जाणीव होती. स्वराज्य ह्याचा आज आपण जो अर्थ घेतो तो अर्थ ह्या मंडळींना अभिप्रेत होता की नाही ह्याची शंका आहे. त्यांना अभिप्रेत असलेले स्वराज्य म्हणजेच ऐतद्देशीय लोकांनी केलेले प्रशासन 'ॲडमिनिस्ट्रेशन? खरे म्हणजे आजही आपल्या समोरील खरा महत्वाचा प्रश्न चांगली नोकरी कशी मिळेल हाच आहे. ह्या दृष्टीनी सर हेन्री कॉटन ह्यांच्या होम गव्हर्नंस किंवा होम रुल ह्या विचाराकडे पाहिले म्हणजे आपणास टिळकांनी वापरलेला स्वराज्य हा शब्द आणि हेन्री कॉटननी वापरलेला त्यांचा पर्यायी इंग्रजी शब्द हा एका अर्थाचा नाही हे कळेल. ह्या सर्व पार्श्वभूमीवर भारतातील प्रबोधनाचा किंवा नवजागरणाचा विचार केला पाहिजे. प्रथमत: जागरण हे जागरण असते. राजकीय आणि सामाजिक प्रबोधन हे वेगळे असते असे समजण्याचे कारण नाही. खरे तर राजकीय जागरण सामाजिक जागरणाचाच एक भाग असतो. खरे खरे जागरण हे सामाजिकच असते. असे जागरण करावयाचे असेल तर समाजातील एक घटक मोठा आणि एक लहान, एक महत्वाचा आणि दुसरा क - पदार्थ असे समजून चलावयाचे नाही. कायद्यात सर्व घटक समान असतात असेच ह्या मागील तत्त्व आहे. अर्थात प्रत्यक्षात सर्वच घटक समान असतात. नियम सर्वांकरिता एकच पाहिजे. त्याकरिता समतेबरोबरच बंधूभावाचाही विचार केला पाहिजे. समता हे ध्येय असते. पण प्रत्यक्षात समता नसतेच. त्याकरिता असमान घटकांनाही एकत्र बांधून ठेवू शकेल असा बंधूभाव पाहिजेच. आपला समाज हा अशा बंधूभावाच्या समता ध्येय असलेल्या बंधूभावाच्या तत्त्वावर आधारलेला नव्हता. त्यामुळेच अस्पृश्यतेसारखे सामाजिक रोग आणि स्त्री-पुरुषांतली विषमता निर्माण झाली. त्यामुळेच निरनिराळ्या घटक--राष्ट्रकांचे एकजिनसी राष्ट्र न बनता निरनिराळ्या जाती उत्पन्न झाल्या. समाजातील निरनिराळ्या घटकांकरिता निरनिराळे नीतीनियम आणि समाजनियम उत्पन्न झाले. त्यातूनच विषमतेचे प्रमाण अधिक वाढले. समान संधी समाजातील प्रत्येक घटकाला मिळालीच पाहिजे पण समान संधी म्हणजे समता नव्हे विषम व्यवस्थेत सुध्दा समान संधी देता येते. ती समाजव्यवस्थेला आवश्यक आहेच. पण तेवढे झाले म्हणजे झाले असे म्हणून उपयोगी नाही. शोषण आणि भ्रष्टाचार या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, हे पण समजले पाहिजे. शोषण असेल तेथे भ्रष्टाचार आणि लबाडी येणार आणि भ्रष्टाचार असेल तर तेथे पुढल्या पायरीवरील शोषण पण येणारच. हे टाळायचे असेल तर समाज घटकांत एक न्यायबुध्दी सूध्दा उत्पन्न झाली पाहिजे. ती मुळात असतेच. पण सामाजिक विकृतीतून त्यावर राखेची पुटे जमलेली असतात. प्रबोधनाच्या चळवळीकडे या सर्वांगानी व ऐतिहासिक पार्श्वभूमीवर पाहिले पाहिजे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

||२||

सामाजिक प्रबोधनाची वाटचाल

कै. गंगाधर बाळकृष्ण सरदार

गेल्या दीडशे वर्षात भारतात, आणि विशेषत: महाराष्ट्रात जे प्रबोधन झाले, त्याची रुपरेषा आपण समजाऊन घेणार आहोत. प्रबोधनाचा नवनिर्माणाशी काय संबंध, असे वाटण्याचा संभव आहे. परंतु आपल्याला नवसमाज निर्माण करावयाचा आहे. नव्या जीवनमूल्यांच्या सदर्भात आपल्या विद्यमान सामाजिक जीवनाला आपण जो आकार देणार आहोत, तो आकार वस्तुत; वास्तवालाच द्यावयाचा असतो. न्या. रानडे यांनी म्हटल्याप्रमाणे 'He has to produce the ideal out of the actual, and with the help of the actual' समाजाचा शिल्पकार, त्याच्या अवती–भोवती जे प्रत्यक्ष वास्तव असते, त्याच्यातूनच आणि त्याच्या सहाय्यानेच आपल्या आदर्श कल्पनेला मूर्तरुप देत असतो. कारण पोकळीत काहीच उभे करता येत नाही. आजच्या आपल्या प्रश्नांना सामोरे जाऊनच आपल्याला नवे काही घडवता येईल. राखीव जागांचा प्रश्न, भाषा–भाषांतील तंटे, वर्गीय तणाव, या सर्व समस्या काही अकस्मात निर्माण झालेल्या नाहीत. त्यांची पाळेमुळे आपल्या गतेतिहासात खोलवर रुजलेली आहेत. म्हणूनच आपल्या समोरील आजच्या या समस्या कशा निर्माण झाल्या, त्यांची वास्तवातील बलस्थाने कोणती, त्या इतका काळ टिकून का राहिल्या, आणि इतके प्रयत्न करुनही त्या समाधानकारकतेने सुटत का नाहीत, याचा विचार आपण केला पाहिजे

गेल्या दीडशे वर्षात आपल्या समाजात फार मोठे दल झाले. मागच्या दीड हजार वर्षात जे काही बदल झाले त्याच्या कितीतरी पट वेगाने बदल या दीडशे वर्षा–तील पहिल्या शंभर वर्षात झाले, आणि त्याहीपेक्षा अधिक गतीने पुढच्या पन्नास वर्षात झाले. या बदलांचे स्वरुप समजावून घेताना कांही व्यक्तीचे उल्लेख येतील. पण ऐतिहासिक दृष्टया केवळ थोर व्यक्ती म्हणून त्यांचा विचार करणे फलदायी होणार नाही. तर निरनिराळ्या प्रवाहांचे प्रतिनिधी किंवा प्रणेते म्हणूनच आपण त्यांच्याकडे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पाहिले पाहिजे. म. फुले, न्या. रानडे, लो. टिळक, म. गांधीजी किंवा डॉ. आंबेडकर यांना आपण युगप्रवर्तक नेते म्हणतो, तेव्हा त्या त्या युगातल्या प्रेरणा आणि प्रवाह कोणते होते, आणि त्यांच्या परस्परसंबंधातून वास्तव कसे घडत गेले हे ध्यानात घेणे आवश्यक आहे.

महाराष्ट्राच्या या दीडशे वर्षांच्या इतिहासाला भारतीय प्रबोधनाची पार्श्वभूमी आहेच. पण आपण तपशील जो पहाणार आहोत तो मुख्यत: महाराष्ट्रापुरता. कारण आपल्याला काम येथेच करायचे आहे.

गेल्या हजार वर्षांमध्ये आपल्या समाजात राजकीय स्थित्यंतरे पुष्कळ झाली. यादवांचे राज्य जाऊन बहामनी राज्य आले. त्यानंतर आदिलशाही, निजामशाही इत्यादी राजवटी अस्तित्वात आल्या. पुढे मराठे, पेशवे हे सत्तेवर आले. हा इत्थंभूत इतिहास सर्वपरिचित आहे. अशा तऱ्हेची राजकीय स्थित्यंतरे झाली. पण त्यामुळे सामाजिक जीवनात काही मूलगामी बदल घडून आला नाही. शतकानुशतके वहिवाटीत असलेल्या जातिव्यवस्था, ग्रामसंस्था ह्या त्यापुढेही तशाच चालू राहिल्या. सामाजिक स्थित्यंतराला सुरुवात ब्रिटिश राज्य इथे आल्यानंतर झाली. त्या पूर्वीच्या समाजात बदल होतच नव्हते असे नाही. परंतु त्यामुळे एकंदर समाजव्यवस्थेची चौकट बदलण्याइतके ते प्रभावी नव्हते. प्राचीन युगातून आपण मध्ययुगात आलो, त्यावेळी जे परिवर्तन झाले, तेवढेच. त्यानंतर मध्ययुगाच्या हजार वर्षात, ज्याला सामाजिक क्रांती म्हणता येईल अशा तऱ्हेचा मूलगामी, सर्वंकष बदल आपल्या परंपरागत समाजव्यवस्थेत घडून आला नाही. ब्रिटिश इथे आल्यानंतर या राजकीय स्थित्यंतराच्या पाठोपाठ सामाजिक परिवर्तनाची मुहूर्तमेढ रोवली गेली. म्हणून ब्रिटिशांचे राज्य इथे येण्यापूर्वीच्या काळात आपला समाज कोणत्या अवस्थेत होता, पुढे त्यात बदल कोणते झाले, आणि ते का झाले, याचा विचार आपल्याला करावा लागणार आहे.

ब्रिटिशपूर्व समाज

१८१८ मध्ये पेशवाई बुडाली. 'तिथून आपल्या सामाजिक इतिहासात एक नवे पर्व सुरु झाले. त्याकाळी आपला समाज कसा होता? त्यावेळच्या एकूणच भारतीय समाजाची व विशेषत: महाराष्ट्रीय समाजाची पाचसहा ठळक वैशिष्ट्ये आपल्याला जाणवतात. मध्ययुगात केवळ आपल्याकडेच नव्हे तर सबंध जगभर सामाजिक जीवनाच्या सर्व अंगावर धर्माचा प्रभाव होता. धर्म हा ईश्वरप्रणीत व सनातन मानला जात होता. तो नित्य, अविचल व अपरिवर्तनीय असा होता, आर्थिक, राजकीय, कौटुंबिक अशा सर्व क्षेत्रात विधिनिषेधात्मक आचारधर्माचे प्राबल्य होते. लोहार, सुतार, कुंभार इत्यादी कामगारांचे व्यवसाय हाही त्यांचा धर्मच, अशी तत्कालीन समजूत होती. पत्नीधर्म, सेवकधर्म, राजधर्म, कुलधर्म, वर्णधर्म इत्यादी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

संग्रामधून धर्मकल्पना त्या काळी किती व्यापक आणि सर्वसमावेशक होती ते ध्यानात येते.

त्यावेळच्या आपल्या जीवनसरणीमध्ये 'धारणा' हे मूल्य होते. धारणा म्हणजे टिकून राहणे. परंपरा, चालीरीती, सामाजिक संस्था हे सर्व टिकून राहणे याला महत्त्व होते. व्यक्तीचे अंतिम श्रेय हे मोक्ष होते, तर धारणा हे समाजाचे महत्त्वाचे कार्य होते. जुन्या चालीरीती, संस्था, तत्त्वज्ञान याला चिकटून राहायचे ही धारणा होती. एखादी गोष्ट पिढयान्पिढया चालत आलेली आहे, तीत बदल झालेला नाही, ही अभिमानाची बाब समजली जात असे. सर्व जीवनावर धर्मांचे नियंत्रण होते. आणि धर्माचा अर्थच मुळी 'जो (समाजाची) धारणा करतो तो धर्म'. विकासाची, परिवर्तनाची कल्पना मान्य नव्हती. याचा अर्थ प्रगती अजिबात होत नव्हती असा नव्हे. व्यक्तिविकास, सामाजिक प्रगती, व्यवसायस्वातंत्र्य इत्यादी कल्पना आधुनिक काळात उदयाला आल्या. म्हणजे काही त्यापूर्वी व्यक्तित्वसंपन्न लोक होतच नव्हते, असे नाही. पण मूल्य म्हणून व्यक्तिला स्वतंत्र स्थान नव्हते. बदल होतच होता. कोणताही समाज स्थिर, अपरिवर्तनीय असा राहूच शकत नाही. म्हणून तर मनुस्मृतीनंतरही आपल्याकडे अनेक स्मृती निर्माण झाल्या. या नंतरच्या स्मृतिकारांनी बदललेल्या परिस्थितीनुसार आचारधर्मात यथायोग्य बदल करुन ते स्मृतिशास्त्रात समाविष्ट केले. मात्र हे बदल करतांना ते मनुस्मृतीशी सुसंगत आहेत हे दाखवण्याचा त्यांनी आटोकाट प्रयत्न केला. त्याद्वारे जुन्या परंपरेशी आपले अनुसंधान त्यांनी कायम ठेवले. कारण बदल हा स्वागतार्ह मानला जात नव्हता. न बदलणे हेच महत्त्वाचे होते. या दृष्टीने धर्मातील आचार–विचार बदलत गेले तरी धर्माचे शाश्वत, चिरंतन स्वरुप कायम होते, आणि त्याचा आपल्या जीवनावरील सर्वंकष प्रभावही कायम होता.

त्या काळच्या समाजाचे आणखी एक वैशिष्टय म्हणजे शास्त्रप्रामाण्य. भारतीय संस्कृतीत नीतिअनीती, कार्याकार्यविवेक, विधिनिषेध इत्यादी सर्व बाबतीत पुरातन धर्मशास्त्र हेच प्रमाण. त्यामुळे आजची गरज काय, हा प्रश्नच उद्‌भवत नव्हता. शास्त्रप्रामाण्याच्या जोडीला खेडयापाडयांत रुढिवादाला महत्त्व होते. सर्वसामान्य लोक रुढीला चिकटून राहत असत. शास्त्रांनीही रुढिपरंपराची दखल घेतलेली होती. हिंदू धर्मशास्त्र म्हणजे स्मृतिग्रंथ. स्मृतीमध्ये ज्या सामाजिक संस्था, आचार–विचार आणि विधिनिषेध आहेत, ते स्मृतिकारांनी स्वतः निर्माण केलेले नाहीत कोणी कितीही महान धर्मशास्त्रवेत्ता झाला तरी तो आपल्या इच्छेनुसार समाजव्यवस्था निर्माण करु शकत नाही. समाजात जे आचारविचार रुढ असतात, ज्या सामाजिक सस्था पवित्र मानल्या जातात, त्यांचे संहितीकरण तो करतो इतकेच. अशा संहितीकरणाने त्या समाजव्यवस्थेला बळकटी येते हे खरे. पण तो स्मृतिकार त्या व्यवस्थेचा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

निर्माता असतो असे समजणे बरोबर नाही. मनू, याज्ञवल्क्य इत्यादिकांच्या स्मृती घेतल्या तर ज्या संस्था समाजात प्रचलित होत्या त्यांच्यात सुसूत्रता आणण्याचे काम त्यानी केले आहे. सर्व रुढीही त्यांनी विचारात घेतल्या आहेत. ज्ञानेश्वरीमध्ये म्हटले आहे की 'येथ वडील जे जे करिती । तया नाव धर्मु ठेविती' पूर्वांपार चालत आला आहे तोच धर्म. संशय निर्माण झाला तर गावातील चार ज्येष्ठ लोक सांगतील ते योग्य. खेड्यापाड्यांत शास्त्राचा प्रत्यक्ष संबंध नसे. विद्येची दरवाजे फक्त त्रैवर्णिकांनाच खुले होते. ते शास्त्राचा काथ्याकूट करीत. खेड्यांमध्ये गावपंचायत किंवा जातपंचायत ही रुढी पाहुन त्यानुसारच धर्माधर्मांचा निर्णय करीत असे. पण हा सर्वत्र प्रचलित असलेला धर्म, मग तो शास्त्रविहित असो किंवा रुढिप्रणीत, तो अनादी आणि शाश्वत आहे याबद्दल कुणालाच शंका नव्हती.

भारतीय समाजाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे समुच्चयात्मकता. आपल्या समाजात एक देव, एक धर्म, एक प्रमाणग्रंथ, एक उपासनापद्धती, एक समाज अशी एकात्मता नाही. अनेक जातींचा समुच्चय म्हणजे समाज, अनेक गावांचा समुच्चय म्हणजे देश, आणि अनेक संप्रदायांचा समुच्चय म्हणजे धर्म. धर्माचरणाच्या प्रेरणेत व्यक्तिगत परमार्थसिद्धीला किंवा कामनापूर्तीलाच प्राधान्य होते. मी धर्मपालन केले म्हणजे, आणि तरच, मला मोक्ष मिळेल, किंवा माझी लौकिक इच्छा पूर्ण होईल, अशी जनसामान्यांची भावना होती. पण धर्माने वेगवेगळ्या जातींना नेमून दिलेली वंशपरंपरागत कामे हा समाजव्यवस्थेच्या एकसूत्रीकरणाचा भाग आहे, याची लोकांना जाणीव नव्हती. अस्मिता ही गावकी आणि जात यांच्याशी निगडित होती. 'तू कोण आहेस?' याला उत्तर अजूनही जातीच्या स्वरुपात येते याला कारण हेच आहे. गावकीचे निर्बंध कधीच मोडले जात नसत. शतकानुशतके टिकून राहिलेल्या ग्रामसंस्थेला पावित्र्य लाभले होते. तसेच पावित्र्य जातिसंस्थेलाही आले होते. समाजापेक्षाही जात महत्त्वाची. त्यामुळे आजच्या अर्थाने सामाजिक जाणिवा निर्माण झाल्याच नव्हत्या. आणि असल्याच तर त्या अगदी क्षीणबल होत्या. 'मी हिंदू आहे' अशी स्वत:ची ओळख कधी कोणी करुन देत नव्हते. 'हिंदू' हा शब्द परकीयांनीच आपल्याला लावला आहे. त्याआधी आपल्याकडे 'वैदिक धर्म', 'आर्यधर्म' या संज्ञा होत्या. वैदिक परंपरेत त्रैवर्णिकांना प्रतिष्ठा होती, शूद्रातिशूद्रांच्या वाट्याला गुलामगिरीचेच जिणे आले होते. हिंदू उपासनासंप्रदाय घेतला तरी त्यात एकेश्वरवाद नाही. आणि दोन पाच नाहीत, तर चांगले तेहतीस कोटी देव. कोणी देवीचा भक्त तर कोणी गणपतीचा. कोणी शैव तर कोणी वैष्णव. यामुळे आपल्या समाजात एकात्मता निर्माण झाली नाही. म्हणूनच परकीय आक्रमणांना आपल्याकडे एकजुटीने प्रतिकार होऊ शकला नाही. काही राजांनी तर शेजारची राज्ये जिकण्यासाठी परकीयांची मदत घेतली. आपण हिंदू एक आहोत, आपला देश एक आहे, अशी जाणीव प्रबळ नव्हती.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तात्त्विक बाबतीत आपल्याकडे पूर्ण स्वातंत्र्य होते. बायबलचा अर्थ नव्याने, स्वतंत्रपणे सांगू पाहणाऱ्या ब्रूनोला युरोपात जिवंत जाळले गेले. वैदिक मताचे खंडन करणाऱ्या चार्वाकाला असा शारीरिक छळ सहन करावा लागला नाही. एवढेच नव्हे तर सर्वदर्शनसंग्रहात त्याच्या तत्त्वज्ञानाचाही समावेश केला गेला. तात्त्विक चर्चेला एवढी मोकळीक, एवढा उदारपणा होता. पण दुसरीकडे व्यवहारात मात्र कमालीचा बंदिस्तपणा आणि असहिष्णुता. जातीचा लहानसहान नियमही मोडण्याची कोणाची प्राज्ञा नव्हती. सामाजिक प्रतिष्ठा ही फक्त जातीमार्फतच मिळत होती. जातिबहिष्कृत होणे म्हणजे समाजात स्थान नसण्यासारखेच होते. ज्ञानेश्वरांना वाळीत टाकले म्हणून त्यांची मुंज होऊ शकली नाही. आणि म्हणूनच त्यांना ब्राम्हणाचा दर्जा आणि सन्मानही नव्हता. हिंदू समाजात प्रत्येक व्यक्ती ही कोणत्या ना कोणत्या जातीची असली पाहिजे, ही मध्ययुगाची घडण होती.

ब्रिटिश इथे आले त्यावेळची आपली सामाजिक स्थिती अशा प्रकारची होती. याउलट ब्रिटिशांची जीवनसरणी आधुनिक वळणाची होती. त्यांच्याकडे लोकशाही सुस्थिर झालेली होती. इंग्रजी राजवट हे पूर्वीच्याप्रमाणे केवळ एक राजकीय स्थित्यतर नव्हते, तर ती एका सामाजिक परिवर्तनाची सुरुवात होती. हे मन्वन्तर आताच का घडले, हे समजून घेण्यासाठी इंग्रजी शासनपद्धतीचे वेगळेपण नेमके काय होते हे जाणून घेणे इष्ट ठरेल.

पूर्वी कधी नव्हता इतक्या मोठ्या भूप्रदेशावरचा इंग्रजांचा एकछत्री अंमल हा काही प्रमाणात आपल्यामध्ये एकराष्ट्रीयत्वाची जाणीव निर्माण करण्यास पोषक ठरला. शिवाय इंग्रजांनी देशभर एकच एक शासनपद्धती लागू केली. तलाठ्यापासून ते व्हाइसरॉयपर्यंत एक सुनियंत्रित यंत्रणा त्यांनी निर्माण केली. या सर्व राज्याला एकच एक कायदा त्यांनी लागू केला. इंग्रज आपल्या राज्याला 'कायद्याचे राज्य' म्हणत. याचा अर्थ पूर्वीच्या राजवटीत कायदे नव्हते असे नाही. मनुस्मृती वगैरे कायदेच होते. परंतु त्यांना धार्मिक आणि त्यातही दैवी अधिष्ठान होते. ते अपरिवर्तनीय असे होते. याउलट इंग्रजी कायदा ही एक धर्मनिरपेक्ष, इहवादी (सेक्यूलर) संकल्पना होती. कायदे माणसांनी आपल्या सोयीसाठी बनवलेले आहेत आणि गरजेनुसार त्यात बदल करता येतो, याला त्यामध्ये मान्यता होती.

नव्या राज्यव्यवस्थेमुळे अर्थव्यवस्थेतही बदल व्हायला सुरुवात झाली. १८५३ नंतर इथे आगगाडी आली. परदेशी स्वस्त माल सर्वत्र मिळू लागल्यावर इथल्या कारागिरांचे जुने वंशपरंपरागत उद्योगधंदे बसले. स्वयंपूर्ण ग्रामव्यवस्था मोडकळीस आली आणि बलुतेदार बेकार झाले. ही नवी अर्थव्यवस्था आणि इथली जुनी अर्थव्यवस्था यांच्यात गुणात्मक फरक होता. पूर्वीच्या व्यवस्थेत जातीनुसार कामाची विभागणी झालेली होती. कोणी कोणते काम करायचे हे जन्मावरून ठरलेले होते.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्याचा मोबदलाही निश्चित केलेला होता. त्यात स्पर्धेला वाव नव्हता. उत्पादनयंत्रणा ही कुटुंबाधिष्ठित होती. नव्या अर्थव्यवस्थेत व्यक्ती ही मूलभूत घटक बनली. व्यक्ती–व्यक्तींमध्ये स्पर्धा सुरु झाली. दळणवळणाच्या साधनांच्या प्रसाराबरोबर ही नवी अर्थव्यवस्था सगळीकडे पसरली व रुजली. पण तिचे परिणाम शहरांमध्ये तावडतोब दिसून येऊ लागले. कारण गिरण्या सुरुवातीला तिथेच स्थापन झाल्या.

तिसरी गोष्ट म्हणजे इंग्रजी शिक्षण. इंग्रजी विद्येमार्फत इथल्या नवशिक्षि–तांना आधुनिक जगताची पहिल्या प्रथमच ओळख झाली. त्यांच्या जाणिवा व्यापक होऊ लागल्या. इंग्लंडच्या जनतेने खुद्द आपल्या राजाशी सातत्यानें झगडा करुन राज–कीय हक्क प्राप्त करुन घेतले आणि यथावकाश लोकशाही राज्यपद्धती विकसीत केली. हा इतिहास वाचून इथल्या सुशिक्षित वर्गात नव्या प्रेरणा, नव्या आकांक्षा जाग्या झाल्या.

इंग्रजांच्या शिक्षणविषयक धोरणाचे आणखी एक वैशिष्टय हणजे शिक्षण. हे पूर्वीप्रमाणे त्रैवर्णिकांचे मिरास न राहता त्याची द्वारे तत्त्वत: सर्वांना खुली झाली. मात्र या धोरणाची प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना शासनाची राजकीय गरज आणि इथली सामाजिक परंपरा, यांची त्यांनी कटाक्षाने दखल घेतली होती. १८५८ पर्यंत सरकारी शाळांमधूनही अस्पृश्यतांना प्रवेश दिला जात नव्हता. पण हळूहळू ही परि–स्थिती बदलली. जे तत्त्वतः मान्य झालेले होते, ते मंदगतीने का होईना, पण प्रत्यक्षात यायला सुरुवात झाली. पूर्वी स्त्रिया आणि शूद्रातिशूद्र यांना शिक्षणाचा अधिकार नव्हता. त्यांच्या वाट्याला दिलेली कामे हलकी समजली जात होती. आणि ज्या सामाजिक संस्थांच्या द्वारे ही कामे त्यांच्यावर लादण्यात आली होती, त्या संस्थांची मीमांसा करण्याचा त्यांना काही अधिकार नव्हता. त्यामुळे इथल्या बहुसंख्य जनतेचा नेहमीच कोंडमारा होत होता. इंग्रजी राज्यातील विद्येच्या सार्वत्रिक प्रसारामुळे हा कोंडमारा कमी होण्यास मदत झाली. अर्थात खेड्यापाड्यापर्यंत शिक्षणाचे लोण पोंहोचण्यासाठी खूपच कालावधी जावा लागला.

इथल्या समाजमानसावर प्रभाव टाकणारी आणखी एक गोष्ट म्हणजे खिस्ती धर्मोपदेशकांचे कार्य. शिक्षणप्रसार हे त्यांच्या धर्मप्रचाराचे प्रमुख अंग होते. त्यांनीच इथे पहिल्या प्रथम मुलींच्या शाळा काढल्या. मुंबईला या मिशनऱ्यांच्या शाळांतून दोनशेच्यावर संख्येने मुली शिकत असत. बालविवाहाची पद्धत रुढ असल्याने पुढे त्यांचे शिक्षण चालू राहत नसे ही गोष्ट वेगळी. पण मिशनऱ्यांच्या या शिक्षणक्षेत्रा–तील कार्यामुळे तळचा समाज जागा झाला. महात्मा जोतीराव फुले हे मिशनऱ्यांच्याच शाळेत शिकले, आणि त्यांच्यापासूनच स्फूर्ती घेऊन त्यांनी मुलींसाठी व महारामांगा–साठी शाळा काढल्या. एखादे विशिष्ट सामाजिक कार्य हे आपले जीवितकार्य मानून त्यासाठी सर्वस्व वेचण्याच्या वत्तीची एक परंपराच आपलेकडे महर्षी शिंदे यांच्यापासून

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ते महात्मा गांधीपर्यंत तयार झालेली दिसते, त्यामागे या ख्रिस्ती मिशनऱ्यांकडून घेतलेली 'मिशन' ची कल्पनाच पायाभूत आहे. महर्षी विठ्ठल रामजी यांनी आपण काढलेल्या 'डिप्रेस्ड क्लासेस मिशन' या संस्थेच्या नावातच ती अंतर्भूत केली. विवेनंदांनी आपल्या गुरुंच्या स्मृत्यर्थ काढलेल्या संस्थेलाही 'रामकृष्ण मिशन' असेच नाव दिले. 'मिशन' मध्ये केवळ परोपकाराची भावना नाही, तर 'जनसेवा हीच ईश्वरसेवा' ही कल्पना त्यामागे आहे. एखाद्या गांजलेल्या दयाबुद्धीने तात्पुरती मदत करणे वेगळे, आणि आपण सारीच ईश्वराची लेकरे आहोत, या बंधुभावाच्या कल्पनेतून जाणीवपूर्वक आणि संघटितपणे माणसांची सेवा करणे वेगळे. आपल्याकडे परोपकार नव्हता असे नाही. पण त्याचे सुसंघटित रुप आपल्याला मिशनऱ्यांच्या कार्यातून पहायला मिळाले. त्यांनी काढलेले दवाखाने, शाळा, छापखाने यांच्यापासून आपल्याकडच्या अनेक समाजसुधारकांना संस्थात्मक स्वरुपातील समाजकार्याची प्रेरणा मिळाली.

अशा रीतीने इंग्रजी अंमल इथे सुरु झाल्यावर नवी एकजिनसी शासनपद्धती नवी स्पर्धाप्रधान अर्थव्यवस्था, सार्वत्रिक इंग्रजी शिक्षण आणि ख्रिस्ती धर्मोपदेशकांचे मानवतावादी कार्य, यांच्यामुळे आपल्या समाजात लक्षणीय बदल घडून येण्यास सुरुवात झाली.

विज्ञान आणि धर्म

भारतात ब्रिटिशांची राजवट सुरु झाल्यानंतर त्यायोगे आपल्याला दोन नव्या शक्तींची ओळख झाली. त्या म्हणजे विज्ञान आणि ख्रिस्तप्रणीत ईश्वरनिष्ठ मानवताधर्म. विज्ञानाच्या शक्तिची जाणीव आपल्याला इंग्रजी विद्येमधूनच झाली त्याच्या आधी विज्ञानाचा पद्धतशीर अभ्यास आपल्याकडे नव्हता. शिक्षण म्हणजे प्राय: धर्मशिक्षण होते. धर्मग्रंथांचा आणि फार तर कालिदासादिकांच्या काव्यनाटकांचा अभ्यास एवढ्यापुरतेच आधी शिक्षण मर्यादित होते. इंग्रजी शिक्षणातून पदार्थविज्ञान, रसायन, भूगोल इत्यादी शास्त्रांची आपल्याला ओळख झाली. त्यांचा अभ्यास येथे नव्याने सुरु झाला.

तितकीच महत्त्वाची दुसरी गोष्ट म्हणजे ख्रिस्तप्रणीत सेवाप्रधान मानवतावाद. ख्रिस्ती धर्मोपदेशकांच्या कार्यामुळे 'जनसेवा ही ईश्वरसेवा' या तत्त्वाचा आपल्या समाजचिंतकांच्या मनावर फार मोठा प्रभाव पडला. ईश्वरनिष्ठ निखळ मानवतावादाच्या कल्पनेची आपणास प्रथम ओळख झाली. मानवाच्या जीवनावर ठसा उमटवणाऱ्या या दोन्ही प्रबळ शक्ती आहेत. त्यापैकी कोणत्या शक्तीचा आपल्यावर विशेष प्रभाव पडला हे पाहिले तर तो धर्माचाच होय. आपल्याकडचे बहुतेक सारे लोकप्रिय समाजसुधारक धर्मनिष्ठ आहेत. पंडित नेहरुंचा अपवाद वगळता राजा राममोहन रॉय यांच्यापासून ते म. गांधी यांच्यापर्यंतचे सर्व राष्ट्रनेते तर धर्मश्रद्ध होतेच, पण म. फुले आणि डॉ. आंबेडकर यांच्यासारख्या परंपरागत धर्मावर प्रहार

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

करणाऱ्या दलित–शोषित वर्गातील क्रांतिकारक नेत्यांनीसुद्धा आपल्या कार्यासाठी धर्मतत्त्वाचाच आधार घेतला. अनुयायीवर्गावर धर्मभावनेचे वर्चस्व असल्यामुळे असेल कदाचित, पण दलित समाज, बहुजनसमाज व उच्चवर्णीय या तिन्हीं थरांतील लोकप्रिय नेत्यांच्या विचाराला आणि कार्याला धर्माचे अधिष्ठान होते असे आपल्याला दिसून येते.

आता आपल्याकडे विज्ञानाच्या तंत्राचा प्रसार खूप झाला आहे. पण विज्ञाननिष्ठ दृष्टिकोण निर्माण झाला आहे असे मात्र म्हणता येणार नाही. सर्वसामान्य लोक तर सोडाच, पण विज्ञान विषय शिकवणारे प्राध्यापक आणि शास्त्रज्ञही प्रयोगशाळेत विज्ञानाचे सर्व नियम समजावून घेतात व देतात, आणि बाहेर भाविकपणे शिर्डीच्या वाऱ्या करतात. मग त्यावेळच्या लोकसंग्रहाची कास धरणाऱ्या पुढाऱ्यांमध्ये धार्मिकतेचा प्रभाव असल्यास नवल नाही. कारण तेव्हा जीवनाच्या सर्व क्षेत्रांवरच धर्माचे अधिराज्य होते, हे आपण मागे पाहिलेच आहे.

स्वातंत्र्य चळवळीच्या वाटचालीबरोबर इथे जो ध्येयवाद आकार घेऊ लागला, आणि जो आपण स्वीकारला, त्यात तत्त्वतः धर्मनिरपेक्षतेचा पाया होता. आपल्या प्रत्यक्ष व्यवहारात मात्र धर्मनिष्ठ मानवतावादच प्रबळ राहिला. हा अंतर्विरोध आपल्या सामाजिक जीवनात आजतागायत तग धरुन राहिला आहे.

हा आणि इतरही अंतर्विरोध दूर करण्यासाठी बदल जो करायचा तो कसा करायचा? प्रबोधन हे बदलाच्या प्रक्रियेतील एक महत्वाचे साधन आहे. प्रबोधन म्हणजे केवळ ज्ञानप्रसार नव्हे, तर ती लोकांना कार्यप्रवण करणारी एक चळवळ झाली पाहिजे, तिला निश्चित दिशा असली पाहिजे आणि तिच्या कार्यवाहीत पद्धतशीरपणा असला पाहिजे. ती परिवर्तनाच्या ध्येयाला बांधलेली लोकजागृतीची चळवळ बनली पाहिजे. खरे म्हणजे आपली इच्छा असो वा नसो, समाजात बदल हा सतत होतच असतो. बदल हे मूल्य म्हणून जेव्हा समाजात मानले गेले नव्हते त्यावेळीही समाज बदलतच होता. जीवन हे प्रवाही आहे. 'संसार' 'जग' या संज्ञामध्येही गती अभिप्रेत आहे. 'जगत्' या शब्दातच गतिमानता अंतर्भूत आहे. जे चालते ते जग (संस्कृतात गम्–जाणे). चैतन्यमय जीवनाचा प्रवाह कधीच स्थिर नसतो. लोकांच्या जाणिवा मात्र स्थिर, जड राहू शकतात. मध्ययुगातील मूल्यसरणीत स्थितीवादाला महत्व होते. आता तसे नाही. व्यवहार बदलत गेला आणि जाणिवा त्याच राहिल्या तर त्यांच्यात जो विसंवाद निर्माण होतो, त्याचे निराकरण करण्याची आवश्यकता साहजिकच समाजचिंतकांना जाणवते. त्या दृष्टीने ते जे लोकजागृतीचे कार्य करतात त्यालाच आपण प्रबोधन म्हणतो. येथेच माणसाचे एक अनन्यसाधारण वैशिष्टय आपल्या ध्यानात येते. मनुष्य हा सर्जनशील प्राणी आहे. त्याला जाणीव आहे, विचार आहे इतर प्राण्यांमध्ये जाणिवा, कल्पना अजिबात नसतात असे नाही. मुंग्याची वारुळे,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मधमाशांची पोळी यांच्यात आपल्याला विलक्षण कलाकता प्रत्ययाला येते. पण ही वारुळे आणि पोळी शतकानुशतके तशीच चालत आली आहेत. याउलट मानवाच्या जीवनसरणीत जात्याच प्रगमनशीलता आहे. मोडक्यातोडक्या पर्णकुटीपासून गगनचुंबी इमारतीपर्यंत त्याने मजल मारली आहे. जे दृश्यमान आहे, जे ज्ञात आहे, जे हस्तगत झालेले आहे, त्याच्या पलीकडे जाण्याची माणसाला ओढ असते. 'जीवाचा जणु हाचि धर्म दिसतो, जावे पुढे त्या पुढे', कसे कवी 'बी' यांनी म्हटले आहे. अज्ञाताकडे सतत झेप घेणे हा माणसाचा जणू धर्मच आहे. त्यातूनच त्याची विद्याभिवृद्धी, कलोपासना आणि तत्त्वान्वेषण ही उदयास आली आहेत. प्रत्यक्ष अनुभव, प्रयोगशीलता आणि औपपत्तिक चिकित्सा यांच्याद्वारे अज्ञाताला ज्ञाताच्या कक्षेत आणणे यालाच आपण विज्ञान म्हणतो. विज्ञान हे माणसाच्या या सीमोल्लंघनाच्या प्रेरणेतून निर्माण झालेले आहे. स्वतःच्या मर्यादा ओलांडून पुढे जाण्याची, स्वतःला विकसित करण्याची माण-साची अविरत धडपड चालू असते. त्यातूनच त्याची संस्कृती जन्म घेते. मनुष्येतर प्राणी बव्हंशी प्राकृतिक जीवन जगत असतात. निसर्गाने त्यांना जे देणे दिलेले असेल त्या भांडवलावर ते आपला निर्वाह करतात. त्यांची उपजत बुद्धी भले कितीही आश्चर्यकारक व कौतुकास्पद असली तरी त्यात बदल, विकास होत नाही. पण आदिमानवापासून आतापर्यंत माणसाचा केवढ्यातरी मोठ्या प्रमाणात सर्वांगीण विकास होत आला आहे. त्यातून अनेक प्रश्नही निर्माण झाले आहेत. पण ते प्रगतीचेच निदर्शक आहेत. आहे त्या चाकोरीत सहजप्रवृत्तीने संपूर्ण जीवन घालवण्यामध्ये कदा-चित काही गुंतागुंत, काही प्रश्न नसतील, पण मग त्यात प्रगतीही नसते. माणूस आहे त्यात कधी समाधानी नसतो, आणि यातच त्याच्या प्रगतीचे बीज आहे. 'तमसो मा ज्योतिर्गमय' ही पुरातन ऋषिप्रणीत प्रार्थना सर्वश्रुत आहे. माणूस जरी अंधारात चाचपडत असला तरी तो प्रकाशाची आराधना करीत असतो. इच्छा स्वातंत्र्य आहे. निवडीचे स्वातंत्र्य आहे. तो उपजत प्रेरणांचा गुलाम नाही. त्याचा प्रवास अज्ञाना-पासूनच सुरु झाला आहे हे उघड आहे. ज्यांचे त्याला आकलन होत नव्हते अशा बादळ, वीज, पाऊस, वणवा यासारख्या घटना, इतकेच काय रोज नियमाने रात्रीचा अंधार दूर करणारा सूर्य आणि लहानमोठा होत जाणारा चंद्र, या सर्वांसमोर तो पदोपदी विनम्र होत होता. भीतीने व अगतिकतेने नाक घासत होता. कोणताही अनाकलनीय घटना दृष्टीस पडली म्हणजे त्यात काहीतरी दैवी शक्ति आहे अशी त्याची भावना होत होती. तो जड वस्तूंमध्ये देव पाहत होता. माणसाच्या इतिहासात पाषाणपूजा आहे, प्राणिपूजा आहे, निसर्गाची आराधना आहे हे सर्व आहे हे तर खरेच, पण तो तेथेच थांबला नाही हे महत्त्वाचे आहे. ज्यांच्याबद्दल अज्ञान होते आणि त्यामुळे भीती होती, किंवा जीवनसंघर्षात ज्या गोष्टींचा त्याला उपयोग होत होता अशा सर्वांना त्याने देव मानले होते. पण तो परिस्थितीचा केवळ गुलाम बनून राहिला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

नाही. एका बाजूला प्राप्त परिस्थितीपुढे तो नमते घेत होता, परंतु दुसऱ्या बाजूला आपल्या कुवतीनुसार कळत न कळत तो तिच्याशी झगडतही होता. परिस्थितीला भिडण्याची आणि तिच्यावर मात करण्याची ही जी त्याच्यातील जिद्द आहे तिने त्याला कुठच्याकुठे नेऊन ठेवले आहे. बदलणाऱ्या परिस्थितीचे ज्ञान करुन घेणे. तिच्या स्थितीगतीचे नियम जाणून घेणे यातच माणसाच्या प्रगतीचे इंगित आहे. परिस्थिती सतत बदलत असते. त्यावरहुकूम त्याला स्वत:ला तरी बदलावे लागते, किंवा त्या बदलणाऱ्या परिस्थितीचा इष्ट ते वळण देण्यासाठी धडपड तरी करावी लागते. अशा तऱ्हेच्या धडपडीतूनच हळूहळू माणसाची बुद्धी विकसित होत गेली. त्याने आपल्या सहाय्यार्थाने नवनवी हत्यारे व उपकरणे बनवली आणि त्यातही तो वारंवार सुधारणा करत गेला. त्याच्या जीवन पद्धतीतही त्यानुरुप बदल होत गेले. हे सर्व माणसाच्या जिज्ञासू आणि युयुत्सू वृत्तीतूनच घडते असे आपल्या लक्षात येईल.

या निरंतर प्रवाही जीवनात आचार आणि विचार, जाणिवा आणि प्रत्यक्ष व्यवहार यांचा मेळ घालण्याची जबाबदारी माणसावर येऊन पडते. त्यामध्ये फारकत झाली तर समाज प्रवाहपतित, अनियंत्रित व दिशाहीन होईल. सामाजिक जीवनात एक प्रकारचे अराजकच निर्माण होईल, म्हणून समाजाचे नियंत्रण करणारी काही तत्त्वे प्रमाण मानली गेली पाहिजेत. याची जाणीव असणारे समाजचिंतक त्या त्या काळातील बदललेल्या परिस्थितीला नवें वैचारिक अधिष्ठान देण्याचा आणि आचार–विचारात सुसूत्रता आणण्याचा प्रयत्न करतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

॥३॥

आर्यसमाज : एक विश्लेषण

प्रा. डॉ. सूर्यनारायण रणसुभे

भारतीय संस्कृतीच्या विकासाचे जे स्थूल टप्पे पाडले जातात, त्यात प्रामुख्याने आर्य–द्रविड संघर्ष, वैदिक आणि बौद्धमत भक्तीसंप्रदायाचा उदय आणि त्यानंतरचा पुनुरुत्थानाचा काळ याचा विचार होतो. या देशाच्या आरंभापासूनचा विचार केल्यास हे लक्षात येईल की येथील सर्व तत्वज्ञानाचा व त्यातून उगम पावणाऱ्या संस्कृतीचा केंद्रबिंदू वेद आणि वैदिक धर्म आहेत. वेद आणि वैदीकी धर्माचा निषेध किंवा समर्थन या दोहोतच येथील सर्व तत्वज्ञान किंवा संस्कृतीची वाटचाल दिसून येईल. वेदप्रणित तत्वज्ञानाचा प्रभाव इतका प्रचंड आणि सखोल आहे की एकतर त्याला नाकारुनच स्वतःचे तत्त्वज्ञान उभे करावे लागते किंवा त्याला स्वीकारुन अगदी बुध्दपूर्व काळातील चार्वाक तत्त्वज्ञान असो की बौध्दमत असो की नंतरच्या काळातील सिक्स किंवा बसवचा लिंगायत पंथ असो की वारकरी किंवा भागवत धर्म असो. वेदप्रणित आचार धर्म किंवा तत्त्वज्ञान याच्या विरोधात किंवा समर्थनार्थ अशी कोणतीतरी एक भूमिका धर्म किंवा संस्कृती क्षेत्रातल्या महनीय व्यक्तीना घ्यावी लागते. वेदाना नाकारणारे येथे पूजनीय ठरलेले आहेत. त्याना फार मोठ्या प्रमाणात अनुयायी मिळालेले आहेत. उदा. चार्वाक, म. गौतम बुद्ध, कबीर, बसव, म. जोतिबा फुले पासून ते थेट आंबेडकर पर्यंत ही यादी आहे. तर दुसरीकडे वेद समर्थनार्थ उभे असलेल्यांची यादी ऋषीमुनी, राम, कृष्णा–पासून ते थेट ऋषी दयानंद, विवेकानंद पासून लो. टिळकापर्यंत आणून सोडत येते.

ज्या–ज्यावेळी या देशाचा संपर्क, इतर धर्म किंवा तत्त्वज्ञानाशी आला ह्या संपर्क ज्यावेळी समन्वयाऐवजी संघर्षाच्या जवळपास पोहचू लागला, त्या–त्यावेळी वैदिक धर्माची पुनर्रमांडणी करण्याचा प्रयत्न झालेला दिसून येतो. आता या वैदिक धर्माची व्याप्ति किती असावी याबद्दल अनेक मतभेद आहेत. वेद, उपनिषद, ब्राम्हणे, स्मृति, पुराण या सर्वांचा समावेश वैदिक धर्मात करणारे सनातनी आहेत, तर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वेद–उपनिषदानाचा प्रमाण मानणारे काही आहेत. इकडे वेदाना नाकारण्याची देखील अनेक पंथ–उपपंथ आहेत.

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात खिश्चन मिशनऱ्यांच्या धर्म प्रचारामुळे भारतीय समाज पुन्हा एकदा ढवळून निघत होता. विशेषत: ज्या भागात इंग्रजी शिक्षणाची सुरवात झालेली होती, त्या भागातील वरच्या थरातील मंडळीत धर्म चिकित्सा सुरु झालेली होती. इंग्रजी शिक्षण व खिश्चन मिशनिऱ्यांनी येथील धर्मा–समोर एक फार आव्हान उभे केले होते. हे आव्हान येथील बंदिस्त अशा समाज रचनेस होते, चातुर्वण्य व्यवस्थेस होते. इंग्रजांच्या प्रशासनाचा, व्यापारी वृत्तीचा, व्यापारासाठी म्हणून त्यानी स्वीकारलेल्या काहीं धोरणांचा, विकासाचा परिणाम येथील बंदिस्त समाज रचनेवर होत होता. येथील तळागाळातील गुणवान, शूरवीर मंडळीना इंग्रज अधिकारी सैन्यात व इतरत्र मानाचे स्थान देत होते. अर्थात माणूस म्हणून सर्वांना समान लेखणारा 'धर्म' कोठेतरी आहे, याची जाणीव पहिल्यांदा सर्व थरातील मंडळींना होत होती. येथे ही बाब देखील स्पष्ट केली पाहिजे की दहाव्या शत-कातयेथे आलेल्या इस्लामाच्या क्रांतीकारी अशा समतेच्या तत्त्वज्ञानामुळे अशीच खळ-बळ त्याकाळी येथे झालेली होतीं.त्याचा परिणाम म्हणूनभक्ती संप्रदायाचा येथे उदय झाला. आणि भक्ती संप्रदायाना आध्यात्मक व भक्तींच्या क्षेत्रात वर्ण व जाती व्यव-स्थेविरुद्ध स्पष्ट अशी भूमिका घेतलेली होती. पण समतेची त्यांची ही भूमिका केवळ भक्ती पुरतीच मर्यादित राहिली. सामाजिक परिवर्तनाची ती नांदी ठरु शकली नाही. पण खिश्चनाच्या संपर्कामुळे, इंग्रजी भाषेच्या शिक्षणामुळे धर्माच्या पलीकडे जाऊन सामाजिक क्षेत्रातील समतेचे आणि बंधुत्वाचे तत्त्वज्ञान येथे पोहचू लागले. अशा प्रकारचे तत्त्वज्ञान येथे जरी नवीन नव्हते (बौद्धमत व इतर पंथ) तरी यास प्रत्यक्ष आचरणात आणणारी सत्ता येथे नवीन होती. असा धर्म देखील नवीन होता. याचा परिणाम म्हणून बंगाल व महाराष्ट्रातील सवर्ण व अस्पृश्य मंडळी या धर्माकडे आकर्षली जाऊ लागली. या आकर्षणाचे पर्यवसान दोन परस्पर विरोधी गोष्टींत होऊ लागले. एक काहीं मंडळी स्वधर्माचा त्याग करुन खिश्चन धर्म स्वीकारु लागली तर काहींजण आपल्या धर्माची बौद्धिक चिकित्सा करु लागले. धर्मप्रचारासाठी म्हणून खिश्चन मिशनरी हिंदू धर्मातील उणीवांच्या कडे लक्ष वेधू लागलो. या उणीवामुळे ज्याना अस्पृश्तेचे दुःख भोगावे लागत, ती मंडळी तिकडे जाण्याची शक्यता निर्माण झालेली होती. धर्माची बौद्धिक चिकित्सा करुन हिंदू धर्मास अधिक शास्त्रीय, बुद्धी–वादी व सत्यवादी धर्माचे रुप देण्याचा प्रयत्न दोहों प्रांतात सुरु झाला. बंगालमध्ये राजा राममोहन यांच्या नेतृत्वाखाली १८२८ मध्ये ब्राम्हो समाजाची स्थापना झाली. १८६४ मध्ये याचा ब्राम्हो समाजची एक शाखा म्हणून मुंबई येथे प्रार्थना समाजाची स्थापना झाली १८७३ मध्ये पुणे येथे म. जोतिबा फुले यानी सत्यशोधक समाजाची

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

स्थापना केली तर म. दयानंद सरस्वती यांनी १८७५ मध्ये मुंबई येथे आर्यसमाजाची स्थापना केली. ब्राम्हो समाज, प्रार्थना समाज, सत्यशोधक समाज आणि आर्यसमाज या सर्व समाजांचा उद्देश हिंदू धर्मातील अवगुणांना टाळून त्यास एक नवे परिमाण मिळवून देण्याचा होता. त्यामुळे इतर समाजाप्रमाणे आर्यसमाजाची स्थापना देखील ख्रिश्चन मिशनऱ्यांकडून होणाऱ्या टीकेस प्रत्युत्तर म्हणून किंवा त्यांच्या धर्मप्रचाराची प्रतिक्रिया म्हणून झालेली आहे हे लक्षात ठेवणे गरजेचे आहे.

२

आर्य समाजाचे संस्थापक स्वामी दयानंद यांचा जन्म १८२४ मध्ये काठियावाड विभागातील टंकारा या गावात झाला. लहानपणापासूनच संस्कृत व वेदांचा अभ्यास त्यांच्याकडून करवून घेण्यात आला. आपल्या कुशाग्र बुद्धीमत्तेमुळे वैदिक तत्त्वज्ञान व प्रचलित धर्म व कर्मकांडात त्याना फार मोठी विसंगती दिसून येऊ लागली. आणि त्यामुळेच "हिंदू समाजात प्रचलित असलेल्या रीतिरिवाज आणि कर्मकांडात सुधार घडवून आणण्याचे व्रतच त्यानी घेतले".[1] वेदांच्या अभ्यासासाठी ते अनेक ठिकाणी भटकत राहिले. समाज सुधारणेसाठी धडपडत असणाऱ्या अनेक ठिकाणी त्यानी हजेरी लावली. त्यावेळी कलकत्यात ब्राम्हो समाजाचा जोर होता. तेथेही ते गेले. पण त्याना असे जाणवले की "जो कुछ ब्राम्हो समाज और प्रार्थना समाजियोंने ईसाई मत मे मिलने से थोडे से मनुष्यों को बचाए और कुछ-कुछ पाषाणादि मूर्ती पूजा को हटाया, अन्य जात ग्रंथो के फंदे से भी कुछ बचाए, इत्यादि अच्छी बाते है। परंतु इन लोगों मे स्वदेश भक्ति बहुत न्यून है। --- अपने देश की प्रशंसा वा पूर्वजों की बडाई करनी तो दूर रही उसके स्थान मे पेटभर निंदा करते हैं।"[2] ब्राम्हो समाज व प्रार्थना समाज हे सामाजिक सुधारणावादी दृष्टी घेऊन जरी कार्य करीत असले, धर्मांतरास त्यांनी थोपवून धरलेले असले तरी त्यांच्यात स्वदेशाभिमान नव्हता ही स्वामीजींची खत होती. आणि त्यामुळेच धार्मिक सुधारणा, सामाजिक सुधारणा व स्वदेशाभिमान हे तीन उद्दिष्टये ठेवून त्यानी आर्यसमाजाची स्थापना १८७५ ला मुंबई येथे केली. स्वदेशाभिमान व समतेची सामाजिक रचना या दोन बाबी खूपच महत्त्वाच्या होत्या. विशेषत: त्या काळात खूपच क्रांतीकारी होत्या. त्यांच्या या समतावादी विचारांमुळेच म. जोतिबा फुल्यानी पुण्यातील सनातन्यांच्या नाकावर टिच्चून महर्षि दयानंदाना पुण्यास बोलावून त्यांची जंगी मिरवणूक काढली होती.[3]

हिंदू धर्म सुधारणेच्या संदर्भात स्वामीजींचे सर्वात महत्त्वाचे कार्य म्हणजे या बंदिस्त धर्मावर त्यानी प्रखर अशा वैचारिक हल्लाच चढवला नाही तर या धर्मात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्यास किंवा या धर्मातून इतर धर्मात गेलेल्यास परत या धर्मात येण्याची वाट उपलब्ध करुन दिली. सनातन धर्मियांनी आर्य समाजावर सतत हल्ले

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

चढवलेले आहेत. पण या बाबतीत मात्र सनातन्याची स्वामीजींची ही सुधारणा स्वीकारल्याचे दिसून येईल. मूर्तिपूजेचा विरोध, सर्व कर्मकांडाचा तिरस्कार व एक ग्रंथीय धर्म करण्याचा अट्टाहास यामुळे आर्यसमाज हा परंपरावादी ब्राम्हणी धर्मांच्या विरुद्ध उभा असल्याचे दिसून येईल. आर्य समाजाच्या कठोर तार्किकतेमुळे सनातनी खवळले आणि ब्राम्हणी धर्माची ध्वजा उंच उभी करण्यासाठी म्हणून सनातन सभेची स्थापना याच काळात झाली. आर्य समाजाने एका पातळीवर धर्मांतराच्या विरोधात प्रखर अशी लढाई सुरु केली तर त्याचवेंळी स्वधर्माच्या सनातन्याविरुद्ध देखील त्याना ही लढाई लढावी लागलेली आहे.

३

आर्य समाजानी चातुर्वण्य व्यवस्थेची मांडणी वेगळ्या रुपात ठेवण्याचा प्रयत्न केलेला आहे. सनातन्यांशी त्यांचा जो वाद होता तो वर्ण व्यवस्थेच्या संदर्भात होता. आर्य समाज जाती व्यवस्थेस पूर्णपणे नाकारतो. पण त्याचवेळी वर्णव्यवस्थेस मात्र गुणधर्मानुसार स्विकारतो. वर्णव्यवस्था ही ईश्वर निर्मित आहे असे सनातनी मानतात. तर दयानंदाच्या मते वर्णव्यवस्था ही गुणकर्मानुसार मान्य करावी लागेल. प्रखर बुद्धीवादी व तार्किक आर्यसमाज वेदांना अपौरुषेय मानतो. "मनुष्य, पशु, पक्षी, वृक्ष, जलजंतु आदि जातियां, वृक्षो मे पीपल, वट, आम्र आदि, पक्षियों मे हंस, काक, व आदि, जलजंतुओं मे मत्स्य, मकरादि जातिभेद हैं वैसे मनुष्यों मे ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र अत्यंज जातिभेद हैं, ईश्वरकृत हैं। परंतु मनुष्यों मे ब्राम्हणादि को सामान्य जाति मे नहीं किंतु सामान्य विशेषात्मक जाति मे गिनते हैं। जैसे पूर्ण वर्णाश्रम व्यवस्थां मे लिख आए वैसेही गुण, कर्म, स्वभाव से पूर्वोक्ता नुसार ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य, शूद्रादि वर्णों की परीक्षा पूर्वक व्यवस्था करनी राजा और विद्वानो का काम है।"[4] म्हणजे महर्षि दयानंद वर्णाश्रम व्यवस्थेच्या संदर्भात म. जोतिबा फुले यांच्यासारखी क्रांतीकारी भूमिका घेऊ शकलेले नाहीत. दोघेही एकाच काळातील. पण फुले वर्णव्यवस्था पूर्णपणे नाकारतात. गुणकर्मानुसार देखील मान्य करीत नाहीत. पण दयानंद मात्र गुणकर्मानुसार वर्णव्यवस्थेस स्वीकारण्याची भूमिका घेतात. मग प्रत्येक व्यक्तीचा हा वर्ण कोण ठरवणार. तर ही जबाबदारी ते राजा व विद्वानावर टाकतात. आता राजा किंवा विद्वान याचा वर्ण कोण ठरवणार हा प्रश्न शिल्लक राहतोच. आणखिन एक अडचण आहे. गुणकर्मांनुसार वर्णव्यवस्था स्वीकारल्यानंतर श्रमाची, सेवेची कामे करणारा हा सर्वांच्या नजरेने अस्पृश्य, दलित किंवा शूद्र ठरतो. एके ठिकाणी श्रमप्रतिष्ठेचा डांगोरा पिटायचा आणि त्याचवेळी श्रम करणाऱ्यास शूद्र ठरवावयाचे सगळाच गोंधळ आहे. आज ही आर्य समाजी मंडळी गुणकर्मांनुसार वर्णव्यवस्थेचे समर्थन करीत असतात. पण एखाद्याचे वर्ण ठरवावयाचे कसे याचा तपशील देण्याचे मात्र ते टाळतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

दयानंदासमोरील अडचणी स्पष्ट आहेत. ब्राम्हो समाजासारखे त्याना या मातीतील सर्वच काही नाकारायचे नव्हते. येथील सर्वच नाकारल्यानंतर याना आपण उभे कसे करणार हा त्यांचा समोरचा प्रश्न होता. एकदा वेदाना सर्वश्रेष्ठ स्थान दिले, त्याना अपौरुषेय मानले की मग वेदातील सर्वच तत्त्वज्ञानाचे समर्थन करणे अपरिहार्य ठरते. वेद आणि वेदांशी संबंधित सर्वच सहितांना तरी त्यांनी कोठे स्वीकारलेले आहे. "यह विस्मय की बात है कि स्वामीजीने संहिताओं को तो प्रमाण माना, किंतु उपनिषदों पर वही श्रद्धा नही दिखलाई। वेद से उनका अभिप्राय केवल चारों वेद (विद्या, धर्म–युक्त–ईश्वरप्रणीत संहिता, मंत्र–याग) और चारों वेदों के ब्राम्हण, छइ अंग, छइ उपांग, चार उपवेद और ११२७ वेदों की शाखा है।"[5]

वर्णव्यवस्थेच्या या मांडणीत अनेक विसंगति जरी आढळून येत असल्या तरी देखील या मांडणीमुळे पंजाब, हरियाणा, गुजरात, उ. प्र., म. प्र., या हिंदी क्षेत्रातील पद दलितांना आर्यसमाजाच्या रुपाने एक वेगळाच आधार मिळाला. मराठवाड्यातील बहुजन समाजास आर्यसमाजाने एक वेगळी ताकत मिळवून दिली. जोपर्यंत आंतर जातीय लग्ने होणार नाहीत, तो पर्यंत जन्माधिष्ठित जाती व वर्ण व्यवस्था मोडणार नाही असा आर्य समाजाचा विश्वास आहे. आणि त्यामुळेच या देशात आंतर जातीय लग्ने घडवून आणण्यात आर्य समाजाने नेहमीच पुढाकार घेतलेला आहे.

४

आर्य समाजाच्या आंतर जातीय लग्नाच्या या सिद्धांतास डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पाठिंबा होता. डॉ. बाबासाहेबांनी इनहिलिशेन ऑफ कास्ट मध्ये हाच सिद्धांत मांडलेला आहे. लाहोरच्या जाती–तोडो सम्मेलनाचे अध्यक्षपद डॉ. बाबासाहेबांना देऊ करण्यात आले होते. त्यांच्या अध्यक्षपदावरुन बोलण्यासाठी डॉ. बाबासाहेबानी प्रचंड असे असे परिश्रम घेऊन हा शोध निबंध तयार केला होता. या शोध निबंधात बाबासाहेब वर्णव्यवस्थेच्या संकल्पनेवर तुटुन पडलेले होते. चातुर्वण्य मग ती जन्माधिष्ठित असो की वर्णाधिष्ठित ती मान्य करणे डॉ. बाबासाहेबांना शक्यच नव्हते. कारण गुणकर्मानुसार कोण कोणत्या वर्णात जाणार हे ठरवणाऱ्या वर्गाच्या प्रामाणिकपणावर विश्वास नव्हता व कोणाचाही नाही. आणि दोन हजार वर्षापासून ज्याना सर्व संधी नाकारण्यात आलेल्या आहेत, त्यांचा गुणांचा विकास होणार कसा हा प्रश्न होता. पण आर्यसमाजी मंडळींना या शब्दाचा आणि स्वामी दयानंदानी दिलेल्या या मांडणीचा इतका मोह होता (व आहे) की या शब्दावरील हल्ला त्याना मान्य नव्हता. त्यामुळे वर्णव्यवस्थेवरील टीका डॉ. बाबासाहेबानी आपल्या शोध निबंधातून गाळावी हा त्यांचा आग्रह आणि ज्या संकल्पनेच्या विरुद्ध बाबासाहेब प्राणपणाने लढत होते, ते काढून टाकणे त्याना शक्य नव्हते. त्यामुळे अध्यक्षीय

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भाषणाची परवानगीच नाकारण्यात आली.

५

आर्य समाजाची चळवळ ही हिंदू समाजा अंतर्गत समाज सुधारणेची, धर्म सुधारणेची व राष्ट्राभिमानाची चळवळ होती. म. दयानंदाच्या हयातीत ही चळवळ मुस्लिम विरोधी कधीच नव्हती. उलट दयानंदाच्या चाहत्यात त्यावेळची ज्येष्ठबुद्धीवादी मुस्लिम मंडळी होती. १८८३ मध्ये स्वामीजींचा मृत्यु होतो. त्यांच्या मृत्यूनंतर प्रसिध्द मुस्लिम पुढारी सर सैय्यद अहमद खां ने त्यांना जी श्रध्दांजली दिलेली आहे त्यावरुन स्पष्ट होते की मुस्लिम जनतेत स्वामीजी किती लोकप्रिय होते. आर्य समाजाने हिंदू या शब्दाचा कोठेही वापर केलेला नाही. इतराबद्दल द्वेष किंवा तिरस्कार कोठेच नाही.

आर्य समाज ही एके काळची ऐतिहासिक गरज होती. नंतरच्या काळात आर्य समाजाच्या व्यासपीठाचा वापर अनेकानी केला. पंजाब आणि हरियाणात आर्य समाज आणि आर. एस. एस. यांच्यात विळा भोपळयाचे शत्रुत्व होते हें अनेक पुराव्यासहित श्री. देशराज गोयल नी आपल्या पुस्तकात स्पष्ट केलेले आहे पुरोगामी आणि धर्मनिरपेक्ष चळवळीचे खरे कार्यकर्ते आर्य समाजानी दिलेले आहेत. काळाच्या प्रवाहात आर्य समाज धर्मांधतेकडे झुकू लागला, त्याच्यात कर्मकांड शिरलं. इतर सर्व पंथाप्रमाणे याही पंथाचा पराभव त्यांच्या शिष्यानीच घडवून आणला.

संदर्भ :-

१ साहित्य कोश : धीरेंद्र वर्मा, २२६

२ सत्यार्थ प्रकाश : स्वामी दयानंद, २५९

३ म. जोतिबा फुले : मु. ब. शहा, १०७

४ सत्यार्थ प्रकाश : स्वामी दयानंद, २६०

५ संस्कृति के चार अध्याय : रामदारीसिंह दिनकर, ५६५

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

॥४॥

आर्यसमाजाचा समाज सुधारणा विषयक दृष्टिकोण

प्रा. दयानंद बेडदे

महर्षि दयानंद सरस्वती यांच्या जिवनात शिवरात्रीचे विशेष स्थान आहे. कारण शिवरात्रीच्या रात्रीच्या दिवशी दयानंद यांना जो बोध झाला त्यामुळेच ते महर्षि होऊ शकले. शिवरात्रीच्या दिवशी हिंदू धर्मातील प्रथेप्रमाणे सर्व लोक वृत उपवास करत असत. वृत उपवासामुळे पाप नाहीसे होवून भोलेनाथ प्रसन्न होतो अशी भावना हिंदु धर्मियांची होती या दिवशी लोक शिव मंदीरात जावून रात्री पुजा प्रार्थना करत असत. इतर ज्येष्ठ व्यक्ती प्रमाणेच मुल शंकर नावाचा चौदा वर्षाचा मुलगा धर्मीच्या प्रथेप्रमाणे सायंकाळी शिव मंदीरामध्ये कथा, किर्तन ऐकण्यासाठी गेला. टंकारा येथील या शिवमंदीरात या दिवशी अनेक लोक एकत्र येतात. सर्व लोक रात्री शिव मंदीरात जावून भक्तिभावाने शंकराची पूजा करत असत. एके दिवशी सर्व भाविकामध्ये मुल शंकर कथाकिर्तना–साठी गेला होता. रात्री कथा किर्तना नंतरच्या तिसऱ्या प्रहारानंतर अनेक भक्तांचे डोळे लागू लागले पण मुल शंकर मात्र डोळयात तेल घालून मुर्तीकडे पहात होता. यावेळी सर्वत्र शांतता पसरली होती. मूल शंकरने अकस्मात असे पाहिले की, कांही उंदीर शंकराच्या पिंडीवर उड्या मारत आहेत. घाण करत आहेत व समोर ठेवलेला प्रसादही खात आहेत. लहानपणी वडीलांनी सांगीतलेल्या प्रसंगाची आठवण मुल शंकरला झाली. नंदीची स्वारी करणारे यक्ष मित्र त्रिशुलधारी विषधर धारण कर–णारे शिव, दुष्टांचे सहांरण भक्तांचे इच्छा पुर्ण करणारे भोलेनाथ, लहानशा उंदीरांना मना करु शकत नाहीत व स्वतःचे संरक्षणही करु शकत नाहीत. तेव्हा हा देव कसला? यावर श्रद्धा का ठेवावी व पुजा ही का करावी? असे अनेक प्रश्न मुल शंकरच्या मना-मध्ये निर्माण होवू लागले. तेंव्हा त्याने खरा परमेश्वर मंदीरात किंवा दगडाच्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मुर्तीत नाही हे समजून घेण्यासाठी व खऱ्या परमेश्वराच्या शोधासाठी त्यावेळीपासूनच गृह त्याग केला.

ईश्वराच्या शोधात निघालेल्या मुल शंकराची भेट महाराष्ट्रीय सन्याशी स्वामी पुर्णानंद यांच्याशी झाली व त्यांनी मुल शंकर यांचे नाव बदलून दयानंद सरस्वती असे ठेवले. त्यानंतर स्वामीजींनी ज्यांना गुरु म्हणून स्विकारले त्या विरजानंद सरस्वती यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी अध्यायन केले. अष्टाध्यायी व महाभाष्य या दोन ग्रंथाच्या अध्यायनामुळे महर्षि दयानंद तारकीक बनले आणि चिकित्सकपणे विचार करु लागले. महापुरुषाच्या जिवनामध्ये एखादा प्रसंग अनुभवाला आल्यामुळे व त्याप्रसंगाचा त्यांनी सखोल विचार चिकित्सकपणे केल्यामुळे ते महापुरुष बनतात अशी अनेक उदाहरणे इतिहासामध्ये आहेत. गौतम बुद्धानी रस्त्याने जाणारे प्रत पाहिले आणि प्रत्येकाला असेच जावे लागणार आहे. त्यांच्या लक्षात आले तेव्हा त्यांनी राज्याचा त्याग करुन समाजासाठी आत्मसमर्पण केले तसेच महर्षि दयानंदाच्या जिवनातही शिव मंदीरातील प्रसंग घडल्यामुळे त्यांच्या डोळयात प्रकाश पडला आणि ते जगाला प्रकाश देणारे महर्षि दयानंद झाले. महापुरुषाच्या जीवन चरित्राची ओळख नसणे व त्यांच्या कार्याची माहिती नसणे म्हणजे सबंध जीवन बाल्यावस्थेत घालवल्यासारखे आहे म्हणून महर्षींचा जीवन चरित्राची आणि वैचारीक दृष्टीकोणाची मुलभूत माहिती असणे आवश्यक आहे. १८ व्या शतकाच्या आखेरीस व १९ व्या शतकाच्या पुर्वार्धाचा कालावधी म्हणजे भारताच्या राजकीय आणि सामाजिक गुलामगिरीचा काळ होता. कांही समाज सुधारकांनी सामाजिक सुधारणेसाठी प्रयत्न केले तर कांहीनी राजकीय दृष्टया ब्रिटीशांच्या गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा केली. महर्षी दयानंद सामाजिक स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारे सुधारक होते. राजकीय स्वातंत्र्यासाठी अनुकूल परिस्थिती समाजसुधारकांनी निर्माण केली. त्यामुळे लोकांचा सर्वांगीण विकास करणे सहज शक्य झाले. महर्षी दयानदांनी कर्मकांड, धर्मांधता, अस्पृश्यता, अज्ञान, निरक्षरता, रुढीपरंपरा, अंध श्रध्दा, मुर्तीपुजा याविरुद्ध जिवनभर प्रत्यक्ष कार्य केले. आणि धर्मांधतेविरुद्ध कडाडून हल्लाही केला म्हणून त्यांना विष देवून मारण्याचे प्रयत्न अनेक वेळा झाले आणि त्यांचा अंतही अशाच प्रकारे विष देवून करण्यात आला. असा नेहमीच समाजाने महापुरुषा सोबत खेळ केला आहे. म्हणून तर सुधारणेसाठी अधिक कालावधी लागत असतो. भारतीयांच्या मनामध्ये स्वाभीमान व आत्मविश्वास निर्माण करुन स्त्री-पुरुषांना सर्व जाती धर्माच्या लोकांना समान अधिकार देण्याचा प्रयत्न करुन समताधिष्टीत समाज निर्माण करणे हे त्यांच्या जिवनातील मुख्य उद्देश होता.

आर्य समाजाची स्थापना आपले विचार असंख्य लोकांपर्यंत पोंहचले पाहिजेत यासाठी संस्कृत मधील शास्त्रार्थ व प्रवचनांचा फारसा उपयोग होणार नाहीय

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

यासाठी मोठ मोठ्या सभा भरवून व प्रत्यक्ष लोकामध्ये कार्य करुन आणि लोकभाषेतील लोकसाहित्य निर्माण करण्याची गरज त्यांना भासत होती. आपण एखादा नवीन धर्म, पंथ, संप्रदाय स्थापन न करता पुरातन वैदिक धर्माचे पुनरुथान करण्याचा मनोदय व आर्य समाज स्थापन करण्याचा मनोदय त्यांनी ईश्वरचंद्र विद्यासागर, रामकृष्ण परमहंस, व्युमेशचंद्र बॅनर्जी, बॅ. चंद्रशेखर शेन यासारख्या समाज सुधारकासमोर बोलून दाखविला. कलकत्ता येथे यासंबंधी अनेक मान्यवरांशी चर्चा करुन आणि अनेकांची मते लक्षात घेवून सामाजिक मर्यादांचे पालन करण्यासाठीचा नविन विचार लोकांना योग्य पध्दतीने देण्यासाठी आर्य समाजही सक्रिय सामाजिक चळवळ बनवण्याचा त्यांनी निश्चय केला आणि १८७५ या वर्षी फोर्ट मुंबई येथे आर्य समाजाची महर्षी दयानंद सरस्वती यांनी स्थापना केली.

सामाजिक समतेचा पुरस्कार

जातीभेदाचे निर्मूलन करण्यासाठी दयानंदानी कर्माधिष्टीत वर्ण व्यवस्थेचा पुरस्कार केला आणि जातीसाठी पर्याय लोकांच्या समोर ठेवला. सामाजिक समतेच्या प्रस्थापनेसाठी त्यांनी असे अनेक उपक्रम चालवले. स्त्री, क्षुद्रांना वेद अध्यायनांचा अधिकार दिला पाहिजे असा आग्रह त्यांनी नेहमीच धरलेला आहे. जुन्या रुढी व परंपरा व श्रध्दा यांना मुठमाती देवून नेहमीच सर्वांना समान वागणूक दिली पाहिजे यासाठी त्यांनी अनेक लढे उभारले होते. स्त्री क्षुद्रांना शिक्षण देण्यासाठी गुरुकुल पद्धतीच्या माध्यमातून सर्वांना शिक्षणासाठीं समान संधी उपलब्ध करुन दिली होती. मुलांसाठी आणि मुलींसाठी गुरुकूल चालवून ज्यांच्या पर्यंत शिक्षण जावू शकले नव्हते त्यांना शिक्षण देण्याची सुरुवात त्यानी केली. विधवा, परित्यक्ता व अनाथ मुलींसाठी त्यांनी अनाथालय चालविणे. सत्यार्थ प्रकाश या ग्रंथात ते म्हणतात की, सर्वांना सारखेच वस्त्र, प्रावरण, भोजनाच्छादन दिले जावे श्रीमंताची मुले असोत किंवा निर्धनाची सर्वांनी तपस्वी झाले पाहिजे. राजर्षी शाहू महाराजांना धर्म सुधारणा करण्यासाठीं सामाजिक दृष्टीकोण असणारी चळवळ आर्य समाजाच्या रुपाने उपलब्ध झाली. शाहू महाराजांनी १९१८ या वर्षी कोल्हापूर मध्ये आर्य समाजाची शाखा स्थापन करण्यामध्ये पुढाकार घेतला. राजाराम कॉलेज व राजाराम हायस्कुल, अनाथश्रम, आर्य समाजाला चालविण्यासाठी दिले. तसेच महर्षी दयानंद लिखित सत्यार्थप्रकाश हा ग्रंथ कोल्हापूरमधील कांही शाळांमध्ये विद्यार्थ्यांना सक्तीचा विषय केला. कोल्हापूर व ज्योतिबाच्या रस्त्यावर केरल येथे गुरुकूलाची स्थापना केली एवढेच नाही तर सर्व प्रकारची धार्मिक सुधारणा करण्यासाठी व सर्वत्र आर्य समाजाला चालना देण्यासाठी शाहूंनी सर्वतोपरी आर्थिक मदत केली. मार्च १९१९ मध्ये भाव नगर येथे भरलेल्या तिसऱ्या अधिवेशनात अध्यक्ष पदावरुन बोलतांना महर्षी दयानंद आणि आर्य समाज याना सामाजिक कार्यासाठी धन्यवाद देवून ते म्हणाले होते की, मी आर्य समाजाची

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

विचारसरणी स्विकारली आहे त्याचे कारण म्हणजे वैदिक धर्म इतर कोणत्याही धर्म-श्रद्धेपेक्षा श्रेष्ठ आहे असा माझा विश्वास आहे. मी राजाराम कॉलेज, हायस्कुल, गुरु-कुल, अनाथाश्रम, सरदार बोर्डींग या संस्था आर्य प्रतिनिधी सभेकडे सोपविलेल्या आहेत त्यामागेही माझी अशी श्रद्धा आहे की, या सर्व संस्थांची नैतिक प्रगती व्हावी आर्य समाजाचे शिक्षक आणि विचारवंत माझा उद्देश सफल करतील. यामध्ये मला अपेक्षित असलेल्या समाजाची निर्मिती होणे शक्य होईल. मला जे शक्य ते सर्व मी केले आहे. मला मनापासून असे वाटते की, या परिषदेसाठी जमलेल्या प्रतिनिधींनी आणि प्रमुख सुत्रधारांनी धार्मिक क्षेत्राच्या ठिकाणी शिक्षण संस्था सुरु कराव्यात. तुमच्यातील कांहीं उत्साही कार्यकर्त्यांनी आमच्या राज्यात सामाजिक कार्य करावे. माझे त्याला सर्वतोपरी सहकार्य मिळेल.

समाज सुधारक दयानंद

सामाजिक व धार्मिक सुधारणेची चळवळ दयानंदानी चालवून समाजातील विकृत विषमता नाहीशी करण्याचा प्रयत्न केला. सर्व विषमतेचे मुळे जातीय विचार सरणीवर असल्यामुळे त्यांनी जातीबंद समाजाची प्रगती होवू शकत नाही म्हणून जाती विरुद्ध मत व्यक्त केले व जाती व्यवस्था नाकारण्याचे आव्हान केलें. आणि गुणकर्म स्वभावानुसार असलेल्या समाजव्यवस्थेचा स्विकार केला होता. आंतरजातीय विवाहाची चळवळ आर्य समाजामार्फत चालवून जाती जातीतील दरी कमी करण्याचा प्रयत्न केला. प्रत्येक जात स्वतःला श्रेष्ठ व कोणाला तरी कनिष्ठ समजत असल्यामुळे विषमता टिकून आहे. विषमतेचे मूळ श्रेष्ठ कनिष्ठ भावनेमध्ये असल्यामुळे त्यांनी जाती विषयक विषमता अधिष्टित तत्त्वज्ञान समाजास हानिकारक आहे. असे मत स्पष्ट केले. सत्यार्थप्रकाशाच्या दहाव्या समुल्लासात ते म्हणतात की, अन्न शिजविणे हे क्षुद्रांचे काम आहे ब्राम्हणांचे नव्हे अन्न शिजवण्याचे काम करणारा हा कसला ब्राम्हण आचारी? म्हणून क्षूद्राचे अन्न ग्रहण करावे. १९२४ या वर्षी दिल्ली येथे त्यांनी दलितोद्धारक महा संमेलन भरवून लोकांचे प्रबोधन केले होते आणि सहभोजनाच्या माध्यमातून अनेकांना एकत्र आणले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दयानंदाचे शिक्षण स्वामी श्रद्धानंद यांच्या विषयी व्हॉट कॉंग्रेस अँड गांधी हॅव्ह डन टू दी अनटचेबल्स या ग्रंथात म्हटले आहे की, महर्षी दयानंद आणि त्यांचे शिष्य स्वामीं श्रद्धानंद हे अस्पृश्याचे सर्वात मोठे व अत्यंत कळकळीचे कैवारी होते. त्यांनी या विषयाशी संबंधीत समितीमध्ये राहून काम केले असते तर फार मोठी योजना मांडली असती. यात मुळीच शंका नाही. पुढे लाला लजपतराय सारख्या अनुयायांनी दलितोद्धारासाठी सतत कार्य करुन त्यांच्या विकासासाठी प्रयत्न चालू ठेवले. या देशाच्या नैतिक, धार्मिक, सामाजिक, राजकीय पतनाचे व मानव जातीय ऐक्य नष्ट करण्याचे मुर्ती पुजा व धर्मांधता तसेच जातीयता ही कारणीभूत आहेत असे सांगुन

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्यांच्या उच्चाटनासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले.

स्त्री–उद्धारासाठीचे कार्य

नारी निंदा मत करो, नारी नर की खान। नारी से नर होता है, ध्रुव प्रल्हाद समान।। स्त्री निर्माण करती तसेच राष्ट्र जननी आहे. असे दयानंदाचे स्त्री विषयक विचार होते त्यांच्या कालावधीमध्ये स्त्रीयांची दाश्यआवस्था होती. स्त्री शुद्र नारी ये सब ताडण के अधिकारी असे म्हटले जात होते. स्त्रीयांच्या सर्वांगीण सुधार–णेचा दयानंदानी कृतियुक्त प्रयत्न करुन सामाजिक, शैक्षणिक व धार्मिक अधिकार स्त्रीयांना प्राप्त करुन देण्यासाठी नेहमीच कार्य केले. बालविवाह, जरठकुमारी विवाह, विधवांची दुर्दशा, सतिप्रथा, विधवा पुर्नविवाहाचा प्रश्न स्त्रियांचे सामाजिक स्थान इ. अनेक स्त्रीयांच्या समस्या सोडविण्यासाठी त्यांनी कार्य केले. स्त्रीयांना पुरुषांच्या सार–खेच सर्व अधिकार मिळाले पाहिजेत याची जाणीव सुरुवातीला स्त्रीयांना करुन देण्या–साठी स्त्री शिक्षणावर त्यांनी भर दिला. विधवांनाही पुर्नविवाह करण्याचा अधिकार आहे. शिक्षण घेण्याचा अधिकार आहे. असे ते वारंवार सांगत असत. अनेक गुरुकुले व कन्या विद्यालय चालवून स्त्रीयांच्या मनामध्ये स्वाभीमान कर्तव्य तत्परतेची भावना विकसीत करण्यासाठी आर्य समाजाच्या माध्यमातून सर्वप्रथम त्यांनी सर्वत्र काम सुरु केले होते. आपली प्रतिमा व कर्तव्यनिष्ठता याद्वारे स्त्रीयांना मानाचे स्थान मिळू शकते. हे विचार दयानंदानी १९ व्या शतकामध्येच सांगीतले होते. स्त्री ही केवळ उपभोग्य वस्तू नसून तिलाही मन, भावना, विचार असतात. कुटुंबाच्या कल्याणामध्ये स्त्री हा महत्वाचा घटक आहे. कुटूंबरुपी रथाचे ती एक चाक आहे. खऱ्या अर्थाने अर्धांगिनी आहे. किंबहुना तिच्या शिवाय पुरुष पूर्णच होवू शकत नाही असे स्वामी–जींचे मत होते. त्यांनी जे स्त्री विषयक विचार दिले तो विचार पंडीता रमाबाई, माई भगवती यांनी स्वामीजींच्या प्रेरणेने पुढे चालू ठेवला आणि स्त्रीयांना सुशिक्षीत व सुसंस्कारीत बनविण्यासाठी कार्य केले म्हणूनच स्त्रीयांचा सर्वांगीण विकास होण्या–साठीची सुरुवात १९ व्या शतकामध्ये आर्य समाजाच्या माध्यमातून सुरु झाली होती असे म्हटले जाते.

महर्षी दयानंद सरस्वती याच्याविषयी आपले मत व त्यांच्या कार्याविषयी अनेक समाज सुधारकांनी आपली भुमिका स्पष्ट केली आहे. नेताजी सुभाषचंद्र बोस, महर्षी दयानंदाविषयी म्हणतात की, दयानंद भारताची नवनिर्मिती, धार्मिक पुनरुत्थान व नैतिक जागरणाची मशाल पटवणाऱ्या त्या अनेक महापुरुषांपैकी निश्चितपणे एक होते. त्यांनी स्थापन केलेल्या आर्य समाजाने निर्विवादपणे हिंदु समाजाची पुनर्बांधणी सुधारणा व नवचैतन्याच्या निर्मितीत एक महत्वाची भूमिका वठवली आहे तर असाहाय्यतेच्या खोल चिखलात रुतून बसलेल्या भारताच्या उद्धारासाठी स्वामी दया–नंदानी केलेले कार्य अतिशय मोलाचे आहे खरे पाहता त्यांनीच भारताच्या स्वातंत्र्य

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्राप्तीचा पाया घातला. त्यांनी अस्पृश्यता व जबरदस्तीने धर्मांतरीत केलेल्या व्यक्तीसाठी हिंदू धर्मांत पुर्नप्रवेशासाठी दारे उघडी केलीं असे सरदार वल्लभाई पटेल यांनी त्यांच्या कार्याविषयी आपले मत स्पष्ट केले आहे. हिंदूत्व शतकानुशतके दुबळे राहिले म्हणून भारत पारतंत्र्यात सापडला याचे प्रगट दर्शन महर्षी दयानंदाला झाले म्हणून त्यांनी जन्मजात जातीभेद व मुर्तीपूजा यासारख्या दौर्बल्यकारक परंपरांना मुठमाती देणारा विश्वव्यापी महत्वाकांक्षेचा आर्य धर्म दाखवला, असे लक्ष्मण शास्त्री जोशी म्हणतात. महर्षी दयानंदाच्या जीवनातील कार्याकडे पाहिल्यानंतर दयानंदाला मंत्रदृष्टा समाज सुधारक महर्षी सुधारणेचा आदय पुरस्कर्ता विचारवंत व राष्ट्रपुरुष अशा वेगवेगळ्या शब्दात अनेक विचारवंतानी दयानंदांचा उल्लेख केलेला आहे. तें अगदी यथार्थच आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

॥५॥

सर्वोदय चळवळ : काल, आज आणि उद्या

गंगाप्रसाद अग्रवाल

सर्वोदय चळवळ म्हणजे म. गांधी, विनोबा भावे आणि जयप्रकाश नारायण यांच्या जीवन कार्यांचा आढावा असे म्हटल्यास वावगे ठरु नये. शासन निरपेक्ष, शोषण मुक्त, अहिंसक समाज स्थापण्याचा प्रयत्न असाही शब्दप्रयोग करता येईल. ग्रामस्वराज्याची स्थापना असाही सुटसुटीत शब्दप्रयोग केला जातो. या चळवळीला पौराणीक काळापासून चालत आलेल्या चिरंतन मूल्याचा पाया आहे. वर्तमान दाहक परिस्थितीचे भान आहे. भावी आदर्श समाज व्यवस्थेकडे जाण्याची ओढ आहे. अनेक चढ उतारातून ही चळवळ आपला मार्ग आक्रमीत आहे.

म. गांधीच्या काळात देश इंग्रजाच्या गुलामगिरीत पिचत होता. त्यातून मुक्त झाल्याखेरीज सर्वोदय चळवळ पुढे नेणे शक्य नव्हते. त्यामुळे स्वातंत्र्य आंदोलन प्रमुख कार्यक्रम बनला. सर्व जनतेला बरोबर घेऊन चळवळ पुढे न्यावयाची होती. गांधीजींनी स्वातंत्र्य लढयात सामुहिक सत्याग्रहाचे तत्त्व दाखल करुन नवीन आयाम जोडला. इंग्रज निघून गेला सर्वोदय समाजाची स्थापना झाली नाही. स्वातंत्र्य लढयाच्या काळापासूनच सत्याग्रहावरोबर, रचनात्मक कार्यक्रमाची सांगड, सर्वोदय समाजाच्या दिशेने जाण्याचा प्रयत्न होता. स्वातंत्र्य प्राप्ती व म. गांधीची जीवन समाप्ती या दोन घटनामुळे सर्वोदय चळकळ कुंठीत झाल्यासारखी वाटली.

विनोबा भावे पुढे आले. त्यानी आपल्या प्रतिभेतून भूदान-ग्रामदानाचा कार्यक्रम विकसीत केला. दानामध्ये लाखो एकर जमीन मिळाली हजारो ग्रामदानेच झाली नाहीत तर जिल्हा ग्रामदान, प्रांत ग्रामदानापर्यंत त्याचा विकास झाला. ग्राम-दान पुष्टीच्या कार्यक्रमाजवळ सर्वोदय चळवळ पुनः रेंगाळली. भूदान चळवळ केवळ भूमी प्राप्त करण्याचे आंदोलन नव्हते. समाजाच्या आर्थिक जोवनात अहिंसेचे तत्त्व दाखल करण्याचा तो प्रयत्न होता. गांधीजींनी सुरु केलेली सर्वोदय चळवळ पुढे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

नेण्याचा प्रयत्न होता. त्यात काही प्रमाणात यशही आले. ग्रामदान आंदोलनाचे समर्थन येलवाल परिषदेत कॉंग्रेस, समाजवादी व कम्युनिस्ट पक्षाच्या सर्वश्रेष्ठ पुढाऱ्यानी संयुक्त पत्रकात केले, एवढा एकच पुरावा त्यासाठी पुरेसा आहे. बिहारच्या सहरसा जिल्हयात ग्रामदान पुष्टीचा नवीन समाज स्थापन करण्याचा विशेष प्रयत्न तीन चार वर्षेपर्यंत सर्व शक्तीनिशी करण्यात आला. त्यात यश आले नाही.

भूदान आंदोलना बरोबरच डाकूंचे आत्मसमर्पण, शिक्षण क्षेत्रात आचार्य कुलाचा विचार असे कांही नवीन कार्यक्रमही पुढे आले. त्याचे आपापल्या परीने महत्व आहे. परंतु विनोबांचा क्षेत्रसंन्यास व जीवन समाप्तीने ते कार्यक्रमही फार पुढे जाऊ शकले नाहीत. पुनः एकदा सर्वोदय चळवळ थबकल्यासारखी स्थिती निर्माण झाली. याच सुमाराला जयप्रकाशजीचे नेतृत्व सर्वोदय चळवळीत सक्रिय झाले. सर्वोदय चळवळीचा नवीन इतिहास त्यातून निर्माण झाला. सर्वोदय चळवळीत नवीन अध्याय लिहिला गेला. जयप्रकाशजी राजकारणातून मुक्त होऊन भूदान आंदोलनात आले. भूदान प्राप्त करण्यात त्यानी भरपूर शक्ती लावली. त्यानंतर विकसीत झालेल्या ग्रामदान आंदोलनातही ते मागे नव्हते. ग्रामदान पुष्टी आंदोलनात तर त्यांनी आपल्या जीवनातील एक वर्ष बिहारच्या मुजफ्फरपूर जिल्हयातील मुसहरी विकास गटात झोकून दिले. भूमीहिनांना भूमीचे वाटप करणे, ग्रामकोष उभारणे, ग्रामसभा सक्रिय करणे आदि कामे केली. त्यातून आलेल्या अनुभवातून त्यानी 'आमने सामने' नावाचे पुस्तक लिहिलें. जड समाज व्यवस्था हलत नाही. राजकीय पक्ष व सरकार अडथळा बनला आहे. भ्रष्टाचार प्रमुख समस्या बनली आहे. अशा वातावरणात ग्रामदान पुष्टीचे काम पुढे नेणे अशक्य आहे. निराळा मार्ग त्यासाठी चोखाळावा लागेल असे त्यांचे चिंतन चालले होते. लोकशाही संकटात आहे असा अनुभवही त्याना आला.

अशा परिस्थितीत युवकच कांही करु शकतील असे त्याना जाणवले 'लोकशाहीसाठी युवक' अशी नवीन घोषणा त्यानी केली. गुजराथमध्ये मुख्यमंत्री चिमनभाईविरुद्ध त्याच सुमाराला युवक सरसावले. बिहारमधील युवकानी आंदोलन सुरु केले. या आंदोलनाचे नेतृत्व जयप्रकाशजींना स्वीकारावे लागले. बिहार आंदोलनाने सर्वोदय चळवळीत विभाजन निर्माण केले. आणिबाणी, तुरुंगवास, सार्वत्रिक निवडणुका अशा क्रमाने सर्वोदय चळवळ वाटचाल करीत होती. दिल्लीचे सरकार बदलले. प्रांताप्रांतामधील निवडणुकात राज्यकर्ते बदलले. सरकारे बदलली समाजव्यवस्था बदलली नाही. हुकूमशाहीवर लोकशाहीचा विजय झाला एवढा अर्थ त्यातून काढता येईल. थोडयाच काळात जयप्रकाशजीही राहिले नाहींत.

सर्वोदय चळवळ नेतृत्वहीन झाल्यासारखी स्थितीं निर्माण झाली. गांधीं, विनोबा, जयप्रकाश सारखे उत्तुंग नेतृत्व नाहीं. चळवळींच्या भवितव्याबद्दल निरनिराळे अंदाज व्यक्त करण्यात येऊ लागले. सर्वोदय चळवळ व्यक्तिप्रधान नाही, विचारप्रधान आहे, हे लक्षात घेतले गेले नाही. कांही काळ अशाच अनिश्चित अवस्थेत गेला. नवीन परिस्थिती निर्माण होण्यास कांही काळ जाणे स्वाभाविक होते. गणसेवकत्व किंवा सामुहिक नेतृत्वाची प्रक्रिया सुरु झाली. आज असे म्हणता येईल

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

की, सर्वोदय चळवळ अनिश्चित अवस्थेतून बाहेर पडली आहे. सामुहिक नेतृत्व निर्माण झाले आहे. बदललेल्या परिस्थितीचा आढावा घेऊन नवीन कार्यक्रम पुढे आला आहे.

रशिया कोसळला. साम्यवादाची पिछेहाट झाली. भांडवलशाही जगात अमेरिका व जापानच्या संघर्षाने भांडवलशाही व्यवस्थाही डळमळत आहे. जगातील मुठभर बड्या भांडवलदारांनी विज्ञानाच्या नवनवीन संशोधनाचा दुरुपयोग करुन जगातील बाजारावर आपली पकड मजबूत करण्याचा प्रयत्न चालविला आहे. उदारीकरण, वैश्वीकरण अशा गोंडस नावाखाली जगातील बहुतेक सरकारे नव्या सापळ्यात अडकत आहेत. डंकेल प्रस्तावाने ही सर्व प्रक्रिया मुठभर भांडवलदाराच्या हितासाठी सुकर करुन ठेवली आहे. अशा पार्श्वभूमीवर जगात दोन जीवनशैलीची लढाई सुरु झाली आहे. साम्यवाद चालत नाही, भांडवलशाही टिकणार नाही. अशा संधी काळावर जग येऊन ठेपले आहे. जग नव्या पर्यायाच्या शोधात आहे. नफा व व्याज याच्या माध्यमाने सर्व जग शोषणाच्या चरकात पीळले जात आहे. प्रचंड कर्ज ही सर्वच देशाची समस्या बनली आहे. बहुराष्ट्रीय कंपन्यांनी एकानंतर एक जगाचे बाजार पादाक्रांत करण्याचा धडाका चालविला आहे.

पाश्चिमात्य सभ्यताविरुद्ध पौर्वात्य सभ्यता, उत्तर गोलार्ध विरुद्ध दक्षिण गोलार्ध, चंगळवाद विरुद्ध मानववाद असा सामना सुरु आहे. सर्वोदय चळवळ मानववादाच्या मदतीला न गेली तरच आश्चर्य. वर्तमान परिस्थितीचे विश्लेषण करुन सर्वोदय चळवळीने 'बहिष्कार व स्वदेशी' आंदोलनाचा कार्यक्रम ठरविला आहे. बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या उत्पादनाचा बहिष्कार करावयाचा व स्वदेशी वस्तूचा वापर व निर्मिती करावयाची असा प्रमुख कार्यक्रम आहे. जनतेकडून त्याला प्रतिसाद मिळत आहे. ही आंतरराष्ट्रीय लढाई आहे. जनतेला संघटीत सक्रिय करणे सोपे नाही. युवक व महिलांची या आंदोलनात महत्वाची भूमिका राहणार आहे.

मुक्त क्षेत्र, ग्रामस्वराज्य क्षेत्र या संदर्भातील प्रमुख कार्यक्रम तीन सलग गावांची निवड करावयाची. तेथे किमान एका विदेशी वस्तूचा शंभर टक्के बहिष्कार घडवून आणावयाचा. स्वदेशी वस्तूची विक्री व निर्मिती सुरु करावयाची. हा क्रम बहिष्काराच्या वस्तुंची संख्या व मुक्त गावांची संख्या वाढवित तालुका व्यापला गेला म्हणजे त्याला ग्रामस्वराज्य क्षेत्र मानावयाचे. असा मुक्त तालुक्यांचा कार्यक्रम देश पातळीपर्यंत न्यावयाचा अशी ही दिशा आहे.

त्यासाठी कार्यकर्ते धडपडत आहेत. यशापयशाच्या अनुभवातून मार्गक्रमण करीत आहेत. सर्वोदय चळवळीने वर्तमान परिस्थितीचे विश्लेषण करुन नवीन कार्यक्रम ठरविला आहे. नफा आणि व्याजाच्या आक्रमणाला स्वदेशीच्या महा अस्त्राने उत्तर देण्याचे ठरविले आहे. 'स्वदेशी म्हणजे शेजाऱ्याची सेवा' ही गांधीजींची व्याख्या समोर ठेवून मार्ग आक्रमिला पाहिजे. सर्वोदय चळवळीला उज्वल भवितव्य आहे, असे म्हणणे अतिशयोक्तीचे ठरु नये. ही चळवळ चालविताना विज्ञान युगाने जैव तंत्रज्ञानाच्या तिसऱ्या कालखंडात प्रवेश केला त्याची दखल घेतल्याखेरीज चळवळ प्रभावी होऊ शकणार नाही. ❑❑❑

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

॥६॥

महाराष्ट्रातील दलित चळवळ

डॉ. पी. जी. जोगदंड

प्रस्तुत लेखाच्या माध्यमाने महाराष्ट्रातील दलितांची पिढयानपिढया झालेली पिळवणूक व त्या संदर्भात दलिताकडून उभ्या झालेल्या चळवळी व त्यांचा सैद्धांतिक संदर्भ व तसेच दलितांच्या चळवळीचे परिणाम याचा समाजशास्त्रीय दृष्टिकोणातून मी विचार करणार आहे.

भारतीय समाजव्यवस्था जातिव्यवस्थेवर आधारलेली समाजव्यवस्था होती व आजतागयत आहे. कामाची विभागणी जातीवर ठरलेली होती. यामुळे कांही जातींना श्रेष्ठ दर्जा प्राप्त झाला. ज्या जाती कनिष्ठ म्हणून संबोधल्या गेल्या त्यांचे सातत्याने दमन व पिळवणूक झाल्याचे इतिहास सांगतो. प्रो. टी. के. वुमनच्या म्हणण्यानुसार कनिष्ठ जातीचे वेगवेगळया आघाडयावर deprivation झालेले आहे व या जाती संकलित प्रभुत्वाच्या (cumulative domination) शिकार झालेल्या होत्या.[1]

कालांतराने कनिष्ठ जातीमध्ये 'सापेक्ष वंचितता' या बाबीचीं जाणिव झाली. आम्ही कांही गोष्टीपासून वंचित आहोत हया क्रांतीकारी जाणिवेतूनच त्यांच्यात सामाजिक चळवळींना सुरुवात झाल्याची माहिती उपलब्ध आहे. ढोबळमानाने असे म्हणता येईल की, दलितांना तीन आघाडयावरील वंचितता जास्त प्रकर्षाने जाणवली १) सामाजिक व सांस्कृतिक वंचितता २) आर्थिक वंचितता ३) राजकीय वंचितता

म्हणून दलित चळवळीचा प्रोटेस्ट वरील तीन आघाडयावरील वंचितता नाहीशी करण्याच्या दृष्टिकोनातून घडून आला.

दलित चळवळीने नोंदविलेल्या विद्रोहाचे परिणाम काय झालें याची चिकित्सा पुढे बघू.

दलित चळवळीचा सैध्दांतिक संदर्भ

कुठल्याही समाजातून सामाजिक चळवळीचा उदय कसा होतो व त्यास

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कोणत्या प्रकारच्या संरचनात्मक परिस्थिती व इतर घटक कारणीभूत आहेत हे पाहणे महत्वाचे आहे. याबाबतीत विचारवंतांनी सामाजिक चळवळीच्या उगमाविषयी निर-निराळे सिद्धांत मांडले आहेत व सहाय्यक अशा घटकांचा व परिस्थितीचा आढावा घेतला आहे. आणि या सिद्धांताच्या चौकटीतूनच दलित चळवळीची मीमांसा करणे उद्‌बोधक ठरेल.

ज्यावेळेस सामुदायिक वर्तन व सामुदायिक कृती संघटित होतात त्यावेळेस सामाजिक चळवळ जन्म घेते. विशिष्ट प्रकारच्या कृती करण्यामागे सहभागी होणाऱ्यांचे सामूहिक हितसंबंध असतात. प्रत्येक चळवळीचे ध्येय हे प्रचलित समाजव्यवस्थेत बदल घडवून आणणे हेच असते. या संदर्भात कांही विचारवंताच्या चळवळी-विषयीच्या परिभाषा लक्षात घेणे योग्य ठरेल.

वॅलेसच्या[2] मते ज्यावेळी सहभागकाला सांस्कृतिक असमानता जाणवते त्या-वेळेस चळवळीस पोषक स्थिती तयार होते. अशाच वेळी चळवळीचे वारे वाहू लागते. बॅंक्स[3] या विचारवंताची परिभाषा थोडीशी व्यापक आहे. त्याच्या मतानुसार प्रचलित समाजव्यवस्थेमधील असमानता व असमाधान चळवळीच्या उदयास कारणीभूत होतात. तो पुढे म्हणतो, विचारसरणी व संघटना हे सामाजिक चळवळीच्या उदया-साठी महत्वाचे घटक आहेत. समाजशास्त्रज्ञ एम. एस. ए. राव [4] म्हणतात समाजातील एखाद्या घटकाने सामाजिक बदल घडवून आणण्यासाठी मुद्दाम होऊन केलेले व विचारप्रणालिवर आधारलेले सामुदायिक वर्तन म्हणजे सामाजिक चळवळ होय. राव पुढे म्हणतात सामाजिक चळवळीचे चार वैशिष्टचे असतात. :१) सामुदायिक कृती व सामुदायिक वर्तन २) योग्य नेतृत्व ३) विचारप्रणाली व ४) बदलाभिमूखता

यावरुन थोडक्यात असे म्हणता येईल की, समाजात कोणत्याही एका गटास किंवा बहुसंख्याकाना प्रचलित समाजव्यवस्थेमधील समस्या असंतुष्टता जाणवते तेव्हा स्थितीविरुद्ध बंड करण्याची उर्मी त्यांच्यामध्ये निर्माण होते. अशा प्रकारची जाणीव म्हणजेच चळवळीचा उगम होय. माणसाच्या अस्तित्वाला जेव्हा विरोध होतो तेव्हा सामाजिक द्वंद्वाला सुरवात होते. विद्रोह हा अमानुषतेविरुद्ध असतो.

दलित चळवळीच्या उगमाविषयी सांगायचे झाल्यास असे म्हणता येईल की, ही चळवळ पारंपारिक जातिव्यवस्थेमध्ये अस्पृश्यांना मिळालेल्या अमानुष वागणुकी-तून व संतापातून उभारलेली चळवळ आहे. आपल्या पिळवणुकीची व समाजातील निम्नप्रतिष्ठेची (degraded status) त्यांना जाणीव झाली. आपण आपल्या स्वत्वासाठी लढे उभारले पाहिजेत या जाणिवेतून दलित चळवळीचा उदय झाला असे ध्यानात येते.

बऱ्याच विचारवंतांनी सामाजिक चळवळीच्या उगमाविषयी सिद्धांत मांडले आहेत. त्या सिद्धांताचा संबंध दलित चळवळीशी कुठपर्यंत आहे हे पहावे लागेल.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

इतिहास कसा घडतो? ऐतिहासिक बदल कसे होतात? असे प्रश्न जनसामान्यांच्या मनात येणे साहजिक आहे. या संदर्भात ऐतिहासिक बदल आर्थिक शक्ती घडवितात येथपासून ते इतिहास माणसे घडवितात, इथपर्यंत सर्व विचारप्रवाह चर्चिले गेले आहेत. या विचारधारांच्या गदारोळात इतिहास, परिस्थिती आणि माणुस यांच्या समुच्चयाने घडतो असा कौल सर्वसामान्य माणसांचा येतो. या संतुलित विचारप्रवाहाची पाठराखण करण्याचे श्रेय एरिक हॉफर[5] यांना आहे. चळवळीची चिकित्सा करण्याच्या त्याच्या पद्धतीचे हे एक प्रसन्न वैशिष्ट्य आहे.

एरिक हॉफर यांची चळवळीची चिकित्सा एका मर्यादेत आहे. प्रथमत: त्याने चळवळीस पोषक परिस्थिती असावी हे मान्य केले आहे. हॉफर च्या 'चळवळ' या संकल्पनेची व्याप्ती ही विशाल आहे.

व्यक्ती प्रचलित व्यवस्थेवर असंतुष्ट होतात. व्यक्तींना असंतुष्ट करणे हे चळवळीस पोषक परिस्थितीचे प्रमुख वैशिष्य आहे. इसवीसनाच्या पूर्वी ज्यू धर्मगुरु शोषक व्यापारी बनले, ही परिस्थिती येशू ख्रिस्ताच्या उदयास कारणीभूत ठरली. जर्मनीतील राज्यघटनेच्या भोंगळ कारभारातून नाझी चळवळीचा उदय या गेल्या शंभर वर्षातील घटना. सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक शोषणयुक्त परिस्थितून या शतकात निग्रो व दलित चळवळी उभ्या राहिल्या आहेत.

नुसती अशी असंतुष्ट परिस्थिती असून चालत नाही. ही परिस्थिती चळ-वळयोग्य होण्यासाठी प्रचलित व्यवस्थेतील दोष शब्दबद्ध करुन प्रचलित करण्यासाठी शब्दप्रभूंची गरज पडते. त्यामुळे प्रत्येक चळवळीतील बुद्धिमंतांचे योगदान इतिहासानें मान्य केले आहे. फ्रेंच राज्यक्रांतीत रुसो, मार्क्सवादी चळवळीत कार्ल मार्क्स, एंग्लस व लेनिन यांचा प्रभाव जगमान्य आहे. तसेच निग्रो चळवळीतील फ्रेडरिक डग्लस, मार्टिन लूथर किंग, जेसी जॅक्सन व ईतर निग्रो मंडळी, तर दलित चळवळीतील महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या साहित्याचा वाटा अत्यंत महत्वाचा आहे. भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या पहिल्या पर्वात लोकमान्य टिळक प्रभृतींनी हेच कार्य केले. टिळकांना इंग्रज 'भारतीय असंतोषाचे जनक' म्हणायचे त्यात त्यांच्या कार्याचे नेमके मूल्यमापन आलेले आहे. यामुळेच गांधीजीना स्वातंत्र्य चळवळीचा विस्तार वाढवून ती प्रभावी करणे शक्य झाले.

इथपर्यंत चळवळीचा एक महत्वपूर्ण टप्पा आहे. हा चळवळीचा दारुगोळा अष्हे असे म्हणता येईल. याला 'वत्ती' लावण्याची क्रिया चळवळीच्या नेतृत्वाकडून घडते. ही चळवळीची कार्यरत अवस्था आहे. आणि एरिक हॉफर यांचे विश्लेषण प्रामुख्याने या कार्यरत अवस्थेपुरते मर्यादित आहे.

हॉफर यांचे विश्लेषण मानसशास्त्रीय झाले आहे कारण या अवस्थेत कार्य-कर्ता चळवळीचा प्रमुख घटक असतो. हा कार्यकर्ता असंतुष्ट परिस्थितीचे नुसते बौद्धिक

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आकलन झालेलाच असून चालत नाही तर तो प्रचलित व्यवस्थेत अत्याचारग्रस्त झालेला असावा लागतो. असा कार्यकर्ता अत्याचारविरोधी सिद्धांतांनी एवढा भारावून जातो की तो इतर कांहीच पाहू शकत नाहीं. त्याच्या सिद्धांताशिवाय तो काहीं पाहू, ऐकू शकत नाही. याला अतिश्रद्ध म्हणता येईल. एरिक हॅाफर यांनीं यासाठीं एक शब्द वापरला आहे. (The true Believer) हे अतिश्रद्ध कार्यकर्ते वेगवेगळ्या परिस्थितीतून येतात पण त्यांचे एक वैशिष्टयपूर्ण लक्षण असते. ते प्रचलित परि-स्थितीवर पूर्णपणे असंतुष्ट असतात. त्यामुळे परिस्थिती बदलणे हाच त्यांच्या जीव-नाचा एकमेव अर्थ बनतो.

या सिद्धांताचा संबंध दलित चळवळींत कुठपर्यंत आहे? या विषयीं असे म्हणता येईल की भारतीय समाजव्यवस्थेतील कमालीच्या असमानतेची परिणती दलितांच्या चळवळीं उभ्या राहण्यात झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे खंबीर नेतृत्व ही परिस्थिती चळवळयोग्य बनण्यास कारणीभूत झाले. प्रचलीत समाजरचनेत असंतुष्ट अशा दलित समाजाने चळवळीत उडया घेतल्या. समाजातील त्यांच्या दर्जा-विषयी व एकंदरीत व्यवस्थेविषयी असंतुष्ट असलेला समाज आज शक्य असलेल्या सर्व आघाड्यावरुन चळवळी उभारण्याच्या प्रयत्नात आहे असे स्पष्ट चित्र दिसते 'विषमता जाणिवेतून चळवळ' (From discrimination to protest) असा त्यांच्या चळवळीचा मार्ग आहे.

चळवळीच्या उगमाविषयी आणखी एक महत्वाचा सिद्धांत आहे. तो सिद्धांत म्हणजे 'सापेक्ष वंचितता' (Relative deprivation)[6] समाजातील वेग-वेगळ्या स्तरातील लोक जेव्हा आपले जीवन, दर्जा, व स्थिती यांचा इतर स्तरा-बरोबर तुलना करतात तेव्हा विशिष्ट थरातील लोकांना त्यातील तफावत प्रखरतेने जाणवते व अशा प्रकारच्या जाणिवेची प्रखरता हीच बदलाची शक्ती असते.

दलित चळवळीच्या संदर्भात या सिद्धांताचा विचार केल्यास असे दिसून येईल की दलितांचे एकंदर जीवनच इतर स्तरातील लोकाबरोबर तुलना केल्यास त्यांना त्यांच्या वंचिततेची प्रखर जाणीव होण्यासारखे आहे. यास 'सापेक्ष वंचितता' असा शब्दप्रयोग केला आहे. हीच जाणीव दलित चळवळीमागील प्रेरणाशक्ती आहे. धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय व आर्थिक क्षेत्रात दलितांना सापेक्ष वंचि-ततेची जाणीव प्रखरतेने वाटू लागली. याचाच परिणाम म्हणून या समाजात सामा-जिक बदलाचा दाब निर्माण झाला.

स्मेलसरने[7] सामाजिक चळवळीच्या उदयासाठी ताण-तणाव सिद्धांत (Strain theory) मांडला आहे. त्याच्या मतानुसार जेव्हा समाजातील विविध गटामध्ये असणाऱ्या परस्पर संबंधामध्ये तणाव निर्माण होतात तेव्हा सामाजिक बद-लाची स्थिती तयार होते.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सामाजिक चळवळीच्या उदयासंबंधी आणखी एक 'पुनर्जीवन सिध्दांत' (Revitalization theory) वॅलस ने[४] मांडला आहे. त्याच्या मतानुसार विशिष्ट अशा थरातील लोकानी जाणीवपूर्वक व समुच्चयाने त्यांच्या संतोषजनक सांस्कृतिक प्रस्थापनेसाठी केलेल्या प्रयत्नात सामाजिक चळवळीचीं बीजे असतात.

वरील सिद्धांताचा आढावा घेतल्यास सामाजिक चळवळ ही घृणेतून व संतापातून जन्म घेतें असे लक्षात येते.

एम. एस. ए. राव यांनी दलित चळवळीची मीमांसा करताना ही चळवळ अस्वीकारात्मक स्वरुपाची (rejectionist) होती असे म्हटले आहे. अन्याय, जातिभेद व पारंपरिक धर्मव्यवस्था यांचा अस्वीकार करुन नवी प्रतिमा (new identity) प्रस्थापित करणे हेच दलित चळवळीचे उद्दिष्ट होते. अस्पृश्यता, विषमता व जातीयता याची परिणती डॉ. आंबेडकर व त्यांच्या लाखो अनुयायांनी बौद्ध धम्म स्विकारण्यात झाली. धर्मांतरामुळे सामाजिक प्रश्न सुटला नसला तरी स्वत्वाची जाणीव व अन्यायाविरुद्ध समुच्चयाने लढा देण्याची तयारी दलितामध्ये निर्माण झाली हे नाकारता येत नाही. राव यांनी मागासवर्गीय व दलित चळवळीच्या उदयासाठी सापेक्ष वंचितता ही जाणीव कारणीभूत झालेली आहे असे स्पष्ट मत मांडले आहे. चळवळी उभारण्यामागे जुन्या गोष्टींचा अव्हेर करुन नवी ओळख प्रस्थापित करणे हा हेतू होता असे राव यांनी प्रतिपादन केले आहे.

वरील व्याख्यांच्या व सिद्धांताच्या चौकटीतून दलित चळवळीची चिकित्सा केली तर ती एक सामाजिक चळवळ आहे असे ध्यानात येते. विशिष्ट उद्दिष्टचे समोर ठेवून उभी राहिलेली ही एक विद्रोही चळवळ आहे. सामाजिक चळवळीचे सर्व निकष ही चळवळ परिपूर्ण करते. विशिष्ट सिद्धांतावर उभी असलेली दलित चळवळ ही एक व्यापक चळवळ आहे हे वादातीत आहे. 'सापेक्ष वंचितता' संकल्पनेतून दलित चळवळीची चिकित्सा करणे जास्त संयुक्तिक आहे असे माझे मत आहे. काय आहे? यापेक्षा काय असावयास पाहिजे ? हे या संकल्पनेचा केंद्रबिंदू आहे. ग्राऊंड रियालिटीचे विश्लेषण करणारी ही संकल्पना आहे. आणि म्हणून सापेक्ष वंचितते-पासून चळवळीकडे असा दलित चळवळीचा मार्ग आहे हेही ध्यानात येते.

दलित चळवळीचे तीन पर्व

ढोबळमानाने दलित चळवळीचे तीन पर्व आहेत. आंबेडकरपूर्व द. चळवळ आंबेडकर चळवळ व आंबेडकरवादाची द. चळवळ, पहिल्या पर्वात प्रामुख्याने गोपाळबाबा वलंगकर, शिवराम जानबा कांबळे, किशन भागुजी बनसोडे यांच्या कार्याचा आढावा घ्यावा लागतो. त्याच बरोबर विठोबा रावजी मून, कालीचरण नंदा गवळी, रेवाराम कवाडे, केशवरावजी खंडारे इ. समाज सुधारकांनी महत्वाची कामगिरी केली आहे. आणखी एक महत्वाची बाब म्हणजे 'महासभेची' निर्मिती (१९१२) या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कालखंडातील दलित चळवळींचा भर हा आंतरिक बदलावर जास्त होता. म्हणून पहिल्या पर्वात आपल्याला विद्रोह दिसत नाही. वरील सर्व पुढाऱ्यांनी जाणीव-जागृतीचे महान कार्य केले. पण त्या जाणीव जागृतीला त्यांना दिशा देता आली नाही. म्हणून दलित चळवळीचे पहिले पर्व हे अॅकॉमडेटिव्ह स्वरुपाचे होते असे लक्षात येते. महाराष्ट्रा व्यतिरिक्त दुसऱ्या प्रांतात पण याच कालखंडात अनेक दलित चळवळी झाल्या आहेत. त्यांचा उल्लेख या ठिकाणी मी मुद्दाम केला नाही कारण या लेखाची कक्षा मुद्दाम मर्यादित ठरविली आहे.

या चळवळीच्या दुसऱ्या पर्वात विद्रोहाची मालिका आपल्यासमोर आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक आघाड्यावर प्रोटेस्ट नोंदविले आहेत. आंबेडकरांचा लढा म्हणजे खऱ्या अर्थाने मानवमुक्तीचा लढा होता. स्वातंत्र्य, समता, बंधुता या मूल्यांचा शोध घेणारे विद्रोह होते. माणुस विज्ञाननिष्ठ व्हावा, माणुसकीची व अस्मितेची त्याला जाणीव व्हावी या व्यापक उद्दिष्टाभोवतीच बाबासाहेबांचे सर्व लढे केंद्रभूत झालेले आहेत. विद्रोहाच्या मालिकेचे फलित काय झाले हे स्पष्ट करण्यासाठी या ठिकाणी मी एक तक्ता दिला आहे.[10]

— तक्ता —

सामाजिक बदलाचा घटक	प्रोटेस्टची स्टाईल	दिसणारे परिणाम
दलित प्रोटेस्ट चळवळ	सामाजिक	अन्यायाविरुद्ध संघर्ष करण्याची उर्मी निर्माण झाली, आत्मविश्वास, मानवी हक्क मिळाले, सामुदायिक कृतीचे फलित काय असते ते जनसामान्याला कळले.
,,–,,	राजकीय	राजकीय पक्षांची बांधणी, दलितांचा राजकीय सहभाग वाढला, रा. जाणीव निर्माण झाली. राजकीय जाणीवेतून स्वतंत्र मतदार संघाची मागणी पुढे आली.
,,–,,	सांस्कृतिक	धर्मांतर घडून आलें. दलितांना नवीन मूल्य मिळाली, स्व. अस्तित्वसाठी प्रयत्न माणुसकी मिळाली, जीवनाची नवीन सुरवात झाली. न्यूनगंड गळून पडला, स्वत:च्या जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला.

स्व-अभियान, स्वतंत्र अस्मिता, क्रांतीकारी जाणीव, प्रचंड आत्मविश्वास, पारंपारिक गोष्टी सोडून देण्याची तयारी, विज्ञाननिष्ठ मूल्य स्विकारण्याची माणसिक तयारी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ही या पर्वाची ठळक वैशिष्टये सांगता येतील.

दलित चळवळीच्या तिसऱ्या पर्वात रिपब्लिकन पक्ष, दलित पँथर चळवळ, दलित साहित्य चळवळ, दलित रंगभूमी, बामसेफ आणि अलिकडील भारतीय रिपब्लिकन पक्ष व बहुजन महासंघ व बहुजन समाज पक्षाच्या उदयाचा व वरील पक्ष संघटनांनी वेळोवेळी केलेल्या चळवळीचा अंतर्भाव होतो.

जोरदार विद्रोह झाले ते पँथर व साहित्याच्या माध्यमातून. नंतर या चळवळीचे स्वरुप हे एकसंध राहिले नाही. या पर्वात प्रोटेस्ट झाले पण ते सौम्य स्वरुपाचे होते. परिणामी समाज व्यवस्थेला फारसा आघात झाला नाही. फुटकळ स्वरुपाचे विधायक परिणाम झाले आहेत पण लांब पल्ल्याची दृष्टी नसल्याने चळवळीत सातत्य राहिले नाही. मानापानाच्या विळख्यात ही चळवळ अडकली. तडजोडवादी भूमिका स्विकारल्यामुळे विद्रोही लढ्याची धार बोथट झाली. पॅट्रान–क्लाईंट संबंध दर्शवणारी दलित चळवळ ठरली. समुच्चयाने लढा देण्याची ताकत व तयारी लोप पावली.

दलित चळवळीची आजची स्थिती

आजची द. चळवळ फार मोठ्या पेचात सापडली आहे असे दिसते. चळवळीत प्रचंड स्थिरता निर्माण झाली आहे. यात कुठलीही आघाडी अपवाद म्हणून सांगता येणार नाही. या चळवळीचा प्रवाह रोखला गेला आहे. द. चळवळीची चिकित्सा सामाजिक चळवळीचे समाजशास्त्राच्या चौकटीतून कशी करणार? सामाजिक चळवळीच्या वैशिष्टयावरुन आजच्या दलित चळवळीचे परीक्षण केल्यास या चळवळीस सामाजिक चळवळ म्हणता येईल का? असे बरेचसे प्रश्न आपल्या मनात निर्माण होतात. लांबची व नजिकची उद्दिष्टये याची फोड करता आली नाही. नजिकच्या उद्दिष्टावर जास्त शक्ती केंद्रीत केल्यामुळे मुख्य विषय बाजूला फेकले गेले. या चळवळीत सामुदायिक कृती याचा प्रकर्षाने अभाव आहे. बुद्धीजीवी, पुढारी, कार्यकर्ते व जनसामान्य यांच्यात आंतरक्रिया राहील्या नाहीत. मुख्य म्हणजे या चळवळीमध्ये आपआपसात ताळमेळ नाही.

आज दलित चळवळीत सहभागी कोण होतात? ढोबळमानाने आजच्या द. चळवळीत तीन प्रकारचे लोक सहभागी होताना दिसतात. १) चळवळीस बाहेरुन तोही जेमतेम पाठिंबा देणारे दलितामधील श्रेष्ठीजण २) वारंवार सहभागी होणारे जनसामान्य आणि ३) विविष्ट अंतर कायम ठेवूत सहभागी होणारे. 'पेरीफेरल पार्टीशीपंट'[11] या सहभागामध्ये क्र. १ व ३ चे सहभागी स्वार्थी व संकुचित हेतू मनात ठेवून सहभागी होताना दिसतात. परंतु जनसामान्यांच्या कायम सहभागामुळे आजची द. चळवळ जीवंत आहे. हा सेक्शन या चळवळींचा कणा आहे. जनसामान्यांच्या अशा सहभागामुळे सर्व गटातटांचे एकंदरित बरे चालले आहे. परिणामी, जनसामान्य आमच्याच पाठीशी आहेत असे सर्वांनाच वाटत आले आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अलिकडे ही दलित जनता उदासीन झाली आहे असे दिसते. १४ एप्रिल ६ डिसेंबर व १४ ऑक्टोबरला एकत्र येणे. बाबासाहेबांच्या फोटोला अगरबत्ती, मेणबत्ती लावणे, फुले वहाने. बाबासाहेबांच्या चांगल्या फोटोची व पुस्तकांची खरेदी करणे. फार झाले तर एखाद्या मोर्चात सहभागी होणे व दलित नेत्यांना व कार्यकर्त्यांना जयभिम ठोकणे. बस्स, अशी दलित समाजाची दिनक्रिया आहे.[12]

दलित साहित्याला अलिकडे चांगले दिवस आले आहेत हे जरी खरे असले तरी दिशाहीन द. चळवळीला दलित साहित्य चळवळ दिशा देऊ शकली नाही. आपण लिहिलेल्या दलित साहित्याला (कथा, कविता, आत्मकथन इ. प्रकार) पुरस्कार मिळावा या नशेतच आमची दलित मंडळी राहिल्याने आपण जनसामान्यापर्यंत पोचावे असे त्याना कधी वाटलेच नाही. बाबासाहेबांना 'क्रांतीसुर्य, प्रज्ञासुर्य, ज्वालामुखी ' इ. विरुदावली लावून साहित्यीक मंडळी मोकळे झाले आहेत. आत्मकथन व कवितासंग्रह यांना तर खूप पीक आले आहे. हा सर्व साहित्यप्रकार व आजची दलित चळवळ यात कांही समन्वय आहे काय ? दलित चळवळीच्या रोखल्या गेलेल्या प्रवाहाला वाट देवून दिशा दिग्दर्शनाचे कार्य आमचे साहित्यिक करताना दिसत नाहीत ही फार मोठी शोकांतिका आहे.

दलितामध्ये आज मध्यमवर्ग निर्माण झाला आहे. व्यक्तीगत पातळीवर हा वर्ग गरजूना मदत करताना दिसतो पण मध्यमवर्ग / गट संघटीत होवून पुढे येताना दिसत नाही. थोडक्यात, राखीव जागावरच डोळा ठेवून वावरणारे सुशिक्षित तरुण, निवडणुकांच्या राजकारणावरच सर्व शक्ती एकत्रित करणारे राजकारणी संघर्षापेक्षा सामोपचाराने वागणारे कार्यकर्ते, आंबेडकरी धम्मापेक्षा पारंपारिक कर्मकांड, विधी करणारे अति उत्साही या सर्वांनी मिळून दलित चळवळीला आज अवकळा आणली आहे.[13]

या पेचातून दलित चळवळीला बाहेर काढावयाचे असेल तर आपण काय केले पाहिजे असा प्रश्न मी संशोधन करताना १०० लोकांना विचारला. यासंदर्भात शंभर लोकांच्या प्रतिक्रिया खालीलप्रमाणे. ४४ टक्के लोक म्हणतात दलित चळवळीत ऐक्य पाहिजे. ऐक्य ही काळाची गरज आहे. १४ टक्के म्हणतात मुलभूत प्रश्नावर दलितांनी कायम लढा दिला पाहिजे त्यात धरसोड नसली पाहिजे. लांबची व जवळची उद्दिष्टचे फोड करता आली पाहिजे असे १० टक्के उत्तरात म्हणतात. ९ टक्के म्हणतात या चळवळीला वेगवेगळ्या आघाड्या हव्या. ८ टक्के लोकांचे असे म्हणणे आहे की धार्मिक घटक बाजूला ठेवावा. उठसुठ धार्मिक बाब पुढे करु नये. दुसऱ्यांच्या नावाने शंख करण्यात कांही अर्थ नाही स्वतःचे परीक्षण करावे असे ६ टक्के उत्तरदाते म्हणतात. आजच्या दलित चळवळीत समता, स्वातंत्र्य व बंधुभाव हे तत्त्व अंगीकारले पाहिजेत तर ३ टक्के लोकांच्या म्हणण्यानुसार वर्ग व जात दृष्टिकोन

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

या चळवळीने स्विकारावा. दलित चळवळीच्या पुनर्बांधणीसाठी १०० टक्के लोकांच्या प्रतिक्रिया मार्गदर्शक ठराव्यात असे वाटते.[14]

बहुजन राजकारण : दलित चळवळीला नवे वळण

बहुजनांच्या राजकीय सहभागामुळे व राजकीय उलाढालीमुळे दलित चळ- वळीत एक नवी फेज पुढे येऊ पहात आहे. ओ. बी. सी. मधील राजकीय जाणीव तीव्र झाली आहे. दलित-बहुजन मिळून नवीन राजकीय .मोर्चेबांधणी करत आहेत. बहुजन समाजाच्या ऐक्यातून राजकीय परिवर्तन करण्याची ही प्रक्रिया आहे. दलित चळवळीला नवा आशय नवा संदर्भ लावून नवे वळण देण्याचा प्रयत्न आहे असे बोलले, लिहीले जात आहे.[15]

आज 'बहुजन' ही संकल्पना पुढे येऊ पाहतेय. म्हणजेच दलित या संकल्प- नेला मर्यादा आहेत असेच ग्रहित धरायचे काय?

दलित आइडेन्टिटिला जातिचा स्टिग्मा आहे व पोटजाति पकडून ठेवणारा पुंजका (cluster) आहे असे प्रतिपादन होत आहे. दलित अस्मिता ही बहुजन अस्मितेमध्ये वितळवून (melt) ८५ टक्केवाल्यांची व्यापक आइडेन्टिटि प्रस्थापित होऊ शकते. 'बहुजन सुखाय, बहुजन हिताय' हे बाबासाहेबांचे उद्दिष्ट लोकशाहीच्या उद्दिष्टाजवळचे आहे. म्हणून आज बहुजन अस्मिता स्विकारली पाहिजे असे जोरदार समर्थन होत आहे. महाराष्ट्रातील बहुजनांच्या मानसिकतेमध्ये आज बदल होत आहे असे चित्र दिसते. त्यांच्यात असांस्कृतिकरणाची प्रक्रिया जोर धरते आहे. स्वतःची वेगळी ओळख (बहुजन) करुन देता येते. बाबासाहेबांच्या विचारांचा शोध घेवून जवळीकता साधण्याचा प्रयत्न जारी आहे असे एकंदरीत उलथापालथीवरुन दिसते. जातिचा उपयोग करुनच जाती नष्ट करावयाच्या आहेत आणि हे राजकीय अभि- सरण। घुसळण झाल्यासच शक्य आहे असेहीं बोलले जात आहे.[16]

उलट बहुजन समाज राजकीय स्वार्थासाठी एकत्र येतो आहे. हा समुह वैचारिक पातळीवर एकत्र येऊ शकेल का? ही शंका आहे. वैचारिक पातळीवर हा समुह एकत्र येत नसेल तर तो केवळ चेहरा नसलेला समूह ठरेल असीही भीती व्यक्त करण्यात येत आहे.[17]

राजकीय सत्ता हस्तगत केल्यास सामाजिक क्रांती घडून येईल का? म्हणजे प्राधान्य कशाला द्यायचे राजकीय सत्ता काबीज करण्याला की सामाजिक बदलाला हा वाद सुरु होतो. भा. रि. प. दलितांसाठी व महासंघ ओ. बी. सी. साठी असेच गृहीत धरायचे का? राजकारणावरच जास्त शक्ती केंद्रीत केल्याने इतर आघाड्याची मुद्यांचीं पडझड होत आहे. हातात सत्ता आली की समतेचा सूर्य लगेच उगवतो, या एकाच तत्त्वावर राजकारणाचा कबिला चालला आहे. समता, जातिनिर्मूलन या गोष्टी सत्तेशी कमी आणि मानसिकतेशी अधिक निगडित आहेत. पण ही मानसिकता

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

संपविण्यासाठी ठोस प्रयत्न होत नाहीत. सर्व समस्यांचे निदान राजकीय सत्ता काबीज करण्यातच आहे असे बहुजन नेतृत्वाला वाटते असे थोडक्यात सांगता येईल.

बहुजन समाज पक्षाची मोर्चेबांधणी महाराष्ट्रात सुरु झाली आहे. या पक्षाची भीस्त ही बहुजन समाजावरच आहे. महाराष्ट्रातील दलित नेतृत्वाने कांशी-रामची फारशी दखल घेतलेली नाही असे दिसते. 'जाती तोडो समाज जोडो' या नाऱ्यासोबत इथली समाजव्यवस्था 'व्हरटीकल' आहे ती 'होरीझाँटल' करणे असा त्यांचा प्रमुख मुद्दा आहे. सत्ता हस्तगत केल्याशिवाय हे शक्य नाही असे त्यांना वाटते. उत्तर प्रदेशात राजकीय सत्ता हस्तगत केल्यानंतर देशाची राजकीय सत्ता हस्तगत करण्यासाठी त्यांचा प्रयत्न आहे.

महाराष्ट्रातील दलित चळवळीत ही नवीन फेज आहे इथपर्यंत दखल घेण्याचा याठिकाणी हेतू आहे. तपशील देणे किंवा तुलनात्मक अभ्यास करणे याठिकाणी अप्रस्तुत ठरेल.

सारांश, राजकीय पातळीवर नवीन ध्रुवीकरण होऊ पाहात आहे. दलिता-तील एक गट कॉंग्रेस सोबत राहून सहकार व सरकारमध्ये हिस्सा मागत आहे.[18] अलिकडे ख्रिश्चन दलित आरक्षणाचे फायदे मिळाले पाहिजेत अशी मागणी करत आहेत. ख्रिश्चन धर्म स्विकारल्यानतरही त्यांची स्थिती सुधारलेली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. त्यांच्या धर्मप्रेरणा वेगळ्या आहेत हे वादातीत आहे पण विषमता व दलित्वाच्या मुद्यावर ते इतर दलितासारखेच वंचित आहेत असे अलिकडे जाणवू लागले आहे. [9]

या सर्व बाबी आजच्या दलित चळवळीसमोर उभ्या आहेत. फुले-आंबेडकरी विचारप्रणालीवर या चळवळीची पुनर्बांधणी केली तर पुन्हा एकदा दलित चळवळीस प्रोटेस्ट स्वरुप येईल व सामाजिक बदलासाठी एक साधन म्हणून मदत होईल यात शंका नाही.

संदर्भ सूची –

१) वुमन टी. के सोर्सेस ऑफ डिप्रीव्हेशन अॅण्ड स्टाइल्स् ऑफ प्रोटेस्ट : दि केस ऑफ दलित इन इंडिया" कॉन्ट्रब्रुशन टू इंडियन सोशालॉजी, जानेवारी – जून, १९८४.

२) वॅलेश ए. एफ. सी. " रिव्हायटलायझेशन मुव्हमेंट ", अमेरीकन अँथोपॉलॉ-जीस्ट, १९५६.

३) बॅक्स जे. ए. दि सोशॉलॉजी ऑफ सोशल मुव्हमेंडस् मॅकमीलन प्रेस, लंडन, १९७२.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

४) राव एम. एस. ए. सोशल मुव्हमेंट इन इंडिया, खंड १, १९७९.

५) एरिक हॉफर, दि ट्रू बिलीव्हर, न्यूयार्क, १९५१.

६) एस. स्टफर, दि अमेरीकन सोल्जर : एडजेस्डमेंट डुरींग आर्मी लाइफ, खंड १ प्रिन्सटॉन विद्यापीठ प्रेस, प्रिन्सटॉन, १९४९, पुढे आर. के. मर्टन नी ही संकल्पना 'संदर्भ गट' या नावाने विकसीत केली.

७) स्मेलसर, थेअरी ऑफ कलेक्टीव्ह बिव्हेइर, फ्री प्रेस न्यूयार्क, १९५३.

८) वॅलेस, पहा संदर्भ क्र. २.

९) राव, संदर्भ क्र. ४.

१०) जोगदंड पी. जी. महाराष्ट्रातील दलित चळवळ, कनक प्रकाशन नवी दिल्ली, १९९१.

११) उपरोक्त

१२) गाडे बाबासाहेत, स्वार्थीवार नि मानापानाच्या विळख्यात अडकलेल्या दलित, चळवळी, दै. लोकमत (औरंगाबाद) ६ डिसेंबर, १९८७.

१३) भोळे भा. ल. " महाराष्ट्रातील दलित चळवळ " महाराष्ट्रातील परिवर्तनाच्या दिशा, संपा. पानसे रमेश, मधुकरराव चौधरी गौरव ग्रंथ, मॅजेस्टिक प्रकाशन, १९८९.

१४) जोगदंड पी. जी. उपरोक्त.

१६) पंदेरे शांताराराम " फुले – शाहू – आंबेडकरी चळवळीचे नवे वळण " लेख

१६) प्रा. जोगदंड ए. के. व अॅड. जयदेव गायकवाड यांची प्रत्यक्ष मुलाखत.

१७) ढाले राजा, " सम्यक क्रांती व 'बहुजना'चे राजकारण " नवशक्ती, १९ मार्च १९९४.

१८) आठवले रामदास यांची मुलाखत, रविवार दिनांक, पान १२

१९) निर्मल अरविंद यांचे अध्यक्षीय भाषण, पहिले मराठी ख्रिस्ती दलित साहित्य संमेलन, अहमदनगर, मे १९९२.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

॥७॥

स्त्री-मुक्ती चळवळीतील विचार प्रवाह

विद्युत भागवत

काटेकोर विचार केला तर स्त्री-वादी चळवळ व विचार आणि स्त्री-मुक्तिवादी चळवळ व विचार ह्यात फरक आहे, व तो केला पाहिजे. स्त्रीवाद हा शब्द स्त्री-प्रश्न मांडणीच्या संदर्भात सर्वसमावेशक आहे. आहे. त्या प्रवाहात स्त्री-मुक्तिवाद ही येतो पण स्त्री-मुक्तिवाद मात्र गेल्या दोन दशकातील पाश्चात्य देशातील एक विशिष्ट जहाल भूमिका घेणाऱ्या गटाचाच विचार आहे. अर्थात रोजच्या व्यवहारात मात्र हे दोन शब्द समानार्थी असल्याप्रमाणे वापरले जातात.

१९६० सालानंतर पाश्चिमात्य जगात 'स्त्री-प्रश्ना'संबंधी जो नवा विचार सुरु झाला तो ह्या लेखात मांडणार आहे. "दि सेकंड सेक्स" हे सिमॉन दि बोह्-व्हाचे गाजलेले पुस्तक १९४९ साली प्रकाशित झाले. पण त्या पुस्तकाचा खरा प्रभाव व उपयोग १९६० नंतरच मोठ्या प्रमाणात झाला. हे लक्षात घेतले तर आधुनिक स्त्रीवादी विचारप्रवाह प्रामुख्याने १९६० ते १९८० ह्या दोन दशकात निर्माण झालेले दिसतात.

१९६० सालाच्या आसपास पाश्चिमात्य जगात स्त्री-प्रश्नाविषयी पुन्हा एकदा जवळजवळ चाळीस वर्षांच्या कालखंडानंतर विचारमंथन सुरु झाले. हा अपघात नव्हता. दुसऱ्या महायुद्धानंतर पश्चिम युरोप व अमेरिका येथील समाज युद्धोत्तर पुनर्रचनेच्या कामात व्यग्र होता. १९४५ ते १९६० च्या काळात अमेरिका आणि युरोपच्या ह्या भागात सुबत्ता व कल्याणकारी राज्याचे निर्माण केलेल्या सर्व तऱ्हेच्या सुविधांचे पेव फुटले. सुबत्तेने झपाटलेल्या ह्या काळात आपण पुरुषप्रधान संस्कृतीत अधिकाधिक गुरफटून जात आहोत, ह्याचे भान स्त्रियांना फारसे राहिले नाही. पण १९६० च्या आसपास मिक्सर, फ्रिज, वॉशिंग मशिन, व्हॅक्युम क्लीनर इत्यादी घरगुती उपकरणेवजा कल्पत्या (gadgets) चे नावीन्य ओसरले आणि शिक्षण किंवा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तत्सम सुविधा मिळूनही आपण केवळ शोभेच्या वस्तूच म्हणूनच वावरतो आहोत, हे स्त्रियांना जाणवू लागले.

दुसऱ्या बाजूने बाह्य परिस्थितीही झपाट्याने बदलत होती. १९६० नंतर इंडोचीन द्वीपकल्पातील युद्ध भडकत गेले. त्यात अमेरिकेची मनुष्यहानी जसजशी वाढत गेली तसतशा युद्धविरोधी जहाल चळवळी व विचार अमेरिकेत व नंतर पश्चिम युरोपमध्ये वाढू लागले. ह्याच कालखंडात अमेरिकेतील काळ्यांच्या चळवळीनेही उग्र रुप धारण केले. १९६८ च्या पॅरिसमधील विद्यार्थ्यांच्या बंडाच्या आसपास व नंतर पश्चिम युरोपमधील व नंतर अमेरिकेतील विद्यार्थी व युवक चळवळी अधिकाधिक जहाल बनत गेल्या. थोडक्यात १९६० ते १९७५ ह्या काळात पाश्चिमात्य देशात जीवनाच्या सर्व क्षेत्रात जहालवादी विचारांचा गदारोळ माजला. १९६० सालानंतर आपल्या परवशतेचे भान येऊ लागलेल्या स्त्री-चळवळीवर वर उल्लेखिलेल्या इतर चळवळींचाही प्रभाव पडला.

स्त्रीवादाचे सार एका वाक्यात सांगायचे झाले तर पुरुषांच्या जोडीने स्त्रियांच्या समतेचा धरला गेलेला आग्रह. ह्यापूर्वी ह्या संकल्पनेचा अर्थ असा होता की, स्त्री-पुरुषांचे गुणधर्म मुळात वेगळे आहेत म्हणून त्यांची कार्यक्षेत्रेही वेगळी आहेत व असली पाहिजेत. ह्या स्वायत्ततेचे भान ठेवणे म्हणजे समता, असे मानले जात होते. स्त्री-पुरुषांनी एकमेकांना पूरक रीतीने वागवून आपापल्या क्षेत्रात विकास साधला पाहिजे, असा ह्या मांडणीचा रोख असे.

आजच्या स्त्री-वादी विचारात समतेचा हा अर्थ कोणालाही मान्य नाही. पुरुष हा विवेकत्त्वाचा प्रतिनिधी तर, स्त्री ही भावनाविश्वाची प्रतिनिधी, अशी जुनी विभागणी त्या अमान्य करतात. माणूस म्हणून स्त्री-पुरुषाचे गुणधर्म व म्हणून श्रेय-कल्पना एकच आहेत व असल्या पाहिजेत, असा हा नवा विचार आहे. म्हणूनच इतिहास घडविताना जीवनाच्या सर्व क्षेत्रात सर्जनशील रीतीनें जगण्याचा व स्वतःला अभिव्यक्त करण्याचा स्त्रिया व पुरुष, दोघांनाही तितकाच हक्क आहे. आतापर्यंतच्या ऐतिहासिक वाटचालीत स्त्री-पुरुषांतील भेद जे वरकरणी स्वाभाविक वाटतात, नैसर्गिक वाटतात ते वस्तुतः मानवनिर्मित म्हणजेच पुरुषनिर्मित आहेत. खऱ्या माणुसकीच्या समाजात स्त्री-पुरुषांच्या भिन्नतेचे स्वीकार करुनही त्यांचे सामाजिक गुणधर्म समानपणेच घडविले जातील आणि गेले पाहिजेत, असा त्यांचा आग्रह आहे.

स्त्रियांची पारंपारिक भूमिका बदलू पाहाणाऱ्या ह्या चळवळीत विविध विचारांच्या संघटना, व्यक्ती आणि संकल्पना अंतर्भूत आहेत. त्यात सुधारणावादी विचारांपासून जहाल विचारापर्यंत सर्व तऱ्हेच्या छटा आहेत. स्त्रीचे स्त्रीत्व म्हणजे कृतिहीनता (passivity) आणि परावलंबन, तर पौरुष म्हणजे कृतिप्रवणता, नवनिर्मिती आणि स्वातंत्र्य असे समीकरण आजवरच्या पुरुषी वर्चस्व असलेल्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

इतिहासाने मांडले त्यामुळे विवाहसंस्था, कुटुंबसंस्था, धर्मसंस्था आणि उत्पादन व्यवहारात स्त्रीची भूमिका दुय्यम व अनुषंगिक मानली गेली. दोघानेच कुटुंबसंस्था खाजगी संपत्ती व सार्वजनिक निर्णय प्रक्रिया ह्या क्षेत्रात तिला पूर्ण माणूस म्हणजेच नागरिक म्हणून वावरायचे स्वातंत्र्य नाकारण्यात आले. समकालीन स्त्रीवादी विचारप्रवाह पुन्हा पुन्हा असे मांडतात की, स्त्री–पुरुषांमध्ये असणाऱ्या शारीरिक भिन्नतेमुळे स्त्रिया दुय्यम झाल्या नाहीत तर इतिहासात व आजही भिन्न समाजव्यवस्थांनी स्त्री–पुरुषांच्या शारीरिक भिन्नतेला जे अर्थ दिले, जे मूल्य शिकविले त्यामुळे स्त्रियांची दडपणूक होते व झाली आहे. म्हणून स्त्रीवादाने स्त्री–पुरुषांमध्ये येणारा लिंगाधिष्ठित साचेबंदपणा, पुरुषांच्या स्त्रीविषयक प्रतिमा, स्त्रियांची पारंपारिक कामे व समाजात त्यांना दिली गेलेली भूमिका, लैंगिक क्रांतीची संकल्पना आणि पुरुषशाही राजकारण इत्यादी विविध प्रश्नांना हात घातला आहे. ह्या समकालीन स्त्रियांच्या चळवळीत अनेक दृष्टिकोन दिसतात. आपापल्या आवडीच्या उदारमतवाद किंवा समाजवाद किंवा साम्यवाद ह्यासारख्या सर्व व्यापक जीवनविषयक विचारप्रणालीच्या चौकटीत आपला नवा स्त्रीवादी विचार मांडण्याचा प्रयत्न ह्या स्त्रीवाद्यांनी केला. तसेच पाश्चात्य स्त्रियांच्या वेगवेगळ्या संघटनामधील स्पर्धेमुळे आणि त्या त्या वेळेच्या संघटनात्मक डावपेचामुळे नव्या स्त्रीवादी विचारांना वेगवेगळी रुपे प्राप्त झाली ह्यातून पुढील ठळक विचारप्रवाह उदयाला आले.

व्यक्तिवादी/उदारमतवादी विचार प्रवाह

१९७२ साली प्रसिद्ध झालेले मेरी वूल्स्टनक्राफ्टचे व्हिंडिकेशन ऑव्ह दि राईट्स ऑफ द वूमन हे पुस्तक व्यक्तिवादी विचारांची मांडणी करणारे पहिले पुस्तक आहे. पण उदारमतवादी स्त्रीवादाची अभिजात मांडणी जॉन स्टुअर्ट मिलने केली. ह्या विचारसरणीमध्येच प्रत्येक व्यक्तीला दुसऱ्या व्यक्तिचे स्वातंत्र्य व हक्क मान्य करुन आपण कसे जगायचे हे ठरविण्याचा हक्क आहे असे माणले जाते. वूल्स्टन क्राफ्टने स्त्रिया सर्वप्रथम माणूस आहेत आणि फक्त लैंगिक अस्तित्व असलेल्या मात्रा नाहीत, हे मांडले. विवेकशीलता हा स्त्रियांचाही गुणधर्म आहे. म्हणून त्यांना स्वातंत्र्य, संधी मिळाली पाहिजे व स्वतःची बुद्धिमत्ता वाढविण्यासाठी शिक्षण मिळाले पाहिजे. परंतु ह्या विचारसरणीमध्ये स्त्री–पुरुषांमध्ये गुणात्मक भेद आहेत आणि त्यांची कार्यक्षेत्रे भिन्न आहेत, हे मान्य केले गेले आहे. इतकेच नाही, तर चांगली आई व चांगली बायको होण्यासाठी स्त्रीला शिक्षण द्यावें असे मांडले गेले आहे. स्त्रियांनी घरात राहून उत्तमरितीने बालसंगोपन करावे, चांगले नेटके घरकाम करावे, असाच सूर त्या काळानुसार ह्या विचारसरणीत दिसतो. समानता व स्वातंत्र्य ह्याचा अर्थ विभक्त कुटुंबाच्या बंदिस्त चौकटीतच लावलेला दिसतो. स्त्रियांना माणूस म्हणून मतदानाचे किंवा शिक्षणाचे किंवा नागरिकत्वाचे हक्क मिळाले तरी तिच्या स्त्रीत्वामुळे तिने बायको व आई ह्या भूमिकांमधूनच स्वतःच्या जीवनाचे श्रेय शोधले पाहिजे, असा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

निष्कर्ष हृया विचारसरणीतून निघतो. त्यांच्या मते कायद्याने स्त्रियांना समानता मिळाली पाहिजेच, पण समाजात असणारी विषमता अवैध ठरविण्याचे कामही कायद्यानेच केले पाहिजे. स्त्रियांनी पुरुषांच्या बरोबरीने सर्व क्षेत्रात सहभाग घ्यायचा तर त्यांना स्वतःच्या जननक्षमतेवर ताबा हवा आणि त्यांची अपत्यसंगोपनाची जबाबदारीही घरामध्ये विभागली गेली पाहिजे. स्त्री-स्वातंत्र्यासाठी संपूर्ण सामाजिक रचना बदलण्याची गरज आहे, असे मात्र त्यांना वाटत नाही. विविध स्तरातील स्त्रियांना स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी काही धडपडणाऱ्या स्त्रिया व्यक्तिशः स्वतःला स्वतंत्र करु शकतील, असे त्यांना वाटते.

स्त्रियांच्या मुक्तिमध्येच पुरुषाच्या मुक्तीची बीजे आहेत, असे उदारमतवादी मानतात. कारण स्त्रीमुक्तीमुळे जसे पुरुषांना काही सवलती मिळेनाशा होतील तसेच आर्थोत्पादनाच्या व देश संरक्षणाच्या एकाकी जबाबदारीपासून त्यांना सुटकाही मिळेल.

१९६० नंतर नव्या स्त्रीवादाचा जन्म झाला. बेटी फ्रीडनने 'फॅमिनाइन मिस्टिक' हृया पुस्तकात व्यक्तिवादी विचारसरणीच मांडली आहे. व्यक्तीने स्वतःचे आयुष्य व भविष्य घडविण्यातूनच मानवी स्वातंत्र्य सिद्ध होते हृया चौकटीतच फ्रीडनने मांडणी केली. तिने मध्यमवर्गीय उपनगरात राहणाऱ्या स्त्रियांची कोंडी पाहिली व गृहिणी, आई हृया भूमिकांपेक्षा स्त्रीने व्यक्ती म्हणून आपले व्यक्तिमत्त्व घडवावे, असे मांडले. उदारमतवादातील बाईपणाची पारंपरिक प्रतिमा मोडून काढण्याचा तिने प्रथम प्रयत्न केला. व्यक्तिवाद मानूनही तिने व त्यानंतरच्या अन्य उदारमतवादी स्त्रियांनी जुन्या उदारमतवादातून निर्माण होणाऱ्या घराशीच बांधल्या गेलेल्या स्त्री-प्रतिमेवर व आई-बायको हृया भूमिकांनाच जे अमर्याद महत्व दिले गेले होते त्यावर कडाडून हल्ला चढविला. स्त्रियांना समानता मिळण्यासाठी नागरी आणि राजकीय क्षेत्रात समान स्थान व समान संधी मिळाली पाहिजे. पण त्याचबरोबर 'घर' ही संस्था पुरुषांच्या आयुष्यात ज्याप्रमाणे केंद्रस्थानी नाही त्याचप्रमाणे स्त्रीच्याही आयुष्यात राहणार नाही. हृयावर तिने भर दिला. स्त्रियांना स्वतंत्र माणूस म्हणून बाहेरच्या जगात पुरुषांच्या बरोबरीने वावरायचे झाल्यास अपत्य-संगोपनाची जबाबदारी शासनाने घेतली पाहिजे आणि कुटूंब संस्थेचे एकुण महत्व कमी झाले पाहिजे असे मांडले गेले. कौटुंबिक मूल्यांपेक्षा स्त्रियांचा सामाजिक-राजकीय जीवनातील सहभाग महत्वाचा मानणे किंवा स्त्रियांना कुटुंबापासून पूर्णतः मुक्ती मिळावी हे मांडणे व्यक्तिवादी विचारसरणीच्या चौकटीत शक्य झाले. फ्रीडनने मध्यमवर्गीय स्त्रीयांना गृहिणीची प्रतिमा नाकारण्याचा सल्ला दिला. नवरा, घर आणि मुले हृयांना न नाकारताही स्त्रियांना घराबाहेर आपल्यां आवडी-निवडीचे क्षेत्र असण्याचा अधिकार आहे आणि हे बाहेरचे जगणे म्हणजे केवळ छंद वा हौस नसून तो त्यांच्या अस्तित्वाचा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

महत्त्वाचा गाभा असायला हवा, असे तिला वाटते. म्हणूनच ह्या संस्थेद्वारे फ्रीडनने जे काम उभे केले त्याचा प्रमुख भर मुलांसाठी पाळणाघरांचीं मागणीं व स्त्री–समानतेसाठीं कायद्यामध्ये बदल घडविणे ह्यावर होता. १९ व्या शतकातील व्यक्तिवादी स्त्रीवाद्यांपेक्षा फ्रीडनसारख्यांचीं भूमिका वेगळीं आहे. स्त्रियांच्या पारंपारिक कौटुंबिक भूमिका चांगल्या तऱ्हेने बजावल्या गेल्या कीं स्त्रिया स्वतंत्र माणूस म्हणून उभ्या राहू शकतील, असे जुन्या मांडणीत दिसते. त्यांच्या मते चांगलीं गृहिणीं हीं स्त्रीची करियर असायला हरकत नाही. पण फ्रीडनचा प्रयत्न असा होता, की ज्या समाजात कायद्याने स्त्रियांना समानता मिळाली आहे, शिक्षणाची संधी मिळाली आहे त्या समाजातील स्त्रियांना ' स्त्री 'त्वाच्या गूढापासून मोकळे करणे आवश्यक होते. आपले स्वातंत्र्य म्हणजे काय, ह्या प्रश्नाचे खरे उत्तर सापडण्यासाठीच फरोडनला स्त्रीत्वाची पारंपरिक व्याख्या बदलावीशी वाटते.

जहाल स्त्रीवादी विचार प्रवाह

१९७० नंतर पाश्चात्य स्त्रीमुक्ति चळवळींला बहर आला. त्या वेळी मूलत: व्यक्तिवादी असलेल्याच पण वृत्तीने कडव्या असलेल्या अनेक स्त्रियांना बेटो फरोडनचा विचार हा मवाळ आणि पठडीतला वाटू लागला. त्यांनी व्यक्तिवादी चौकटीतच अत्यंत आक्रमकपणे आपले विचार मांडले. त्यातून जहाल स्त्रीवादाचा जन्म झाला. जहाल स्त्रीवादाने स्त्रिया व पुरुष ह्यांच्यात मूलत: काही फरक असतात हेच नाकारले. ह्या विचारसरणीला सिमॉन दि बोहूव्हाच्या मांडणीचा बराच आधार मिळाला. सिमॉनने स्त्री–पुरुषांमध्ये निर्माण होणारा आणि खोल चरत जाणारा ताण आपल्या लेखनातून मांडला. ' स्त्री म्हणजे नेमके काय ?' ह्या प्रश्नाला हात घालताना दि बोहूव्हाने स्त्रीत्वाची व्याख्या तिच्या शारीरिक कार्याशी आणि सनातन स्त्रीत्वाशी जोडून करण्याचे नाकारले. पुरुष कर्ता, सर्जनशील माणूस म्हणून वावरतो तेव्हा साहजिकच स्त्रीच्या वाटयाला निष्क्रिय भूमिका येते. ह्या प्रकारे पुरुषांनी श्रेयाच्या दिशेने वाटचालीला सुरुवात केली, स्वत:ला विकास साधला. हे करताना संयोजन, देखभाल, पालनपोषण अशी पुन्हा पुन्हा करावी लागणारी कामे स्त्री–जातीकडे नैसर्गिकतेच्या नावाखाली आली. स्त्रीने स्वतंत्र माणूस म्हणून उभे राहायचे झाले तर स्वत:चे अस्तित्व मिळविण्यासाठी तिला झगडावेच लागणार. ह्यासाठी स्त्रियांना स्वत:चा इतिहास स्वत:च घडवावा लागेल व इतर स्त्रियांशी खरे सख्य निर्माण करावे लागेल. बोहूव्हाने विवाह संस्थेऐवजी स्त्री–पुरुषांचे स्वतंत्र माणूस म्हणून एकत्र येणे महत्वाचे मानले. तिला मूल जन्माला घालणे ही सर्जनशील क्रिया वाटत नाही. मतदानाचा हक्क, शिक्षण, नोकऱ्या मिळूनही माणूस म्हणून स्त्रीला तिच्या स्त्रीत्वामुळे दुहेरी ताण सोसावे लागतात. तिला तिचे लैंगिक अस्तित्व एक तर पूर्णत: नाकारावे लागते किंवा पुरुषांच्या संदर्भातच निर्जीव वस्तू म्हणून परिपूर्ण करावे लागते. आजच्या काळात

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रेमाच्या संदर्भात जिंकणे, हरणे, मिळविणे इत्यादी कल्पना येतात त्या दि बोहूव्हाने नाकारल्या. स्त्रियांना सर्जनशीलतेच्या वाटा मोकळ्या झाल्या पाहिजेत, मातृत्वाची निवड करण्याची संधी मिळाली पाहिजे, असे तिला ठामपणे वाटते. मार्क्सवादी विचारसरणीत येणारे स्त्रियांच्या दडपणुकीचे स्पष्टीकरण तिला पुरेसे वाटले नाही. केवळ खाजगी संपत्तीच्या उदयामुळे बायकांचे स्थान दुय्यम झाले, असे मानण्यापेक्षा त्याबरोबरचे स्त्रीचे शारीरिक वेगळेपण, गरोदरपणातील परावलंबन आणि घरकामातील काबाडकष्ट तिच्या आयुष्यातील सर्जनशीलतेचा पूर्ण अभाव ह्या कारणावर तिने भर दिला.

दि बोहूव्हानंतर जवळजवळ वीस वर्षांनी जर्मेन ग्रिअर, फायरस्टोन, मिलेट आदींनी जहाल स्त्रीमुक्तिवादी विचारसरणीची मांडणी केली. जर्मेन ग्रिअरच्या "दि फीमेल युनक" ह्या पुस्तकात स्त्रीत्वाच्या साचेबंदपणातून स्त्रियांना खऱ्या अर्थाने लैंगिकता कशी नाकारली गेली आहे, ह्याचे विवरण केले आहे. स्त्रिया मूल म्हणून कशा वाढविल्या जातात, ह्याची तपशिलात मांडणी तिने केली. छोटे, विभक्त कुटुंब फार स्वकेंद्रित, संकुचित असते. त्यात बाईची अधिकच कोंडी व दडपणूक होते. ती अधिकच एकाकी होते, आणि खोट्या स्त्रीत्वाच्या प्रतिमेखाली चेंगरुन जाते. म्हणून विभक्त कुटूंबाऐवजी सामूहिक कुटुंबाची कल्पना तिने मांडली. केट मिलेटने 'सेक्शुअल पॉलिटिक्स' ह्या पुस्तकात लैंगिकतेचे राजकारण विशद केले. तिच्या मते पुरुषाचे स्त्रियावर असणारे लैंगिक वर्चस्व हीच सर्वात प्रभावी विचारसरणी आधुनिक संस्कृतीत दिसते तसेच पाश्चात्य समाजातील पायाभूत संरचना पुरुषी वर्चस्वाची आहे. ह्यालाच तिने पुरुषशाही व्यवस्था असे म्हटले आहे ह्या व्यवस्थेचीं प्रमुख संस्था कुटुंबसंस्था आहे. बाहेरच्या समाजातील पुरुषी वर्चस्व कसे आहे, हे कुटुंबरुपी आरशात स्पष्ट दिसते. पुरुषांची सत्ता चालू राहण्यासाठी कुटुंबामध्ये मुलांवर 'योग्य' संस्कार करण्याची जबाबदारी स्त्रीवर येते. इतकेच नाही, तर पितृत्व निश्चित असल्याशिवाय जगातील एकाही मुलाला जगण्याचा अधिकार नाही, अशा मूल्यव्यवस्थेत पुरुषी वर्चस्वाला अधिमान्यता मिळते. जहाल स्त्रीवादी आणखी एक दावा करतात त्यांच्या मते सर्वच स्त्रियांचा एकत्रितपणे एक दडपलेला वर्ग असतो. कोणत्याही वर्गातील स्त्रियांना आर्थिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक कोणत्याही स्तरावर पुरुषांव्यतिरिक्त स्थान नसते, ह्यातून हे सिद्ध होते. पुरुषी वर्चस्वाची व्यवस्था पुरातन आहे, आणि हजारो वर्षे चालू आहे. मिलेटने असे दाखवून दिले आहे की, पुरुषांच्या मनात स्त्रियांविषयी असणारी वर्चस्वाची, स्वामित्वाची, क्रौर्याची भावना लैंगिक विकृतीने भरलेल्या मासिकांतून व त्या मासिकांच्या भाषेतून स्पष्ट होते. ह्यासाठी जहाल स्त्रीवाद्यांनी लैंगिक क्रांतीची मागणी केली. फायरस्टोनच्या "दि डायलेक्टिक ऑफ सेक्स" ह्या पुस्तकात समाजातील मूलभूत वर्गीय विभाजन

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आणि दडपणूक लैंगिकतेच्या आधारे केली जाते, हे मांडले. कामगारांच्या दडपणुकी-प्रमाणेच स्त्रियांची दडपणूक होते, हे दाखविण्यासाठी भौसिकवाद व द्वन्द्वात्मकता ह्या संकल्पना तिने मांडल्या. आपले विश्व म्हणजे कधीही सुसंवाद साधू न शकणाऱ्या संपूर्णतया परस्परविरोधी क्रिया प्रतिक्रिया 'यांच्या नैसर्गिक प्रवाहांची प्रक्रिया असते. असा तो आपल्या द्वन्द्वात्मकतेच्या कल्पनेचा अर्थ लावते. आपला सिद्धांत भौतिक-वादीच आहे, असा दावा तिने केला. आर्थिक वर्ग आणि राजकीय समाज ह्यांच्या जडणघडणीचे मूळ तिने सेंद्रिय उर्फ नैसर्गिक कारणात शोधले. म्हणून आपण जे मानस धारण करतो. व जे लैंगिक विश्व उभे करतो ते एक निखळ भौतिक वास्तवच असते, असे तिचे म्हणणे आहे. शारीरिकतेवर आधारित असलेली आजची कुटुंबव्यवस्थाच लैंगिक विषमता व वर्गव्यवस्था निर्माण करते. म्हणून लैंगिक विग्रह व स्त्रीत्व-पुरुषत्व ह्या साऱ्याचे उच्चाटन हा जहाल स्त्रीवादाचा अंतिम हेतू दिसतो.

एकूण जहाल स्त्रीवाद्यांनी मूलभूत लैंगिक दडपणुकीतूनच समाजात सर्व क्षेत्रात दडपणूक होते असे मांडले. त्यांच्या मते स्त्रियांच्या दुख:चे मूळ त्यांच्या शारी-रिकतेत आहे. गरोदरपणामुळे परावलंबी होणाऱ्या स्त्रिया स्वत:च्या सुरक्षिततेसाठी पुरुषांवर अवलंबून राहू लागल्या. ह्यातूनच कुटूंबसंस्था उदयाला आली. आर्थिक, सामाजिक कारणापेक्षा स्त्रीच्या शारीरिक भिन्नतेवर आजच्या कुटुंबाचे विपरीत स्व-रुप उभे आहे, स्त्रियांच्या शरीरावर पुरुषांनी मिळविलेला तावा हेच वांशिक व वर्गीय दडपणुकीचे मूळ आहे. म्हणून स्त्रियांच्या मुक्तीसाठी त्यांना लैंगिक क्रांतीची गरज वाटते.

तसेच गर्भधारणा होणे व बाळंत होणे ह्यामुळे स्त्रिया पुरुषांपेक्षा विषम पायावर उभ्या असतात. स्त्रियांच्या मुक्तीसाठी कृत्रिमरित्या मूल जन्माला घालण्याच्या तंत्राचा विकास आवश्यक आहे. ह्यामुळे पुनरुत्पादन (मानववंशाचे, श्रमशक्तीचे मूल्यव्यवस्थेचे) आणि लैंगिकता म्हणजेच बाईपणा ह्या समीकरणापासून मुक्तता मिळेल. ह्यामुळे कुटुंबसंस्था नष्ट होईल आणि स्त्री-पुरुषांच्या कामांचे साचेबंद स्वरुप नाहीसे होईल. केवळ शारीरिकतेवर आधारलेले कुटूंब संपल्यावर सर्वच तऱ्हेच्या लैंगिक दडपणापासून माणसाला मोकळीक मिळेल आणि स्त्री-पुरुष खऱ्या अर्थाने निर्मितीक्षम्य आयुष्य जगू लागतील. लैंगिक संभोगामध्ये स्त्री-पुरुष जे ठराविक कार्य करतात ते संपले की मगच खऱ्या मानवी समाजाला सुरुवात होईल. स्त्रियांवरील बलात्कार, सक्तीची बाळंतपणे, लादलेले विवाह ह्यापासून सुटका मिळविण्यासाठी लैंगिकतेचा अर्थ केवळ जननेंद्रियांशी संलग्न असा लावला जातो. त्याला छेद दिला गेला पाहिजे. स्त्रिया गर्भधारणा, अपत्यसंगोपन ह्या जंजाळातून सुटल्या की, पुरु-षांचीही पालनपोषण करणारा व संरक्षण देणारा ह्या भूमिकेपासून मुक्ती होईल. मुलांनाही अनेक वर्षे अनावश्यक असतानाही जे मूलपण कुटुंबसंस्थेमध्ये स्वीकारावे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

लागते त्यापासून सुटका मिळेल.

थोडक्यात, जहाल स्त्रीवाद्यांच्या मते जेव्हा स्त्रीवादी क्रांती होईल तेव्हा स्त्रिया मातृत्वाच्या काचातून मोकळ्या होतील. अपत्य संगोपनाचे काम सामूहिकरीत्या समाजामार्फत पार पडेल.

स्त्रियांना व मुलांना आत्मविष्काराला पूर्ण वाव मिळेल. संपत्तीची समान वाटणी होईल.

व्यापक समाजात स्त्रियांना व मुलांना संपुर्ण सहभाग मिळेल.

लैंगिकतेचा व्यवहार साचेबंदपणापासून मुक्त होईल.

समाजवादी स्त्रीवादी विचारप्रवाह

उदारमतवाद आणि मार्क्सवाद ह्यांचा संगम साधण्याची भूमिका घेऊन लोकशाही समाजवादी विचारसरणी निर्माण झालीं, हे आपल्याला माहिती आहेच. ह्या परंपरेतील ज्युलियट मिचेलसारख्या स्त्री विचारवंतांनी जहाल स्त्रीवादातील कांही महत्त्वाच्या संकल्पना व विचार आत्मसात करुन आपल्या उदारमतवादी मार्क्सवादाशीं जोडण्याचा प्रयत्न केला.

ज्युलिएट मिचेलने स्त्रियांच्या दडपणुकीचे विश्लेषण करताना मार्क्सवादी सिद्धांत ह्या प्रश्नावाबत अपुरा पडतो, व समाजवादी क्रांतीनंतर स्त्रीमुक्तीही आपोआप घडेल, असे गृहीत धरतो इत्यादी आक्षेप घेतले. सरळसोट आर्थिक सिद्धांकनापलिकडे जाऊनच स्त्रियांच्या प्रश्नांची मांडणी केली जावी, असा आग्रह तिने धरला. उत्पादनाच्या क्षेत्रात स्त्रिया दुय्यम झाल्या, ह्याचे कारण शारीरिक दुबळेपणा नाही. स्त्रीयांमध्ये असलेला आत्ताचा दुबळेपणा हा समाजांतर्गत मूल्यव्यवस्थेतून निर्माण होतो, शारीरिकतेतून नाही, असे तिचे म्हणणे आहे.

मिचेलने कुटूंब ह्या संस्थेच्या उत्पादन, पुनरुत्पादन, लैंगिकता व मुलांवरील संस्कारप्रक्रिया ह्या चार संरचनांचे तपशीलात वर्णन केले आहे. तिच्या मते कुटुंबनियोजनाच्या साधनांमुळे स्त्रियांची जननक्षमता आणि लैंगिकता ह्यामध्ये आपल्याला समंजस फरक करता येईल. आजचा समाज अजूनही पुरुषशाही मूल्यव्यवस्थेच्या छायेत वावरत असल्याने वर्तमान परिस्थितीत मात्र कुटुंबनियोजनाच्या साधनामुळे स्त्रियांचे अधिकच शोषण होते. परंतु स्त्रीला जर खरेखुरे स्वातंत्र्य मिळाले तर मात्र तिला ह्यामुळे प्रथमतःच स्वतःच्या शरीरावर ताबा मिळेल, असे मिचेलला वाटते. स्त्री शरीराने आई बनते म्हणून मुलांवर संस्कार करायची जबाबदारी सर्वस्वी तिचीच, पण कोणते संस्कार करायचे ते ठरविण्याचे स्वातंत्र्य व हक्क मात्र तिचा नाही, ह्याही मुद्याचे विवरण तिने केले. म्हणून कुटुंबाच्या चारही संरचनामध्ये बदल झाला पाहिजे, असे ती मांडते. हे बदल होण्यासाठी तिने पुढील उपाय सुचविले. समान कामाचा हक्क, समान शिक्षणाचा हक्क, सहज सोपी आणि प्रभावी संततिप्रतिबंधक

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

साधने आणि नीति–अनीतीवर आधारित मूल्यव्यवस्थेचे उच्चाटन, ह्याच बरोबर मुलावर संस्कार करण्याचे स्थान ह्या अर्थाने कुटुंबाचे कार्य संपुष्टात आणणे केवळ खाजगी संपत्तीचे उच्चाटन झाले व स्त्रिया सार्वजनिक जगात उद्योग धंद्यामध्ये सह–भागी झाल्या, की स्त्रियांच्या दुय्यम स्थानाचे प्रश्न संपत नाहीत, तर कुटूंबाची संर–चनाही आमूलाग्र बदलावी लागेल ह्यावर मिचेलने भर दिला. मिचेलच्या मते कुटुं–बाची संरचना आर्थिक घटकावर अवलंबून नाही.

मिचेलने भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा पाडाव म्हणजेच पुरुषशाही विचार–व्यूहाचा पाडाव, असे समीकरण नाकारले. फॉइडच्या सिद्धांताचा आधार घेऊन मिचेल समाजवादी समाजरचनेतही स्त्रियांचे स्थान दुय्यमच कसे राहते हे दाखविते. स्त्र–यांचा न्यूनगंड हे मानवी जीवनाचे अटळ वास्तव आहे – एक कटू सत्य आहे, असे फॉईडने मांडले, पण जर कुटुंबसंस्था आमूलाग्र बदलली, तर हे वास्तवही बदलेल, असे मिचेलने थोडक्यात सांगायचे, तर मांडले. पुरुषशाही स्त्रीत्व व पुरुषत्व अशी दोन भिन्न-विलग जगे निर्माण होतात. पुरुषी–पुरुष व बायकी–बाया निर्माण करणे थांबले पाहिजे, अशी मागणी ती करते. तिच्या मते प्रत्येक मूल हे जन्मतः द्विलिंगीच असते परंतु भिन्न लिंगी व्यक्तींचा संभोग हेच नैसर्गिक आहे, असे मुलांना कुटुंबातून शिक–विले जाते. तिच्या मते फॉईडच्या सिद्धांतातून एकदा असे कुटुंब अस्तित्वात आल्यावर ते तसेच चालू राहण्यासाठी मुला–मुलींची मानसिक रचना कशी घडविली जाते, ह्याचे स्पष्टीकरण येते. पण मुळात पुरुषप्रधान कुटुंब निर्माणच कसे झाले, ह्याचे स्पष्टीकरण मात्र येत नाही. त्यासाठी मिचेलने लेव्ही स्ट्राउस ह्या मानववंशशास्त्र–ज्ञाचा आधार घेतला. टोळयाटोळयांनी राहणारा माणूस प्राचीन काळी स्थिरावू लागला तेव्हा सर्वप्रथम भावा–बहिणींच्या, आई–मुलाच्या, वडील–मूलीच्या संबंधा–वर निबंध आले. स्त्रियांचा विनिमय करुन कुटुंबा–कुटुंबामध्ये परस्परावलंबन निर्माण केले गेले. ह्यातून आजच्या प्रकारची कुटूंबे निर्माण झाली. तसेच त्यांच्यामध्ये अधिक व्यापक पायावर सामाजिक नाते निर्माण झाले. विवाहविषयक जे नियम तयार झाले त्यातून स्त्रियांचा विविमय चालू राहिला व त्यायोगे समाज एकत्र बांधला गेला.

मिचेलच्या मते आता अशा तऱ्हेने स्त्रियांच्या विनिमयाच्या आधारे समाज बांधण्याची आवश्यकता नाही. आता आर्थिक संबंधातून समाज बांधला जातो. त्या–मुळे आज कुटुंबसंस्था तितकी महत्वाची राहिली नाही. तिच्या मते आज कुटुंबसंस्था अत्यंत कृत्रिम पद्धतीने टिकविली आहे. आधुनिक काळात ती स्त्री–पुरुषांच्या शरीर–संबंधावर आणि श्रमशक्तींच्या पुनरुत्पादनाचे केंद्र म्हणून अस्त्वात आहे, असे तिने मांडले.

समाजवादी स्त्रीवादाची मांडणीं करण्याचे असेच प्रयत्न आणखीं अनेक

SRI JAGADGURU VISHWARADHYA
JNANA SIMHASAN JNANAMANDIR
LIBRARY
Jangamawadi Math, Varanasi
Acc. No. ....6972........

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

स्त्री--विचारवंतांनीही केले आहेत. त्यांच्यात फरक आढळतो तो मार्क्स आणि फ्रॉईड ह्यांच्या विचारांच्या कमी-जास्त मिश्रणा संदर्भात काही बाबतीत मात्र त्यांच्यात एकमत दिसते.

मार्क्सवादी स्त्रीवादी विचार प्रवाह

अभिजात मार्क्सवादी समाजवादाच्या चौकटीत राहून विचार करणाऱ्या अनेक स्त्रियाही पाश्चिमात्य जगात आढळून येतात. शीला रॉबोथम हे त्याचे प्रति-निधीक उदाहरण म्हणून घेता येईल. ह्या स्त्रिया परंपरागत मार्क्सवादी मांडणी नाकारत नाहीत, पण स्त्रियांच्या वाटचाला आजवर आलेला ऐतिहासिक अनुभव लक्षात घेऊन मूळच्या मार्क्सवादात काही मौलिक भर घालू इच्छितात. अभिजात मार्क्सवादी विचारानुसार ऐतिहासिक दृष्टचा खाजगी संपत्तीच्या उदयातच स्त्रियांच्या दडपणुकीची कारणे सापडतात. म्हणून त्यांच्या मते स्त्री-मुक्तिवाद हा साम्यवादी समाज अस्तित्वात आणण्यासाठी द्यावयाच्या लढयाचाच एक भाग आहे भांडवलशाही अर्थव्यवस्थेत स्त्रियांना पुरुषांपेक्षा वेगळया तऱ्हेच्या प्रश्नांना तोंड द्यावे लागते. त्या-करिता स्त्रियांनी एक गट म्हणून भांडवलशाहीच्या विरोधात उभे राहिले पाहिजे. त्यांनी जे कुटुंबसंस्थेचे विश्लेषण केले आहे त्यातून पुरुषीवर्चस्व हा वर्गीय समाजाचा अविभाज्य घटक आहे. असा विचार व्यक्त होतो. वाढावा (Surplus) निर्माण झाल्यावर त्यावर आधारित जो समाज अस्तित्वात आला तेव्हाच एक पति-पत्नी विवाहसंस्थाही अस्तित्वात आली. ह्यातून पुरुषाला कुटुंबामध्ये सर्वोच्च स्थान मिळाले तसेच त्याच्या संपत्तीला वारसा असणारी मुले त्यांचीच असली पाहिजेत अशी अट निर्माण झाली. असे विवाह पत्नीच्या उघड किंवा छुप्या गुलामगिरीवर उभे असतात आणि त्यात पुरुषांना व स्त्रियांना दुहेरी नीतिमूल्य व्यवस्थेला तोंड द्यावें लागते. स्त्रीने शुद्ध, पवित्र असावे व पुरुषाला मात्र एकपत्नीत्वासारख्या नीतिनियमांपासून मुक्तता असा दुटप्पीपणा सुरु झाला. भांडवलशाहीच्या उदयाबरोबर स्त्रीचे अवमूल्यन झाले व अधिकाधिक होत गेले. तसेच स्त्रीयांचे श्रम स्वस्तात मिळवून एकूण मजूरी कमीतकमी ठेवणे ही भांडवलशाहीच्या लाभाची गोष्टही पुरुषी वर्चस्वातून साधलीं जाते. स्त्रिया घरात जे काम करतात त्याला मोल नसते, हे भांडवलशाहीच्या पथ्यावर पडते. म्हणून सार्वजनिक उद्योगधंद्यात स्त्रियांना स्वतंत्रपणे समान पातळीवर सहभाग घेता आला पाहिजे, असा आग्रह मार्क्सवादी विचार धरतो. समाजवादी शासनाने बालसंगोपन, वृद्धांची देखभाल व कुटुंबात होणारे इतर उत्पादक काम ह्यांची जबाबदारी उच-लली पाहिजे, असे त्यांचे मत आहे. त्यांच्या मते समाज संधी म्हणजे प्रत्येक व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीशी स्पर्धा करण्यासाठी मिळविलेली समानता नाही, तर माणुसकीच्या गरजा भागविण्यासाठी सर्वांना समान सहभाग मिळणे म्हणजे समानता.

पाश्चात्य देशातील विविध स्त्रीवादी विचारप्रवाहात भांडवलशाहीला विरोध

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

विशेषतः भांडवलशाहीतून वाढीला लागणाऱ्या उपभोगवादाला विरोध, हे समान सूत्र दिसते. उपभोगवादी वृत्तीमुळे माणसाचे जे सत्त्वहरण होते, त्यामुळे ह्या सर्व स्त्रिया अस्वस्थ झालेल्या दिसतात. भारतात गीतेसारख्या ग्रंथातही स्त्रियांची व अतिशूद्रांची गणना एकत्र केली गेली आहे. त्याच न्यायाने पाश्चात्य देशातील स्त्रीवादी वंशवाद व पुरुषंशाही व्यवस्था ह्यात नाते पाहतात. सर्व स्त्रीवाद्यांना आपले घर हा एक सुसंपन्न तुरुंग वाटतो. खरी मानवी नाती असलेली जिवंत घरे त्यांना हवी आहेत. खूप वस्तू असलेली देखणी, जाहिरातीतील घरे त्यांना नको होती. आणखी एक महत्वाचे सूत्र दिसते, ते म्हणजे आपल्याला मिळालेल्या देहाचा श्रेयपुर्ण उपयोग व्हावा ह्यासाठी त्यांना स्वतःच्या देहावर नियंत्रण वा ताबा हवासा वाटतो.

भारतीय संदर्भांत पाश्चात्य स्त्रीवादी विचाराचा नेमका अर्थ कसा लावला गेला पाहिजे, हा प्रश्न फार महत्वाचा आहे. खऱ्या अर्थाने माणूस म्हणून आपण मुक्ती ह्या शब्दाचा अर्थ कसा लावला तर तो सर्व माणसांना सारख्याच अर्थाने अधिक श्रेयपूर्ण जगण्याकडे नेईल, हा यक्षप्रश्न आहे.

भारतीय समाजाचे वास्तव लक्षात घेता धड पूर्ण औद्योगिकरण नाही, धड शहरीकरण नाही, धड विभक्त कुटुंबाची चाकोरी नाही, असे चित्र दिसते. पुरुषी वर्चस्वा इतकेच जातीय व वर्गीय प्रश्नाचे वास्तव जळजळीत आहे. तरीही काही गोष्टी सूर्यप्रकाशाइतक्या स्वच्छ आहेत. सर्व धर्मात, जातीत, सर्व थरात वेगवेगळ्या रुपाने बायका माणूसपणापासून वंचित जिणे जगत आहेत, एक सार्वत्रिक दडपणूक अनुभवीत आहेत. ह्या सर्व थरातील स्त्रियांना आपली वाटेल अशी स्त्रीवादी चळवळ उभी करायची तर मुक्तीविषयक विचाराला सार्वत्रिकतेची ताकत हवी, आपल्या सांस्कृतिक ऐतिहासिक मुळापाशी जाण्राची खोली हवी. हा अभ्यासाचा, गंभीरपणे वर्षांनुवर्षे अनेकांनी एकत्र येऊन प्रयत्न करण्याचा विषय आहे. एका अर्थाने आपला इतिहास नव्या दृष्टिकोनातून तपासून पाहण्याचा, त्यातील अदृश्य स्त्री जीवनाचा सह-भाग उलगडून पाहण्याचा हा प्रयत्न आहे. एकाच वेळी आपल्या मागच्या पिढ्यां-मधल्या स्त्रियांशी नाते जोडण्याचा, तसेच जगातील इतर स्त्रियांच्या दडपणुकीशीही नाते जोडण्याचा हा फार मोठा प्रयत्न आहे.

ह्या प्रयत्नात पाश्चात्य स्त्रीवादी विचारवंतांनी पुरुषी वर्चस्वाचे पुरुषशाही व्यवस्था म्हणून केलेले विवेचन फार उपयोगी पडणारे आहे. ह्या संकल्पनेमुळे सर-सकट सर्व स्त्रियांना पिळवणूक, शक्तिहीनता, दुर्बलता आणि पुरुषी वर्चस्वाचा येणारा अनुभव स्वच्छपणे व्यक्त करता येतो, हा पुरुषी वर्चस्वाचा येणारा अनुभव स्वच्छपणे व्यक्त करता येतो. ही पुरुषी वर्चस्वाची व्यवस्था संपूर्णतः उघडउघड फक्त अत्या-चारावर उभी नसते, तर स्त्रिया आणि पुरुष ह्यांचे गुणधर्म कार्यक्षेत्रे, श्रेयाच्या वाटा भिन्न असतातच, ह्या पिढ्यान् पिढ्या रुजविलेल्या संस्काराच्या पायावर पुरुषी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वर्चस्वाचा डोलारा उभा असतो. स्त्रियांच्या संमतीने त्यांना पूर्ण विश्वासात घेऊन, त्यांच्या देहमनावर ताबा मिळवून हे वर्चस्व अस्तित्वात आलेले असते म्हणून स्त्री-पुरुष दोघांनाही माणसाचे जगणे जगायचे झाल्यास मी निर्जीव वस्तू नाही, मी बाई-पणा असलेली पण तरीही विकास पावू शकणारी, पुरुषांइतकाच कस असलेली माणूस आहे, हे स्त्रियांच्या मनात जागविणे आणि केवळ पुरुष म्हणून जन्माला आलो म्हणून मी कोणी वेगळा, उच्च नाही, माझ्या मनोरंजनासाठी, आत्मप्रत्ययासाठी अथवा राग काढण्याचे किंवा सुख मिळविण्याचे केवळ साधन म्हणून स्त्री जन्माला आली नाही, हे पुरुषांच्या मनात जागविणे अत्यावशक आहे. ह्या दृष्टीने पाश्चात्य स्त्रीवादी विचार-वंताचे जाणीव-जागृतीचे प्रयत्न, त्यातून नव्या आत्मभानातून नवी भाषा व साहित्य निर्माण करण्याचे प्रयत्न, स्त्रिया-स्त्रियांमध्ये स्नेहभाव निर्माण करण्याचे प्रयत्न, स्त्रि-यांच्या मनावर असणारे आईपणाचे एकाकी ओझे उतरविण्याचे प्रयत्न, उत्पादनाच्या क्षेत्रातील लैंगिकतेवर आधारित असलेल्या श्रमविभागाचे नाते स्त्रियांच्या अपत्यसंगो-पनाशी कसे निगडित आहे, फक्त मातृत्वाचे गोडवेच गाणाऱ्या संस्कृतीशी कसे निग-डित आहे हे दाखविणे, किंवा पौरुष म्हणजे निसर्गतः काहीतरी क्रूर, बलदंड भावने-पेक्षा बुद्धीवर भर देणारे, अमानुष अस्तित्व अशी भलावण केली जाण्यामागे कसे एक सत्तेचे राजकारण आहे ह्याचे विवेचन, असे कितीतरी मुद्दे आजच्या संदर्भात आपल्या चळवळीलाही लागू होणारे व म्हणून महत्वाचे आहेत.

फक्त पाश्चात्य स्त्रीवादी विचारांचे, मांडणीचे, कृतीचे आकृतिबंध जसेच्या तसे आपल्या परिस्थितीत राबविणे चूक ठरेल. तसेच स्त्रियांमध्ये जे निसर्गदत्त विशेष आहेत, ते अडथळे होऊन बसतात म्हणून पाश्चात्य जहाल स्त्रीवाद्यांप्रमाणे केवळ धिक्कार न करता त्यांचे नावीन्यपूर्ण क्रियाशील अवस्थेत रुपांतर करणे ह्या तत्त्वा-वर भर दिला गेला पाहिजे. आपल्या परिस्थितीत काही मूठभर उच्चवर्गीय सुशिक्षित कुटूंबे सोडली तर सर्वसाधारण विवाहित स्त्रियांना जी कोंडी अनुभवावयास मिळते त्यात कुटुंब नावाच्या संरचनेचा भाग मोठा असतो. ह्या अर्थाने स्त्रियांच्या प्रश्नाचे कुटुंब व्यवस्थेशी रक्ताच्या नात्यावर आधारलेल्या जाती व्यवस्थेशी फार जवळचे नाते आहे. म्हणून जातीव्यवस्थेच्या विरोधात उभे राहणे, जातीच्या उतरंडीची चिकित्सा करणे हाही आपल्याकडील पुरुषी वर्चस्वाला शह देण्याचाच एक भाग असणार आहे. उदा. ब्राम्हण अथवा मराठा जातीत दिसणाऱ्या स्त्रियांच्या कोंडीचे स्वरुप दलित जातीतील स्त्रीपेक्षाही वेगळं आहे, हे अगदी वरवर पाहिले तरी लक्षात येते.

थोडक्यात, जगातील सर्व स्त्रियांमध्ये एक जोडलेपण निर्माण करीत अस-ताना भारतीय स्त्रियांच्या संमिश्रतेला हात घालण्याचे अवघड शिवधनुष्य पेलण्याची फार मोठी जबाबदारी स्त्रीवादी चळवळीवर आहे, हे विसरुन चालणार नाही.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आंतरजातीय विवाह : चळवळीची शक्याशक्यता व दिशा

प्रा. डॉ. प्रदीप गोखले

आपल्या भारतीय समाजात जातिभेद हा शेकडो वर्षांपासून पाळला जात आहे आणि त्यामुळे आपल्या समाजाचे मोठे नुकसानहीं झाले आहे. तरीसुद्धा आजही आपल्यामध्ये जातीयतेची जाणीव मोठ्या प्रमाणावर आहे. आपण स्वत:ला व दुसऱ्यांनाही जातीवरुन ओळखतो व जाती-प्रमाणे वेगवेगळी वागणूक देतो. यामुळे समाजात एक प्रकारची विषमता व दुही आहे व ती दूर झाली पाहिजे असे सर्व समाजसुधारक सांगत असतात. यासाठी काय केले पाहिजे? काहीजण म्हणतात की, जाती टिकवूनहीं त्यांच्यातील उच्चनीचतेच्या कल्पना जातील. काहींजण वर्णव्यवस्था चांगली होती, ती रहावी, जातीव्यवस्था नष्ट व्हावी असे म्हणतात. तर अनेकजण असा विचार मांडत आले आहेत कीं वर्णव्यवस्था ही जातिव्यवस्थेचेच एक रुप आहे आणि म्हणून दोन्ही नष्ट झाले पाहिजे. या वादात आता शिरण्याचे कारण नाही. पण सर्व साधारणपणे समाजसुधारक हे मान्य करतात की, जातिव्यवस्था कालबाह्य झाली आहे व ती टाकून दिली पाहिजे. मात्र प्रत्यक्षात जातिव्यवस्थेचा आपल्यावर, आपल्या मनावर इतका पगडा आहे, की कळत न कळत आपण जातिव्यवस्था टिकविण्याचा प्रयत्न करतो. जातिव्यवस्था ही आपल्याला सोयि-स्कर असेल तर गुळगुळीत भाषेत आपण तिचा पाठपुरावा करतो किंवा सोयीस्करपणे त्याबाबत उदासीन रहातो किंवा दुर्लक्षहीं करतो. पण जातिव्यवस्था ही मला सोयीची असली तरी ती व्यवस्था मुळात वाईटच आहे, केवळ जन्म कुठल्या जातीत झाला यामुळे सोय किंवा गैरसोय ठरता कामा नये अशी जर आपली धारणा असेल तर जातिव्यवस्थाच नष्ट करण्यासाठी आपण जाणीवपूर्वक प्रयत्न केले पाहिजेत हे ओघा-नेच येते.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कळत न कळत स्वतःच्या जातीच्या चौकटीत आपण वावरत असतो. वेगवेगळ्या जातीजमातीच्या लोकांशी मैत्री जोडण्याचाच त्यातील व आल्याकडील मानवतेचा दुवा शोधण्याचा व बळकट करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न आपण करीत नाही. आपण स्वतःभोवती एक सांस्कृतिक कोशही विनती. जी संस्कृती आपल्या कुटुंबव्यवस्थेतून आपल्याला मिळते, तीच संस्कृती ही आपली संस्कृती असा शिक्का आपण कळत–नकळत स्वतःवर मारुन घेतो व त्यामुळे साहजिकच सर्व व्यवहारात आपल्या मनात एक अढी रहाते. आणि जात, आपल्यावरील संस्कार, आपली संस्कृती टिकविणे हे आपले एक अटळ कर्तव्य आहे अशी आपली समजूत होते.

या दुष्ट चक्रातून बाहेर पडायचे असेल; मला कुणी माझ्या जातीवरुन ओळखू नये तर माणूस म्हणून ओळखावे, आपली जातीय जाणीव विसरता यावी असे आपल्याला वाटत असेल तर आपल्याला आपली जात उल्लंघून पुढे गेले पाहिजे, इतर जाती–जमातीच्या लोकांशी आपलेपणा वाढविला पाहिजे, इतकेच नव्हे तर लग्नही इतर जातीत करण्याचा मुद्दाम प्रयत्न करुन आपल्या संकुचित जातीय जाणिवेला कायमची रजा दिली पाहिजे. आंतरजातीय विवाह हा व्यक्तिगत जीवनातील जातीय भाव नष्ट करण्याचा मार्ग ठरला पाहिजे.

पण इथे 'आंतरजातीय विवाहाविषयी आपला काय दृष्टीकोन असावा' ? असा जर प्रश्न विचारला तर त्याविषयी वेगवेगळ्या भूमिका मांडता येऊ शकतील.

एक भूमिका अशी असू शकेल विवाहाच्या संदर्भात जात आडवी येऊ नये हे ठीक आहे. पण मुद्दाम आंतरजातीय विवाह करण्याचा प्रयत्न करावा अशी भूमिका घेऊ नये. कारण विवाह हा एक नाजूक प्रश्न आहे. याविषयी काहींचे मत असेही दिसते की विवाह हा मुळात दोन व्यक्तीचा खाजगी प्रश्न आहे. आणि जो प्रश्न मुळात खाजगी आहे त्याच्या संदर्भात सामाजिक स्वरुपाची चळवळ उभारता येणार नाही. ही भूमिका घेणाऱ्या लोकांना आंतरजातीय विवाह तत्त्वतः मान्य असेल, पण आंतरजातीय विवाह ही एक चळवळ होणे मान्य नसेल

या भूमिकेच्या संदर्भात काही प्रश्न उपस्थित होतील. एकतर आंतरजातीय विवाह ही चळवळ होऊ नये असे जे आपण म्हणतो. त्यामागे हे तर कारण नाही ना की आपण स्वतः आजवर आपल्या जातीच्या व आपल्या सांस्कृतिक कोशाच्या बाहेर जाण्याचा मुद्दामहून प्रयत्नच केला नाही ? हा प्रश्न वरील भूमिका घेणाऱ्याने स्वतःला विचारुन पहावा.

मुद्दामहून आंतरजातीय विवाहच करण्याच्या भानगडीत पडू नये असे म्हणण्यामागे बऱ्याचदा असा दृष्टीकोन असतो की विवाह म्हणजे केवळ शारीरिक मीलन आणि सहअस्तित्व एवढेच नसून त्याचबरोबर वैवाहिक जीवनात विचार जुळणे, आवडीनिवडीं परस्परपूरक असणे, हरघडीं बारीक–सारीक कृतितून व्यक्त होणारी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

'संस्कृती' परस्परपूरक असणे हेही अभिप्रेत असते व आंतरजातीय विवाह हा या सगळ्यांचा विचार न करता केवळ तत्त्व प्रेमापोटी केला तर असा विवाह पुढे अयशस्वी होऊ शकेल. हा प्रश्न महत्त्वाचा आहे. पण याबाबतीत मी एवढेच म्हणेन की परजातीतल्या जोडीदाराची संस्कृती, विचार, संस्कार हे आपल्या संस्कृतीशी, विचारांशी, संस्काराशी जुळणारच नाहीत, उलट ते परस्पर विरोधीच ठरतील असेही गृहीत धरणे चूकच नाही का ? आपल्यावर जसे घरातून संस्कार होतात व रुढी परंपरेमुळे येणारे काही धार्मिक धर्मकांडात्मक संस्कार वगळले तर सुशिक्षित समाजात जातीजातीमुळे फारसे सांस्कृतिक अंतर रहात नाही. मात्र आता म्हटल्याप्रमाणे धार्मिक कर्मकांडाचे काही संस्कार कुटुंबव्यवस्थेने आपल्यावर लादलेले असतात व त्यामुळे जातीजातीच्या संस्कृतीत फरक पडतो. याबावत असे म्हणता येईल की, वधू व वर अशा दोघांनीही या जातीय संस्कारातून मुक्ती मिळविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्यांनी अधिक सुजाण मानवतावादी विचारांनी स्वतःला सुसंस्कृत बनविले तर दोन संस्कृतीमधील ही दरी कमी होऊ शकेल. दुसरे म्हणजे आपल्या जातीत काही खरोखरच विशेष चांगले असले तरी ते आपल्या जातीतल्या जातीतच ठेवणे बरोबर नाही उलट आंतरजातीय विवाहाच्या माध्यमातून या चांगल्या गोष्टी आपण इतर समाजात संक्रात करु, कळत किंवा नकळत.

अर्थात परजातींतलाच जोडीदार मिळवायचा असा प्रयत्न करताना वाट पहावी लागेल. कारण हा जोडीदार परजातींतला तर असला पाहिजेच पण त्याच्याशी आपले विचार जुळले पाहिजेत, मनोमीलनही होऊ शकले पाहिजे पण असा प्रश्न जातीतल्या जातीत लग्न करणाऱ्या परंपरावाद्यांसमोरही नाही का? अशा लोकांसमोर कित्येकदा जात-पोटजात जुळणे व पत्रिका जुळणे हे मोठे जटील प्रश्न असतात आणि इतके करुन पुन्हा विचार व मने जुळावित ही इच्छा असतेच तेव्हा आंतरजातीय विवाहेच्छूंना जरा प्रयत्न करावा लागेल व थोडीफार वाट पहावी लागेल. पण ही परिस्थिती आतापर्यंतच्या परिस्थितीपेक्षा फार निराशाजनक आहे असे वाटत नाही.

याबाबत असे म्हणता येईल की, आंतरजातीय विवाहाला आपण होऊन तयार होण्यात व त्यासाठी प्रयत्न करण्यात एक थ्रिल आहे व हे थ्रिल सामान्यातला सामान्य तरुणही अनुभवू शकतो. वस्तुतः हे थ्रिल ठरण्याचे काही कारण नव्हते. परंतु एकंदर आपल्या सामाजिक संस्थांची, विशेषतः कुटुंबसंस्थेची चौकट आंतरजातीय विवाहाला अनुकूल नसल्यामुळे ही गोष्ट आज थ्रिलिंग ठरत आहे. पण त्याचबरोबर आजच्या तरुणांचा जीवनात कुठे थ्रिल नाही. साहसीपणाला वावच नाही असे जे वारंवार म्हटले जाते, त्याला हे एक उत्तर आहे 'आंतरजातीय विवाहाचे थ्रिल अनुभवा विचारपूर्वक व विवेकपूर्वक अनुभववा!' हे थ्रिलसाठी थ्रिल नाही, तर सामाजिक जाणिवेतून गंभीरतापूर्वक स्विकारलेले हे थ्रिल आहे. केवळ आई-वडिलांसमोर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

हा विषय मांडून पहा की मी आंतरजातीय विवाह करणार आहे. तेवढयाने कसा संघर्ष होतो ते पहा. ही सत्याग्रहाची सुरुवात आहे. एका सांस्कृतिक क्रांतीची सुरुवात आहे. जातिप्रथा हीं तुमच्या आमच्या कुटुंबव्यवस्थेत रुचणारी व वाढणारी प्रथा आहे व म्हणून जातिप्रथेला विरोध करायचा असेल तर घरा-घरांतून अशी अहिंसक सांस्कृतिक क्रांति सुरु व्हावी असे मला वाटते. आई-वडिलांच्या व नाते-वाईकांच्या हृदयपरिवर्तनाचा प्रयत्न आजच्या सुजान युवकांनी करावा व आंतरजातिय विवाह-मागचे सामाजिक सत्य त्यांनी स्वीकारावे, पचवावे, याचा युवकांनी आग्रह धरावा, म्हणजेच सत्याग्रह करावा.

'विवाह हा केवळ दोन व्यक्तीच्या इच्छेचा प्रश्न आहे आणि त्यामुळे आंतरजातीय विवाहाची सामाजिक चळवळ होऊ शकणार नाही' असे बऱ्याचदा म्ह-टले जाते पण हा युक्तिवाद फसवा आहे. कारण खरोखरच जर प्रत्येक तरुणाने वा तरुणीने पालकांच्या पारंपारिक अपेक्षांचा विचार न करता स्वतःची इच्छा-अनिच्छा आवड-निवड हीच लग्नाच्या बाबतीत प्रमाण मानली म्हणजे खरोखरच लग्न हा पूर्णतया खाजगी प्रश्न बनविला तर जात पाहून जातीतल्या जातीत विवाह होण्याचे प्रमाण खूपच कमी होईल. पण प्रत्यक्षात ते होत नाही, 'विवाह हा केवळ दोन व्य-क्तींच्या इच्छेचा खाजगी प्रश्न आहे' हे विधान व्यवहारात खोटेच ठरते. तरुण-तरुणींचे विवाह कसे ठरतात वा ठरविले जातात? बहुतेक उदाहरणात हा एक वधू-वरांच्या सर्वस्वी उत्स्फूर्त निवडीचा आविष्कार नसून यात अनेक सामाजिक घटक गुंतलेले असतात. बहुसंख्य उदाहरणात मुलाचा का मुलीचा विवाह ठरविण्यात पालक वडिलधारे नातेवाईक पुढाकार घेतात व ते साहजिकच स्थळे बघताना प्रथम जातीचा विचार करतील हे ओघाने येते. आपल्या जातीच्या बंदिस्त कौटुंबिक चौकटीत सामा-वून घेतली जाईल अशीच वधू निवडण्याचा प्रयत्न त्या त्या जातीचे वरपिते करतात. तेव्हा बहुसंख्य विवाह एका सामाजिक चाकोरीतून ठरविले जातात व या चाकोरीला नियंत्रित करणारी 'रक्तशुद्धी' वंशमहात्म्य, बेटीबंदी यासारखी विवाहविषयक मूल्य असतात असे दिसून येते. या मूल्यांचे शास्त्रीय मूल्यांकन करुन ती बदलण्यासाठी सामाजिक चळवळ ही आवश्यक होऊन बसते. जिथे सर्व जातीजमातीच्या तरुणतरुणी एकत्र येत आहेत व जातीचा विचार न करता आपल्या जोडीदाराची निवड करीत आहेत अशी सामाजिक चाकोरी विवाह ठरविण्यासाठी वस्तुतः योग्य असेल तर ती चाकोरी व त्या चाकोरीमागे असलेली स्वातंत्र्यासारखी मूल्ये यांचा पुरस्कार करणे हे आवश्यक ठरेल. त्याचप्रमाणे सध्या ज्या सामाजिक संस्थाच्या माध्यमातून ही सजा-तीय लग्ने ठरतात त्याला पर्यायी सामाजिक संस्थांची साखळी उपलब्ध करणे हे ही या सामाजिक चळवळीचे अंग ठरते. या सामाजिक संस्थामध्ये आंतरजातीय वधूवर सूचक मंडळे व आंतरजातीय परिचय केंद्रे-परिचय मेळावा यांचा अंतर्भाव होईल. या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

संस्थांची जबाबदारी दुहेरी असेल. सध्याच्या विवाहसंस्था बहुधा विवाह जुळविण्यासाठी स्वत: फारशी खटपट करीत नाहीत, तर फक्त माहितीची देवाणघेवाण करतात. खटपटीचे काम पालकमंडळी करतात. पण आंतरजातीय विवाह संस्थांना विवाह जुळविण्यासाठी खटपट करणाऱ्या पालकांचीही भूमिका कमी अधिक प्रमाणात बजावावी लागेल. कारण आज तरी मुलांचे पालक सहसा आंतरजातीय विवाह जमविण्याची खटपट करायला तयार होणार नाहीत. फार तर ते मुलगा किंवा मुलगी त्याबाबत हट्टाला पेटली तर नाईलाजाने परवानगी देतील. तेव्हा आंतरजातीय विवाह संस्थांना लग्नेच्छूंना अधिकाधिक सुयोग्य अशी जातीबाहेरची स्थळे मिळवून देण्यासाठी व त्यांचा परस्पर परिचय घडून त्यांच्याशी विचार विनिमय करुन त्यांचे लग्न जुळविण्यासाठी प्रयत्न करावे लागतील. थोडक्यात वधूवर सूचक व पालक अशा दोघांच्या भूमिका या संस्थांना वठवाव्या लागतील.

दुसरे अपेक्षित सामाजिक कार्य हे अर्थात मूल्यपरिवर्तनाचे आहे हे वरील कार्याच्या बरोबरीनेच होणे अपेक्षित आहे. या मूल्यपरिवर्तनाचे पहिले क्षेत्र तरुण पिढी हे आहे. तरुणामध्ये या विषयावर मोठ्या प्रमाणात चर्चा घडवून आणली पाहिजे. स्वत:च्या जातीची बेडी तोडून दुसऱ्या जातीत लग्न करण्याचा निर्णय त्यांनी घ्यावा किंवा निदान मी लग्न ठरविताना जातीचा विचार करणार नाही व इतर करत असतील तर त्यानाही तसा करु देणार नाही, अशी पक्की खूणगाठ त्यांनी मनाशी बाळगावी. याबाबत तरुणाना धीट बनविले गेले पाहिजे. जी कौटुंबिक चौकट परंपरेने आपल्याला दिली आहे, त्यात तरुणातरुणींचा विवाहाचा धीटपणे करण्याचे जाहीरपणे त्याविषयी काही भूमिका घेण्याचे वा मतप्रदर्शन करण्याचे स्वातंत्र्य तरुण-तरुणींना दिले जात नाही. तर हे स्वातंत्र्य व ही 'जबाबदारी' ही त्यांच्या पालकांची किंवा वडीलधाऱ्या माणसांची समजली जाते. तरुण-तरुणींनी आपल्या लग्नाविषयी किंवा एकूण विवाह संस्थेविषयी काही भूमिका स्वतंत्रपणे मांडणे व त्याविषयी जाहिरपणे बोलणे हे धाडसच मानले जाते. (असे धाडस कांही तरुण-तरुणी करताना दिसतात ही समाधानाची गोष्ट आहे.) जर तरुण-तरुणींना आपल्या लग्नाविषयी व एकूण विवाहसंस्थेविषयी मोकळेपणाने व धिटाईने बोलण्याची संधी उपलब्ध झाली तर ती जाति निर्मूलनाला उपकारक ठरेल असे वाटते. कारण जेव्हा ही जबाबदारी व हे स्वातंत्र्य तरुण-तरुणीचे पालक स्वत:कडेच घेतात त्यावेळी ते बेटीबंदीवर अधिष्ठित विवाहसंस्थांच आपल्या भूमिकेद्वारा बळकट करणार हे सहज वाटते. उलट तरुण-तरुणीच्या मनात विशेषत: शिक्षण व नोकरीच्या निमित्ताने अन्य जातीबरोबर मिसळणाऱ्या तरुण-तरुणीच्या मनात हा जातीचा विचार तितका प्रबळ नसतो. पण एकदा पालकाचे वर्चस्व स्वीकारले की ते विवाहसंस्था आणि जातीयभाव याच्या दृढ संबंध जोडणाऱ्या पालकांपुढे मान तुकवितात. म्हणून तरुण-तरुणींना या विषयावर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

धिटाईने बोलते करणे अगत्याचे ठरेल. अर्थात तरुणतरुणींच्या मनात जातपात नाही असे नाही, पण तो जातपातीचा आकस मनमोकळचा चर्चेच्या वातावरणात कमी होऊ शकेल अशी आशा करायला जागा आहे.

मूल्यपरिवर्तनाचे दुसरे क्षेत्र पालकमंडळी हे आहे. पालकांचे मतपरिवर्तन करण्याचे काम मोठे अवघड आहे. याबाबतीत माणसाची परिस्थिती पशूपेक्षा वाईट आहे. पशूचे अपत्य आपल्या पायावर उभे राहिले, स्वतःचे खाद्य स्वतः मिळवू लागले की पालकपशू त्याला दूर सारतात. मग त्यावर अधिकार गाजवीत नाहीत. साहजिकच आपल्या आपत्यांनी लैंगिक संबंध कुणाशी ठेवावेत याबाबत पालकपशूचे काहीच बंधन नसते. मानवी पालक मात्र आपल्या मुलांना आजन्म आपल्या बंधनात ठेवण्याचा प्रयत्न करतात. त्यांच्या जीवनातील सर्व महत्त्वाच्या निर्णयांवर आपला अधिकार गाजविण्याचा प्रयत्न करतात त्यांनी जन्मभर मानसिक दृष्टचा परावलंबी रहावे असाच या पालकांचा प्रयत्न असतो. त्याचाच एक भाग म्हणून मुलांची लग्ने पालक लावतात व मुलांच्या भावी वैवाहिक जीवनावर एक प्रकारे आपले वर्चस्व गाजवितात. प्रौढ विवाहात मुलांच्या व मुलींच्या मनाला थोडे महत्व येण्याची शक्यता असते. उलट बालविवाहात त्यांच्या मताला काडीचेही महत्त्व असू शकत नाही. तेव्हा प्रौढ-विवाहात आंतरजातीय विवाहाची किंचित तरी शक्यता असते. बालविवाहात ती सुतराम नसते आणि खेडचात आजही बालविवाह मोठचा प्रमाणात होतात. तेव्हा बालविवाहाची प्रथा बंद होणे, प्रौढ विवाहातही मुलांना स्वतःचा विवाह ठरविण्याचे जास्तीतजास्त स्वातंत्र्य मिळणे व आंतरजातीय विवाह करणाऱ्या मुलानाही पालकांनी व नातेवाईकांनी आपल्यात सामावून घेणे हे घडण्यासाठी पालकांचे मूल्यपरिवर्तन आवश्यक आहे. ते बिकट आहे व त्यासाठी प्रौढशिक्षण, पालकांचे मेळावे व चर्चासत्र यांचा उपयोग होऊ शकेल. त्याचबरोबर तरुण पिढीने या मूल्यपरिवर्तनासाठी शांततामय संघर्ष सतत चालू ठेवला पाहिजे.

या चळवळीचाच एक भाग म्हणून आणखी एका मुद्याचा विचार झाला पाहिजे. अशा चळवळीला बळकटी येण्यासाठी ज्यांचा आंतरजातीय विवाह झाला आहे. त्यांना समाजाची केवळ कोरडी सहानुभूतीच नव्हे तर पाठिंबा मिळाला पाहिजे आज आंतरजातीय विवाह करणाऱ्यांना घरच्या, कुटुंबीयांच्या व एकूण समाजाच्या विरोधाला प्रखर तोंड द्यावे लागते. हा विरोध कमी करण्यासाठी समाजात आंतरजातीय विवाहाला अनुकूल असे वातावरण निर्माण केले पाहिजे. शहरापेक्षा खेडचात या प्रश्नाची तीव्रता अधिक आहे. जातीयवादी ब्राम्हण, जातींयवादी मराठा व जातीयवादी महार एरवी जातीवरुन एकमेकांशी भांडतील, पण त्यांचे जातीयवाद असावा यां एका मुद्यावर एकमत असेल. त्यामुळे आंतरजातीय विवाहासारख्या मार्गाने एखादा माणूस जातीचे कुंपनच ओलांडून जाऊ लागला तर त्याला तिघेही जातीयवादी

CC0: In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

हे जातींयतेच्या झेंड्याखाली एकत्र येऊन विरोध करतील. साहजिकच जातच नष्ट करणे हे काम बिकट होऊन बसते. तरीही ते कधीना कधीं करावे लागणारच आहे. वर वर्णिलेल्या मूल्य परिवर्तनाच्या चळवळीतूनच हे आंतरजातीय विवाहाला अनुकूल सामाजिक वातावरण निर्माण करावे लागणार आहे.

शेवटी आंतरजातीय विवाह या शस्त्राच्या काही मर्यादाचा विचारही आवश्यक ठरतो. 'आंतरजातीय विवाह हा जातिनिर्मूलनाचा, जातिव्यवस्था नष्ट करण्याचा एकमेव मार्ग आहे का ?' असा प्रश्न काही वेळा विचारला जातो. हे खरे आहे की आंतरजातीय विवाह हा एकमेव मार्ग नाही. पण बऱ्याचदा वरील प्रश्न म्हणजे एक पळवाट असते. याउलट असे म्हणता येईल की जातिव्यवस्था नष्ट केली पाहिजे असे ज्याला वाटते त्याने आंतरजातीय विवाहाला तत्वत: विरोध करणे विसंगत आहे. 'आंतरजातीय विवाहामुळे खरेच जातिनिर्मूलन होईल का?' असाही प्रश्न विचारला जातो. आणि हेही खरे आहे की आंतरजातीय विवाहातून जातीचे उच्चाटन होईलच असे नाही. पण जातीचे बंधन पाळण्याबाबत सौम्यता तरी निश्चित निर्माण होईल. आंतरजातीय विवाहाकडे जात विसरण्याचे नाहिशी करण्याचे एक साधन किंवा जाति विरोधी दृष्टिकोनाचा एक सहजाविष्कार म्हणून पाहिलेच गेले नाही तर आंतरजातीय विवाहातूनही जाती तग धरुन रहाण्याची शक्यता आहे. उदाहरणार्थ आंतरजातीय विवाहानंतर बऱ्याचदा पत्नीला पतीची जात लावली जाते. (आंतरधर्मीय विवाहात हे प्रश्न जास्त बिकट असतात.) तसेच आंतरजातीय विवाहातून जन्मलेल्या मुलांना वडिलांची जात लावली जाते. या मुलाचा पुन्हा आंतरजातीय विवाह होऊ लागला तर हे आंतरजातीय पालक विरोध करणार नाहीत (स्वत:च्या उदाहरणावरुन) इतकेच. पण पुन्हा हा मुलगा स्वत:ची जात आपल्याही मुलांना लावण्याची शक्यता आहेच. तेव्हा आंतरजातीय विवाहातून खरोखर जातिनिर्मूलन होते की नाही याविषयी जागरुक रहाणे हाही या चळवळीचाच भाग असेल. आंतरजातीय विवाहितांनी स्वत:ची जात कुठेही लावू नये, त्यांनी मुलालाही कुठलीच (आईची वा वडिलांची) जात लावू नये असा प्रचार केला पाहिजे. आंतरजातीय विवाह होईपर्यंत जातीचा विचार केला जाऊ शकेल. (उदाहरणार्थ जो वर आंतरजातीय विवाह करण्यास उद्युक्त झाला असेल, त्यालाही वधूची जात आपल्या पेक्षा वेगळी आहे ना हे पहावे लागेल व हा पर्यायाने जातीचा विचार झाला.) पण हा जातीचा विचार म्हणजे अशी शिडी असेल की तिच्यावरुन चढून गेल्यावर ती फेकून देणेच योग्य. आंतरजातीय विवाह ज्याक्षणी ठरेल त्याक्षणीं दोघांचा जातीचा विचार संपला पाहिजे.

तेव्हा जातिनिर्मूलनाचा एक मार्ग म्हणून आंतरजातीय विवाहाची चळवळ उभारणे शक्य आहे. 'विवाहाचा प्रश्न नाजूक आहे, खाजगी आहे व म्हणून आंतरजातीय विवाह ही केवळ वैयक्तिक बाब' या युक्तिवादात काही तथ्य दिसत नाही. जास्तीत जास्त आंतरजातीय विवाह घडविणे, आंतरजातीय विवाहांना अनुकूल असे सामाजिक वातावरण निर्माण करणे व आंतरजातीय विवाहाची ही जातिनिर्मूलनाची चळवळ व्हावी यासाठी सर्व प्रकारचे प्रयत्न करणे अशा तीन वाटांनी ही चळवळ चालविता येईल.

◘◘◘

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

॥१॥

समाज प्रबोधन आणि परिवर्तन

कुलगुरु डॉ. जनार्दन वाघमारे

महाराष्ट्र समाज–प्रबोधनाची प्रक्रिया तशी फुले–आगरकरांच्या काळात आरंभ झाली, आणि वास्तविक स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंत त्या प्रक्रियेचा वेग सातत्याने वाढलेला होता. पण स्वातंत्र्योत्तर काळात तिच्या मागचे सातत्य जवळपास संपुष्टात आले. कारण सत्तेच्या राजकारणाने निर्माण केलेला व्यूह छेदून पुढे जाण्याइतकी ताकद समाज–प्रबोधनाच्या ह्या प्रक्रियेत राहिली नाही. पण या दशकाच्या आरंभीं प्रबोधनाची चाहूल पुन्हा ऐकू येऊ लागली. दि. के. बेडेकरांसारख्या विचारवंताला दुसऱ्या प्रबोधनाचा आरंभ झालेला दिसला.

वास्तविक गेल्या एक–दोन दशकांपासून सबंध जगात प्रस्थापित समाज आणि संस्कृतीच्या विरुद्ध असंतोषाची लाट उसळलेली आहे. त्या त्या देशातील तरुणांची मने प्रस्थापित समाजव्यवस्थेच्या आणि तिला पोषक असणाऱ्या राज्यसत्तेच्या विरुद्ध बंडखोरी करुन उठली. गेल्या दशकात काही देशातील तरुणांनी आपापल्या देशांत सत्तांतरे घडवून आणली आणि प्रस्थापितांच्या विरुद्ध लढे आरंभिले. गेल्या दशकात आणि या दशकाच्या आरंभी अमेरिकेतील तरुणांनी प्रस्थापित मूल्यांचा त्याग केला. श्वेत आणि निग्रो तरुणांनी मिळून वांशिक समतेसाठी फार मोठा लढा दिला, आणि त्यांनी व्हिएतनामच्या स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. अमेरिकेतील तरुणांचे अपूर्व असे धाडस पाहून Jean-Francois Revel या फ्रेंच लेखकाने 'Without Marx or Jesus : The New American Revolution' या नावाचे पुस्तक लिहून क्रांती ही केवळ अमेरिकेतच घडू शकते असा आशावाद व्यक्त केला. त्याच–प्रमाणे Charles A. Reich या अमेरिकन लेखकाने 'The Greeing of America' या नावाचे पुस्तक लिहून अमेरिकन समाजवृक्षावर नवी हिरवी पालवी कशी फुटत आहे याची चर्चा केली. अमेरिकन तरुणांचा, विशेषतः निग्रो तरुणांचा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रभाव आपल्या देशातील तरुणांवर निश्चिपणे झाला.

भारतात या दशकाचे आगमन झाले तेच मुळी अत्यंत तेजस्वी व विजयी मुद्रेने ! बांगला देशाची निर्मिती आणि समाजवादाच्या दिशेने भारताने घेतलेली झेप या दोन गोष्टींनी आमच्या तरुणांना आशावादी बनविले, पण समाजवादी दिशेतील पाऊल हे हुकूमशाहीच्या वाटेवरचे आहे, हे आणीबाणीने लोकांच्या लक्षात आणून दिले. भारतातील युवक चळवळी ह्या अपरिहार्यपणे वैचारिकदृष्ट्या डावीकडे झुक- ल्या. भ्रष्टाचार, जातीयवाद आणि एकंदर प्रस्थापित्यांच्या विरुद्ध भारतीय तरुणांनी उठाव केला. क्रांतीची येथेही चाहूल लागली. तेथील जीर्ण व निष्पर्ण समाजवृक्षावर नवीन तेजस्वी मूल्यांची पालवी फुटू लागली. या दशकातील पूर्वार्धाला The Gr- eening of India असे म्हटले तरी चालेल. पण तथाकथित दुसरे स्वातंत्र्य येऊ- नही सामाजिक अभिसरणाची प्रक्रिया मंद झाल्याची चिन्हे दिसत आहेत. तेजस्वी मुद्रेने आलेले हे दशक वेदना आणि अश्रू मागे ठेवून जाईल की काय अशी साधार भिती मनामध्ये निर्माण झालेली आहे.

महाराष्ट्रामध्ये ज्या चळवळींनी समाज-प्रबोधनाच्या दृष्टीने मूळ धरले त्या चळवळींमध्ये प्रामुख्याने तीन चळवळी मला फार महत्त्वाच्या व मोलाच्या वाटतात. त्या तीन चळवळी म्हणजे हमीद दलवाईंची 'मुस्लिम सत्यशोधक चळवळ', बाबा आढा- वांची 'एक गाव एक पाणवठा' ही चळवळ आणि 'दलित साहित्याची चळवळ'. या तिन्ही चळवळींचा सखोल असा परिणाम महाराष्ट्राच्या सामाजिक मनावर आणि सांस्कृतिक जीवनावर होणार आहे. आणि म्हणूनच ऐतिहासिक दृष्टीने ह्या तिन्ही चळवळी महत्त्वपूर्ण ठरणार आहेत. त्या तिन्ही चळवळींच्या पाठीमागे वैचारिक अशी बैठक आहे आणि सामाजिक प्रबोधनाची प्रेरणा आहे. कोणतीही चळवळ केवळ निषे- धात्मक असून चालत नाही. प्रक्षोभाच्या लाटेवर स्वार झालेली चळवळ कोणत्या दिशेने कूच करेल आणि कोणत्या ठिकाणी जाऊन पोचेल हे निश्चितपणे सांगता येत नाही. निषेधाच्या मार्गावरुन ती रचनात्मक दिशेत जात असेल तर निश्चित ठिकाणी तिला पोचता येऊ शकेल. या तिन्हीही चळवळी सामाजिक परिवर्तनाच्या कार्याशी जोडल्या गेल्या आहेत.

भारतीय मुस्लिम समाज तसा पूर्वीपासूनच विलगतावादी राहिलेला आहे. राष्ट्रीय जीवनाच्या मुख्य प्रवाहात मिसळण्याची प्रवृत्ती त्याने सहसा दाखवलेली नाही. धर्म, संस्कृती आणि भाषा यांच्या आधारावर भारतीय मुसलमांनांनी आपल्या विल- गतावादी प्रवृत्तींची वाढ आणि जोपासना केलेली आहे. बदलत्या काळाशी स्वत:ला समांतर ठेवून आपल्या विविध अशा सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक प्रश्नांकडे पाहण्याचे मुस्लिम समाजाने आत्तापर्यंत अगदी कटाक्षाने टाळलेले आहे. म्हणूनच त्याला आपल्या प्रश्नांकडे पाहण्यासाठी आवश्यक असे Perspectives सापडले

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

नाहीत. त्यामुळे वैज्ञानिक जगात वावरत असूनही त्यांची दृष्टी आणि विचारसरणी मध्ययुगीन राहिली. राष्ट्रीय जीवनाचा मुख्य प्रवाह आणि विज्ञानाने निर्माण केलेली 'आधुनिकता' यांच्या संदर्भात मुस्लिम मानसिकतेची कठोर मीमांसा हमीद दलवाईंनी केली आणि भारतीय मुसलमानांना आपला विलगतावादी मार्ग सोडून राष्ट्रीय प्रवाहात सामील होण्याचे आवाहन केले. मुस्लिम सत्यशोधक समाजाची त्यांनीं स्थापना करुन सामाजिक परिवर्तनाच्या कार्याचा आरंभ केला आणि ह्या कार्याला ह्या दशकात चांगलीच गती मिळाली.

ज्या देशात अनेक धर्म आणि भाषा आहेत, त्या देशातला राष्ट्रवाद केवळ धर्मावर आणि भाषेवर आधारुन चालत नाही. ही गोष्ट हमीद दलवाईंनी भारतीय मुसमानांच्या गळी उतरवण्याचा प्रयत्न केला. धर्म ही व्यक्तिगत श्रद्धेची बाब आहे आणि यापुढे धर्माला सामाजिक, आर्थिक, राजकीय प्रश्नांमध्ये ढवळाढवळ करण्याचे कारण नाही. उर्दू हीच केवळ आपली भाषा आहे हे भारतीय मुसलमानांनी मान नये. त्या त्या प्रांतातील भाषा त्यांनी आत्मसात केल्यानंतर इतरांच्या बरोबरीने त्यांनाही पुढे जाता येईल. या देशातील सर्व जाती जमातींचे भवितव्य धर्मनिरपेक्षतेवरच अवलंबून आहे. अशा प्रकारचे विचार महाराष्ट्रातील मुस्लिम मनात रुजविण्याचे कार्य दलवाईंनीं केले आहे. त्यांचे अकाली निधन झाले नसते, तर मुस्लिम सत्यशोधक समाजाला त्यांच्या विवेकशील आणि आग्रही नेतृत्वाचा लाभ अनेक वर्षापर्यंत लाभला असता.

मुस्लिम सत्यशोधक समाजाने चालवलेला स्त्रीमुक्ति–संग्राम तर फारच महत्वाचा आहे. या दशकात मुस्लिम स्त्रियांच्या प्रश्नाला चांगलीच चालना मिळाली आहे. तलाकपीडित मुस्लिम स्त्रिया आपल्या अधिकारासाठी व्यासपीठावर आणि रस्त्यावर निर्भयपणे येऊ लागल्या आहेत. त्यांची ही बंडखोरी या दशकातील महाराष्ट्रीय जीवनातील एक unique phenomenon आहे, असे मला वाटते.

मुस्लिम सत्यशोधक समाजाचा प्रभाव बोहरा समाजातील युवकयुवतींच्या मनावर तर अधिक प्रकर्षाने झालेला दिसतो. त्यांनी आपल्या धर्मगुरुच्या अधिसत्तेला सुरुंग लावला आहे. मला ही गोष्ट समाज–प्रबोधनाच्या व परिवर्तनाच्या दृष्टीने फार महत्त्वाची आणि अर्थगर्भ वाटते. भारतातील इतर प्रांतांमध्ये देखील महाराष्ट्रीय मुस्लिम समाजात सुरु झालेली समाज–प्रबोधनाची ही प्रक्रिया आंदोलनाचे रुप धारण करु शकेल यात शंका नाही. त्याला लागणारे वैचारिक व संघटनात्मक नेतृत्व महाराष्ट्राने दिले आहे, ही अभिमानाची गोष्ट आहे.

बाबा आढावांनी हाती घेतलेली 'एक गाव एक पाणवठा' ही चळवळ ग्रामीण भागात खोलवर रुजलेल्या सामाजिक विषमतेच्या आणि प्रामुख्याने अस्पृश्यतेच्या निर्मूलनासाठी कार्यरत आहे. महात्मा फुले आणि कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

यांच्यानंतर एवढ्या पोटतिडकीने ह्या प्रश्नाला बाबा आढावांशिवाय दुसऱ्या कोण-त्याही सुधारकाने हात घातलेला दिसत नाही. बाबा आढाव ही ध्येयवादाने झपाटलेली व्यक्ती आहे. महाराष्ट्रातील गावागावातील उद्याच्या पाणवठ्यावर कालच्या पाण-ठ्यांची व्यथा आणि ती दूर करण्यासाठी या व्यक्तीच्या प्रेरणेने सुरु झालेल्या सामाजिक समतेच्या संघर्षाची कथा सांगितली जाईल यात काहीच शंका नाही. 'एक गाव एक पाणवठा' ही राष्ट्रीय पातळीवर घेण्यासारखी चळवळ आहे. या चळवळीच्या यशा-पयशावर दलित-दलितेतरांचे संबंध अवलंबून राहणार आहेत, हे निदान महाराष्ट्राने तरी लक्षात घेणे आवश्यक आहे. या दशकात सुरु झालेली ही चळवळ आताच संक-टाच्या खाईत सापडल्याचे दृश्य निर्माण झालेले दिसते. हे दशक दलितांवरील अत्या-चारांचे दशक म्हणून ओळखले जाईल की काय असे वाटू लागले आहे. मराठवाड्यात परवा दलितांच्या घरादारांची राखरांगोळी झाली ती पाहून समाज-प्रबोधन अगदी निष्फळ ठरले आहे असे म्हणता येईल. महाराष्ट्रातील समाज-प्रबोधनाची विहीरच आटली तर पाणवठ्यांवर समतेचे पाणी भरणार कोण आणि पिणार कोण? आढा-वांची चळवळ ह्या शोकांतिकेतून बाहेर काढण्यासाठी कार्यकर्त्यांचे मोठे काफिले हवे आहेत. सैन्याशिवाय सेनानीला यश मिळणार कसे?

महाराष्ट्रातील दलित चळवळीला या दशकात खरोखर सर्वंकष असे स्वरुप प्राप्त झालें आहे. दलितांच्या आंदोलनाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीं वैचारिक व संघटनात्मक कणा दिला म्हणून ती आज ताठपणे उभी आहे आणि ताठपणे चाल-ण्याचा तिचा निर्धार आहे. तिच्या पाठीमागे बाबासाहेबांनी घडविलेल्या मुक्तिसंग्रा-माचा उज्ज्वल इतिहास आहे. त्या इतिहासाने महाराष्ट्रातील दलितांना मानसिक धैर्य दिलेले आहे. आणि आजची दलित चळवळ ही स्वातंत्र्योत्तर काळात जन्मलेल्या व शिक्षणाचा लाभ घेतलेल्या तरुणांच्या हाती आलेली आहे. ह्या तरुण पिढीतून नवचैतन्याचा आविष्कार झालेला आहे. दलितांची ही तरुण पिढी एकीकडे प्रस्थापित समाजाच्या विरुद्ध संतापलेलीं आहे तर दुसरीकडे स्वार्थांध दलित नेतृत्वाच्या विरुद्ध उभी आहे. नव्या मूल्यांचा वेध घेण्याचा प्रयत्न ती करीत आहे. आणि त्या प्रयत्नातूनच दलित साहित्याचा जन्म झालेला आहे.

दलित साहित्य महाराष्ट्रातील समाज-प्रबोधनाच्या वृक्षाला लागलेले मधुर फळ आहे असे म्हणणे अतिशयोक्तीचे ठरणार नाही. या दशकाने महाराष्ट्राच्या पद-रात टाकलेले ते एक दान आहे असे मला प्रामाणिकपणे वाटते. माणसाच्या स्वातं-त्र्याला, त्याच्या समतेला आणि बंधुत्वाला आपल्या कथा-कवितांचे प्रमुख विषय मानून लिहिणारा दलित लेखक समाज प्रबोधनाचे व परिवर्तनाचे माध्यम बनला आहे हे कोणालाही नाकारता येणार नाही.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अर्थात महाराष्ट्रात या पूर्वीही सामाजिक चळवळीं झालेल्या आहेत. पण त्यांना पूरक ठरणाऱ्या, त्यांच्या समांतर चालणाऱ्या आणि त्यांचे प्रतिबिंब शब्दात टिपणाऱ्या साहित्य-सांस्कृतिक चळवळी फारशा झाल्या नाहीत. प्रचाराचे साधन म्हणून वृत्तपत्रांचा आणि साहित्य माध्यमांचा वापर त्या चळवळींशी निगडित असणाऱ्या मंडळींनी केला आहे, ही गोष्ट खरी असली तरी त्या त्या चळवळींचे एक अविभाज्य असे सांस्कृतिक अंग म्हणून यापूर्वी मराठी भाषेत साहित्य-निर्मिती झाली नाही. दलित्य साहित्य हे दलितांच्या वेदनेला मुखरित करणारे आणि दलितांच्या सांस्कृतिक चळवळीला पुढे नेणारे असल्यामुळे दलित चळवळीचे ते एक अविभाज्य अंगच बनले आहे. कथा-काव्यांतून दलितांची वेदना कलात्मक रुप घेऊन व्यक्त होते आहे, आणि त्या वेदनेला वैश्विक पातळीवर नेऊन मानवी जीवनातील अर्थ शोधीत आहे. आणि म्हणून दलित साहित्य हे या दशकात आविष्कृत झालेला एक अपूर्व असा phenomenon आहे असे मला प्रामाणिकपणे वाटते.

महाराष्ट्रात अगदी प्रकर्षाने नावारुपाला आलेल्या आणखी एका विधायक कार्याचा व कर्तृत्वाचा उल्लेख करणे आवश्यक आहे, आणि ते विधायक कार्य आणि कर्तृत्व आहे बाबा आमटे यांचे. महाराष्ट्रातील युवक-युवतींना त्यांनी एक फार मोठे आव्हान दिलेले आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील सोमनाथ प्रकल्पाचा परिसर म्हणजे महाराष्ट्रातील प्रबोधनाचे खुले विद्यापीठच! श्रमाशिवाय स्वावलंबन नाही. स्वावलंबनाशिवाय स्वाभिमान नाही स्वाभिमानाशिवाय कसलीच अस्मिता नाही, अशा प्रकारचा प्रेरणादायी व कृतिशील विचार बाबा आमट्यांनी मराठी मनात पेरला आहे. ह्या विचाराला विधायक कार्याचे रुप दिले तर महाराष्ट्राचे ‘ आनंदवन ’ केवळ पावशतकाच्या कालावधीत होऊ शकेल असा आशावाद उरी बाळगायला काहीच हरकत नाही.

समाज-प्रबोधनाची व परिवर्तनाची प्रक्रिया सातत्याने टिकविणे ही एक अतिशय कठीण बाब आहे. पण तिच्या वाटेवर एकामागून एक असे अनेक चढ लागतात हे लक्षात घेणे आवश्यक असते

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

॥१०॥

समाज परिवर्तनाच्या चळवळी : काल, आज आणि उद्या

ग. प्र. प्रधान

कोणत्याही समाजात प्रामाणिकपणे कष्ट करुन जगू इच्छिणाऱ्या स्त्री-पुरुषांना स्वाभिमानाने जगता आले पाहिजे. अन्न-वस्त्र-निवारा-आरोग्य आणि शिक्षण या त्यांच्या गरजा भागल्या पाहिजेत. परंतु हे केवळ त्या व्यक्तींनी कष्ट करुन वा चांगले वागून होत नाही, होणार नाही. ज्या समाजात ती माणससे वाढतात, त्या समाजात त्यांना जर शिक्षणाची संधी नसेल, त्यांना जर रोजगार मिळण्याची शक्यता नसेल तर त्यांच्या मूलभूत गरजा भागू शकणार नाहीत. आपल्या समाजात कोट्यावधी मुला-मुलींना शिक्षण मिळत नाहीं, मोठे झाल्यावर नोकरीधंदा नीट मिळत नाही. मग काहीतरी करुन त्यांची जगण्याची धडपड चालू असते. ही परिस्थिती बदलण्यासाठी समाजाची आर्थिक पुनर्रचना झाली पाहिजे असे मला कालही वाटत होते आणि आजही वाटत आहे. अशा समाजपरि-परिवर्तनासाठी करावयाची चळवळ राजकीय आणि आर्थिक असते. ज्या राजकीय पक्षाच्या कार्यक्रमात बेकारी निर्मूलनाला अग्रस्थान असेल तो राजकीय पक्ष निवडून आला पाहिजे आणि समाजाची आर्थिक घडी बसवितांना 'काम मिळण्याचा' मूल-भूत हक्क प्रस्थापित व्हावा याबद्दल सर्व राजकीय पक्षांमध्ये एकमत असावयास हवे. हे ध्येय अल्पकाळात साध्य होणार नसेल तरीं ज्यावेळी 'समाजवाद' हे उद्दिष्ट आपण डोळयासमोर ठेवले होते, त्यावेळी त्या दिशेने थोडे बहुत प्रयत्न होऊ लागले होते. वस्तुस्थिती लक्षात घेऊन समाजवादाच्या आशयात बदल करणे जरुर असले तरी समाजातील प्रत्येक व्यक्तीस काम करण्याची संधी मिळून स्वाभिमानाने जगता आले पाहिजे हा समाजवादाचा आशय बदलता येणार नाही, बदलून चालणार नाही. भारत स्वतंत्र स्वातंत्र्यपूर्व काळात म. गांधींनी हेच ध्येय देशासमोर ठेवले होते.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

झाल्यावर १९४७ पासून आर्थिक धोरणात उणीवा असल्या तरी हे उद्दिष्ट मान्य झाले होते. परंतु गेल्या चार वर्षात सत्ताधारी कॉंग्रेस पक्षाने या ध्येयाला बाजूला सारुन नव्या आर्थिक धोरणात सर्व गोष्टी खासगी क्षेत्राला खुल्या करुन, समाज परिवर्तनाची जबाबदारी शासनावर नाही असेच जाहीर केले आहे. या परिस्थितीत उद्यासाठी या देशातील शेतकरी–शेतमजूर, असंघटित कामगार आणि मध्यमवर्ग यांनी एकजूट करुन लढा दिला पाहिजे. असा लढा आपण जर करु शकलो नाही तर फक्त मूठभर श्रीमं–तांचा विचार करणारा समाज अस्तित्वात येईल अशी भीती मला वाटते.

सुदैवाने ही जाणीव असलेले तरुण कार्यकर्त्यांचे गट स्त्रियांमध्ये, धरणग्रस्तांमध्ये, श्रमिकांमध्ये, दलितांमध्ये, आदिवासी आणि भटक्या जमातींच्यामध्ये गेली काहीं वर्षे काम करीत आहेत. या तरुण कार्यकर्त्यांना मी परिवर्तन चळवळींचे अग्रदूत मानतो, त्यांच्या संघटना या परिवर्तनाच्या चळवळीची साधने आहेत. असे मी मानतो. माझ्या मनात एकच खंत आहे. ती म्हणजे या संघटनांचे काम बेटासारखे आहे. त्यांचा एक प्रवाह होत नाही. मी तरुणपणी स्वातंत्र्य चळवळीत आणि समाजवादी चळवळीत असताना आमच्या मर्यादा समजून घेऊन काम देणारे नेते होते. चळवळीचा घटक म्हणून काम करताना आपण कर्तृत्वाने कमी असलो तरी आत्मविश्वास असतो. आजच्या परिवर्त–नाच्या संघटनातील सर्व कार्यकर्त्यांची एक व्यापक चळवळ झाली पाहिजे असे माझे मत आहे. असे परिवर्तनाच्या चळवळीचे व्यासपीठ निर्माण झाले तरच समाज बदलला जाण्याची शक्यता आहे. अन्यथा वेगवेगळ्या जागी कामे चालू राहतील. काही ठिकाणी आपण यशस्वी होऊ परंतु यश तात्कालिक आणि स्थानिक असेल. तरुण कार्यकर्त्यांनी आपापले स्वतंत्र अस्तित्व टिकविण्यास माझा विरोध नाही. मात्र त्यांनीं परस्परपूरक घेऊन परिवर्तनाची चळवळ उभी केली पाहिजे.

या व्यतिरिक्त मला कार्यपद्धतीबद्दल एक मुद्दा मांडावासा वाटतो. आमच्या पिढीत ज्यांच्यावर अन्याय झाला असेल त्यांच्याबद्दल आमच्या मनाच उत्कट सहानु–भूती असे आमच्या कामास भावनेमुळे गती येत असे. गेल्या तीन दशकात परिवर्तना–च्या चळवळीचे स्वरुप शास्त्रीय असावे हे नेत्यांना आणि कार्यकर्त्यांना समजले आहे मी या शास्त्रीय दृष्टिकोनाचे मनःपूर्वक स्वागत करतो. सामाजिक कार्यात ओंगळपणा असू नये, हिशोब चोख असावेत, जे काम आपण करतो त्याचे मूल्यमापन व्हावे हे सर्व मला मान्य आहे. मात्र शासकीय किंवा निमशासकीय कल्याणकारी काम करणाऱ्या संस्थात, दिसून येणारा रुक्षपणा, व्यवहारीपणाच्या नावाखाली येणारा बाजारीपणा परिवर्तनाच्या चळवळीत येऊन चालणार नाही. शास्त्रीय दृष्टिकोन, ध्येयवादी विचार आणि उत्कट भावना यांच्या संगमावर उद्याची परिवर्तनाची चळवळ उभी रहावी असे मला वाटते.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

॥११॥

सामाजिक चळवळी : बदलता संदर्भ

यदुनाथ थत्ते

सामाजिक चळवळी कालाच्या संदर्भात नवनव्या स्वरुपात अवतरत असतात. भारतीय सुधारणावादाचे अग्रणी राजा राममोहन रॉय समजले जातात. सतीच्या अमानुष प्रथेविरुद्ध त्यांनी आवाज उठवला, त्यांना मोठ्या प्रमाणावर लोकांची साथ मिळाली असे नाही, पण त्यांना सती-प्रथा हा मानवतेवरील बीभत्स कलंक वाटत होता. पतीवाचून पत्नीला जीवन निरर्थक वाटावे तसेच पत्नीवाचून पतीला जीवन निरर्थक का वाटू नये? असा एकदा पती पत्नीच्या सरणावर सती गेल्याचे अपवादभूत उदाहरणसुद्धा मिळू नये, याचा अर्थ काय? मरणाची इच्छा नसणाऱ्या कोणा बाईला बळजबरीने पतीच्या सरणावर चढ-वायचे आणि जळून तिची राख झाल्यावर तिच्या पुण्याईचे पोवाडे गायचे हे लोकां-च्या अंगवळणी पडले होते! त्यातील अमानुषपणा जाणवणारी काही संवेदनशील माणसे त्या काळातही होती. आपसात ती कुजबुजही करीत. पण उघडपणे त्या सती-प्रतेचा जाहीर पंचनामा राजा राममोहन रॉय यांनी केला. समाजाचा मुख्यतः धर्मां-धांचा रोखही त्यांनी ओढवून घेतला. त्यांनी जे सोसले त्यामुळे अनेकांना हिंमत आली. सतीप्रथेविरुद्ध इंग्रज सरकारने वटहुकूम काढला तेव्हा सतीप्रथेचे समर्थक त्या वट-हुकूमापुढे शरण गेले! अलीकडे राजस्थानमध्ये देवराला या ठिकाणी सती प्रकरण घडले तेव्हा देशभर विरोधाचा बुलंद आवाज निघाला.

विधवांना सजा

सती प्रथेची जत्रा विधवांवरील केशवपनासारख्या दुष्ट प्रथांनी घेतली. विध-वेचे केशवपन करुन तिला विद्रुप केले जात असे. तारुण्यसुलभ विकारांना दडपण्या-साठी ही अमानुष प्रथा सुरु झाली आणि शास्त्रार्थ करण्याचा आपल्याला खास अधि-कार आहे असे समजण्याचा भटाभिक्षुकांनी समाजाला जरबेत ठेवून केशवपनाची सजा वरील वर्गातल्या विधवांना ठोठावली! विधवेचे कुंकू, मंगळसूत्र पतीच्या प्रेताबरोबर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

जातच असे, पण तिला अलवाण नेसून जीवन घालवावें लागे, विधवेने पुर्नविवाह करणे हे पाप समजले जाई; पण विधूराच्या लग्नाच्या वाटाघाटी स्मशान यात्रेतून परततानाच सुरु झाल्याच्या हकीगतीं कानांवर पडत. विधूराला दुसरे लग्न करण्याची मुभा होती आणि तसे करणाराला कोणीं बोल लावत नसे.

अमानुष देवदाशी प्रथा

छत्रपती शिवाजी महाराजांनाही अनेक बायका होत्या. पेशवाईत आणि अव्वल इंग्रजीत लग्नाच्या बायकांशिवाय अंगवस्त्र असणे हे पुरुषार्थाचे द्योतक समजले जाई! देवदासीसारखी अमानुष प्रथा आतापर्यंत कर्नाटक-महाराष्ट्राच्या सीमा भागात होती. देवाशी लग्न लावून त्या बाईला सर्वांच्या उपभोगाचे साधन बनवणे धर्मसंमत समजले जात होते! विजापूरच्या काका कारखानिसांनी देवदासी प्रथेतील अमानुषतेविरुद्ध विधायक बंड पुकारले! त्यांच्या सारख्या ब्रम्हचाऱ्याने अशी उठाठेव करण्याबद्दल त्यांच्यावर टीका ही झाली, पण 'सत्या असत्यासी मन केले ग्वाही' या निष्ठेने त्यांनी काम केले आणि देवदासी प्रथेविरुद्ध कायद्याची तरतूदही करण्यात आली.

हा दुष्टावाच

या सर्व दुष्ट प्रथा परंपरांच्या मुळाशी स्त्रीच्या विशिष्ट शरीररचनेमुळे निर्माण झालेल्या अगतिकतेचा फायदा उचलण्याचा दुष्टावाच होता. स्त्री-पुरुषांच्या विवाह-बाह्य संबंधाची सजा स्त्री आणि तिची संतती यांच्याच वारसाला येत असे. विवाह-बाह्य संबंध ठेवणाऱ्या पुरुषाला समाज कोणतेही शासन करीत नसे. या अन्यायाविरुद्ध सुरवातीला निघणारे विवेकी आवाज क्षीण असत, पण कोणी पुढाकार घेण्याची हिंमत दाखवली की हळूहळू आवाज बुलंद होई आणि अपेक्षित सुधारणा अंमलात येई स्त्रियांना दुय्यम स्थान मिळण्याचे एक महत्वाचे कारण म्हणजे लग्नावाचून स्त्री जन्म व्यर्थ, अशी समाजात रुजली गेलेली कल्पना. स्त्रियांना योग्य प्रतिष्ठा मिळयची तर त्यांची सौभाग्याकांक्षा सोडावी, असे दादा धर्माधिकारी प्रतिपादन करीत.

बदलाची दिशा

पुर्वी लग्नप्रसंगी वधूला तोंड भरुन 'अष्टपुत्रा सौभाग्यवती भव' असा आशीर्वाद दिला जाई. स्त्रीचे सर्व जीवन मुलांच्या संगोतनातच खर्ची पडे. आता विवेकी माणसे नववधूला 'इष्ट संतानवती भव' असा आशीर्वाद देऊ लागले आहेत. मुलगी हे परक्याचे धन आणि मुलगा म्हणजे कुलदीपक अशी जुन्या काळात धारणा होती. मुलगीं जन्माला देणे म्हणजे स्त्रीच्या हातून काही तरी भयंकर गुन्हा घडणे अशी समजुत होती. आता विज्ञान असे सांगते की संतानाच्या दोनाचा निर्णय पुरुषांच्या विर्यातील घटकांवर अवलंबून असतो!

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

विचारमंथनाचे महत्व

स्त्री-पुरुषांमधील संबंधांवर समाजाचे स्थैर्य आणि भरभराट मुख्यत: अवलंबून असते. सामाजिक चळवळींचा प्रारंभ त्यापासूनच होतो. समाजसुधारणेबाबत कोणीतरी कृतीने इसार दिला म्हणजे समाजात विचारमंथन सुरु होते आणि सामाजिक चळवळी मूळ धरु लागतात आणि कालांतराने त्या समाजांत रुजतात देखील. आपण काल नव्हतो आणि उद्या नसणार ही कल्पना माणसाला रुचत नाही हे जाणून त्याच्या समाधानासाठी कर्मविपाकाचे एक तत्त्वज्ञान हितसंबंधी लोकांनी उभे केले आहे आणि त्याआधारे समाजात स्थैर्य आणि शांतता निर्माण झाली, असा भ्रम निर्माण केला. लोकायतांनी ह्या मूळ कल्पनांना विरोध केला. पण हितसंबंधी मंडळींनी लोकायत म्हणजे नीतिशून्य अशी हवा निर्माण केली. कसले पाप आणि कसले पुण्य असे लोकायत म्हणतात, शरीराची राखरांगोळी झाल्यावर कसला पुनर्जन्म ? खुशाल कर्ज काढून तुपावर ताव मारावा, असे चार्वाक आणि लोकायत सांगतात असा हितसंबंधी मंडळींनी बभ्रा केला. परंतु आता त्या प्रचाराचे इंगित लोकाना समजू लागले आहे. आता 'आस्तिक शिरोमणी चार्वाक' असे पुस्तक प्रसिद्ध होते आणि त्याचे स्वागतही होते.

संकुचित विचार

समाज सुधारणांचा विचार मुख्यत: हिंदू सवर्णांच्या संदर्भातच केला जातो. ही बोलघेवडी मंडळी आपली दु:खे तेवढीच खरी असा समज निर्माण करतात. निधर्मी राष्ट्रातही मग हिंदू कायद्यात सरकार सुधारणा करते. इतरांची दु:खे त्यांना शीतल वाटतात! मुस्लिम स्त्रिया सवत, तोंडी फारकत आणि पोटगीचा हक्क नसणे यामुळे पीडित आहे. पण कोणी सर्वांना एकच समान कायदा लागू करा म्हणाले की प्रधानमंत्री वकिली युक्तिवादाचा डोंगर उभा करतात. देशातील ८५ टक्के लोकांचा कायदा सुधारला की १५ टक्क्यांच्या कायद्यात हस्तक्षेप करणे सुलभ होईल, असा भ्रम ते निर्माण करतात, प्रत्यक्ष पावले मात्र तशी पडत नाहीत !

संविधानाशी बेईमानी

संविधानाशी बेईमानी करणारे शहाजोग इथे पुढारी म्हणून मिरवतात. न्याय, स्वातंत्र्य, समता आणि आपलेपणा यांच्या आधारे इथे नवा समाज घडवण्याचे उद्दिष्ट संविधानाच्या प्रारंभीच घोषित केले आहे. धर्म, वंश, जात, भाषा किंवा दोन भेदामुळे खंडित न होणारे अखिल भारतीय नागरिकत्व जोपासण्याची संविधानाची प्रतिज्ञा आहे. कायद्यासमक्ष सर्व नागरिक समान समजले जातील व सर्वांना कायद्याचे समान संरक्षण मिळेल हे संविधानाचे आश्वासन आहे. हा सुधारणेचा टप्पा फार दूर आहे, पण त्या दिशेने पावले निश्चयाने टाकली जात आहेत, असा प्रत्यय लोकांना

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आला पाहिजे. आपली संविधाननिष्ठाच त्यामुळे संशयास्पद ठरत आहे. संविधान हा आपल्या वाटचालीचा स्पष्ट असा नकाशा आहे. पण समयबद्ध असा कार्यक्रम करण्याची इच्छाशक्ती ना राज्यकर्त्यांत, ना समाजात आढळून येते !

अपसमज

आपण अनेक अपसमज जोपासले आहेत. आधी राजकीय स्वातंत्र्य मिळाले की सर्व प्रश्न सुटतील असा एक भ्रम आपण निर्माण केला. नंतर आर्थिक प्रश्नांबरोबर सामाजिक प्रश्न मार्गी लागतील असा भ्रम आपण जोपासला. सामाजिक प्रश्नांना नेहमी गौण लेखले गेले. महात्मा फुल्यांपासून महात्मा गांधीपर्यंत अनेक सुधारणावाद्यांच्या वचनांना आपण टाळ्या दिल्या. त्यांच्या पुतळ्यांना हार घातले. की आपले काम संपले असा समज झाला आहे. जिवंतपणी सुधारकांना ज्यांनी विरोध केला, त्यांच्या प्रेतयात्रा काढायलाही कमी केले नाही, तीच मंडळी त्यांचे गोडवे गाताना दिसतात तेव्हा आश्चर्य वाटते.

संवेदनशीलता आणि विवेक

सद्‌वचनांचा जिभेला स्पर्श झाला की आपण सुसंस्कृत म्हणून मिरवायला मोकळे होतो. सद्‌वचनांचा स्पर्श मनाला, बुध्दीला आणि कर्माला होतो तेव्हा संस्कार झाला असे म्हणता येईल. सुसंस्कृत होणे म्हणजे तरल संवेदना जाणण्याची क्षमता वाढवणे आणि विवेकाची कास धरणे. असा सुसंस्कृत समाज सुधारणेची आघाडी लढवू शकतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर असे म्हणत राजकीय बाबतीत घोड्याच्या वेगाने जायचा आग्रह धरणारेच जेव्हा धीम्या गतीने सामाजिक सुधारणा होतील, असे म्हणतात तेव्हा आश्चर्य वाटते.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

॥१२॥

सामाजिक बदलासाठी वृत्तीव्यवस्था बदलणे आवश्यक !

प्रा. गो. न. मग्गीरवार

अयोध्येत बाबरी मशीद पाडली त्या दिवशीची गोष्ट माझा छोटा मुलगा शाळेतून परत आला तो भलत्याच खुशीत, घरी आल्या आल्या त्याने सांगितले, 'माझ्या वर्गात माझा एक मुस्लिम दोस्त आहे. त्याला मी सांगीतले की आम्ही तुमची मशीद पाडली त्याचा चेहरा पडला. आपले संस्कार मुलाच्या बाबतीत कवडीमोलाचे ठरल्याचे मी पाहात होतो. 'आम्ही तुमची मशीद पाडली' हे वाक्य आपल्या एकूणच वृत्तीव्यवस्थेचे (attitude) द्योतक वाटले. ही वृत्ती व्यवस्था जोपर्यंत बदलत नाही, तोपर्यंत खऱ्या अर्थाने सामाजिक बदल किंवा परिवर्तन घडून येणे शक्य नाही असेही वाटून गेले. 'आम्ही' आणि 'तुमची' हा आपपर भाव आणि मशीद पाडल्याचा आसुरी आनंद हे दोन्ही भोवतीच्या वातावरणातून निर्माण झाले होते. माझा मुलगा या वातावरणालाच त्या वागण्यातून प्रतिसाद देत होता. या वातावरणातच एक वृतिव्यवस्था निर्माण होते. तीं बदलायची असेल तर वातावरणच बदलावे लागेल. त्यासाठी जाणींवपूर्वक असे वातावरण निर्माण करावे लागेल की, त्याच्या तोंडून असे वाक्यच निघू नये. मशीद पाडल्याचा आनंद कुणालाच वाटत नाही असे वातावरण त्याला दिसले तर तो हे वाक्य बोलणारच नाही. त्याचे एक वाक्य मला दिवसभराची अस्वस्थता देऊन गेले.

आपल्या वृत्तीव्यवस्थेतील दोषाची जाणीव तीव्रतेने करुन देणारा असाच आणखी एक प्रसंग. निमित्त पुन्हा बाबरी मशीदीचेच. माझे एक मित्र जयप्रकाश दगडे यांचे सोबत मी लातूरच्या खोरी गल्लीतील मुस्लिम वस्तीत गेलो, मशीद प्रकरणानंतर आम्हाला एक काहीं हिंदू-मुस्लिम सद्भाव संवाद आयोजित करावयाचा होता, त्यासाठी काही मुस्लिम युवकांना बोलके करणे आणि त्यांना जे काही वाटते ते हिंदूसमोर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बोलू द्यावे असे ठरले. मनातील किल्मिष अशा प्रकारे किमान काही अंशी तरी कमी करता येईल असे वाटत होते. त्यासाठी खोरी गल्लीतील मुस्लिमांना तयार करावे म्हणून आम्ही तिथे गेलो, बोलावे तर कुणाशी बोलावे ? मनाच्या ठिकाणी मोकळेपणा असला तरच संवाद शक्य होतो. एक प्रचंड ताण मनात घेऊन संवाद कसा शक्य आहे ? यातूनही मार्ग काढीत आम्ही एका दुकानातील मुस्लिम गृहस्थाशी संवाद साधण्याचा प्रयत्न केलाच, लागलीच दोन–चार मुस्लिम गोळा झाले. दुकानाला लागूनच असलेल्या घरातून एक वृद्ध मुस्लिम स्त्री दारापर्यंत आली आणि पडदा बाजूला करुन ती बराचवेळ आमचा काय संवाद चालतो ते ऐकत राहिली, आपल्या घरातील लोकांशी हे दोन हिंदु गृहस्थ काय बोलतात ते ऐकण्याची तिला गरज वाटावी आणि आम्ही तिथून जात नाहीत तोवर तिने थांबून राहावें ही बाबच सद्भाव संवादाची गरज स्पष्ट करीत होती. कोठून आली होती ही अविश्वासाची जाणीव ? त्यावेळच्या वातावरणातून वर्षांनुवर्षे एकाच गावात, एकाच भागात राहणाऱ्या लोकांनाही परस्पराबद्दल विश्वास वाटू नये आणि त्यांनी एकमेकांकडे संशयाने पहावे हा दोष आपल्या वृत्तीव्यवस्थेतून आला आहे असे मला वाटते.

निवडणुकीच्या कळात वार्डां–वार्डांतून फेऱ्या काढणारे पुढारी किंवा परिसंवादात घसा कोरडा होईपर्यंत सर्वधर्मसमभावावर भाषण झोडणारे बुद्धिवंत अशावेळी लोकांना दिलासा देण्यासाठी घराबाहेरही पडत नाहीत हा दोष आपल्या वृत्तीव्यवस्थेचा आहे. आयुष्यभर आपण परिवर्तनवादी विचार व्यासपीठावरुन मांडावेत आणि त्या विचाराची कसोटी लागली की स्वस्थ बसावे हे चित्र बदलले पाहिजे. दोन्ही हात पॅन्टच्या खिशात घालून सर्वधर्म समभावावर बोलणे निराळे आणि कसोटीच्या क्षणी घराघरात जाऊन दिलासा देणे निराळे. समाजात बदल होण्यासाठी व्यक्तीच्या वृत्तीत आधी बदल होणे आवश्यक आहे.

या वृत्तीव्यवस्थेतूनच विचार व्यवस्था किंवा मूल्यव्यवस्था निर्माण होते. समाजात शिक्षकाला जास्त महत्व असावे की पोलिस कॉन्स्टेबलला हे आपली वृत्तीव्यवस्थाच ठरवते, संचारबंदीच्या काळात इंजिनियरिंग कॉलजचा एक विद्यार्थी माझ्या घरात घाबरा घुबरा होऊन शिरला, दोन दिवस खायला काहीच मिळाले नाही म्हणून तो एस. आर. पी. जवानांचा डोळा चुकवत कुठून तरी दुध घेऊन तो घरी निघाला होता. पण एका जवानाची नजर त्याच्यावर गेलीच, हातात काठी घेऊन तो त्याच्या मागे लागला. विद्यार्थी सरळ माझ्या घरात घुसला. आणि त्या जवानापासून वाचवण्याची विनंती करु लागला. मी दार लावून घेतले होते पण बाहेर जवान दारावर काठी आपटत धमकावीत होता, विद्यार्थ्याला बाहेर काढले नाही तर आपल्यालाही मार मिळेल या भीतीने मी तो गयावया करीत असतानाही त्याला बाहेर काढून जवानाच्या हवाली केले. जवानाने मनसोक्त काठी फिरविली. एक चप्पल पायात

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आणि दुसरी माझ्या दारात सोडून विद्यार्थी जीव मुठीत घेऊन पळाला. त्याचे दूधही सांडले होते, केवळ पोलिसी माराच्या भीतीने मी त्याला संरक्षण देण्याचे नाकारले याची आजही मला लाज वाटते. पोलिसी माराला भिऊन अन्याय सहन करण्याची वृत्तीव्यवस्था आपणच निर्माण करतो, शिक्षकांपेक्षा पोलिसांचा धाक जास्त वाटावा ही आपल्या मूल्यव्यवस्थेवर व वृत्तीव्यवस्थेवर प्रकाश टाकणारी बाब आहे. कापडाच्या मोठ्या दुकानात इन्कमटॅक्स ऑफीस मधला साधा कारकूनही गेला की दुकानाचा मालक उठून त्याला अदबीने नमस्कार करतो आणि कापड दाखवतो, पण मालकाच्या मुलाला शिकविणारा मास्तर दुकानात गेला तर त्याचे असे स्वागत चुकूनही होत नाही. हा आपल्या वृत्तीव्यवस्थेचा भाग आहे.

जगताना कशाला जास्त महत्व द्यायचे हे आपणच ठरवीत असतो. आणि ज्या गोष्टींला आपण महत्व देतो त्यावरच आपला सांस्कृतिक दर्जा ठरवत असतो. माणसाचं मोठेपण पैशाच्या किंवा अधिकाराच्या आधारावर मोजायचे का त्याच्या चारित्र्याच्या किंवा ज्ञानाच्या आधारावर ठरवायचे हे आपणच ठरवीत असतो. मूल्यांचे आदर्श आणि नमूने आपणच तयार करीत असतो. त्यातूनच समाजाचे स्वरुप कसे असावे ते ठरवीत असतो. मूल्यव्यवस्था आणि वृत्तीव्यवस्था ही व्यक्तीच्या आणि समाजाच्या अस्तित्वाचा आधार असते. या व्यवस्थेचे विघटनच व्यक्ति व समाजाच्या विघटनाचे कारण बनते. म्हणूनच समाजांचे विघटन थांबवायचे असेल तर या व्यवस्थेचे विघटन थांबविले पाहिजे.

गुंड आणि मस्तवाल लोकांचे हितसंबंध जपणारे शासन, ढोंगी आणि दुटप्पी वृत्तीचे षंढ बुद्धीवादी आणि सर्वच बाबतीत उदासीन असणारी सामान्य जनता या फार्म्युल्यातून कोणत्या प्रकारचा समाज निर्माण होऊ शकतो ? परिवर्तनाची भाषा आणि तळमळ या समाजाला कशी कळावी ? अशा समाजात जगणे अवघड झाल्यावर शरणकुमार लिंबाळे सारखा कवि उद्विग्नपणे म्हणतो.

पिण्याचे पाणीही देत नाही, तुम्ही समान हक्काचे तुमच्या बरोबर. मग तुमच्याबरोबर संसार कसा करु द्याल ? हे माझे विचारणे तुम्हाला उद्धट वाटत असेल तर मी जरुर उद्धट आहे.

हा उद्धटपणा देशद्रोह असेल तर मी जरुर देशद्रोही आहे.

असे म्हणणारा शरणकुमार लिंबाळे आणि 'आम्ही तुमची मशीद पाडली' असे म्हणणारा माझा मुलगा मला सामाजिक विघटनाच्या प्रक्रियेतील दोन टोके वाटतात. या दोघांनाही असे म्हणावेसे वाटू नये अशी वृत्तीव्यवस्था आणि मूल्यव्यवस्था आपण निर्माण करु शकू काय हाच खरा महत्वाचा प्रश्न आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

॥१३॥

समाजप्रबोधन, विज्ञान व फलश्रृती/क्रांती

वा. रा. जवाहिरे

समाजप्रबोधन

आपल्या व्यक्तिगत जीवनात व समाज जीवनात जे अनेक प्रश्न आपल्या पुढे येतात आणि आपल्या व्यक्तिगत व समाजजीवनात बरा वाईट परिणाम घडवतात, त्या प्रश्नासंबंधीची स्वतःसाठी माहिती करुन घेणे व त्या प्रश्नासंबंधीची समाजातील नागरिकांना माहिती करुन देणे आणि ते प्रश्न कसे सोडवायचे या संबंधीचेही विवेचन करुन त्याबाबच मार्गदर्शन करणे याचे नाव समाज-प्रबोधन.

उद्दिष्ट

समाजातील सर्व जनसामान्याचे हित साध्य करणे हा उद्देश समाजप्रबोध-नाच्या कार्यामागे असतो, असला पाहिजे. त्या दिशेने जे कार्य चालले नसेल परंतु ते समाजप्रबोधनाचे कार्य म्हणवले जात असले तरी ते समाज प्रबोधनाचे कार्य ठरणार नाही. साहजिकच समाज–प्रबोधनाचे कार्य करताना ते कार्य करणाऱ्या व्यक्तिच्या-जवळ निर्भेळ जनहिताची दृष्टी असली पाहिजे आणि ती दृष्टि असल्यानेच संबंधितांना योग्य दिशेने वाटचाल करता येते.

प्रबोधनात विज्ञानाचे स्थान

सुरुवातीस नमूद केल्याप्रमाणे व्यक्तिगत व समाजजीवनामध्ये समोर येणाऱ्या व जीवनावर परिणाम घडविणाऱ्या प्रश्नांविषयी व त्यांच्या निराकरणाविषयी नागरिकांना सज्ञान घडविण्याचे कार्य समाज प्रबोधनात करावयाचे असते, साहजिकच अशा प्रत्येक प्रश्नाचे विवेचन व अभ्यास करताना संबंधित विज्ञानशाखेचा अभ्यास क्रमप्राप्त ठरतो. उदा. पर्यावरण प्रदूषणाचा अभ्यास करताना प्रदूषण कशामुळे घडते, प्रदूषणास घातक ठरणारे वायू कसे निर्माण होतात, ते वायू निर्माण न होण्याचे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

दृष्टिने काय करावयास पाहिजे, या संबंधीचा अभ्यास करावा लागतो. म्हणजे यामध्ये पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, जीवशास्त्र या संबंधिची माहिती प्राप्त व प्रसृत करावी लागते. समाजजीवनात राज्यकर्त्यांकडून समाजहित विरोधी निर्णय व वाटचाल घडत असल्यास, त्या परिस्थितीत राज्यशास्त्र, समाजशास्त्र, नागरिकशास्त्र आदि क्षेत्रातील विज्ञान शाखांची जरुर ती माहिती प्राप्त व प्रसृत करावी लागते. समाज–घटकांची आरोग्य साधना घडविण्याचे कार्य चालविण्यासाठी वैद्यक शास्त्रातील किमान जरुर ती माहिती प्राप्त व प्रसृत करावी लागते. समाजप्रबोधनामध्ये समाजाचे खरेखुरे शिक्षण करावे लागते. साहजिकच दैववाद व अंधश्रद्धा याबाबतचे समाजाला शिक्षण देऊन त्यातून समाजाला मुक्त करण्याचे काम करावे लागते. हे कार्य विज्ञानाच्या अभ्यासाखेरीज होऊच शकत नाही, हे अगदी स्पष्ट आहे. सारांश, समाजप्रबोधनाच्या कार्यात विज्ञानाचा अभ्यास ही अत्यावश्यक व अटळ बाब आहे.

समाजप्रबोधनाचा भारतातील अलिकडील इतिहास

१८ व्या शतकाच्या अखेरीस व १९ व्या शतकाच्या पुर्वार्धात बंगालमध्ये राजा राममोहन रॉय व ईश्वरचंद विद्यासागर यांनी सतीच्या चालीविरुद्ध, बाल–विवाहविरुद्ध व विधवा विवाहाच्या पुरस्कारार्थ आयुष्यभर जनजागरणाचे काम केले. परिणामी या तिन्ही क्षेत्रात पूर्णांशाने प्रगती झाल्याचे आज दिसून येत आहे. त्याच १९ व्या शतकामध्ये महाराष्ट्रात लोकहितवादांनी ब्राम्हणांच्या वर्णवर्चस्वाविरुद्ध सातत्याने व प्रखरतेने विचार मांडले. पुरोहित वर्गाचे वर्णवर्चस्व आता बहुतांशाने लोप पावले आहे. म. ज्योतिबा फुल्यांनी मागासवर्गीयांच्या एकूण सुधारणेचे आणि अस्पृश्यांच्या व स्त्रियांच्या उद्धाराचे व शिक्षणाचे मूलगामी काम एक मोहिम म्हणून केले. आणि हेच कार्य डॉ. आंबेडकरांनी पुढे चालविले. परिणामी महाराष्ट्रातील अस्पृश्यांमध्ये व दलितांमध्ये जवळपास इतरांच्या बरोबरीने शिक्षणप्रसार झाला आहे. आणि सरकारी व निमसरकारी नोकरीच्या क्षेत्रातही जवळजवळ इतरांच्या बरोबर आज ते आहेत. गोपाळ गणेश आगरकरांनी अंधश्रध्दा व दैववाद याविरुद्ध बुध्दि–प्रामाण्यवाद प्रकर्षाने व पोटतिडकीने लोकांपुढे मांडला. बुध्दिप्रामाण्याच्या विचारा–सहित संतती नियमनाच्या क्षेत्रात महर्षि कर्वे यांचे ज्येष्ठ पुत्र र. धों. कर्वे यांनी प्रखर हाल सोसत व कठिण आर्थिक दुस्थितीशी लढा देत देत आपले भरीव योगदान दिले. हे कार्य आज अंधश्रद्धा निर्मूलन समिती एक मोहिम म्हणून चालवून राहिली आहे. या सर्व कार्यातून अंधश्रद्धा व दैववादाची चांगली पिछेहाट होऊन राहिली आहे. संतती नियमनाची चळवळ मूळत: र. धों. कर्वेनींच चालवली.

समाजप्रबोधन आणि धार्मिक शिक्षण

कोणत्याही धर्माच्या धर्मनिर्मात्याचे व धर्मप्रवक्त्यांचे धार्मिक शिक्षणाच्या कार्यात धर्मासंबंधिचे संदेश सांगितले जातात. त्यामध्ये सहसा विज्ञानाला व वैज्ञानिक

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

दृष्टिकोनाला स्थान असत नाही व संभवतही नाही. म्हणून समाज प्रबोधनाचे कार्य धार्मिक प्रवचनामध्ये बहुतांशपणे विवेचन धर्मश्रद्धेवर आधारलेले असते. म्हणून समाज-प्रबोधनाचे कार्य करणाऱ्या व्यक्तींनी हा दोष टाळून प्रबोधनाचे कार्य चालवणे जरुर ठरते.

या संदर्भात विज्ञानाच्या क्षेत्रात घडलेल्या क्रांतिकारी घटनेची नोंद ही अत्यावश्यक ठरते. ती घटना अशी – पृथ्वी निश्चल असून सूर्य तिचे भोवती फीरतो, असे बायबलने सांगितले आहे व तशी समजूत होती. कोपर्निक्स व गॅलिलिओने याबाबत जरुर तो अभ्यास व संशोधन करुन ही समजूत चुकीची असल्याची माहिती प्राप्त केली. आणि चर्चने ठोठावलेल्या प्राणहत्येच्या शिक्षेला सामोरे जाऊन त्यांनी जगाला सांगितले की, सूर्य केंद्रस्थानी असून पृथ्वी त्याभोवती फिरते. धार्मिक शिक्षण व विज्ञान या दरम्यान केवढी दरी असते हे यावरुन स्पष्ट होते.

समाजप्रबोधन व पक्षीय राजकारण

पक्षीय राजकारणापासून जनहिताला जितका हात मिळतो, त्याच्या अनेक पटीने पक्षीय राजकारण जनहिताला मारक ठरते, असा समाजातील सर्व समाजघटकांचा अनुभव आहे. राजकीय पक्ष निवडणुकीचे वेळी जी आश्वासने मतदारांना देतात, त्या आश्वासनांना धाब्यावर बसवून ते मनमानी कारभार करतात व पुष्कळवेळा त्या आश्वासनांच्या नेमके विरोधी निर्णय व वर्तन करतात. हे सर्व लक्षात घेता, शुद्ध समाजप्रबोधनाचे कार्य पक्षीय राजकारणापासून पूर्णपणे अलिप्त राहणे व ठेवणे जरुर आहे. बरेच वेळा पक्षांची आश्वासनेच मुळात अंधश्रद्धेला पूरक असतात.

फलनिष्पत्ती खरी समाजक्रांती

समाज प्रबोधनाच्या कार्यात जीवनाच्या विविध विषयावर समाजाचे खरे जनजागरण घडत असल्यामुळे संबंधित प्रश्नांबाबत समाज घटकांचा प्रथम वैचारिक बदल घडतो. परिणामी समाजव्यवस्थेत त्याप्रमाणे बदल घडविण्याच्या सनदशीर व शांततेच्या मार्गाने काम करण्यास समाजघटक कटिबद्ध होऊन कामाला लागतात. त्या कार्याला यश साध्य होण्याने प्रथम वैचारिक बदल व नंतर प्रत्यक्षात त्यानुसार समाजव्यवस्थेत उद्देशित स्पष्ट तो बदल अशा दोन क्रांत्या शांततेच्या मार्गाने घडतात. शस्त्रांच्या साधनांनी घडवलेली, समाजाचा सहभाग नसलेली व अल्पसंख्य राजकारण्यांनी समाजावर लादलेली अशी ही दुष्ट क्रांती नव्हे. तर संपूर्ण वा बहुसंख्य समाजघटकांनी संबंधित समाज प्रश्नांचा साधकबाधक विचार करुन घडवलेली अशी ही निव्वळ शांततेच्या व सनदशीर अशा मार्गाची ही क्रांति असणार आहे. अगदी अनोखी व सर्वसामान्याचा पाठिंबा, सहभाग व कल्याण साधणारी ही क्रांति. सर्वे अपि सुखित: सन्तु, सर्वे सन्तु निरामय: या सर्वमान्य नैतिक उद्दिष्टाच्या दिशेने वाटचाल करणारी क्रांती. यासाठी शुद्ध समाज प्रबोधनाच्या कार्याला चळवळीचे रुप प्राप्त झाले पाहिजे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

स्वयंसेवी संस्था चळवळ : एक दृष्टीक्षेप

श्रीनिवास कुलकर्णी

स्वंयसेवी कामाची सुरुवात प्रारंभी ख्रिस्ती मिशनरीनी केली. या काळात ख्रिस्ती धर्म प्रसारासोबतच शिक्षणाच्या प्रसारा सोबतच शिक्षणाच्या प्रचारासाठी, प्रसारासाठी शाळा काढणे, धर्मादाय दवाखाने चालविणे, निराधार अनाथ मुला-मुलींचे वस्तीगृह चालविणे. दुष्काळ, महापूर वा तत्सम आपत्तीपासून मदत कार्य करणे इतकेच मर्यादित काम या मिशनरी संस्थाचे होते. थोडक्यात धर्म प्रचाराचे उद्दिष्टाने पण धर्मादाय स्वरुपाचे ते काम केले होते, सेवेच्या कामातून आपलेपणाचे क्षितीज वाढते ही भावना त्यामागे होती. राष्ट्रीय कॉंग्रेसची स्थापना झाल्यावर हिंदी जनतेची गाऱ्हाने ब्रिटीश सत्ताधाऱ्यांच्या कानावर घालणे एवढेच मर्यादित स्वरुपाचे काम कॉंग्रेस करत होती मात्र लोकमान्य टिळकांच्या आगमनानंतर राष्ट्रीय कॉंग्रेसने स्वराज्याचा लढा पुकारला. याच काळात सामाजिक सुधारणा की राजकीय स्वातंत्र्य हा वाद निर्माण झाला. समाज सुधारणा झाल्याशिवाय राजकीय स्वातंत्र्याला कांही अर्थ नाही. ही विचारधारा मानणाऱ्या व्यक्तीनी राजकीय आंदोलनाबाहेर संस्था चालवून समाज प्रबोधनाचे काम जोरात चालविले. शिक्षण प्रसार, अंधश्रद्धा निर्मूलन, नारी मुक्ती आदी प्रश्नावर त्यांनी प्रभावीपणे काम केले. त्याची परिणीती म्हणून हिंद सेवक संघ, हिंगणे स्त्री शिक्षण संस्था, पंडीता रमाबाई रानडे यांचे काम पहावयास मिळते.

स्वयंसेवी कामात रचनात्मक, गतिशिलता व सृजनशिलता आणण्याचे काम म. गांधीनी केले. राजकारणाला रचनात्मक कामाची जोड देऊनही रचनात्मक काम हे राजकारणापासून दूर ठेवण्याचे कसोशीने प्रयत्न म. गांधीनी केले. स्वातंत्र्यानंतरचा भारत कसा असेल वा असावा याबाबतचे चित्र हे खादीत आहे असे गांधीजी म्हणत. म्हणजे गांधीजी म्हणतात खादी म्हणजे स्वावलंबन, खादी म्हणजे स्वदेशी, स्वदेशी म्हणजे शेजाऱ्याची सेवा. ही सुत्री गांधीजीनी सांगितली होती. गांधीधीजी म्हणत की,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ब्रिटीशांना आम्हाला घालवायचे नसून आम्हाला अंतरबाह्य सशक्त बनायचे आहे. आम्ही जेंव्हा सशक्त बनू तेंव्हा ब्रिटीश आपोआप जातील त्या दृष्टीने गांधीजींनी खादी हे सूत्र वापरले. हरिजन सेवक संघ, चरखा संघ, खादी ग्रामोद्योग, नयी तालीम, कृषी गोसेवा संघ आदी संस्थाची निर्मितीं केली. त्या उपक्रमात व कार्यात एकसूत्री-पणा, एकात्मता होतीच पण त्यात मानवी मनाची सृजनशिलता टिकून होती. ह्या केवळ निव्वळ संस्था नव्हत्या तर त्या व्यापक परिणामी चळवळी होत्या. त्या काळी खादी वा चरखा ही ब्रिटीशांच्या विरोधात लढली जाणारी हत्यारे होती, सर्व सामान्य माणसापासून ते मोठ्या-मोठ्या नेत्यांना चळवळीत आपआपल्या कुवतीनुसार सह-भागी होता यावे असा तो कार्यक्रम होता. त्यात बदल करण्याची संधी होती. नव-निर्मितीचा ध्यास होता. व्यक्तीं आणि समष्टी यातील संबंध दृढ ठेवतच स्वतंत्र अस्तित्व कायम राहील असा प्रयत्न होता. कल्याणकारी साध्यासाठी शुद्ध साधनांचा प्रयोग ही त्या तपासी प्रयोगशाळा म्हणजेच ही कामे होती. स्वातंत्र्यानंतर काँग्रेसचे विलीनीकरण करुन लोकसेवक संघाची स्थापना करावी असा प्रयत्न म. गांधीचा होता. माणसे जोडण्याची, घडवण्याची प्रचंड क्षमता म. गांधीच्या रचनात्मक कार्य-क्रमात होती.

स्वातंत्र्यानंतर व म. गांधीच्या नंतर ही उपक्रमशिलता आणि रचनात्मक लोप पावून तिला संस्थात्मकता आली व त्यात स्थितीशिलता आली आणि आज त्यात एक औपचारिकता शिल्लक राहिली आहे. स्वातंत्र्यांच्या नंतर स्वयंसेवी संस्था-च्या कामाचे क्षेत्र व व्याप्ती वाढली. कांही प्रमाणात ह्या संस्थांनी धर्मादायापासून तें प्रबोधनाच्या कामापासून पुढे प्रत्यक्ष विकास आणि कल्याणकारी कामात सहभाग घेतला. शासन ही स्वतःच खर तर मोठी स्वयंसेवी संस्था असताना व शासन म्हणजे एका बाजूला कायदा व सुव्यवस्था सांभाळत देशाचे परकीय आक्रमणापासून संरक्षण करणे व जनतेचा विकास करण्यासाठी कामे हाती घेणे दुर्बलाचे संरक्षण व त्यांच्या अभ्यूदयाचे कार्यक्रम राबविणे अशी दुहेरी भूमिका शासन या संस्थेनी राबवावी असे ठरले.

तथापी स्वातंत्र्यानंतर सर्वच राजकीय पक्ष सत्ता प्राप्तीच्या मागे लागले. सत्ता प्राप्तीसाठी विचाराला, उद्दिष्टाला मुरड घालून तडजोड करावी लागली. परि-णामी समाजातील दुर्बल/मागास व कमकुवत घटकाचे प्रश्न मागे पडले. हळूहळू राज-कारणात सत्ता प्राप्तीसाठी जात, पैसा आणि गुंडगिरी यांनी हस्तक्षेप केला. स्वयंसेवी संस्थांनी स्वातंत्र्योत्तर काळात आपली कक्षा वाढवली. धर्मदाय स्वरुपाच्या वा प्रबो-धनाच्या कामापासून ते आता कल्याणकारी व विकास कामाकडे वळले. आरोग्य, अनौपचारिक शिक्षण, शेती विकास, ग्रामोद्योग चालविणे, अपंगाच्या पुनर्वसनासाठी प्रयत्न करणे, विधवा परितक्ता यांच्या पुनर्वसनासाठीं माहेरसारख्या योजना राबविणे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कायदेशीर सल्ला व सहाय्य योजना राबविणे. अशा विविध स्वरूपाची व उपक्रमांची जंत्री देता येईल. पण ती विस्तार भयास्तव मला शक्य होत नाही. स्वयंसेवी संस्थाच्या कामाचे जाळे व रेटा इतका वाढत होता की, माजी पंतप्रधान राजीव गांधी यांनी सातव्या पंचवार्षीक योजनेत स्वयंसेवी संस्थासाठी खास राखीव निधी ठेवला व स्वयंसेवी संस्थाना मदत करण्यासाठी कपार्ट नावाच्या संस्थेची निर्मिती व स्थापना केली. केंद्र व राज्य शासनाला स्वयंसेवी संस्थांची मदत घेण्याबाबत खास निर्देश करण्यात आले. १९७० पासून साधारणत: व १९८० पासून मोठ्या प्रमाणावर स्वयंसेवी संस्थाचे जाळे देशभर काढावयास सुरुवात झाली. याच काळात आंतरराष्ट्रीय स्तरावर सुद्धा स्वयंसेवी संस्थाची व्याप्ती व कामाची गति वाढत होती. विदेशी व देशी दानदात्री संस्था मदतीसाठी पुढे आल्या होत्या व येत आहेत. शिवाय शासनाने पण या कामासाठी निधी राखून ठेवल्यामुळे यात वाढ होत होती. केवळ निधीच्या देणगीच्या सुलभतेमुळे संस्था वाढत होत्या हे म्हणणे बरोबर नाही.

स्वयंसेवी संस्था वाढीची कारणे

(१) राजकीय पोकळी :– राजकीय पोकळी दोन अर्थाने होती एक तर प्रचलीत राजकारणात सत्ता संपादनासाठी जात, पैसा व गुंडगिरी याचा सर्रास वापर होत असतांना ध्येयवादी, कष्टाळू, अभ्यासू व मुल्याधिष्टीत जीवन जगू पहाणाऱ्या आणि समाज घडवू पहाणाऱ्यासाठी या सत्ता स्पर्धेत कांही स्थान नव्हते. निवडणुका काळात यांचा केवळ वापर होत होता. समाजातील दुर्बल व मागास घटकातून आलेल्या नव तरूणांना संघटना प्रक्रियेत स्थान देण्यापासून त्यांना हवा तो कार्यक्रम देण्यासाठी राजकीय पक्ष अपयशी ठरले होते. तर दुसऱ्या बाजूला समाजाच्या दुर्बल व मागास समूहाचे प्रश्न राजकीय पक्षांच्या कार्यक्रम पत्रीकेवरच नव्हते. अराजकीय प्रश्न राजकीय बनले होते. संसदीय चौकटीत जनतेच्या प्रश्नांना स्थान नव्हते. त्यामुळे एक व्यापक स्वरूपाच्या राजकीय पोकळीत स्वयंसेवी संस्थाची निर्मिती झाली.

(२) सरकारने विकासाच्या व कल्याणाच्या नावाखाली जे विविध स्वरूपाचे कार्यक्रम वेळोवेळी नियोजनबद्धरित्या आखले व राबविले त्याची अंमलबजावणी व्यवस्थीत झाली नाही. कोणताच अनुभव येत होता. हलगर्जी, वेळकाढू, भ्रष्ट नोकरशाहीच्या माध्यमातून या योजनांची अंमलबजावणी असल्यामुळे, दलालांचे वर्चस्व वाढत चालल्यामुळे योजना लाभधारकापर्यंत न पोहचता त्या भागधारकात विभागल्या जात होत्या. प्रत्यक्ष लाभ धारका–साठी, लाभधारकावर जेवढा पैसा खर्च करावयाचा होता, तेवढा पैसा खर्च करण्यासाठी; व्यवस्थापनावर त्याच्या कितीतरी पट पैसा खर्च होत होता; शासन व जनता याच्यातील नोकरशाहीचा दुवा कुचकामी होता. लोकांच्या कल्याणाच्या वा विकासाची कामे करण्याच्या नावाखाली जनतेची अडवणूक, फसवणूक व पिळवणून होत होती. या सर्वांचा परिणाम म्हणून शासनाच्या योजना ज्या लोकांसाठी आहेत; त्या लोकांपर्यंत पोहंचविण्यासाठी लोकांची जनजागृती करण्यासाठी व लोकांतील कल्पक, सुप्त शक्तीला चालना देऊन त्यांना सोबत

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

घेऊन उपक्रम राबविण्यासाठी स्वयंसेवी संस्था पुढे आल्या.

(३) आंतरराष्ट्रीय स्तरावर पण स्वयंसेवी संस्था वाढत होत्या. जागतिक पातळीवर महिलांचे हक्क, पर्यावरण, नैसर्गिक साधन संपत्ती वरील हक्क आदी मुलभूत स्वरूपाच्या प्रश्नांना घेऊन स्वयंसेवी संस्थांचे जाळे विनले जात होते. अपरिहार्यपणे त्याचे पडसाद म्हणून वा प्रतिसाद म्हणून १९८० नंतर मोठ्या प्रमाणावर स्वयंसेवी संस्था उदयास आल्या. स्वयंसेवी संस्थांनी या काळात कांही उल्लेखनीय प्रयोग केले. त्याची दखल सरकारला व समाजाला घ्यावी लागली. एवढेच नव्हे तर सरकारने हे प्रयोग स्विकारून सरकारी योजना राबविण्यासाठी यांना आमंत्रित पण केले. उदा. अण्णा हजारे यांचा राळेगण सिद्धी प्रकल्प. विलास साळुंके यांची पाणी पंचायत, विजय अण्णाभाऊ राडे यांचा आडगांव प्रकल्प, नाशिक येथील महिला हक्क संरक्षण समिती, मध्य प्रदेशातींल ग्रुप, डेहराडून येथील लोक विज्ञान संस्था आदी घेता येईल. स्वयंसेवी संस्थाच्या या सर्व कार्याकडे लक्ष टाकल्यास असे दिसून येईल की,

(१) स्वयंसेवी संस्था ह्या स्वयंसेवी स्वरूपात काम करतातच. त्याचे स्वयंसेवीपण कुठेतरी हरवून जाऊन त्यांना संस्थात्मक रूप आले. परिणामी स्वयंसेवी काम व त्यांनी केलेली कामे यांना चळवळीचे रूप न येता संस्थात्मक प्रक्रियेत त्या अडकून पडल्या. एकदा कुठल्याही बाबीस संस्थात्मक रूप आले की, त्या कामास मर्यादा पडतात. मर्यादेत अडकलेले वा अडवलेले काम व्यापक रूप धारण करू शकत नाही. प्रयोगशिलता संपते व केवळ पत शिल्लक राहते. उदा. अण्णा हजारे यांनी राळेगण सिद्धीमध्ये केलेला प्रयोग त्यांनाच इतर गावात करता येणार नाही. अनुकरण करणे वेगळे व प्रयोग वापरणे / करणे वेगळे.

(२) स्वयंसेवीपण संपल्यावर संस्थात्मक उभारणी होत असते. संस्थात्मक बाबीचा दोष हा की; संस्था व्यक्ति केंद्रीत बनत असते. संस्थेची ओळख त्याच्या कार्यावर विचार धारेवर न होता प्रथम त्या संस्थेच्या प्रमुख व्यक्तीच्या नावावर होते. संस्थेत कोण आहे. त्या पेक्षा संस्था कोणाची आहे यावर ओळख बनते. अशा स्वरूपाच्या व्यक्ति केंद्री कामामुळे त्या संस्थेत त्या व्यक्ति नंतर संस्था बंद पडते किंवा ती नाममात्र चालते वा त्यांच्यात भांडणे सुरू होतात. वस्तुत: व्यक्ति केंद्रीपण हा दोष केवळ स्वयंसेवी संस्थात नसून राजकीय पक्षात व संसद बाह्य संघटनात पण आहेत. अवतारवादी, भाग्यवादी, विचारधारा ज्या समाजात प्रभूत्व गाजवते त्या ठिकाणी हा दोष असतोच.

(३) शासनाला पर्याय म्हणून लोकाभिमुख व लोकांना सोबत घेऊन जरी योजना राबविणे प्रकल्प कार्यान्वीत करावयाचा प्रयत्न जरी केला तरी सुद्धा मुलभूत स्वरूपाची समताधिष्ठीत समाज निर्मिती करण्यासाठी अशा स्वरूपाच्या कामाचा उपयोग होत नाही किंवा त्या दिशेने वाटचाल पण होत नाही. उदा. एखाद्या प्रकल्पाने मजूराचे स्थलांतर रोखण्यासाठी, दुष्काळावर मात करण्यासाठी प्रकल्प राबवला असेल व तो यशस्वी झाला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

असे मान्य केले तर काय दिसेल सामुहीक श्रम व संपत्ती राबवून त्यातून निर्माण झालेल्या उत्पादनाचा व साधन संपत्तीचा जास्त वाटा सधनाकडे जातो. परिणाम सधन हा सधनच बनतो. फरक एवढाच की स्थलांतरीत मजूरांचे स्थलांतर थांबले व मजूरीत वाढ झाली पण हक्क निर्मितीचे काय? मोबदला देणे वेगळे व हक्क निर्मिती वेगळी. प्रकल्पातून हक्क निर्मिती होत नाही. विषमतेची तीव्रता कमी होते. मात्र समतेकडे वाटचाल पण होत नाही.

(४) स्वयंसेवी संस्थात उद्दिष्ट गट ठरतात. या कामात भाग धारकांना वगळले जाते खरे पण जो उद्दिष्ट गट संस्थेने ठरवला आहे. त्यांचे प्रबोधन होऊन त्याची अस्मीता व ओळख समाजासमोर, शासनासमोर यावयास हवी. मात्र प्रकल्प राबविण्याच्या व उद्दिष्ट पुर्तीच्या नादात वैचारीक अभिसरणाची प्रक्रिया बंद पडते. जो उद्दिष्ट गट आहे तो लाभधारक कधी बनतो याचा पत्ता लागत नाही.

(५) शासनाच्या योजना जनतेपर्यंत पोहंचविण्यासाठी स्वयंसेवी संस्था कार्य करतात. शासनाच्या योजनांना प्रभावीपणे राबविण्यासाठी स्वयंसेवी संस्थाकडे त्या सोपविल्या जातात. पण हळू हळू सरकारच स्वयंसेवी संस्थाना राबवून घेते की काय असे जाणवते. विकासाच्या व कल्याणकारी कार्यात शासन स्वयंसेवी संस्थाचा सहभाग घ्यावा असे म्हणत असतांनाच स्वयंसेवी संस्थावर या त्या कारणाने बंधने आणून, दडपणे आणून त्यांना बदनाम करण्याचाही सोयीस्कर पणे प्रयत्न शासन करते. सहभाग फक्त अंमलबजावणी पुरताच हवा असतो. निर्णय प्रक्रियेत व धोरणात्मक भूमीका ठरवण्यास नको वाटते. त्यामुळे आज स्वयंसेवी संस्था हळूहळू शासकीय बनत आहेत.

(६) एकदा मुदती बाबत परावलंबीत्व वाढल्यावर कार्यक्रमाची, उपक्रमाचे अग्रक्रम ठरवण्याबाबत पण स्वावलंबन वाढते. आज एक अवस्था अशी की, आंतरराष्ट्रीय स्तरावर जो कार्यक्रम चर्चीला जातो तो राबवावा लागतो. कारण मदतीचे स्वरूप त्या सोबत निगडीत असते. या भागातील जनतेची गरज काय आहे वा प्रश्न कोणते आहेत. त्यापेक्षा कुठला प्रश्न आंतरराष्ट्रीय स्तरावर चर्चीला जातो आहे. ही बाब कार्यक्रमाचे अग्रक्रम ठरवते. उदा. भारतीय समाजव्यवस्थेत जाती अंतचा प्रश्न निकडीचा आहे. त्या बाबत कांही ठोस प्रबोधन व कृती अपेक्षीत आहे. असे असतांना मात्र सर्वंकष असा जातीअंतचा लढा न देता अन्याय अत्याचारा विरोधचा लढा उभारला जातो. पर्यावरणाचा, पाणी व जमीनी बाबतचा, आरोग्याबाबत, मानवी हक्काबाबत इ. संदर्भात हेच आहे.

(७) कांही संस्था (Action group) कृती गटाचे काम करतात. काम व्यापक सर्वांगीण विचारसरणी, विश्लेषण पद्धती, प्रशिक्षण व लढ्याचे डावपेच ठरलेलेच असल्यामुळे हे कृती गट फार काळ जगू शकत नाहीत. दबाव गट म्हणून तर अजीबात कार्यक्षम राहू शकत नाहीत.

८) स्वयंसेवी संस्थाच्या माध्यमातून वा स्वयंसेवी संस्थाच्या नावाखाली एक प्रतिगामी शक्ती जन माणसात मूळ धरत आहे. रा. स्वयं सेवक संघ ही एक.राजकीय संघटना. मात्र

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ती स्वत: सांस्कृतीक संघटना अशी तीने आपली प्रतिमा उभी केली आहे. तीच्या आज विविध शाखा वा संस्था अनेक स्तरात स्वयंसेवी संस्थाच्या माध्यमातून कार्यरत आहेत. या बाबत कुठल्या स्वरूपाची दक्षता घ्यावी ती बाब सांगणे कठीण आहे. या लेखामध्ये विवेचन करत असतांना जो पक्ष संघटक / संघटना असा उल्लेख केला. त्यामुळे प्रामुख्याने डावे, पुरोगामी व लोकशाहीवादी पक्ष मला अभिप्रेत आहेत.

या सर्व कारणामुळे स्वयंसेवी संस्था एका आर्वतात सापडल्या आहेत. त्याशिवाय बदलल्या परिस्थितीत स्वयंसेवी संस्थांना वेगवेगळ्या आवाहनाना सामोरे जावे लागणार आहे. एका बाजूला मुक्त अर्थव्यवस्था जगभर येऊ पाहात आहे. बहुराष्ट्रीय कंपन्याना रान येथे मुक्त करून दिले जात आहे. नफा प्रधान गुंतवणूकक्षम अशी भांडवली अर्थव्यवस्था भारतात थैमान घालत आहे. मूल्यप्रधान समाज जीवनाऐवजी स्पर्धात्मक व नफा प्रधान उपभोगवाद प्रवृत्तीला प्राधान्य राहील. अशी धारणा बनली जाते. खुद्द कल्याणाचा व विकासाचा ठेका वा संवैधानिक जबाबदारी मानणाऱ्या शासनाची पण आता भूमीका बदलत आहे. कायदा व सुव्यवस्था सांभाळणे व देशाचे संरक्षण एवढेच शासन या संस्थेचे कार्य या पुढे असणार आहे. बाकी सर्व बाबींचे खाजगीकरण होणार. खाजगीकरण हे केवळ व्यवसायापुरते वा उद्योग धंद्यापुरते असणार नाही. तर एक जीवन पद्धती म्हणून पुढे आणून ती राबविली जात आहे. अशा परिस्थितीत स्वयंसेवी संस्था कोणती भूमिका घेणार आहेत ही बाब महत्वाची आहे. दुसऱ्या बाजूला समाजातील सर्वच मागास व वंचीत समूह आपआपले अस्तित्व अस्मिता व ओळख शोधण्याच्या आणि ती सिद्ध करण्यासाठी संघर्षरत आहेत. हा लढा राजकीय स्वरूपाचा नसून तो नैसर्गिक साधनावर हक्क प्रस्थापित करण्या पासून ते मानवी हक्क प्राप्त करण्या पर्यंतची लढाई असणार आहे. आजवरची समाज बदला बाबतची सर्व विश्लेषणे अपूरी पडत आहेत. अशा वेळेस स्वयंसेवी संस्था कोणती भूमिका घेणार आहेत. हा प्रश्न कळीचा आहे. आणि खर तर हेच एक आव्हान या पुढील काळात उभे असणार आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

॥ १५ ॥

प्रार्थना समाज आणि आर्य समाज

स. मा. गर्गे

★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★

नवी विद्या, नव्या चळवळी

एकोणिसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकात मराठ्यांच्या राज्याचा अस्त झाला आणि भारतात इंग्रजांची सत्ता प्रस्थापित झाली. देशातील अेका प्रभावी सत्तेला समाप्त व्हावे लागले आणि तिची जागा एका परदेशी व्यापारी सत्तेने घेतले. राजकीयदृष्ट्या हे फार मोठे सत्तांतर घडले. पण सामाजिक आणि शैक्षणिक दृष्टया तर ते अधिकच मोठे मन्वंतर घडले. या मन्वंतराने भारतात पाश्चात्य विद्या, इंग्रजी शिक्षण, विज्ञानातील तत्कालीन शोध यांचा आरंभ झाला. त्यातूनच सामाजिक समता व राजकीय स्वातंत्र्य अशा नव्या विचारांनाही या देशात चालना मिळाली. त्यातूनच धार्मिक सुधारणा करण्यासाठी, सामाजिक समतेचा विचार रूजविण्यासाठी आणि राजकीय स्वातंत्र्याची महती प्रतिपादन करण्यासाठी नव्या चळवळी सुरू झाल्या. थोर विचारवंतानी संस्था स्थापन केल्या. महाराष्ट्रातील सामाजिक प्रबोधनाचे कार्य त्या संस्थांनी आणि त्यांच्या संस्थापकांनी आपापल्या ध्येयधोरणाप्रमाणे हाती घेतले. अशा चळवळीत कालक्रमाने ब्राम्होसमाज (स्थापना इ.स. १८२८) प्रार्थनासमाज (३१ मार्च १८६७) सत्यशोधकसमाज (२४ सप्टेंबर १८७३) आर्यसमाज (१० एप्रिल १८७५) आणि अलीगढ मुस्लीमस्कूल (इ.सन १८७५) अशा पांच प्रमुख संस्था स्थापन झाल्या. या संस्थांनी भारताच्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक अशा विविध क्षेत्रात आपला प्रभाव निर्माण केला.

या पाच संस्थांपैकी ब्राम्होसमाजाचे कार्य प्रामुख्याने राजा राममोहन रॉय यांनी बंगालमध्ये प्रसृत केले आणि अलिगढ मुस्लीम स्कूलचे कार्य, सर सय्यद अहमदखान यांनी प्रथम उत्तरप्रदेश व बिहारमध्ये व त्यानंतर सर्व उत्तर भारतात पसरविले. या दोन चळवळीचे मूल्यमापन करणे येथे अभिप्रेत नाही. त्या वगळून फक्त महाराष्ट्रात स्थापन झालेल्या संस्थांच्या कार्याची परिणामकारता, उपयुक्तता आणि आवश्यकता यांचा विचार करावयाचा आहे. त्यातही प्रार्थनासमाज आणि आर्यसमाज ह्या दोन चळवळींविषयी प्रामुख्याने येथे लिहावयाचे आहे. सत्यशोधक समाजाचा स्वतंत्रपणे इतरत्र विचार केलेला आहे. विवेचनाच्या सोयीसाठी वरील मर्यादा स्पष्ट केल्या आहेत.

नव्या जुन्या विचारांचा संघर्ष

युगाच्या सरंजामशाहीच्या रूढीग्रस्त वैचारिक वातावरणातून नव्या आधुनिक विचार

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रवाहात मराठी समाजाला सामील करणे हाच प्रामुख्याने या सर्व चळवळींचा उद्देश असला तरी त्यांचे मार्ग, कार्यपद्धती आणि अंतिम साध्य कांही क्षेत्रात का होईना वेगवेगळे होते. त्यांच्या धोरणाची व विचारांची दिशाही भिन्न स्वरूपाची होती. पण ते कांही असलेतरी, व्यापक अर्थाने या चळवळी महाराष्ट्राला नव्या मन्वंतराचा विचार करावयास लावणाऱ्या होत्या. त्या सर्वांनी आपापल्या ध्येयधोरणानुसार जे विचारमंथन केले त्याने मराठी समाजाच्या परंपरागत विचारांना हादरे दिले. समाजजीवन आहे त्या विचारव्यवस्थेत विकसित होऊ शकत नाही. त्याची जाणीवही या चळवळीनी करून दिली. प्रस्थापित समाजव्यवस्था पुढच्या प्रगतीच्या मार्गावर अडथळे निर्माण करणारी आहे, हे ही स्पष्टपणे दाखवून दिले आणि हे करीत असतानाच या चळवळीनी धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक प्रबोधनाचा प्रकाशही दाखविला. सर्व चळवळी संबंधी असेही 'सरसकट' विधान करीत असताना वर उल्लेखिलेल्या चळवळींचे विचार एकामेकापेक्षा काही स्वरूपात भिन्न होते व त्यामुळे समाजमानसावर त्यांची प्रतिक्रिया ही वेगवेगळी होणे स्वाभाविक होते. याची जाणीव ठेवावी लागेल. त्या बरोबरच एकोणीसाव्या शतकातील जुन्या नव्या विचारांचा संघर्ष ही या चळवळीनी घडवून आणला. हे विसरता येत नाही. कालबाह्य विचार कोणते आणि नव्या काळासाठी कोणते परिवर्तन घडवून आणणे आवश्यक आहे. हे सांगण्याचे धैर्य ही या चळवळींच्या प्रवर्तकांनी दाखविली हे मान्यच करावे लागेल. रूढीग्रस्त विचारांमुळे समाजव्यवस्थेचा रुतून पडलेला गाडा वर उचलून नव्या मार्गावर ठेवण्याचे काम त्यांनी केले.

नव्या चळवळींचा आरंभ झाला. समाजात विचार प्रसार झाला. लोकांच्या विचारांना चालनाही मिळाली. पण १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात समाजात नव्या शक्ती उत्पन्न झाल्या. त्यांच्या आशा आकांक्षाही वाढू लागल्या, त्यामुळे स्वाभाविकच विसाव्या शतकाच्या आरंभापर्यंत यापैकी कांही चळवळींना नव्या काळाशी तडजोड करावी लागली. त्यामुळे त्यांचे मूळ स्वरूप बदलले. तरी पण १९ व्या शतकात त्यांनी केलेल्या कार्याचे महत्व कमी लेखता येणार नाही. वरील चळवळींपैकी प्रार्थनासमाज आणि आर्यसमाज ह्या दोन चळवळींचा येथे परामर्श घ्यावयाचा आहे. वर उल्लेख केल्याप्रमाणे या दोन्ही चळवळींनी जुनी सरंजामी संस्कृति आणि नवी वैज्ञानिक संस्कृति यांचे विश्लेषण केले. त्यामुळे समाजात जुन्या नव्या प्रवृत्तींचा संघर्ष घडून आला. हा संघर्ष नेमक्या कोणत्या स्वरूपाचा होता? त्यात सामाजिक समतेला किती स्थान होते? आर्थिक प्रगतीची निकड किती लक्षात घेतली गेली होती? राजकीय घटनांचा कशा प्रकारे विचार केलेला होता आणि धार्मिक विचाराला किती महत्व मिळाले होते? असे सर्व प्रश्न संक्षेपाने का होईना तपासून पहावे लागतील.

धर्म सुधारणेचा समन्वय

बंगालमध्ये राजा राममोहन रॉय यांनी इ.सन १८२८ मध्ये ब्राम्हो समाजाची स्थापना केली याचा निर्देश वर केलाच आहे. ब्राम्हो समाजाचे एक प्रमुख कार्यकर्ते केशवचंद्र सेन इ.सन १८६४ मध्ये मुंबईला आले. त्यांनी ब्राम्हो समाजाच्या सामाजिक आणि धार्मिक

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कार्याचा मुंबईतील प्रमुख विचारवंतांना परिचय करून दिला. अशाच स्वरूपाची धार्मिक सामाजिक चळवळ महाराष्ट्रातही सुरु व्हावी अशी इच्छाही व्यक्त केली. या विचारांपासून प्रेरणा घेऊन डॉ. आत्माराम पांडुरंग तर्खडकर यांच्या नेतृत्वाखाली प्रार्थना समाज ही संस्था स्थापन करण्याचे ३० डिसेंबर १८६६ रोजी ठरले. हे ठरविण्यामागे मुख्यत: पूर्वीच्या परमहंस सभेतील मंडळी होती. त्या सर्वांनी ३१ मार्च १८६७ रोजी प्रार्थना समाजाची प्रतयक्ष स्थापना केली. प्रार्थना समाजात डॉ. तर्खडकर यांच्या बरोबर न्या. महादेव गोविंद रानडे, डॉ. रामकृष्ण भांडारकर, नारायण केशव चंदावरकर, नारायण आबाजी मोडक यांच्यासारखे तत्कालीन थोर विचारवंत होते. पुढच्या काळात पंडिता रमाबाई आणि विठ्ठल रामजी शिंदे हेही प्रार्थना समाजाचे सभासद झाले. या संस्थेने ब्राम्हो समाजाची सर्व तत्त्वे जशाच्या तशी स्वीकारलेली नव्हती. बंगाल आणि महाराष्ट्र या दोन भूमीतील समाजस्थिती सांस्कृतिक परंपरा आणि धार्मिक पंथोपपंथ यांना अनुसरून प्रार्थना समाजाच्या ध्येयधोरणात ब्राम्हो समाजापेक्षा कांही निराळी सूत्र मांडलेली होती. त्यात प्रार्थनासमाज हा हिंदू धर्मातील एक सुधारणावादी पंथ आहे हे तत्त्व प्रमुख होते. न्या. रानडे यांनी म्हटल्याप्रमाणे, 'आम्हाला सर्वच जुन्यापद्धती पासून फारकत घ्यावयाची नाही. एक काळ असा होता की, हिंदु समाजाची रचना आदर्श होती. परंतु नंतर त्यात अनेक भ्रामक रूढी, कर्मकांड, धर्मश्रद्धा यांचा प्रादुर्भाव होऊन धर्माचे स्वरूप मलीन झाले. त्या अविवेकी रूढींचा त्याग करणे अपरिहार्य आहे.

प्रार्थना समाजाची वैचारिक भूमिका

प्रार्थना समाजाच्या पुरस्कर्त्यांना परमेश्वराचे अस्तित्व मान्य होते. ईश्वराच्या अस्तित्वाचा स्वीकार, धार्मिक सुधारणा आणि सामाजिक प्रबोधन ही प्रार्थना समाजाची तीन प्रमुख सूत्रे होती. 'सर्व देव एक आहेत'. या तत्त्वावर विश्वास असणारा हा पंथ हिंदु धर्माच्या शरीरात शिरलेल्या अपप्रकारांचा निषेध केला पाहिजे असेही या पक्षाने आग्रहाने प्रतिपादन केले. प्रार्थना समाजाच्या लोकांना मूर्तिपूजा मान्य नव्हती. त्यांना प्रार्थना आवश्यक वाटत होती. पण अशा प्रार्थनेने भौतिक फलाची प्राप्ती होणे शक्य नाही, असेही त्यांचे मत होते. मग प्रार्थना कशासाठी? त्यांचे म्हणणे असे की प्रार्थना ही फक्त आत्मिक उन्नतीसाठी केली पहिजे. कर्मवादावर आणि अवतारवादावर त्यांचा विश्वास नाही. वेद हे अपौरूषेय नाहीत. ते थोर चिंतनपर विचारवंत अशा ऋषी मुनींनी ते निर्माण केलेले आहेत. उपनिषदे आणि गीता यातील सिद्धांत, प्रार्थना समाजाने आधारभूत मानले. तसेच, उपनिषदातील मध्यवर्ती तत्त्वज्ञानावर आधारलेले संत साहित्य ही मुख्य आधारतत्त्व मानलेले होते. प्राथना समाजाच्या प्रर्वतकांनी संतांचा भक्तीभाव महत्वाचा मानला होता. ज्ञानदेव, एकनाथ, तुकाराम इ. संतांनी समाजात असा भक्तीभाव जागृत केला होता. तोच भक्तीभाव आणि त्यामागील समतेची भावना पुन्हा जागृत व्हावी असेही त्यांचे मत होते. मराठी संतांनी समाजावर केलेल्या संस्कारांचे आणि परिणामांचे सखोल विवेचन न्या. रानडे यांनी केले. सामाजिक

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

समतेवर त्यांचा विश्वास होता. समाजातील दुष्ट रूढीमुळे विषमतेला वाव मिळतो. म्हणून अशा रूढींचा त्यांनी प्रखर विरोध केला. धर्म आणि अध्यात्म याकडे डोळस श्रद्धेने पाहण्याची आवश्यकता प्रतिपादन केली. जीवनविषक उदारमतवादी तत्त्वज्ञान प्रधान मानले. त्यामागे त्यांची समाजनिष्ठाही तेवढीच महत्वाची होती.

प्रार्थना समाजाला ज्या सुधारणा अभिप्रेत होत्या त्यांचे स्वरूप चतुर्विध होते. जातीभेदाचा नाश, स्त्री शिक्षणाचा प्रसार, विधवा विवाहाला मान्यता आणि बालविवाहाला बंदी, अशी या समाजाची चतु:सूत्री होती. समाजाचे धोरण उदारमतवादी होते. सभासदांना व्यक्तिस्वातंत्र्य होते. समाजाला एका बाजूने हिंदू समाजव्यवस्थेचे संबंध पूर्णपणे सोडावयाचे नव्हते आणि दुसऱ्या बाजूने ख्रिश्चन धर्माच्या विचाराचे व आचाराचे अंधानुकरणही करावयाचे नव्हते.

सामाजिक कार्य व संस्था

प्रार्थना समाजाची धर्मसुधारणेच्या कार्यक्रमाबरोबर इतर सामाजिक कार्य ही तेवढीच महत्वाची होती. समाजाने शिक्षण क्षेत्रात महत्वाचे कार्य केले. विशेषत: अनाथ स्त्रिया व बालके यांच्यासाठी आश्रम चालविले. त्यातील राममोहन आश्रम, मुंबई, अनाथ बालकाश्रम पंढरपूर राममोहन इंग्लीश स्कूल, डिस्प्रेस्ड क्लासेस मिशन इत्यादी प्रमुख संस्था होत. महाराष्ट्राप्रमाणेच गुजराथ, आंध, तामीळनाडू इत्यादी प्रदेशातही प्रार्थना समाजाच्या शाखा आहेत. प्रार्थना समाजाच्या प्रवर्तकांनी केवळ धर्मसुधारणेचेच कार्य केले नाही. त्याबरोबर समाजाच्या प्रवर्तकांनी आर्थिक आणि राजकीय क्षेत्रातही महत्वाची कामगिरी केली. विशेषत: डॉ. भांडारकर यांचे प्राच्य विद्या संशोधनाचे महत्वाचे कार्य आणि न्या. रानडे यांचे आर्थिक व सामाजिक क्षेत्रातील मूलभूत विचार अद्यापही महत्वाचे मानले जातात. त्यांनी प्रतिपादन केलेला राजकीय उदारमतवाद तर आताच्या राजकारणात महत्त्वाचा मानावा लागेल.

प्रार्थना आणि भौतिक व्यवहार

प्रार्थना समाजाने उदारमतवादी सांस्कृतिक परिवर्तन घडवून आणले. या परिवर्तनात जुन्या रूढींचा निषेध होता व नव्या सामाजिक परिस्थितीचे स्वागत होते. हे जसे एक वैशिष्टय मानता येईल, तसेच परंपरागत धर्म वचनांची तर्कशुद्ध पद्धतीने चिकित्सा करणे हेही एक वैशिष्टय होते. न्या. रानडे यांच्या प्रमाणेच डॉ. भांडारकर हेही या चळवळीचे एक प्रवर्तक होते. प्रार्थना आणि सामाजिक क्षेत्रातील इष्टप्राप्ती यांच्या मर्यादा दाखवितांना त्यांनी म्हटले होते. "रोग झाला असता मनुष्य वैद्याकडे जातो. प्रार्थनाकरूनच थंड बसतो असे नाही. आणि जसजसे मनुष्याचे ज्ञान वाढते तसतशी त्या माणसाची समजूत की बाह्यवस्तु अबाधित नियमानी बद्ध आहेत. ते नियम प्रार्थनेने टळावयाचे नाहीत. जे व्हायचे ते त्या नियमास अनुसरूनच होते. ग्रीष्मऋतू मध्ये सूर्यकिरणापासून ताप होतो. तो टळून त्यासमयी हेमंतऋतूतील थंड हवा आपणास प्राप्त व्हावयाची नाही. पर्जन्य पडणे न पडणे हे अशाच अबाधित नियमावर अवलंबून आहे. त्यात आमच्या प्रार्थनांनी काही फेरबदल व्हावयाचा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

नाही.'' बाह्य निसर्गशक्ती आणि आत्म्याची उन्नती या दोन्हीत कशी भिन्नता आहे हे दाखवण्याइतका तर्कनिष्ठ बुद्धिवाद प्रार्थना समाजाच्या प्रणेत्यामध्ये होता. ईश्वराच्या प्रार्थने विषयी त्यांचे मन श्रद्धेने भरून येत असे पण त्यामुळे बाह्य 'जगाविषयी भौतिक 'जीवनाविषयी त्यांची दृष्टि उदासिनं बनलेली नव्हती हे त्यांचे वेगळेपण इतर श्रद्धाळू संतापेक्षा भिन्न होते हे लक्षात घ्यावे लागेल. येथे परंपरागत धर्मवाद्यांच्या प्रमुखांनी छेद दिलेला आहे हेही लक्षात ठेवावे लागेल. अंधश्रद्ध धर्मवाद्याप्रमाणे प्रार्थना समाजाने भौतिक जीवन त्याज्य मानलेले नव्हते. समाज व्यवहार राजकीय विचार आणि शैक्षणिक प्रगती या सर्व क्षेत्रात प्रार्थना समाज बुद्धी प्रामाण्यवादी होता. चिकित्सक होता हे त्यांचे वैशिष्ट्य मानले पाहिजे.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात प्रार्थना समाजाने कोणतीही वैचारिक क्रांती केली नाही, हे खरे असले तरी, धर्माच्या नव्या अन्वयार्थाने समाज डोळस बनविण्याचे व त्याला संघटित ठेवण्याचे कार्य केले. आणि त्यासाठी समाजाच्या मनावर चांगले संस्कार करण्याची आवश्यकताही पटवून दिली त्या काळाच्या संदर्भात प्रार्थना समाजाचे हे कार्य कमी महत्वाचे नाही.

वैदिक तत्त्वावर समाजाची पुनर्रचना

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आर्यसमाज या चळवळीनेही विचार प्रबोधाने कार्य केले. या चळवळीचे प्रभावक्षेत्र प्रार्थनासमाजाच्या चळवळीपेक्षा अधिक मोठे होते. त्याचे उद्दिष्ट व कार्य जवळजवळ देशभर पसरले होते. शुद्ध वैदिक तत्त्वावर हिंदु धर्माची पुनर्रचना केली तरच हा धर्म, तो मानणारा समाज आणि सर्व देश समर्थ बनेल. तसेच हिंदु धर्माच्या अनुयायावर ख्रिश्चन आणि मुस्लीम या धर्माचे जे आक्रमण चालू आहे. त्याला प्रतिबंध करण्यासाठीही आर्यसमाजाची तत्त्वे, मार्ग आणि कार्यपद्धती उपयुक्त ठरेल, असा आर्य समाजाच्या संस्थापकांचा विश्वास होता. अर्थात त्याबरोबरच हिंदुधर्म आणि हिंदू समाज यांना ज्या रूढींनी ग्रस्त केले आहे. त्या रूढीही नष्ट झाल्या पाहीजेत, अशी आर्यसमाजाची आणखी एक महत्वाची बाजू होती.

स्वामी दयानंद सरस्वती यांनी इ.सन १८७५ मध्ये मुंबई येथे आर्य समाजाची स्थापना केली. मूळशंकर हे त्यांचे पूर्वाश्रमीचे नाव. काठेवाडमध्ये एका खेड्यात १८२४ मध्ये त्यांचा जन्म झाला. धर्मजिज्ञासा आणि तत्वचिंतन ही त्यांच्या जीवन प्रवृत्तीची लहानपणा पासूनच महत्वाची अंगे होती. धर्मप्रसारासाठी ब्रम्हचर्य व्रताचा अंगीकार करून त्यांनी संन्यास दीक्षा घेतली व दयानंद सरस्वती हे नाव धोरण केले. ज्ञानजिज्ञासेने त्यांनी देशभर खडतर प्रवास केला. संस्कृतविद्येचे अध्ययन केले आणि अशा धर्म जिज्ञासेतूनच प्राचीन वैदिक वाङ्मयाचे संशोधन केले. ते धर्मनिष्ठ होते तसेच राष्ट्रनिष्ठही होतेच आणि सामाजिक उन्नतीविषयी त्यांना तेवढीच ओढ होती.

वेदांच्या विचारात आणि तत्त्वज्ञानात सर्व जगाचे ज्ञान समाविष्ट आहे, अशी दयानंदाची धारणा होती. वेदप्रामाण्यावर त्यांचा सर्व भर होता. वेदविषयक जिज्ञासेतून, धर्मभावनेतून

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आणि समाज उन्नतीच्या दृष्टिकोणातून त्यांनी आर्यसमाजाची मूलतत्त्वे प्रतिपादन केली. ती तत्त्वे समाजाच्या सर्व थरातून प्रसृत व्हावीत यासाठी आयुष्यभर प्रचार कार्यही केले. अनेक अनुयायी जोडले आणि उत्तर भारतात प्रचार कार्यासाठी केंद्रेही निर्माण केली.

धर्म आणि परमेश्वर यांच्या श्रद्धेशी आर्य समाजाची मूलतत्त्वे निगडीत आहेत. सर्व विश्वाचे मूळ परमेश्वर आहे. तो निराकार, सर्व शक्तीमान, न्यायी आणि दयाळू आहे. तो अजन्मा आहे. तसाच अनंतही आहे. ईश्वराप्रमाणे वेदवांङ्मयावरही दयानंदांची अढळ श्रद्धा होती. म्हणूनच त्यांच्या मते, वेद हे सत्य विद्येचे शास्त्र आहे. वेद शिकणे, शिकविणे, ऐकणे आणि ऐकविणे हा प्रत्येक आर्याचा श्रेष्ठ धर्म आहे. अविद्येचा नाश आणि विद्येची वृद्धी यावर समाजाचा दृढ विश्वास आहे. आर्य समाजाने धार्मिक वर्तन आणि नीतीनियमन यावर मुख्य भर दिलेला आढळतो.

स्वामी दयानंद सरस्वती यांनी आपल्या विचारांचा प्रसार करण्यासाठी आणि आपली जीवन विषयक सुत्रे प्रसृत करण्यासाठी 'सत्यार्थ प्रकाश' हा ग्रंथ लिहीला. त्यात वैदिक धर्मातील वर्ण, आश्रम, ईश्वरविषयक विचार सत्या असत्याचा निर्णय इत्यादी संबंधी सिद्धांत मांडले. त्याबरोबरच जैन, बौद्ध, ख्रिश्चन, मुस्लीम इत्यादी धर्मातील विचारांची विसंगतीही दर्शविली आहे. अर्थात हे करीत असतानाच समाजधारणा, ज्ञानाची साधने, नीतीधर्म, जीवनाचे व्यवहार यासंबंधीही 'सत्यार्थ प्रकाशात' विवेचन केलेले आहे. या सर्व विवेचनाचा परामर्श घेणे येथे शक्य नाही. सामाजिक आणि धार्मिक सुधारणांच्या संदर्भात व्यक्त झालेली त्यातील महत्वाची सूत्रे तेवढी सांगता येतील. जातीव्यवस्था आणि वर्णव्यवस्था गुण, कर्म आणि स्वभाव यांच्या वरून ठरविली जावी. त्यात विशिष्ट कुलात झालेला जन्म लक्षात घेऊ नये, असे दयानंदानी ठामपणे म्हटले आहे. समाजात जे उत्तम विद्या आणि सदाचरण यांनी युक्त असतात ते ब्राम्हणच होत आणि जे दुराचारी असतील ते शूद्र होत. याचा अर्थ, नीच कुळात जन्म झालेली व्यक्ती उत्तम गुणांनी युक्त असेल तर तिला ब्राम्हण समजावे आणि उत्तम कुलात जन्म होऊनही जी व्यक्ती हीन कर्मे करते तीची गणना नीच जातीत करावी.

अस्पृश्यतेचा धिक्कार

आर्य समाजाने मूर्तीपूजा निषिद्ध मानली. या मताप्रमाणे 'दगडासारख्या जडवस्तूंची पूजाअर्चा, अभिषेक करून ज्ञान वाढत नाही आणि आचरणही शुद्ध होत नाही.'

स्त्री जातीचा उद्धार हेही एक महत्वाचे तत्त्व आर्यसमाजाने मानलेले आहे आणि मग त्याला अनुसरूनच बालविवाह, पडदा पद्धती हे सर्वप्रकार निषेधार्ह मानले आहेत. स्त्रीयांच्या उद्धारासाठी स्त्रीशिक्षण हा महत्वाचा उपाय सांगितला आहे.

आर्यसमाजाचे आणखी एक तत्त्व म्हणजे या समाजाने अस्पृश्यतेचा केलेला धिक्कार. स्पर्शास्पर्श मानणे म्हणजे एका माणसाने दुसऱ्या माणसाला हीन समजणे होय. म्हणून स्पृशा स्पृश्यतेचे आचार व विचार बंद झाले पाहिजेत. असे या समाजाचे स्पष्ट मत.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वैदिक संस्कृतीवर आधारलेला राष्ट्रवाद

स्वामी दयानंदाच्या मते, केवळ भौतिकसत्ता माणसाला सुखलोलुप बनविते तर केवळ पारलौकिक अध्यात्म मनुष्याला प्रतिकारशून्य बनविते. तेंव्हा या दोन्ही प्रवृत्तींचा त्याग करून भारतीयाने आपली प्राचीन वैदिक संस्कृती शुद्ध स्वरूपात स्वीकारून भारतीय समाजाला निर्भय आणि बलशाली बनविले पाहिजे. यातूनच आर्य समाजाच्या कार्याला राजकीय विचाराची जोड मिळाली. वैदिक संस्कृतीवर आधारलेला भारतीय राष्ट्रवाद, असे त्याचे वर्णन करता येईल. अशा राष्ट्रवादाची विस्मृति झाल्यामुळे भारत परकीयांच्या आक्रमणाला बळी पडला आणि अनेक शतके पारतंत्र्यात राहिला. असे या राष्ट्रवादाने मानले आहे. इस्लामी आक्रमणानंतर खिश्चन धर्मीयांचे आक्रमण झाल्यामुळे भारतीय समाज अधिकच दुर्बल बनला. पाश्चात्य असो की इस्लामी, या दोन्ही संस्कृतींचा आणि विचार पद्धतीचा त्याग करून भारताने सामाजिक संघटना बळकट केली पाहिजे. त्या संघटनेला प्राचीन वेदविद्येने बलशाली बनविणे, त्यातून स्वातंत्र्य प्राप्त करणे आणि वैदिक संस्कृतीचा सर्वत्र प्रसार करणे अशी ही विचारप्रणाली होती. या सर्वामागे एकसूत्र असे की वेदकालीन समाजरचनेचा आदर्श या काळातही भारतीय समाजाने पुढे ठेवावा. अर्थात हे सांगत असताना दयानंदानी त्यांच्या काळात दिसून येणारे सामाजिक दोष नष्ट करण्यावरही भर दिला होता. अनिष्ठ चालीरीती अंधश्रद्धा, रूढी, अस्पृश्यता इत्यादी विरूद्ध त्यांनी परखड टिका केली होती.

समाजाचे संघटना सामर्थ्य

परंपरेने चालत आलेला वेदाचा अर्थ स्वामी दयानंदानी निराळ्या पद्धतीने लावून तो अधिक समाज सन्मुख केला. समाज समर्थ बनावा; भारताचे राजकीय सामर्थ्यही वाढावे, आर्थीक दृष्टया तो संपन्न बनावा हे दयानंदाच्या सामाजिक व राजकीय विचारांचे उद्दिष्टय होते. त्यासाठी त्यांनी सामाजिक संघटना बळकट करण्याचा विचार मांडला. जातिव्यवस्था नाहीशी केली तर समाज अधिक संघटीत होईल आणि असा संघटीत समाज देशाचे पारतंत्र्य नष्ट करील असा त्यांना विश्वास होता. या भूमिकेवरूनच आर्य समाजाच्या नेत्यांनी पुढच्या काळात स्वातंत्र्याच्या लढ्यात भाग घेतला. लाला लजपतराय, लाला हंसराज, स्वामी श्रद्धानंद यांनी देशभक्तीने प्रेरीत होऊन स्वातंत्र्यासाठी सर्वस्वाचा त्याग केला.

सुधारणांचे कार्य व मर्यादा

प्रार्थनासमाज व आर्यसमाज या दोन्ही चळवळींनी भारताच्या विचार प्रबोधनासाठी कार्य केले. भारतीय समाजाला जुन्या रूढी आणि परंपरा यातून बाहेर पडण्यासाठी धार्मिक आणि सामाजिक मार्ग दाखविले. बाहेरच्या जगाचा नव्या संदर्भात प्रकाश दाखविला. जातीभेद, अस्पृश्यता, स्त्रीयांचे दास्य यावर प्रखर टिका केली. समाज मानसावर सुसंस्कार व्हावेत

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

यासाठी प्रयत्न केले. धार्मिक कर्मकांडाचा निषेध करून नव्या धर्मसुधारणा घडवून आणल्या. सांस्कृतिक जीवनाला एक नवे वळण लावले. जुने संकेत आणि प्रथा कशा आणि किती निरर्थक आहेत हे दाखविले आणि त्यांच्या जागी नव्या काळाला अनुसरून नवे विचार प्रतिपादन केले.

अर्थात वरील सर्व सुधारणा आणि नवा विचार १९ व्या शतकातील सामाजिक आणि धार्मिक परिस्थितीच्या संदर्भात पाहिल्या पाहिजेत. म्हणजे त्यांचे महत्व आणि मर्यादा दोन्हीही समजू शकतील तसेच त्यांनी केलेल्या प्रबोधनाचे वैशिष्टय ही लक्षात येईल. विसाव्या शतकातील नवी परिस्थिती आणि जीवनाच्या नव्या प्रेरणा यांच्यापुढे दोन्ही चळवळींचा निभाव लागला नाही आणि हळूहळू त्या निष्प्रभ होत गेल्या. राजकीय स्वातंत्र्य संग्रामाच्या काळात अनेक नवे प्रश्न निर्माण झाले त्यांची उत्तरे प्राचीन धर्मग्रंथात सापडणे शक्य नव्हते.

विसाव्या शतकाच्या आरंभापासून विशेषत: पहिल्या महायुद्धानंतर भारतात उद्योगधंदे वाढू लागले. परदेशाशी व्यापार, व्यवहार वाढत गेले. दळणवळणाची साधने विकसित झाली. आंतरराष्ट्रीय राजकारणाचा संपर्क वाढू लागला. या नव्या परिस्थितीत कामगारांची संख्या वाढली. मालक कामगार प्रश्न निर्माण झाले. दलित समाजाच्या आशा आकांक्षा वाढणेही स्वाभाविक होते. हिंदु-मुसलमानांच्या प्रश्नांना नवे वळण लागले. अशा विविध मार्गांनी आणि प्रकारांनी बदललेल्या परिस्थितीत निर्माण झालेल्या समस्यांची उत्तरे एकोणिसाव्या शतकातील सामाजिक चळवळीनी सूटू शकत नव्हती. त्यातही न्या. रानडे यांच्या निधनानंतर प्रार्थना समाजाचे कार्यही मंदावले. स्वाभाविकच प्रार्थना समाज केवळ प्रार्थनास्थळ बनला. आर्य समाजालाही एकीकडे राष्ट्रसभेच्या राजकीय कार्यापुढे निष्प्रभ व्हावे लागले आणि दुसरीकडे नव्या वैज्ञानिक विचारापुढे वैदिक संस्कृतिचे विचार कालबाह्य बनत गेले.

या दोन्ही चळवळी नव्या समस्या व सामाजिक आशा आकांक्षापुढे टिकू शकल्या नाहीत. हे खरे असले तरी त्यांनी १९ व्या शतकात समाज आणि धर्म या दोन्ही क्षेत्रात केलेले प्रबोधानाचे कार्य मोलाचे आणि महत्वाचे होते. हे मान्य करावे लागेल.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

॥ १६ ॥

मुस्लिमातील समाज परिवर्तनाच्या चळवळी आणि प्रबोधानाचे प्रवाह : काल, आज आणि उद्या

प्रा. फ.हृ. बेन्नूर

★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★

आधुनिक काळात, महाराष्ट्रात, मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना झाल्यापासून, मुस्लिमांच्या सामाजिक प्रबोधानाची चर्चा पहिल्यांदा मोठ्या प्रमाणावर सुरू झाली. मुस्लिमांची समाज रचना, इस्लाम मधील स्त्री-पुरूष संबंध, मुस्लिम स्त्रियांचे हक्क आणि समस्या, भारतातील आणि भारताबाहेरील मुस्लिम समाज सुधारणेच्या चळवळी याबद्दल लिहीले जावू लागले. त्यापूर्वी महाराष्ट्रात आणि भारतीय पातळीवरदेखील मुस्लिमांच्या सामाजिक प्रश्नांबद्दल फारशी चर्चा होतांना दिसत नाही. कारण १८५७ पासून भारतात आणि १८०० पासून मध्य आशियात मुस्लिमांचा प्रश्न हा "राजकीय प्रश्न" म्हणूनच पुढे आलेला दिसतो. ब्रिटीश कालखंडातील काँग्रेसी राजकारणात देखील, मुस्लिमाकडे केवळ राजकीय दृष्टिकोनातूनच, पाहिले गेले आणि मुस्लिमांचे नेतृत्व करणाऱ्या नबाब, जमीनदार आणि मुल्ला मोलवी यांनी आपल्या वर्गाच्या राजकीय महत्वकांक्षेपोटी सर्वसामान्य मुसलमानांच्या, सामाजिक प्रश्नाकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले. स्वतःच्या स्वार्थासाठी त्यांनी साऱ्या मुस्लिम समाजाचे आणि इस्लामचे, राजकीयकरण केलेले होते किंबहुना इस्लामच्या स्थापनेनंतर, थोड्याच काळात राजेशाहीचा उदंय होवून मध्यपूर्वेतील इस्लामी जगतात, सरंजामदारी व्यवस्था व राजसत्ताक हुकूमशाही यांचा उदय झाला. इजिप्त, इराण आणि अरबस्थान, तुर्कस्थान, अफगाणिस्थान इत्यादी देशातील मुस्लिम राज्यकर्त्यांनी इस्लाम धर्माचे पूर्णपणे राजकीयकरण केले. आपल्या सत्तेला जनमान्यता मिळविण्यासाठी, धर्मगुरूंना हाताशी धरून इस्लामी तत्त्वे आणि कायदे यांचे सोयीस्कर अर्थ लावले. इजिप्त पासून ते अफगानीस्थान पर्यंतची इस्लाम धर्मीय प्रजा ही निरक्षर अज्ञानी, टोळी अवस्थेतील आणि राजे व सरंजामदार यांचे हातातील बाहुलेच होती. इस्लामच्या उदयानंतर दुसऱ्या शतकापासून अरब पंडितांनी, विज्ञान आणि बुद्धीवाद यांचा पुरस्कार करणाऱ्या चळवळी उभ्या केल्या. गणित आणि भौतिक शास्त्रात मोलाची भर टाकली. 'मोतजला' परंपरेतील मुस्लिम बुद्धीवाद्यांनी, धर्मगुरू आणि त्यांची अतिरेकी पोथीनिष्ठता, यांचेविरूद्ध लढा उभा केला. परंतु हा सर्व संघर्ष वैचारिक आध्यात्मिक आणि अधिभौतिक, पातळीवरच झाला. सामाजिक पातळीवर झाला नाही.

कारण इस्लामचा प्रसार ज्या मध्यपूर्वेतील देशात झाला, तेथील इजिप्त आणि

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

इराण सारखे काही प्राचीन देश सोडले तर बाकीचे सर्व प्रदेश हे टोळी अवस्थेतील समाज होते. मूर, तुर्क, पठाण, मंगोल, अफगाण, बलुची इत्यादी वांशिक जमाती या रानटी अवस्थेतील भटक्या आणि अप्रगत जमाती होत्या. त्यांनी केलेला इसलाम आणि इस्लामी समाजरचनेचा स्विकार हीच या अप्रगत समाजातील सामाजिक सुधारणा होती. कारण इसलामच्या स्विकाराने त्यांच्यात परिवर्तन घडविले, सुधारणा केल्या. त्यांच्या रानटी सामाजिक प्रथांना आवर धालून त्यांच्यात सामाजिक जाणिवा निर्माण केल्या. म्हणून इसलामचा स्विकार हीच या जमातींची समाजसुधारणा बनली. इस्लामचे पाश्चात्य टिकाकार, ख्रिश्चन विरोधक आणि शहा–दलवाई–कुरूंदकर सारखे अलिकडचे टिकाकार यांनी केलेली इस्लामच्या १४०० शे वर्षांच्या इतिहासात समाज सुधारणेची चळवळ झालीच नाही, ही टिका, अप्रस्तुत आणि इतिहासाचे विकृतीकरण करणारी म्हणावी लागते.

कारण ख्रिस्ती जगाच्या इतिहासात देखिल समाज प्रबोधनाची चळवळ सुरू होण्यास १६ वे शतक उजाडावे लागले. तसे पाहिल्यास इस्लामच्या उदयानंतर, दुसऱ्या आणि तिसऱ्या शतकात इसलामी पंडितांनी विज्ञान आणि बुद्धीवादाचा पुरस्कार केलेला दिसून येतो. ख्रिस्ती जगात अशी प्रक्रिया १६ व्या शतकात सुरू होते. युरोपची अर्थव्यवस्था, समाज रचना आणि राजकीय व्यवस्था यात औद्योगिक क्रांतीने, परिवर्तन घडविले व त्यातून त्यांचे प्रबोधन युग सुरू झाले. महत्वाचे म्हणज युरोपचे "रेनॉसान्स" म्हणून ओळखले जाणारे तथाकथीत प्रबोधन युग हे ग्रीक विचार व बुद्धीवाद यांच्या पुनरूज्जीवनावर आधारीत होते. ख्रिस्ती धर्म आणि युरोपीय विचारविश्व हे साचेबंद झालेले होते आणि सृजनशीलता गमावून बसलेले होते. म्हणून ग्रीक भूतकाळाचे पुनरूज्जीवन, हाच त्यांच्या प्रबोधनाचा आधार बनला. परंतु वास्तवात खऱ्या अर्थाने समाज सुधारणेच्या चळवळी युरोपात देखील १८ शतकानंतरच म्हणजे फ्रेंच राज्यक्रांतीच्या काळानंतर सुरू झालेल्या दिसतात.

पोथीनिष्ठ ख्रिस्ती धर्माने स्त्रियावर लादलेली बंधने, स्त्रीपुरूष विषमता यांच्या विरूद्ध प्रगत कौटूंबिक कायदे, स्त्रियांचे हक्क व स्वातंत्र्य, शिक्षणाचे हक्क इत्यादी सुधारणा युरोपीयन समाजात देखील १९ व्या शतकातच केल्या गेल्या. म्हणून १४०० शे वर्षांच्या काळात इस्लाम मध्ये समाज सुधारणेच्या चळवळी झाल्या नाहीत, म्हणून इसलाम हा वाईट आणि पोथिनिष्ठ धर्म आहे, असे म्हणणारे पाश्चात्य टिकाकार आणि शहा–दलवाई–कुरूंदकर सारखे तथाकथित सेक्युलर विचारवंत यांना हे वास्तव कळू शकले नाही असे म्हणणे भाग आहे. मध्य युगाच्या समाप्तीनंतर मुस्लीम देशांना प्राश्चात्य वसाहतवादाला तोंड द्यावे लागले. सरंजामी व्यवस्थेतील निरक्षर व अप्रगत मुस्लिम समाजात त्यांचेशी लढावे लागले. म्हणजे मध्य युगातील मुस्लिम प्रजा ही राजे, धर्मगुरू आणि सरंजमादार यांची गुलाम होती आणि १८ व्या आणि १९ व्या शतकात ती पाश्चात्य साम्राज्यवादाची गुलाम झाली. अशा स्थितीत कोणत्या समाज सुधारणेच्या चळवळीपुढे येणार होत्या? आणि सुरूवतीला म्हटल्याप्रमाणे या मध्ययुगीन टोळी अवस्थेतील जमातींना इस्लामनेच समाजरचना, कुटुंब व्यवस्था, कौटुंबिक

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आणि सामाजिक नितीनियम दिले. त्यांच्यात शिक्षण व ज्ञान देवून राजकीय आणि सांस्कृतिक जाणिवा निर्माण केल्या. टोळी अवस्थेतील जमातींच्या दृष्टीने या सुधारणा विलक्षण क्रांतीकारक होत्या. इसलामनेच त्याकाळी प्रथम स्त्रियांना वारसाहक्क दिले. कुटूंबात स्वायत्त स्थान समाजात आर्थिक व सामाजिक दर्जा दिला. चार बायकांची मर्यादा घालून पुरुषी स्वैराचार मर्यादीत करण्याचा प्रयत्न केला. धार्मिक, अध्यात्मिक आणि कौटुंबिक बाबतीत स्त्रियांना समान अधिकार दिले. अशा परिस्थितीत तर मग, "टोळी अवस्थेतून" "समाज अवस्थेत" स्थिरावणाऱ्या, या मुस्लिम जगतात, समाज सुधारणेच्या कोणत्या वेगळया चळवळी निर्माण होणार होत्या. याचे उत्तर शहा–दलवाई–कुरूंदकर यांचे समर्थन करणाऱ्यांनी, द्यायला काही हरकत नाही.

विसाव्या शतकात स्त्रीमुक्ती आंदोलन आणि इतर अनेक सामाजिक चळवळीतून ज्या मूल्यांचा आपण पुरस्कार करीत आहोत, ती मुल्ये या शतकाची निर्मिती आहेत, हे लक्षात घ्यायला पाहिजे. दुसरी गोष्ट म्हणजे समाज सुधारणेच्या चळवळी निर्माण होण्यासाठी समाजाची आर्थिक, सामाजिक आणि औद्योगिक चौकट बदलणारी व्यवस्था निर्माण व्हावी लागते. युरोपात औद्योगिक, तंत्रज्ञान आणि वैज्ञानिक क्रांतीनंतर प्रबोधन युग आणि समाज सुधारणेच्या चळवळी सुरू आल्या, हे लक्षात घेणे आवश्यक आहे. अशा प्रकारचे तांत्रिक, औद्योगिक आणि सामाजिक परिवर्तन मध्यपूर्वेतील मुस्लिम देशांत गेल्या दोन दशकापासून सुरू झाले आहे. म्हणूनच सौदी अरेबिया आणि कुवेत यांचा अपवाद सोडल्यास बाकीच्या मुस्लिम देशात व्यक्तिगत कायदे या दशकातच बदललेले गेले.

भारताची परिस्थिती तर आणखीनच वेगळी आणि गुंतागुंतीची आहे. एक तर भारतात इस्लामचे नाव घेवून प्रथम आक्रमण करणाऱ्या आणि नंतर स्थिरावलेल्या राज्यकर्त्या जमाती या तुर्क, पठाण, मोगल, अफगाण या टोळी प्रधान रानटी जमाती होत्या. इस्लाममुळे त्यांना नवी 'आयडेंटीटी' मिळाली. त्यांच्या सत्तापिपासू वृत्तीला धर्माचे आवरण घालून त्यांना लोकप्रियता आणि जनमान्यता मिळविता आली. त्यापैकी कांही राज्यकर्त्यांना तुर्कस्थान सारख्या त्यांच्या भागातील प्रतिस्पर्ध्यामुळे भारतासारखा सुरक्षित प्रदेश गाढावा लागला होता. कांहीना तर फक्त संपत्ती पाहिजे होती. या सर्वांनी सत्ता असो किंवा संपत्ती असो, त्यांच्या प्राप्तीसाठी धर्माचा वापर केला. येथे 'धर्म' राज्यकर्त्यांची विचारप्रणाली म्हणून पुढे आल्याने, कोणत्याही प्रकारच्या सामाजिक सुधारणेचा विचार शक्य नव्हता. भारतात बाहेरून आलेले राज्यकर्ते, त्यांचे सरदार, लष्कर आणि अनुयायी हे स्वतःला सत्ताधारी वर्गाचे मानीत होते. त्यामुळे आपली सर्व समाजरचना आदर्शच आहे. असे त्यांचे प्रतिपादन होते. मुस्लिमांचा दुसरा वर्ग हा भारतातील धर्मांतरीत "नेटीव्ह" मुसलमानांचा होता आणि हे कोण होते? तळागाळातील शुद्र व अतिशूद्र जाती जमातीतील लोकांनीच, सुफी संतांच्या मानवतावादी शिकवणुकीमुळे, समतेच्या विचारामुळे मोठ्या प्रमाणावर इस्लामचा स्विकार, केलेला दिसून येतो. त्यात राज्यसत्तेने सक्तीने केलेले धर्मांतरीत असले तरी त्यांचे प्रमाण

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कमीच होते. भारतातील चातुवर्ण्य अस्पृश्यता, जातीयता आणि ब्राम्हण–पुरोहित वर्गांची हुकूशाही यांच्या पासून सुटका करून घेण्यासाठी या कनिष्ठ जाती जमातीनी इस्लामचा स्विकार केलेला होता. म्हणजे इस्लामचा स्विकार हीच या धर्मांतरीत कनिष्ठ जाती जमातींची समाज सुधारणा होती. इस्लामचा स्विकार करून या कनिष्ठ जाती जमातींनी, ब्राम्हणशाहींने लादलेली गुलामगिरी आणि वर्चस्व यापासून मुक्ती मिळवलेली होती. त्यांचे किड्यांमुंग्या सारखे घाणेरडे जगने तरी संपुष्टात आले होते. विशेषतः राज्यकर्ता वर्ग आणि त्यांच्या इस्लाम धर्माशी "आयडेंटीटी" ही गोष्टच, या धर्मांतरीत जाती जमातींना, महत्वाची होती. त्यामुळे इथल्या नेटीव्ह मुसलमानांनी, मध्ययुगातील सत्ताधारी मुसलीम राज्यकर्ते व त्यांचे धर्मगुरू यांनी आणि नंतर ब्रिटीश काळातील मुसलीमांचे वरिष्ठवर्गीय अभिजन यांनी प्रसारीत केलेले भ्रम (मिथ्स) जसेच्या तसे स्विकारले. या गोष्टीचा डॉ. आंबेडकरापासून ते शहा–दलवाई–कुरूंदकर पर्यंतच्या सर्वांनाच विसर पडलेला दिसून येतो.

मुस्लीमामध्ये समाजसुधारणेच्या चळवळी नाहीत, म्हणून टीका करणाऱ्यांना आणखीन एका महत्वाच्या गोष्टीचा विसर पडलेला आहे. भारतात ब्रिटीशांच्या आगमनानंतर राजाराम मोहन रॉय यांच्यापासून धर्म सुधारणा, समाज सुधारणा, स्त्री सुधारणा, अस्पृश्यता सुधारणा इत्यादी चळवळी सुरू झाल्या. कारण हिन्दू समाजातील मागासलेपणा, स्त्रिया आणि अस्पृश्य जमातीवरील अत्याचार आणि जातीयता वगैरे गोष्टी हिंदू धर्मशास्त्रामुळे निर्माण झालेल्या होत्या. जातीयता व त्यामधील उच्चनीच भाव, अस्पृश्यता, धर्म शास्त्रावर आधारीत होती. स्त्रियांच्या बाबतीत सती प्रथा, विधवा केशवपन, विधवा पुनर्विवाह बंदी, स्त्रियांना वारसा हक्क, शिक्षण व धर्माचे हक्क, धर्मशास्त्राने नाकारले होते. अस्पृश्य जमातींना शिक्षण व धार्मिक हक्कांची बंदी, मंदीर प्रवेश बंदी, देवपूजा बंदी, ही धर्मशास्त्रावर आधारीत होती आणि हिंदू समाजरचनेचा एक भाग होती. अस्पृश्य जाती जमातींना पिण्याचे पाणी तोडण्या पर्यंत हिंदूची समाजरचना अन्यायकारक झालेली होती.

या पैकी कोणतीच गोष्ट इस्लाममध्ये आणि इस्लाम प्रणीत समाजरचनेत नाही आणि नव्हती. वरील एकेक घेवू. स्त्रियांच्या बाबतीत इस्लामनेच तत्कालीन जगात पहिल्या प्रथम, स्त्रियांना कौटुंबिक, वारसा हक्क, धार्मिक हक्क, स्वायत्त अस्तित्व, आर्थिक संरक्षण दिलेले होते. इस्लामने मुस्लिम स्त्रियांना लग्न आणि घटस्फोटाचेही हक्क दिले होते. संमती वयाची, अटही घातली होती. इस्लाममध्ये पुनर्विवाह आणि विधवा विवाह हे धर्ममान्य व समाजमान्य होते. इस्लामने योनीशुचितेची कल्पना नाकारली होती. स्त्रियांना शिक्षणाचेही हक्क दिले होते. त्यामुळे भारतात आणि भारताबाहेर मध्ययुगात देखील वरिष्ठ वर्गात शिक्षित मुस्लिम स्त्रिया दिसून येतात. भारतातील धर्मांतरीत मुसलमान मागासलेले आणि दरिद्री असल्याने मुस्लिम समाजात स्त्री–पुरूष निरक्षरता होती व आहे. हे धर्मामुळे नाही. तसेच मध्ययुगात मुस्लिम स्त्रियांना भरपूर आर्थिक संरक्षण व स्वायत्तता होती आणि सर्वच पुनर्विवाहाची प्रथा सर्रास होती. त्यामुळे तोंडी तलाकमुळे सामाजिक प्रश्न निर्माण झालेले

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

नव्हते. तसेच, बहुपत्नीत्व सर्वांमध्येच होते. १९ व्या शतकात मुसलमानाचे वाढते दारिद्रय, स्त्रियांचा परावलंबीपणा या गोष्टी वाढत गेल्या व त्याच बरोबर २० व्या शतकात व्यक्ती आणि स्त्री स्वातंत्र्याचे विचार मांडले जावू लागले. त्यातून तलाक आणि बहुपत्नीत्व हे सामाजिक प्रश्न म्हणून पुढे आले. या गोष्टीचा विसर सर्वांनाच पडलेला आहे.

भारतातील बहुसंख्य धर्मांतरीत मुसलमान हे मागासजाती जमातीमधील असल्याने आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक दृष्टया मागासलेलेच राहिले. म्हणून मुसलमानातील मागासलेपणा, अज्ञान व दारिद्रय इस्लामप्रणीत म्हणता येत नाही. आपण सत्ताधारी वर्गाचं आहोत आणि जगात सर्वश्रेष्ठ असलेल्या इस्लाम धर्माचे आहोत. या 'मिथ' मध्ये वावरणाऱ्या, भारतातील मुसलमानांना फाळणी नंतरच्या काळात विषमता आणि मागासलेपणा यांचे चटके बसू लागले. इस्लाममध्ये जाती व्यवस्था नाही. परंतु भारतातील धर्मांतरीत मुसलमाना मध्ये त्यांच्या पूर्वाश्रमीच्या जाती व्यवस्थेचे गुणधर्म आणि पीळ नष्ट होवू शकले नाहीत. त्याचे परिणाम बेटीबंदी मध्ये झालेले दिसतात. तसेच मुस्लिमातील वेगवेगळे व्यवसाय करणाऱ्या व्यावसायिक समूहाचे रूपांतर जातीमध्ये होत गेल्याचे दिसून येते आणि हे सर्व दोष, उणीवा आणि समस्या या दोन तीन दशकातच जाणवू लागतात. म्हणून यासंबंधीच्या सामाजिक चळवळी विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातच सुरू झालेल्या आहेत. मुस्लिम समाज सुधारणेचा विचार करणाऱ्यांनी या सर्व घटकांचा आणि प्रक्रियांचा फारसा विचार केलेला आहे, असे दिसत नाही.

याचा अर्थ भारताबाहेरील आणि भारतातील मुस्लिम समाजात प्रबोधनाच्या आणि समाजसुधारणेच्या चळवळी किंवा विचार निर्माण झालेच नाहीत, असा होत नाही किंवा इस्लामी समाज व्यवस्थेत सर्व काही ठीक होते. असाही त्याचा अर्थ होत नाही. युरोपातीलच प्रबोधन चळवळ आणि ब्रिटीशांच्या आगमनानंतर भारतात सुरू झालेल्या सामाजिक सुधारणा आणि प्रबोधनाच्या चळवळी आणि इसलामी जगतातील प्रबोधन विचार आणि सुधारणा यांचे स्वरूपच भिन्न आहे. त्या दोन्हीतील "सादृश्यता" शोधण्याच्या अभ्यासकांच्या प्रयत्नामुळे, घोटाळे वाढलेले आहेत. भारताबाहेरच्या इस्लामी समाजात, इस्लामच्या उदयानंतर दुसऱ्या शतकापासूनच धार्मिक, आध्यात्मिक तणाव निर्माण झाले. इस्लामला मुस्लिम सत्ताधाऱ्यांनी 'राजधर्माचे' स्वरूप दिल्याने इस्लाममध्ये अभिनिवेष आणि पोथीनिष्ठता यांचा उदय झाला. राज्यसत्ता आणि धर्मसत्ता यांची युती होऊन, राज्यकर्ते आणि उलेमा यांनी समाजावर आपले वर्चस्व बसविले. कुराण आणि इस्लामी धर्मशास्त्र हे त्यांच्या हातातील खेळणे बनले. या अतिरेकाविरूद्ध लढा देण्यासाठी अनेक व्यक्तिगत स्वरूपाच्या आणि सामुदायिक स्वरूपाच्या चळवळी झाल्या. त्यापैकी प्रारंभीची "मौतज़ला चळवळ" ही वैशिष्टयपूर्ण आहे. मोतजला परंपरेतील इस्लामी पंडितांनी बुद्धीवादाचा आणि वैज्ञानिक पद्धतीचा पुरस्कार केला. पुढे ग्रीक शास्त्रे आणि ग्रीकाचा बुद्धीवाद यांचा वापर करता करता संपूर्ण इस्लाम तत्त्वज्ञान हे ग्रीकांच्या "हेलेनिक" विचारात बसविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्यामुळे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

श्रद्धावादी आणि पोथिनिष्ठांना त्यांचा पाडाव करणे शक्य झाले. सुफी संतांची चळवळ ही पहिल्या पासून राज्यसत्ता आणि धर्मसत्ता यांच्या अनर्थकारक युती विरुद्ध होती. सूफीने, अुलेमा आणि त्यांच्या पोथेनिष्ठतेविरुद्ध लढा देऊन, इस्लामची समता आणि बंधुत्वाची विचारप्रणाली, साधेपणा व मानवतावाद, लोकप्रिय करण्याचे प्रयत्न केले. इस्लामच्या प्रेम आणि बंधुत्ववादाची मशाल घेवून आणि सर्वधर्मसमभावाचा विचार घेवून हे सर्व सूफी इराण पासून ते इंडोनिशिया पर्यंत पसरले. त्यांनी इस्लामी समाजातील वंशवाद आणि गुलामगिरीला विरोध केला. राज्यसत्तेने धर्माचे केलेले विकृतीकरण थांबविण्याचा प्रयत्न केला. त्यामुळेच सुफीचा छळ झाला व त्यांना देशांतरे करावी लागली. अर्थात यापैकी कांही सुफी पोथीनिष्ठतेचाही विचार मांडत होते. मोतजला चळवळ आणि सूफीची चळवळ या तत्कालीन समाजातील सुधारणेच्या चळवळी होत्या. इस्लामच्या उदयानंतरच्या दुसऱ्या शतकापासून ते नवव्या शतकापर्यंतच्या सुधारणांचा चळवळी या, धर्मांचे कर्मठ प्रतिपादन, धर्मगुरूंनी निर्माण केलेली पोथीनिष्ठता आणि राज्यसत्तेने इस्लामला 'राजधर्म' बनवून त्यात आणलेला एकांगीपणा आणि राजे, सत्ताधारी वर्ग यांनी सर्वसामान्य मुसलमानावर लादलेली गुलामगिरी यांचेविरुद्ध चळवळी करून शिक्षण, विज्ञान आणि धर्मशास्त्र यांचा समन्वय साधण्याचे केलेले प्रयत्न याबद्दलच्या होत्या. त्यापैकी काहींनी मूळ इस्लामी परंपराकडे जाणारा "शुद्धीकरणवादही मांडलेला होता. अगदी तिसऱ्या शतकापासून अनेक इस्लामी पंडितांनी धर्मशास्त्रातील पोथीनिष्ठता यावर टिका करणारे तसेच राज्यकर्ते आणि त्यांचे धर्मगुरू यांनी घुसडलेले लिखाणावर टिका करणारे आणि कुराणच्या कालसापेक्ष अन्वय लावण्याच्या पद्धती विषद करणारे अनेक, ग्रंथ लिहीले आहेत. त्यासंबंधी चळवळी उभ्या केल्या आहेत. इस्लामी जगतातील या चळवळी सुधारणेच्याच चळवळी होत्या. परंतु पूर्वग्रह दोष आणि अपूर्ण माहिती यामुळे अभ्यासकांनी या सर्व घडामोडींची उपेक्षा केलेली दिसते.

एका लहानशा लेखात भारताबाहेरील व भारतातील सर्व सुधारणांच्या चळवळींचा सविस्तर आढावा घेणे अशक्य आहे. परंतु सारांश रूपाने कांही गोष्टींचा उल्लेख करता येईल. वास्तविक जमालोद्दीन अफगाणी सारख्या पोथीनिष्ठ विचारवंताला विरोध करून १८७६ पासून इजिप्तमध्ये महमद अब्दुल या पंडितांने 'अल अझहर' विद्यापीठात आधुनिक वैज्ञानिक शिक्षण दिले जावे याचा पुरस्कार केला तो आणि त्याचा शिष्य रशिद रिदा यांनी इस्लामच्या कालसापेक्ष अन्वयाचा सिद्धांता मांडला. 'इज्तिहाद' चे समर्थन केले. मध्ययुगीन धर्मशास्त्रात अडकलेल्या शिक्षण पद्धतीत आधुनिकता आणण्याची चळवळ सुरू केली. वहाबी चळवळी बद्दल खूप उलटसुलट लिहिले गेले आहे. परंतु वहाबी चळवळीला आपल्या परीने एक प्रकारचे सुधारणावादाचे देखील अंग होते. ते म्हणजे वहाबींनी मध्य युगातील आणि तत्कालीन इस्लाम मधील प्रक्षिप्त भाग काढून टाकून मूळ इस्लामच्या मूळ प्रेरणांचे प्रतिपादन करणारा विचार मांडलेला होता. तो सर्वच कांही कर्मठवाद नव्हता. त्याचप्रमाणे त्या काळातील 'मनार' परंपरेतल्या अभ्यासकांनी, इस्लामच्या नितीतत्त्वांना तत्कालीन

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

समाजातील सामाजिक मूल्यांच्या आधारे सादर करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. इजिप्त मध्ये १९२५ मध्ये शेख अली अब्द अर्रज्जाक या धर्म पंडितांने आपल्या ग्रंथातून, खिलापत बरखास्त करण्याचा विचार मांडला आणि धार्मिक व नागरी कायद्यांचे विभाजन केले जावे, असा विचार मांडल्यामुळे त्याला अल अझहर विद्यापिठातून काढून टाकण्यात आले. १९३० मध्ये महंमद अबुझैद याने कुराणभाष्य लिहून, जुनी कुराण भाष्ये चुकीची कशी आहेत, यासंबंधी लिहिले. त्याचा ग्रंथ जप्त करण्यात आला, अशी अनेक उदाहरणे देता येतील.

भारतात देखील ब्रिटीशांच्या आगमनानंतर अनेक सुधारणावादाचे विचार मांडले गेले. वास्तविक देवबंद पीठाची स्थापना; इस्लाम मधील प्रक्षिप्त भाग काढून टाकून मूळ प्रेरणांचा शोध घेण्यासाठी केली गेली होती. ती एक प्रकारे सुधारणेची चळवळ होती. मौलाना शिबली नुमानी यांनी लखनऊला दुसऱ्या धर्मपीठाची स्थापना करून भारतीय इस्लाममध्ये साहित्यीक व ऐतिहासिक टिकात्मक पद्धती आणण्याचे प्रयत्न केले, इस्लामी विचारशास्त्रांच्या आधारे आधुनिक तत्त्वज्ञानातील कूट प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न केले. वास्तविक सर सय्यद अहमद हे प्रवृत्तीने सुधारक होते. त्यांनी आपल्या कार्याची सुरूवात शैक्षणिक आणि सामाजिक सुधारणनांनी केलेली होती. त्यांनी आपल्या लिखाणातून धर्मशास्त्राच्या संदर्भात विज्ञाननिष्ठ बुद्धीवादाचा पुरस्कार केला होता. त्यानी सुचविलेल्या अनेक सामाजिक सुधारणामुळे तत्कालीन मुल्ला मौलवींनी त्यांचे विरूद्ध फतवे काढलेले होते. परंतु त्यांच्या राजकारणामुळे त्यांची समाजसुधारणेची चळवळ पूर्णपणे विफल झाली. पाटण्याचे नबाब पितापुत्र, नबाब खुदाबक्ष हे फार मोठे पंडित आणि सुधारक होते आणि इस्लामचे गाढे अभ्यासक होते. नबाब खुदाबक्ष यांनी इस्लामी कायद्यांची केलेली चिकित्सा इतकी जहाल आणि परखड आहे की त्यापुढे ''शिवराळ'' हमीद दलवाई सारखी, मंडळी देखील मवाळ वाटतात. मौलाना आझादांनी तर इस्लामचे संपूर्ण धर्मशास्त्रच क्रांतिकारक पद्धतीने मांडले. भारतातील ''कदियानी'' आणि ''अहमदिया'' चळवळ ही विलक्षण क्रांतीकारक धर्म सुधारणेची चळवळ होती. त्यांनी इस्लाममधील पोथीनिष्ठतेवर कडाडून हल्ला चढविला. इस्लामची सर्व तत्त्वे आणि सूत्रे यांची कालसापेक्ष मांडणी केली. त्यांनी इस्लामचे विकृतीकरण करणाऱ्या पाश्चात्य टिकाकाराविरूद्ध जोरदार वैचारीक लढा उभा केला. मौलाना महमदअली (लाहोरी) यांचा ''रिलिजन ऑफ इस्लाम'' हा ग्रंथ इस्लामची कालसापेक्ष मांडणी करणारा ग्रंथ आहे. त्यांचे ''कुराण भाष्य'' आजदेखील क्रांतीकारक मानले जाते.

भारतात, स्वातंत्र्यानंतर आर्थिक, शैक्षणिक आणि सामाजिक परिवर्तन सुरू झाले आणि या परिवर्तनाच्या विचारामुळे न्याय आणि स्वातंत्र्याची मूल्ये मांडली जावू लागली. आंबेडकरवादी झंझावाताने हिंदू समाज रचनेवर घणाघाती हल्ले चढविले. त्यामुळे भारतात सर्वच जातीजमातीत सुधारणेचे आणि परिवर्तनाचे विचार मांडले जावू लागले. महाराष्ट्रात मुस्लिम सत्यशोधक चळवळीच्या रूपाने, हिन्दू समाज सुधारणेचे प्रतिबींब असणारी मुस्लिम

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

समाजसुधारणेची चळवळ उभी करण्याचा प्रयत्न हमीद दलवाई व त्यांच्या अनुयायांनी केला. तसेच केरळात कांही पुरोगामी मुस्लिम कायदेपंडितांच्या चळवळी आणि गोव्यात, "आम्हाला स्वतंत्र्य व्यक्तीगत कायदा नको" म्हणून केलेली चळवळ यांचा अपवाद सोडल्यास, बाकीच्या राज्यात संघटीतरित्या सुधारणा चळवळ निर्माण झाल्याचे दिसत नाही. महाराष्ट्रातील हमीद दलवाईची मुस्लीम सत्यशोधक चळवळ आणि असगरअली इंजिनियर आणि नुमानभाई कॉन्ट्रॅक्टर यांची दाऊदी बोहरा सुधारणा चळवळ या दोन प्रमुख चळवळी उदयास आलेल्या दिसून येतात. परंतु सुधारणा आणि परिवर्तनाचे विचार मांडणारे अनेक विचारवंत स्वातंत्र्योत्तर काळात भारतात उदयास आले. वास्तविक अशा विचारवंतांची संख्या फार मोठी आहे आणि त्यांचे लिखाण क्रांतीकारक स्वरूपाचे आहे. परंतु भारतातील ब्राम्हणी इतिहासकार आणि तथाकथित पुरोगामी विचारवंत आणि बेगडी सेक्युलरवादी लेखक यांनी त्यांची दखल घेतलेली नाही. महाराष्ट्रात ए.ए.ए. फैझी, एम.आर.ए. बेग, असगर अली इंजिनियर, डॉ. मोईन शाकीर, डॉ. रफीक झकेरीया या सारखे सुधारणावादी विचारवंत दिसतात. अखिल भारतीय पातळीवर डॉ. झाकीर हुसेन, डॉ. अबिदअली, प्रा. हुमायून कबीर, डॉ. अलम खुंदमिरी, इरफान हबीब, डॉ. जमाल ख्वाजा, ताहीर महमूद, इम्तियाज अहमद, डॉ. मुशीरूल हसन यासारखे अनेक पुरोगामी विचारवंत लिहित आणि बोलत आहेत.

महाराष्ट्रातील मुस्लिम समाजात अशा समाज सुधारणाच्या चळवळी निर्माण होण्याला कारण म्हणजे, महाराष्ट्रात कै. महात्मा फुले, धोंडो केशव कर्वे, कर्मवीर भाऊराव पाटील, विठ्ठल रामजी शिंदे, लोकहितवादी व आगरकर, छत्रपती शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर इत्यादी थोर समाज सुधारकांनी प्रबोधनाचे आणि आत्म चिकित्सेचे वातावरण निर्माण केलेले होते. हिंदूच्या सामाजिक सुधारणेची पडसाद येथील मुस्लीमात निर्माण होते. त्याला आणखी एक कारण म्हणजे, मराठी मुसलमानाचे वेगळेपण व त्यांची महाराष्ट्राच्या भूमीशी निर्माण झालेली समरसता होय. मध्ययुगातला बाबा शेख महंमद सारखा संत कवी किंवा आधुनिक कवी फ. म. शहाजिंदे यांचे साहित्य जरी घेतले तरी त्यांची प्रचिती येते अशी अनेक उदाहरणे देता येणे शक्य आहे. तसेच महाराष्ट्रात उत्तर भारताप्रमाणे कडवा मुसलमानी समाज नाही. तो इथल्या भूमीशी व मराठमोळ्या संस्कृतीशी इतका रूळलेला आहे की, त्याचे वेगवळेपण भारतात उठून दिसते म्हणूनच कै. प्रा. धनंजयराव गाडगीळ यांनी म्हटले आहे की, महाराष्ट्रातील धर्माने वेगळ्या असलेल्यांचा सर्वांत मोठा गट मुसलमानांचा आहे. ते ज्या ज्या थरांत वावरतात, त्या त्या मराठी समाजातल्या थराहून धर्माशिवाय कोणते भिन्नत्व मराठी मुसलमानांच्या बाबतीत दाखविता येणार नाही.

या मराठी मुसलमानांच्या वेगळेपणाला काही कारणे होती. महाराष्ट्रात मराठेशाहीच्या काळानंतर मुस्लिम राज्यकर्ते, मुस्लिम सरंजामदार (निजाम व त्यांच्या अधिपत्याखालील मराठवाड्याचा अपवाद सोडून) नसल्याने उलेमांना (इस्लाम धर्मगुरू) राजाश्रय मिळू शकला नाही. म्हणून उत्तर भारताप्रमाणे पुनरूज्जीवनवादी व मूलभूत वादाकडे जाणाऱ्या चळवळीही

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

निर्माण झाल्या नाहीत. उलट समन्वयवादी सूफी संतांचा लोंढा, हैद्राबाद, गुलबर्गा, औरंगाबाद ते मुंबई या परिसरात मध्ययुगातच आला व स्थिरावला. सुफी–संतांनी, इस्लाममध्ये, समन्वयवाद व अद्वैत विचारसरणीची भर टाकली आणि मूळ पैगंबरप्रणित सहिष्णूता आणि सहकार्य या विचारावर भर दिला. महाराष्ट्रात मुस्लिम राज्यकर्तेच न राहिल्यामुळे वरिष्ठ वर्गीय अशरफ मुस्लिमांचा त्यांची उर्दू भाषा व मदरसा शिक्षण पद्धती यांचा अभाव निर्माण झाला. त्यामुळे विचार मंथनाला अनुकूल वातावरण निर्माण झाले होते. म्हणूनच महाराष्ट्रात मुस्लिम समाजात सुधारणेच्या चळवळी आणि नवविचाराचे प्रवाह निर्माण झाले.

मुस्लिम समाज सुधारणेच्या चळवळीच्या संदर्भात मुस्लिम प्रबोधन समस्येचे एकूण ४ प्रमुख घटक दिसून येतात.

(१) इस्लाममध्ये निर्माण झालेली पोथी निष्ठता व बंदिस्तपणा दूर करून इस्लामचे उदारमतवादी (बुद्धीवादी) परिवर्तन करणे.

(२) मुस्लिम समाजात आधुनिक, बुद्धीवादी सेक्युलर दृष्टीकोन रूजविणे.

(३) मुस्लिम स्त्रियांचे प्रश्न व सुधारणा त्यांच्यासाठी आधुनिक शिक्षण पद्धतीचा प्रसार करणे.

(४) भारतातील हिंदू–मुस्लिम संबंध सुधारण्याची आवश्यकता.

या समस्या सोडविण्याच्या मार्गातील कांही प्रमुख अडथळे पुढील प्रमाणे आहेत.

(१) इस्लामची काही धार्मिक – अधिभौतिक सूत्रे :

या सुत्रांचा मुस्लिम मुल्ला मौलवींनी एकांगी व संकुचित अर्थ लावून आत्मपरिक्षणाच्या वाटा बंद केल्या आहेत.

(अ) कुराणप्रामाण्य (पोथीनिष्ठता) इस्लामच्या श्रद्धेत कुराण शरिफचे दैवी स्वरूप स्विकारणे, हे बंधनकारक आहे. धर्ममार्तंडांचे म्हणणे आहे की, अल्लाहने मानवाना वारंवार संदेश पाठवून सुधारण्याचा प्रयत्न केला. शेवटी कुराण शरिफ हे "पूर्ण" स्वरूपात मानवाच्या मार्गदर्शनासाठी पाठविले. कुराण शरिफच्या अवतरणानंतर तत्पूर्वीचे धर्मग्रंथ व ईश्वरी संदेश, आपोआपच रद्द होतात. कुराणात सर्व पूर्वीच्या धर्मग्रंथाचे सार असल्याने त्यांची गरज रहात नाही. कुराण "पूर्ण" स्वरूपात पाठविले गेल्याने, त्या मधील प्रत्येक शब्द अंतिम व चिरंतन स्वरूपाचा आहे.

मुल्ला–मौलवीचे हे प्रतिपादन चुकीचे आहे. कुराण शरिफ मध्ये पूर्वीचे ईश्वरी संदेश व धर्म रद्द झाल्याचे कोठेही म्हटलेले नाही. उलट "सुरे अलबकर" मध्ये ईश्वराने दुसऱ्या प्रेषितांना पाठविलेला धर्म व इस्लाम हे एकच असल्याचे व संदेश समान असल्याने, त्यांचेही पालन करण्याचा आदेश दिला आहे.

तसेच "मी सांगतो म्हणून विश्वास ठेवा" असे पोथिनिष्ठतेचे तत्त्व दर्शविणारे, विधान कोठेही नाही. उलट बुद्धीनिष्ठतेच्या व समजून घेण्याच्या प्रक्रियेला महत्व देण्यात आले आहे. कुराणाचा संदेश, "विचार करा म्हणजे तुम्हाला सृष्टीचे रहस्य उमगेल." असा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आहे. पैंगबर साहेबांनी हजरत मुआदना "स्वतःच्या बुद्धीचा वापर करून निर्णय घ्या" असा दिलेला आदेश इस्लामच्या परिवर्तनवादी भूमिकेचा आधार स्तंभ मानला गेला आहे.

ब) महंमद पैगंबराच्या अंतिम प्रेषित्वाचा सिद्धात (अडथळा) इस्लामच्या श्रद्धेत पैगंबर साहेबांचे "अंतिम प्रेषितत्व" हे महत्वाचे सूत्र आहे. पैगंबर साहेब हे अंतिम हे कोणत्या अर्थाने व कां, या बद्दलचे न संपणारे वाद आहेत. मुल्ला मोलवींना यांचा अर्थ "पैंगबर प्रमाणम" असा लावला आहे. पैगंबर साहेबांची परिस्थिती सापेक्ष निर्णय देण्याच्या पद्धतीकडे, धर्ममार्तंडांनी हेतुपरस्पर दुर्लक्ष करून पोथीनिष्ठता निर्माण केली.

"अंतिम प्रेषितत्वाची कल्पना" धार्मिक विचारांच्या उत्क्रांती–प्रक्रियेशी निगडीत आहे, असा सिद्धांत मौ. आझादानी आपल्या सुप्रसिद्ध ग्रंथ "तर्जुमा अलकुरान–भाग १ मध्ये मांडला आहे. मौ. आझादांनी, त्याबद्दल महत्वपूर्ण विवेचन केले आहे. त्यांनी म्हटल्याप्रमाणे संस्कृतीच्या प्राथमीक अवस्थेत मानवी बुद्धी अविकसित होती. परिणामी निसर्गपूजा, भीती, पंच महाभूतपूजा, या गोष्टी आल्या. हळुहळू उत्क्रांती व विकासवादाच्या तत्त्वानुसार प्रगत् बुद्धीगम्य अवस्थेत प्रत्यक्ष प्रेषित्वाची गरज उरली नाही. पुस्तक रूपाने ज्ञान शब्दांकीत करण्याचे तत्त्व, त्यांच्या दृष्टीने इस्लाममधील ही प्रक्रिया महत्वाची आहे आणि या प्रक्रियेतून शब्द प्रमाण्य व वचन प्रामाण्य निर्माण होत नाही.

(क) (अडथळा) ईश्वराने खास निवडलेले जमात (चोजन पिपल) वरील २ सुत्राच्या (अ व ब) आधारे, मुस्लिम जमातीच्या श्रेष्ठत्वाचा सिद्धांत, परंपरावादी धर्मपंडितांनी मांडला आहे. परंतु कुराणातील श्लोकावरून "मुस्लिम खास जमात" हा मुद्दा सिद्ध होत नाही. कुराणात अरबांचे प्रबोधन करण्यासाठी मार्गदर्शनासाठी पैगंबरांना पाठविले. कुराण पाठविले असे; प्रतिपादन आहे. अरबांना अल्लाहने संदेश देण्यासाठी निवडले याचा अर्थ ते खास जमात आहेत, असा होत नाही. तर उलट त्यांना ईश्वरी संदेशाची गरज भासू लागली एवढे ते अधःपतित झाले होते, असा होतो.

(२) (अडथळा) विस्तारवादाचे राजकीय तत्त्वज्ञान म्हणून इस्लामचा वापर : त्यांच्या बंदीस्तपणाला कारणीभूत :

खलिफा उमरच्या काळापासून अरबांच्या विस्तारवादी मोहिमा सुरू झाल्या. उम्मयाद व अब्बसिद राजघराण्यांच्या काळात साम्राज्यवादी धोरण स्विकारले गेले. मुळात इस्लाममध्ये नसलेली राजेशाही व सरंजामशाही निर्माण झाली. (अ. अली. इंजिनियर–इस्लामिक स्टेट) आणि इस्लाम "दरबारी" धर्म बनला. विस्तारवादाचे समर्थन करण्यासाठी इस्लामची विचारसरणी महत्वाची ठरली. सर्वसामान्य माणसाला लढव्याची चेतना देण्यासाठी अमूर्त तत्त्वाची नेहमीच गरज भासलेली इतिहासातून दिसते. सत्तेसाठी सर्वसामान्य माणसाने लढण्याची कल्पनाच त्या काळात नव्हती. परिणामी मुस्लिम राज्यकर्ते व धर्मपंडिताना हितसंबंध जपण्यासाठी राजेशाही, सरंजामशाही व पुरोहीत वर्गाने धर्म खास निवडलेली जमात चोजन पिपल व लास्ट रिलिजन संकल्पनांचा वापर केला आणि इस्लामला बंदिस्त करून टाकले.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

(३) (अडथळा) अतिरेकी बुद्धीवादाच्या वापराविरूद्ध–प्रतिक्रिया म्हणून बंदिस्तपणाचा पुरस्कार :

इस्लामच्या उदयानंतर ३०० वर्षानंतरच्या सुमारास इस्लामी पंडितांनी ग्रीकांच्या प्रभावासाठी बुद्धीवादाचा अतिरेकी व एकांगी वापर सर्वत्र करण्यास सुरूवात केली. बुद्धीवादाने भारले जाऊन "मोतजला" पंडितांनी इस्लामच्या प्रत्येक तत्त्व व सूत्रावर हल्ले चढविले. श्रद्धा अर्पण बुद्धीवाद याचा संघर्ष सुरू झाला. (प्रा. ए. जे. आरबेरी–रीझन ॲन्ड रेव्हूलेशन इन इस्लाम) ही मुस्लिम राजकीय विस्ताराची सुरूवात होती. अशा परिस्थितीत मोतजला पंडितांच्या बुद्धीवादामुळे, मुस्लीम समाजाला बांधून ठेवणाऱ्या धर्ममूल्यांना धोका आहे, या विचाराने व पोथीनिष्ठेला कायम ठेवण्यात त्यांचे हित असल्याने पुरोहित वर्ग आणि इस्लामी राजेशाहीने बुद्धीवाद आणि इस्लामच्या कालसापेक्ष विश्लेषणाला (इज्तिहाद) बंदी घातली आणि श्रद्धेच्या श्रेष्ठत्वाचा सिद्धांत मांडला. (अल गझली).

(४) पोथी निष्ठेचे आणखीन एक कारण म्हणजे प्रख्यात इस्लामी टीकाकार डॉ. आलम खुंदमिरी यांनी म्हटल्याप्रमाणे भारतात आलेले मुस्लीम राज्यकर्ते व त्यांचे धर्मपंडित इस्लामच्या वैचारिक अधोगतीच्या काळातले होते. भारतातल्या त्यांच्या आगमनाच्या सुमाराला इस्लामधील सृजनशीलता, मोकळेपणा आणि बुद्धीवादी परंपरा संपलेली होती. म्हणून भारतात इस्लामी पोथीनिष्ठता कायमच राहीली.

इस्लामच्या इतिहासातून एक गोष्ट स्पष्ट होते. ती म्हणजे इस्लाम मधून प्रथम पासून पोथीनिष्ठता नाही. इस्लामच्या निर्मितीच्या प्रेरणा, तो साक्षात्कारवादी धर्म असला तरी केवळ श्रद्धावादी नव्हता. इस्लामचा उदयच मुळी सामाजिक असंतोषातून, टोळी समाज व्यवस्थेच्या, अन्यायातून झालेला आहे. (अ.अली. इंजिनियर–इस्लामिक स्टेट ओरिजनस् ऑफ इस्लाम) इस्लामचा साक्षात्काराचा सिद्धांत, मानवी बुद्धीला, पार्थिवतेला आणि आदर्श मानवाच्या, संकल्पनेला महत्व देतो. (मौ. आझाद) इस्लाम पूर्वसंचिताच्या पाप पुण्याचा सिद्धांत नाकारतो. उलट माणसाच्या बुद्धीचा आणि श्रेष्ठत्वाचा सिद्धांत मांडतो. (मौ. अहमद अली–रिलीजन ऑफ इस्लाम) आणि "अल्लाह' रब", म्हणजे पूर्णत्वाकडे नेणारी शक्ती असे मानतो.

स्वत: पैगंबर साहेबांनी अनेक बिगर–इस्लामी व बाहेरील प्रथा स्विकारल्या होत्या. उदा. मेहेरची पद्धती, हम्मुराबीचे कायदे, कसासचे कायदे (.. रॉबर्टस–सोशल लॉज ऑफ दि कुराण) ज्यू परंपरांचा स्विकार उदा: ज्यू ख्रिश्चनांची उपवास पद्धती, बकरीद वगैरे (मौ. महमदअली) इस्लामचा काल–सापेक्ष अर्थ लावण्याचा पद्धतीमुळेच इस्लाममध्ये ४ प्रमुख इस्लामी कायद्याच्या शाखा व अनेक पंथ निर्माण झाले. पहिल्या ४ खलिफांनी शेकडो निर्णय इस्लामला ..ड घालून घेतले. (अ.अली. इंजिनिअर).

विशेषत: भारतात आलेल्या सुफी संतांनी पोथीनिष्ठतेविरूद्ध सदैव लढा दिला. सुफी संतांनी "वहदतुल वजूद" चा म्हणजे "अहम ब्रम्हास्मि" चा सिद्धांत मांडला. तसेच

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

"सल्ह कुल्ह" म्हणजे विश्व प्रेमाचा सिद्धांत मांडला. इस्लाममध्ये अद्वैतवादी विचार प्रणाली आणली. ही एक प्रकारची क्रांतीच होती. इस्लामी धर्मपंडित अब्बू हनीफा, इमाम शाफई, हंबल आणि मालिक या चार महापंडितांनी इज्तिहादच्या (धर्मग्रंथाचा कालसापेक्ष अर्थ लावण्याचे तत्त्व) मुक्त वापर केला. १३ व्या शतकालीन इब्ज-तिमिय्याने इज्तिहादचा पाठपुरावा करून, इस्लामी शरियत मध्ये अनेक बदल सुचविले, असा हा मुक्त परंपरांचा धर्म, इस्लामी राजेशाहीच्या काळात पोथीनिष्ठ बनला.

साकल्याने विचार केल्यास, मुस्लिम समाज सुधारणेच्या चळवळीचे ४ प्रमुख प्रवाह जाणवतात. (१) इस्लामचे शुद्धीकरण करून मूळ कुराण शरिफ प्रणीत समाजरचना आणण्याचा विचार मांडणारा उलेमा आणि तत्सम विचारवंतांचा प्रवाह-यांत पुनरुज्जीवनवादी आणि मूलभूतवादी असे दोन उपप्रवाह दिसतात. शेख अहमद सरहिंदी जमालुद्दीन अफगाणी पासून ते मौ. मौदुदी, खोमेनी पर्यंतच्या सर्वांचा समावेश होतो.

(२) पाश्चात्यांना उत्तर म्हणून इस्लामचा उदारमतवादी अर्थ लावण्याचा प्रयत्न करणारा प्रवाह हा प्रवाह मोठ्या प्रमाणावर समर्थनवादी बनला.

(३) उदारमतवादी हिन्दू यांच्या प्रभाव आणि उत्तेजनामुळे सुरू झालेल्या सत्यशोधक चळवळीचा प्रभाव :- यात सेक्यूलर जसे आहेत. तसेच शहा-कुरुंदकर सारख्यांची विचार प्रणाली स्वतःला सेक्यूलरवादी म्हणवित असली तरी हिंदूत्ववादाशी जवळीक साधणारी आणि परिणामी मुस्लिम प्रबोधनाच्या चळवळीवर परिणाम घडविणारी होती.

(४) असगरअलींची धर्मगुरूंच्या हुकूमशाही विरुद्धची चळवळ आणि इस्लामच्या कालसापेक्ष मांडणीची इज्तिहादची चळवळ यात असगरअली हे, इस्लामचे पाश्चात्य टिकाकार (ओरिएंटॅलिस्ट) आणि भारतीय टीकाकार आणि इस्लामचे समर्थनवादी अभ्यासक या दोन्ही गटापेक्षा भिन्न असणारी परंतु इस्लामच्या मूळ प्रेरणांचा शोध घेवून कालसापेक्ष मांडणी करणारी चिकित्सा करताना दिसतात.

या सर्व पार्श्वभूमिवर १९६७ नंतर महाराष्ट्रात निर्माण झालेली हमीद दलवाईंनी चालविलेली मुस्लिम समाज सुधारणेची चळवळ ही अनेक अर्थाने वैशिष्ट्यपूर्ण होती. ही प्रबोधनाची चळवळ सुरू करणारे हमीद दलवाई हे पत्रकारितेच्या व्यवसायातील होते. महाराष्ट्रातील प्रख्यात लेखक "पत्रकार" प्र. के. अत्रे यांच्या "मराठा" दैनिकात कामाला होते. हमीद दलवाई हे कोकणी मुसलमान होते. त्यांचे शिक्षण परंपरागत इस्लामी पद्धतीने न होता, मराठीतून आलेले होते. समाज सुधारणेच्या चळवळीचे नेतृत्व करण्याच्या थोडे आधी मराठीतील नवोदीत कथाकार म्हणून नाव मिळविले होते. त्यांची "इंधन" ही कोकणाच्या पार्श्वभूमीवर लिहीलेली कादंबरी गाजली होती. महाराष्ट्रातील राष्ट्रवादी चळवळीचा प्रजा समाज वादी पक्षाचा व महाराष्ट्रातील प्रबोधनाच्या विचारांचा प्रभाव त्याच्यावर पडला होता. त्यांनी स्थापन केलेले "मुस्लिम सत्यशोधक मंडळ" या नावावरूनच सत्यशोधक चळवळीचा प्रभाव स्पष्टपणे दिसतो. आता पर्यंतच्या सर्व समाज सुधारकापेक्षा त्यांचे स्वरूप वेगळे होते.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

इस्लामचा गाढा अभ्यास वगैरे नसलेले, परंतु राष्ट्रवादी आणि मानवतावादी भूमिकेतून विचार मांडणारे ते सुधारक होते. त्यांना उर्दू, अरबी किंवा फारसी या भाषांचा परिचय नव्हता. आणखी महत्वाचे म्हणजे दलवाईंची भूमिका पुनरूज्जीवनावादी किंवा समर्थनवादी नव्हती. कालसापेक्षतेच्या तत्त्वानुसार इस्लाममधील स्त्री विषयक कायदे, विवाह, घटस्फोट आदि नियम, प्रेषितत्वाची मूलभूत सुत्रे आणि पोथीनिष्ठता यांना त्यांचा विरोध होता. हे घटक काढून टाकले पाहिजेत, अशी त्यांची भूमिका होती. हमीद दलवाईंनी १९६९ मध्ये निर्माण झालेल्या जातीय दंगलीच्या लाटेच्या पार्श्वभूमिवर हिन्दू मुस्लीम दंगली विरूद्ध उपाय म्हणून आपले प्रबोधनाबद्दलचे विचार मांडण्यास सुरूवात केली होती. आपल्या चळवळीतून त्यांनी प्रामुख्याने. ५ गोष्टीवर भर दिला. (१) हिन्दू मुस्लीम संबंध सुधारणा (२) स्त्री सुधारणा तोंडी तलाक आणि बहुपत्नीत्वाविरूद्ध चळवळ (३) नागरी कायद्याचा आग्रह (४) मुल्ला मौलवीचे उच्चाटन करण्याचा विचार (५) उर्दू ऐवजी प्रादेषिक भाषेचा आग्रह आणि मुस्लिमात राष्ट्रवादाचा प्रसार हे विचार मांडण्यासाठी दलवाईंनी मोठ्या प्रमाणावर महाराष्ट्र भर झंझावती दौरे सुरू केले. दलावाई अत्रे शैलीने आणि त्यांच्या स्वतःच्या जहाल टीकात्मक शैलीने भाषणे देत गेले. त्यांच्या झंझावती भाषणांनी महाराष्ट्रात नव्हे तर भारतात खळबळ उडून गेली. त्यांच्या जहाल भाषा शैलीने अखिल भारतीय पातळीवर रूढीवादी मुसलमानांना जबरदस्त धक्के दिले.

परंतु महाराष्ट्रात सुरूवातीला म्हटल्याप्रमाणे अनूकुल वातावरण असून देखील दलवाईंच्या चळवळीला प्रचंड विरोध आला. आपणास सनातन मुस्लिम गटाकडून विरोध होतो आहे. हे पाहून त्यांनी प्रतिक्रिया म्हणून मुल्ला मौलव्वीवर आणखीन जादा घणाघाती हल्ले चढविण्यास सुरूवात केली. हमिद दलवाईंनी इस्लाम आणि मुल्ला मौलवीवर हल्ले चढविताना प्रा. राम गोपाल, डॉ. मुजमदार, डॉ. करंदीकर व प्रा. अ. भि. शहा आदिंनी उत्तर भारतातील जातीयवादी मुस्लीमांच्या संघटनांच्या संबंधाने जी मुस्लिम प्रतिगामीत्वाची सुत्रे मांडली होती त्यांचाच आधार घेतला.

महाराष्ट्रात जर मालेगांव, औरंगाबाद सारखी कांही शहरे सोडली तर महाराष्ट्रातील आणि उत्तर भारतातील मुस्लिम समाजामध्ये खूप फरक आहे. मराठी मुसलमान इथल्या मातीशी एकरूप आलेला दिसतो. ८०% मुसलमानांना उर्दूचा गंधही नव्हता आणि नाही. इथे अशरफ वर्गाचे राजकारणही नाही. उत्तर भारताच्या प्रमाणात धार्मिकताही नाही. याचा विचार दलवाई व त्यांच्या सत्यशोधक चळवळीने न करता, त्यांनी वापरलेल्या जहाल व अविवेकी भाषेमुळे व चूकीच्या गृहित तत्वामुळे, महाराष्ट्रात विरोधाची प्रतिक्रिया निर्माण झाली. त्या बरोबर सत्यशोधक चहवळीने मुस्लिमांच्या प्रतिगामीत्वाबद्दल ओरड सुरू केली आणि त्याच प्रमाणात मुस्लिमांनी देखील सत्यशोधक चळवळीला "इस्लाम विरोधी" म्हणून बाद केले.

दलावाईनी प्रबोधनाच्या व सुधारणेच्या नावाखाली मांडलेली सुत्रे एकांगी व अतिरेकी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

स्वरूपाची होती. इस्लामच्या कालसापेक्ष अर्थ लावून मुस्लिम धर्म पंडितांनी चुकीचा अर्थ लावून घुसडलेले व पोथीनिष्ठता निर्माण करणारे प्रक्षिप्त भाग काढून टाकायचे का इस्लामचे स्वरूप बदलावयाचे यांचा विचार त्यांनी केला नाही. धर्मपंडितांनी लादलेला चुकीचा अर्थ खोडायचा का इस्लामच नाकारायचा याचे आकलन त्यांना नव्हते. प्रबोधनाचा व बुद्धीवादाचा आधार म्हणून त्यांनी नास्तिकतेचा विचार मांडला. "धर्म मानवी समतेला विघातकच असतो" ही भूमिका घेतली. त्यांनी सुधारणेच्या नावाखाली इस्लामचे एकूण धर्मशास्त्र, अधिभौतिक सूत्रे नाकारून, धर्म सुधारणे ऐवजी इस्लामच नाकारण्याची भूमिका मांडली.

तसेच मुसलमानांच्या प्रत्यक्ष व्यवहारातील गैरवर्तनाला इस्लामलाच, जबाबदार धरले. उदा. बहुपत्नीत्व व तोंडी तलाख याबद्दलच्या अटी आणि व सद्या मुसलमान लावतात तो अर्थ यात फरक आहे. कुराणात याबद्दल महत्वाच्या अटी आहेत. मुसलमान व्यवहारात कुराणातील (शरियत मधील) अटींचे पालन कधीच करीत नाही. परंतु कुराणातील अपवादात्मक सवलतींचा गैरफायदा मात्र घेतात. परंतु दलवाई आणि त्यांच्या सत्य शोधक चळवळींनी ही बाब लक्षात न घेता, कुराणावरच हल्ला चढविला त्यामुळे त्यांच्या प्रबोधनाच्या चळवळीबद्दल गैरसमज पसरविणे मुस्लिम धर्मगुरूंना सहज शक्य झाले. हमीद दलवाई व सत्य शोधकांच्या प्रमुख चुका म्हणजे त्यांची भाषा जहाल व उपमर्दकारक होती. त्यांचा इस्लामच्या धर्मशास्त्र, इतिहास यांचा अजिबात अभ्यास नव्हता. उत्तर भारतातील समीकरणे इथे वापरली, व्यवहारातील गैर वर्तन म्हणजे इसलामी कायदा असा अर्थ लावला. महाराष्ट्रात उर्दूचा प्रश्न नसतांना त्याचे बुजगावणे उभे केले. अतिरेकी प्रतिपादनामुळे त्यांना आपल्या समाजाशी संवाद साधता आला नाही. परिणामी संघटना उभी करता आली नाही. उलट महाराष्ट्रात पूर्वी कधीही नव्हता एवढ्या मोठ्या प्रमाणावर उर्दूचा आणि पर्सनल लॉ चा आग्रह सुरु झाला. महाराष्ट्रात १९६६ नंतरच उर्दू शाळा व विद्यालये मोठ्या प्रमाणावर सुरू झाली. महाराष्ट्रात पुनरूज्जीवनवादी चळवळी देखील पूर्वी अगदी नगण्य होत्या. सत्यशोधक चळवळीनंतर त्यांनी जोर धरला. या प्रतिक्रियेने दलवाई जास्त एकांगी बनत गेले आणि मुस्लीम प्रतिगाम्यांचा जोर जास्त वाढत गेला असे हे दुष्ट चक्र सुरू झाले. एक गोष्ट मात्र चांगली घडली. मुस्लीम स्त्रीयांच्या प्रश्नाकडे व मुस्लिम समाजाच्या मुलभूत प्रश्नाकडे एक सामाजिक समस्या म्हणून पाहिले जावू लागले.

दलवाईंनी जातीय दंगलीच्या स्वरूपात हिंदु मुस्लिम प्रश्नांचा विचार केला. राष्ट्रीयत्वाचे प्रश्न उभे केले. राष्ट्रीयत्व, एकात्मता, सहिष्णूता आणि धार्मिक श्रद्धा यांच्यात विलक्षण गल्लत केली. दंगली बद्दल विश्लेषण करीत असताना मुस्लिमांचा "अल्पसंख्यांक" म्हणून असणारा "न्यूनगंड", असुरक्षतेची भावना, मुस्लिमांचा अडाणीपणा, हिन्दू जमातवाद्यांच्या खोड्या आणि दंगलींना असणारी आर्थिक असंतोषाची बाजू हे घटक कधीही लक्षात घेतले नाहीत. या दशकात काही विचारवंतांनी, दंगलीची आर्थिक मिमांसा, मोठ्या प्रमाणावर केली आहे. दलवाई धर्मावर टीका करण्यासाठी, कार्ल मार्क्सचे नाव सातत्याने घेत असत. परंतु

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

समाज सुधारणेच्या चळवळीची आर्थिक बाजू त्यांनी कधीही मान्य केली नाही. समाजवादी प्रभावामुळे मार्क्सप्रणित आर्थिक विचाराला त्यांचा विरोधच होता, परिणामी दलवाईंचे स्वरूप "मुस्लमानावर डागली जाणारी तोफ" एवढेच बनले दंगलींच्या त्यांच्या विश्लेषणामुळे तर सर्वसामान्य मुस्लमानात ते अत्यंत अप्रिय झाले. त्यामुळे मुस्लीम सनातनी धर्ममार्तंडांचे काम फारच सोपे झाले.

दलवाईंच्या ठिकाणी समाजसुधारकाला आवश्यक असणारा, धर्माचा सखोल अभ्यास नव्हता. प्रबोधनकाराला आवश्यक असणारी वैचारीक बैठक, सहिष्णूवृत्ती, मुलगामी विचारांची पद्धती आणि सर्वसामान्य मुस्लीम माणसाला समजून घेण्याची प्रवृत्ती नव्हती. त्यामुळे त्यांना व सत्यशोधक चळवळीला पिछेहाट स्विकारावी लागली. राजाराम मोहनरॉय पासून ते डॉ. आंबेडकरापर्यंत सर्वसुधारक, धर्माचे गाढे अभ्यासक होते. मूलभूत चिकित्सा करणारे होते, हे त्यांच्या बाबतीत घडले नाही. चळवळीला व्यापक पातळीवर अपयश आले तरी कोल्हापूर, पुणे व अमरावती सारख्या ठिकाणी कार्यकर्त्यांनी तलाकाचा प्रश्न व्यावहारीक पातळीवर हाताळून अन्यायाची प्रकरणे उघडीस आणून आपले अस्तित्व दाखविले आहे. एकूण मुस्लीम प्रबोधनाची चळवळ म्हणून सत्यशोधक चळवळीला अपयश आले, तरी तलाकच्या संदर्भात महत्वाची कामगिरी पार पाडली आहे.

गेल्या २० ते २५ वर्षांत भारताची जशी आर्थिक परिस्थिती खालावत गेली. त्या प्रमाणात मुस्लीम समाजाचे आर्थिक प्रश्न देखील कठीण होत गेले आहे. दंगलीच्या वाढत्या लाटा व आर्थिक अस्थिरता यामुळे मुस्लीम समाज गोंधळलेला होता. शिक्षण घेऊन बाहेर पडणाऱ्या मुस्लीम तरूणाला मिळणाऱ्या नौकऱ्यांची संधी व त्यांचे प्रमाण अत्यल्प होते. त्यातही महाराष्ट्रात हिन्दूत्वाचा विचार कमी होण्याऐवजी, वाढतच गेल्याचे दिसते. दलवाईंनी मांडलेली अतिरेकी भूमिका या हिन्दूत्ववाद्यांनी त्यांना सोईस्कर वाटल्याने उचलून धरल्याने इस्लामच्या कालसापेक्ष विश्लेषणाचीच भूमिका अनुकूल परिस्थिती असूनही मराठी मुस्लीम समाजात रूजू शकली नाही. सत्यशोधक चळवळीने मुसलीम स्त्रियांचे प्रश्न प्रकाशात आणले. मुल्ला मौलवींची कपट नीति उघडकीस आणली. परंतु बुद्धीवादाच्या नावाखाली "नास्तिकतेचा व धर्म कालबाह्य झाल्याचा" विचार मांडला गेल्याने त्या चळवळीला अत्यंत मर्यादीत प्रमाणात प्रतिसाद मिळाला.

महाराष्ट्रात उदय होऊन भारतभर पसरत चाललेली मुस्लीम सामाजिक सुधारणेची दुसरी चळवळ म्हणजे दाऊदी बोहरा जमातीने मुंबईला असलेल्या त्यांच्या धर्मगुरू सय्यदना मोहमंद बुऱ्हानुद्दीन म्हणजेच "मुल्लाजी साहेब" यांच्या धार्मिक हुकूमशाही विरूद्ध आणि या मुल्लाजी साहेबांच्या गैर कृत्याविरूद्ध सुरू असलेली चळवळ होय. १९७३ च्या सुमारास उदयपुरातील सुशिक्षीत दाऊदी बोहरा तरूणांनी या मुल्लाजी विरूद्ध बंडाचे निशाण उभारले. त्यांना मुंबई मधील सुधारणावादी बोहरा बुद्धिजीवी मंडळीनी साथ दिली. दाऊदी बोहरा समाजातील प्रसिद्ध लेखक पत्रकार आणि विचारवंत असगरअली इंजिनियर व त्यांना साथ

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

देणारे नुमानभाई कॉन्ट्रॅक्टर (हे अलीकडेच मृत्यू पावले) यांनी बोहरा सुधारणा चळवळ जोमाने उभी केली आहे. असगरअली हे मुंबई महापालिकेत खरोखरच इंजिनियर होते. त्यांचे शिक्षण उर्दू, अरबी, पारसी, इंग्रजीतून झालेले असून बोहरा मधील पुरोहीत वर्गामधून जन्म घेतल्याने त्यांना धर्माचे पारंपारिक पद्धतीने शिक्षण मिळालेले असून आपले म्हणणे सिद्ध करण्यासाठी ते कुराणातील दाखले व पैगंबर साहेबांची वचने अरबी भाषेतून सहजगत्या तोंडी देतात. इंजिनियरांच्या इस्लामचा अभ्यास गाढा असून इस्लामी धर्मशास्त्र "आधिभौतिक शास्त्र" इतिहास व "हदीस शास्त्र" यांचा गाढा व्यासंग आहे.

असगरअलींच्या चळवळीचे दुहेरी स्वरूप आहे. प्रथम ते दाऊदी बोहरा जमातीचे सदस्य म्हणून मुल्लाजींच्या पुरोहीतशाही विरूद्ध लढा देणाऱ्या चळवळीत भाग घेत असतात. दुसरे म्हणजे असगरअली हे यांनी केवळ दाऊदी बोहरा जमातीपुरतेच आपले कार्य मर्यादित ठेवले नाही तर ते बोहरा पंथाचे असले तरी पंथीय दृष्टीकोणानाच्या बाहेर जाऊन इस्लामचा काल सापेक्ष अर्थ लावण्याचा प्रयत्न करणारे इस्लामचे आधुनिकीकरण करण्याचा प्रयत्न करणारे भारतातील एक प्रमुख मुस्लीम विचारवंत आहेत.

दाऊदी बोहरांची सुधारणा चळवळ देखील तशी वैशिष्टयपूर्ण आहे. दाऊदी बोहरा सुधारकांचा लढा हा इस्लाम विरूद्ध किंवा इस्लामी धर्मशास्त्राच्या कालबाह्य प्रथा किंवा कायद्याविरूद्ध नाही तर दाऊदी बोहरा समाजाचे जे मुल्लाजी हे धर्मगुरू आहेत. त्यांनी बोहरा लोकावर धर्माच्या नावानी लादलेल्या प्रक्षिप्त चालीरिती गैर इस्लामी गैर प्रकारा–विरूद्ध आहे.

दाऊदी बोहरांचे हे मुल्लाजी मध्य युगातील रोमच्या पोपचे आधुनिक दाऊदी अवतार आहे. या मुल्लाजींच्या इजाजतीशिवाय विवाह, मुलांचा नामकरण विधी, साखरपुडा, मृत्यू विधी वगैरे काहीच होऊ शकत नाही. जीवनातल्या प्रत्येक गोष्टीला शाळेला घातल्यापासून ते दुकान लावण्यापर्यंत व सर्व सामाजिक विधींना त्यांची संमती लागते, या सर्व कारणाकरीता प्रत्येक दाऊदी बोहराला मुल्लाजींना "नजराना" लागतो. त्यामुळे हे मुल्लाजी करोडोपती असून मुंबईतील दाऊदी बोहरांच्या सर्व मिळकती पैकी ३/४ पेक्षा. त्यांचीच इस्टेट आहे. हे आर्थिक सत्तेचा वापर करून त्यांनी गुंड बाळगले आहेत. हुकूम मोडणाऱ्या बोहरांना ते शिक्षा देतात. त्यांच्या अनुमती वाचून कब्रस्थानात प्रेताला प्रवेश मिळत नाही. दफन विधी होऊ शकत नाही. ते दाऊदी सुधारकांराविरूद्ध व हुकूम मोडणाऱ्या विरूद्ध बहिष्काराचे शस्त्र वापरतात. ज्या गरीब दाऊदी बोहरांना "नजराना" देण्याची ताकत नाही, त्यांना शिक्षा करतात, विशेष म्हणजे धर्मनिरपेक्ष राज्य घटना असलेल्या समता व स्वातंत्र्याच्या हक्काचा पुरस्कार करणारे स्वतंत्र भारतात, दाऊदी बोहराच्या या गुलामगिरी विरूद्ध शासन काहीच कृती करू शकलेले नाही. दाऊदी बोहरा सुधारकारांनी मुल्लाजींच्या या पुरोहीतशाही विरूद्ध १९७३ पासून आंदोलने सुरू केली आहेत. जयपूर, हैद्राबाद, मुंबई व दिल्ली या शहरातून सुधारकांच्या जागतिक परिषदा आयोजित करणे, गुजराथी, हिन्दी,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

इंग्रजी व उर्दू भाषेतून सुधारणावादी विचारांचे प्रतिपादन करणे धर्मगुरूंचे गैरप्रकारांना वाचा फोडणे हे त्यांच्या चळवळीचे काही प्रमुख घटक आहेत. असगर अली इंजिनियर या निमित्ताने लोकमत जागृत करण्याचा प्रयत्न करीत असतात.

दाऊदी बोहरांच्या या चळवळीचे स्वरूप, इस्लाममधील काल सापेक्ष सुधारणेचे नाही तर दाऊदी बोहरा पंथात निर्माण झालेल्या धर्मगुरूंनी जमातीवर आपले वर्चस्व स्थापन केले आहे, त्या विरूद्ध ती चळवळ आहे. मुळात कुराण प्रणित व पैगंबर प्रणित इस्लाममध्ये कोणत्याही प्रकारे धर्मगुरूंची संकल्पना नाही. महंमद पैगंबरांनी ख्रिश्चन धर्माप्रमाणे पोप सारख्या प्रमुख धर्मगुरूंच्या संकल्पनेला आणि अधिकृत पुरोहित वर्गाला मान्यताच दिलेली नाही. इस्लाममध्ये धर्मगुरूंच्या माध्यमाचे तत्त्व अजिबात नाही. असे शिया पंथात व शियांच्या उपपंथात धर्मगुरूशाही निर्माण झाली आहे. एका दाऊदी बोहरातील मुल्लाजीचे हे पद पूर्णपणे गैर इस्लामी आहे. ते धर्मगुरू इस्लामाच्या नावाचा गैरवापर करून दाऊदी बोहरा नागरिकांकडून खंडणी वसूल करीत असतो. या संदर्भात बॅ. तारकुंडे यांचा चौकशीचा अहवाल किंवा नथवानी कमिशनचा अहवाल प्रसिद्ध होऊनही या मुल्लाजीकडून सत्ताधारी पक्षाला लाखो रूपये मिळत असल्याने कोणतेही कृती केली गेली नाही. मते गमविण्याच्या भितीने शासन व पक्ष मुल्लाजी विरूद्ध कृती करीत नाही, असे असगरअलींचे जाहीर प्रतिपादन आहे.

दाऊदी बोहरांच्या या चळवळीची शोकांतिका ही आहे की मतांच्या भितीने शासन काही कृती करीत नाही. त्याप्रमाणे सर्वसामान्य सुन्नी मुसलमान शिया पंथीयांच्या विरूद्ध असल्याने त्यांच्या चळवळीकडे लक्ष देत नाहीत. त्यातही महत्वाचे म्हणजे त्या मुल्लाजींनी पैशांचा वापर करून जमाते इस्लाम सारख्या कडव्या संघटना आपल्या हाताशी धरल्या आहेत. असगर अलींच्या प्रतिपादनानुसार जमाते इस्लामीचे अमीर व मुल्लाजींचे संबंध आहेत. सुधारकांनी जमाते इस्लामीच्या प्रमुख कार्यकर्त्यांची अनेक वेळा भेट घेवून देखील त्यांना पाठिंबा मिळू शकला नाही. उलट त्या मुल्लाजींनी अत्यंत धूर्तपणानी असगरअली हे दुसरे हमीद दलवाई आहेत, इस्लामच्या विरूद्ध आहेत. असा गैर समज प्रचार माध्यमांच्या साहाय्याने पसरविला आहे. त्यामुळे सर्वसामान्य मुस्लमानांचा पाठिंबा त्यांना मिळत नाही. असगर अलींनी रात्रंदिवस चालविलेल्या प्रयत्नामुळे आता कुठे मुस्लमानांच्या लक्षात येत आहे की, हा सर्वच मामला गैर इस्लामी व अत्याचाराचा आहे.

महाराष्ट्रातील काही तथाकथित बुद्धीवाद्यांना असगर अलींची ही चळवळ कुछ कामी वाटते. त्यांनी असगरअली सुधारणावादी नसल्याचा शोध लावीत आहेत. विशेषतः रॉयवादी व समाजवादी विचारवंतांचा प्रयतन असगर अली हे सुधारणावादी कसे नाही हे दर्शविण्याचा आहे. याला कारण म्हणजे असगर अली हे मार्क्सवादी विचारांनी प्रभावित आहेत. त्यांचे प्रतिपादन असे की, "धर्माची चौकट मानणारे" असगर अली हे पुरोगामी असू शकत नाही किंवा असगर अली जोपर्यंत तलाक, बहुपत्नीत्वाविरूद्ध बोलत नाहीत,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

इसलाम धर्मात कालबाह्य रूढीबाबत बोलत नाहीत, तोपर्यंत त्यांना सुधारणावादी म्हणता येणार नाही.

असगर अलींचे पुरोगामीपण नाकारताच येणार नाही. एवढी त्यांची वैचारिक कामगिरी मोठी आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार धर्मालाच विषमतेविरूद्ध व अन्यायविरूद्ध लढण्याची क्षमता देऊन क्रांतीचे साधन करता येते. असगर अलींच्या म्हणण्यानुसार एंजल्सने आपल्या एका निबंधात मार्टिनल्यूथरच्या एका पुरोहीत सहकाऱ्याने जर्मनी मधील जमीनदारी विरूद्ध धर्माचे सहाय्य घेवून जो संघटीत लढा देण्याचा प्रयत्न केला होता. त्याची माहिती धर्म क्रांतीचे साधन बनू शकतो. असा विचार मांडला आहे. (पहा– जर्मन ऑयडॉलॉजी) असगर अलींचे प्रतिपादन आहे की, इस्लाममध्ये कांही तरतूदी अशा आहेत की, त्यामुळे इस्लाम क्रांतीला अडसर न होता सहाय्यकारक होऊ शकतो. दुसरे प्रतिपादन असे की, इस्लामच्या मुळात बुद्धीवादी असलेल्या प्रेरणांचे पुनरूज्जीवन करून इस्लाममध्ये कालसापेक्ष सुसंगती आणली तर इस्लाम पुरोगामी प्रेरणांचे आधार होऊ शकते.

यासाठी असगर अलींनी इस्लामला कालसापेक्ष अर्थ लाऊन, इस्लाममधील तत्त्वांची पुनर्रचना व नवा अन्वय लावण्याचा जो प्रयत्न लिखाणातून चालवित आहे, त्याला मुस्लीम प्रबोधनाच्या इतिहासात तोड नाही. असगर अलींनी "रेलेव्हन्स ऑफ इस्लाम" या आपल्या नव्या पुस्तकातून इस्लामचा सुधारणावादी अर्थ लावण्याचा केलेला प्रयत्न त्यांच्या प्रज्ञेची साक्ष देतो. असगर अलींनी इस्लामच्याच आधारे तोंडी तलाक किंवा बहुपत्नीत्वाचे प्रकार कसे चुकीचे आहेत, हे लेखनातून मांडले आहेत. धर्माची तत्त्वज्ञान व अधिभौतिकशास्त्र यांच्या चौकटीतून प्रबोधनाचा विचार मांडता येत असेल तर धर्म नाकारण्याची गरज नाही असे त्यांचे म्हणणे आहे.

इस्लामचा जो नवा अर्थ लावण्याचा असगर अलींचा प्रयत्न आहे तो आतापर्यंत सर्व मुस्लीम विचारवंतात वैशिष्ट्यपूर्ण आहे. आता पर्यंत भारतात पोथिनिष्ठतेला अनेक मुस्लीम विचारवंतांनी विरोध केला आहे. सर सय्यद, अब्दुल लखनवी, अशरफ अली, खुदाबक्ष इकबाल इत्यादी सुधारणावादी विचार मांडले होते. मौलाना आझादांनी कुराणाचे पुरोगामी भाष्य करण्याचा प्रयत्न केला होता. परंतु असगर अली इतका धीट आणि शास्त्रशुद्ध प्रयत्न कोणीही केलेला नव्हता. इजिप्त मधील महमंद अब्दुल व महमंद रशिद रिदा यांनी मुस्लीम सनातनांच्या विरूद्ध लढा दिला. असगर अली हे एका बाजूला धर्मगुरूशी लढा देत आहेत. दुसऱ्या बाजूला जमाते इस्लामीसारख्या मुस्लीम मुलभूतवाद्यांशी लढा देत आहोत आणि तिसऱ्या बाजूला इस्लामची कालसापेक्ष रचना करण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यांनी इस्लामी इतिहासाची इस्लामच्या उदय व विकासाची पैगंबर साहेबांच्या चरित्राची व कांही प्रमाणात कुराण शरिफची केलेली चिकित्सा अत्यंत मूलगामी स्वरूपाची आहे. असगर अलींच्या "इज्तिहादच्या" वापराला तोड नाही. धर्म न नाकारता प्रबोधनाचा विचार मांडणे शक्य आहे, असा विचार महाराष्ट्रात प्रा. फैजी यांनी मांडला होता. त्यांचे मत होते की,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कुराणातील श्लोकांच्या आधारे धर्ममार्तंडाशी लढा देऊन, पोथीनिष्ठता घालवून मुस्लीम समाजात आधुनिकता आणणे शक्य आहे. त्यांच्या प्रमाणेच छागला आणि एम. आर. ए. बेग यांनी देखील मूलगामी विचार मांडले. डॉ. रफीक झकेरीया यांनी सातत्याने स्त्री सुधारणेचा विचार आणि इस्लामची कालसापेक्ष पुनर्रचना करण्याचा विचार मांडला आहे. डॉ. मोईन शाकिर यांनी जमाते इस्लामी व मुस्लिम लीग सारख्या कर्मठ संघटनांचा अभ्यास केला. आणि त्यांच्या विरूद्ध महाराष्ट्रात वैचारिक लढा उभा करण्याचा प्रयत्न केला.

अलीकडे गोवा राज्यात कांही मुस्लीम महिलांनी एकत्र येवून प्रबोधनाची चळवळ उभी केल्याचे दिसते. त्यांची चळवळ वैशिष्ठपूर्ण होती. गोव्यात पोर्तुगीज सरकारच्या काळापासून सर्वांना समान कायदा असून मुस्लीम व्यक्तीगत कायदा अस्तित्वात नाही. परंतु अलिकडेच बाहेरच्या अनेक मुस्लीम संघटना जमाते इस्लामी आणि तबलीग जमात सारख्या संघटना तेथे गेल्या. गोव्यात येवून राहिलेल्या बाहेरील मुसलमानांनी आणि या मूलतत्त्ववादी संघटनांनी गोव्यात मुस्लीम व्यक्तीगत कायदा लागू करा. अशी चळवळ सुरू केली. गोव्यातील मुस्लीम महिलांनी व्यक्तिगत कायदा नको ही चळवळ सुरू केली. त्याचे नेतृत्व करणारी रशिदा मुजावर नावाची महिला असून तिच्याबरोबर अनेक सुशिक्षीत तरूणी आहेत.

प्रारंभी म्हटल्याप्रमाणे मुस्लीम समाजात वरील प्रकारे समाज सुधारणेच्या चळवळी उदयास येतांना दिसत आहेत. या चळवळींचे पडसाद अलिगड, दिल्ली, कलकत्ता, बेंगलोर, म्हैसूर या शहरातून जाणवत आहेत. महाराष्ट्राच्या बाहेर देखील इम्तियाझ अहमद, ताहीर महमद यासारखे अनेकजण सुधारणेचा विचार मांडत आहेत. बाबरी मशीदचे प्रकरण झाल्यानंतर दिल्ली, अलिगड, मुंबई इत्यादी शहरातून मुस्लीम बुद्धीवंतांचे मेळावे घेतले गेले. या मेळाव्यातून व्यक्तिगत कायद्यात सुधारणा करण्याचे विचार मांडले गेले. भारताच्या प्रत्येक भागात सुधारणेचे विचार मांडणारे लेखक पुढे येताहेत. या सर्व गोष्टीवरून असे म्हणता येईल की, मुस्लिमांच्या समाज परिवर्तनाच्या चळवळीला आताच कुठे सुरूवात झालेली आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

॥ १७ ॥

शेतकरी चळवळ : काल, आज आणि उद्या

अमर हबीब

****

गर्भवती स्त्रीच्या निरीक्षणातून शेतीचा शोध लागला असावा. असे मानले जाते. सर्वसामान्यापणे याबद्दल शास्त्रांचे एकमत आहे. शेतीचा शोध ही बाब मनुष्य जातीच्या इतिहासाला कलाटणी देणारी ठरली. जंगलात हिंडून शिकार करणारा किंवा कंदमुळे खाऊन पोट भरणारा माणूस हजारो वर्ष साधनांचा विकास करू शकला नव्हता. परंतु जेव्हा शेतीचा शोध लागला आणि कालांतराने शेतीमध्ये बचत होऊ लागली व मनुष्य 'ब्रेगमी' च्या चिंतेतून थोडसा मुक्त झाला तेव्हा पासून साधनांचा विकास करणे त्याला शक्य झाले.

शेतीत पिकले व गरज भागवून जेव्हा कांही उरले तेव्हा साधनांच्या निर्मितीसाठी उसंत लाभली. शेतीत बचत झाली नसती तर मनुष्य जात आज ही त्याच रानटी अवस्थेत राहिली असती.

शेतीत गुणाकार होतो. एका दाण्याचे शंभर दाणे होतात व दाण्यादाण्यात शंभर शंभर दाणे पिकविण्याचे सामर्थ्य असते. कारखाण्यात असा गुणाकार होत नाही. एक किलो लोखंडोचे दहा किलो लोखंड तयार होवू शकत नाही. लोखंडाच्या गोळ्याचे भांडे तयार होईल त्याचे रूपांतर होईल. परंतु एक किलो लोखंड दिड किलो सुद्धा होऊ शकत नाही.

पशु, स्त्रीया, शेती आणि मेंदू हे घटक गुणाकार करतात आणि जे घटक गुणाकार करतात त्यांना ताब्यात घेण्याच्या इर्षेतून व्यवस्था निर्माण होते. जनावरांचे गोठे, स्त्रीयांना दुय्यम दर्जा, गरीब शेतकरी आणि प्रतिभावंताची गुलामी ही त्याचीची रूपे आहेत. गुणाकार करणारे घटक ताब्यात ठेवण्यासाठी व घेण्यासाठीच व्यवस्थांचे संघर्ष उभे राहिले.

मनुष्य जातीच्या इतिहासात शेतीतील बचतीला कळीचे महत्व आहे. कारण मनुष्य प्राणी जगावा यासाठी त्याला अन्नाची गरज असते आणि जोपर्यंत अन्नाची गरज भागली जात नाही तोपर्यंत विकासाचे एकसुद्धा पाऊल पडू शकत नाही. मनुष्य बंदूकीने युद्ध जिंकू शकेल परंतु बंदूक खाऊन त्याला पोट भरता येणार नाही. शेतीने मनुष्य जातीच्या अन्नाची चिंता दूर केली म्हणून तिला 'अन्न मूलाधार' म्हटले जाते.

अन्न मूलाधार हे प्राथमिक भांडवल आहे. आज दिसत असलेल्या कोणत्याही साधनाच्या मागे मागे जात राहिलो तर सरते शेवटी 'शेतकऱ्याने पिकवलेले अन्न नसते तर ही वस्तू निर्माण झाली नसती' असे दिसून येईल. याचा अर्थ एवढाच की प्रत्येक वस्तूच्या तळाशी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आमच्या पूर्वजांनी शेतीत गाळलेला घाम आहे !

वर उल्लेख केल्याप्रमाणे शेतीबाह्य उत्पादन अन्य कामासाठी उपयोगी ठरू शकते परंतु त्याचा पोट भरण्यासाठी उपयोग होत नाही हे आपण पाहिले. औद्योगिक वसाहतीत कष्ट करून कारखादार आणि कामगार जेव्हा एखादी वस्तू तयार करतात, त्या वेळेस त्या वस्तूच्या पाठीशी देखील कामगार आणि कारखानदार यांना खायला लागणाऱ्या अन्नाचे उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्याचे श्रम असतात. वीज किंवा पेट्रोलची जी भूमिका उत्पादन प्रक्रियेत असते तीच भूमिका गहू आणि ज्वारीची असते. ही बाब महत्वाची असून ती नीट समजून घेतली पाहिजे.

शेतीत बचत निर्माण झाली म्हणूनच साधन निर्मितीसाठी उसंत लाभली. या वाक्याचा अर्थ असा होतो की, शेतीतील बचत हे औद्योगिकरणाचे प्राथमिक भांडवल ठरते. ज्या प्रमाणात शेतीतील बचत निर्माण होते त्या प्रमाणात माणसे शेतीतून बाहेर पडतात. ही प्रक्रिया सुलभरित्या घडली तर सर्व समाज विकासाचे नवनवे उच्चांक प्रस्थापित करतो. परिणामत: शेतीत माणसे कमी व औद्योगिकरणात जास्त दिसून येतात. आरोग्य संपन्न समाजाचे हे चित्र आहे. परंतु दुर्दैवाने भारतात शेतीवर जगणाऱ्यांची संख्या जास्त व उद्योग व्यवसायावर जगणाऱ्यांची संख्या अधिक आहे. शेतीवरची जनसंख्या उत्पादकतेच्या विपरित आहे. त्यामुळे हा देश गरीब आहे. शेतीवरचा हा भार ज्या प्रमाणाात घटेल त्या प्रमाणात गरीबी दूर होईल.

शेतीतील बचत शेतकऱ्यांच्या हातात राहिली तर शेतीवर ज्यांचे पोट अवलंबून आहे त्या सर्वांचे जीवनमान उंचावते. आज हे लोक आपल्या गरजा मारून जगतात. कारण त्यांच्याकडे बचत नाही. बचत राहिली तर गरज मागणीत बदलते. मागणी वाढली की पुरवठा सुरू होतो. पुरवठा वाढला की उत्पादन सुरू होते. नवे उद्योग सुरू होतात. नवे रोजगार निर्माण होतात. मुबलक साधनांची निर्मिती होते. शेतकऱ्याकडे बचत राहिली तर शेतकरी नवे तंत्रज्ञान पेलू शकतो. स्वत:च्या संरचना तयार करू शकतो आणि नवे संशोधन करू शकतो. शेतकऱ्याकडील बचत ही गरीबी हटविणारी जादूची कांडी ठरू शकते. शेतीतील बचत लुटारुंनी लुटून नेली तर 'पुन्हा लुटण्यासाठी' तो नवे शस्त्र निर्माण करतो. शेतकऱ्यांचा इतिहास पहाता ही गोष्ट लक्षात येते की, शेतकऱ्यांना लुटणारे दरोडेखोर गणनायक झाले. सरदार झाले. पुढे त्यांनाच लोक राजे आणि सम्राट म्हणू लागले. अशा दरोडेखोरांनी लुटायचे क्षेत्र म्हणजे त्यांचे राज्य. इतर लुटारुंपासून अभय देणे व लुटण्याचा एकाधिकार हक्क प्रस्थापित करणे म्हणजे राज्याची मुहूर्तमेढ रोवणे. एका भूप्रदेशावरील शेतकऱ्यांना लुटण्यासाठी दुसरा कोणी आला की युद्ध व्हायची. सारा मध्ययुगीन इतिहास अशाच घटनांनी भरलेला आहे. भरपूर जमीन आणि त्यावर काम करणारे गुलाम. अशी भूदासांची फौज तयार करण्याचे प्रयत्न इतिहासात झाले. याला आपण गुलामगिरी म्हणून ओळखतो. शेतीत कष्ट करावे लागायचे. लुटण्यासाठी धाडस हवे असायचे. ज्यांना कष्ट आणि धाडस हे दोन्ही नव्हते अशा ऐतखावूंनी शेतकऱ्यांच्या अज्ञानाचा लाभ उपटण्याचा प्रयत्न केला. त्यातून पुरोहितशाही जन्माला आली. ऐतखावूपणाला तत्त्वज्ञानाचे पांघरून घालून धर्मसंस्थेने शेतकऱ्यांची लूट

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

केली असे इतिहास सांगतो.

शेतकऱ्यांना लुटणे हा सत्तेचा स्वभाव आहे. किंबहुना 'सत्ता ही शेतकऱ्यांना लुटण्यासाठीच असते' असे वि.का. रायवाडे यांनी म्हटले आणि ते पदोपदी रास्त असल्याचे सिद्ध होत आहे.

इंग्रज भारतात येण्यापूर्वी हा देश अनेक राजांच्या राजवटीखाली विभागलेला होता. लूट आणि अराजकता होती. शेतकरी गांजलेला होता. शेतकऱ्यांना मालाच्या रूपानी मालगुजारी भरावी लागायची. माल असायचा. तो भरला जायचा. जिथे कुचराई व्हायची तिथे बळजबरी केली जाईची. गोरे इंग्रज सत्तेत आले. तो काळ भांडवलशाहीच्या उदयाचा काळ होता. ब्रिटनमध्ये नवनवे कारखाने निघत होते. नवनव्या वस्तुंची निर्मिती होऊ लागली होती. बाजारपेठा, आकाराला येवू लागल्या होत्या. त्यामुळे 'चलन' हे विनिमयाचे साधन तयार होवू लागले होते. इंग्रजांनी भारतात मालगुजारीच्या ऐवजी रयतवारी पद्धत सुरू केली. हा काळ १७७० चा.जमीनदार आणि शेतकऱ्यांकडे माल असाचा परंतु चलन नसायचे. चलन घेण्यासाठी त्यांना आपला माल बाजारात आणणे भाग पडले. माल बाजारात आला. सक्तीने आला. तो कोणत्या भावाने घ्यायचा हे ज्यांच्याकडे चलन होते तो ठरवू लागला. बाजारात भाव पाडून विकत घेण्याचे नवे तंत्र गोऱ्या इंग्रजांनी प्रथम भारतात आणले. महात्मा ज्योतीबा फुले यांनी सर्व प्रथम शेतकऱ्यांचे दु:ख मांडले. किंबहुना त्यांच्या समग्र चिंतनाच्या आधार शेतकरी होता.

सावकारांना महत्व आले. त्यांनी शेतकऱ्यांच्या जमिनी गिळंकृत केल्या. शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला.आणि जागोजाग सावकारांच्या विरूद्ध उठाव होवू लागले. बंगालमधील संथाल परगाण्यात एक मोठा उठाव झाला. हा उठाव शस्त्र होता. तीर कमान हातात घेवून शेतकरी रस्त्यावर आले. आजची बहुतेक प्रचलित लोकगिते याच आंदोलनाच्या आठवणी सांगतात. त्या काळातील जमीनदारांना सुद्धा महसूलाचा त्रास जाणवू लागला ते ही शेतकऱ्यांच्या बरोबर आले. १७७०–१८५७ पर्यंत छोट्या मोठ्या अनेक घटना घडल्या. या घटना हळूहळू सर्व शेतकरी समाजाला एकत्र आणू लागल्या. १८५७ साली पहिल्यांदा सरकारविरूद्ध सैनिकांचा उठाव झाला.

१८६० नंतर पुन्हा बिखराव दिसून येतो. या काळात डेक्कन रायट्स झाले. सासवड भागात शेतकऱ्यांनी मोठा उठाव केला. सावकाराच्या घरावर हल्ला करून त्याच्याकडची कागदं जाळली जायची. कुणाला जिवे मारल्याचे अैकिवात नाही. परंतु या काळात सावकरांचे नाक कापल्याची घटना घडली. त्या काळात तीन जिल्ह्यांतून नऊ हजार शेतकरी अटक झाले.

उत्तर केरळमध्ये रोमांचकारी मोपल्यांचे बंड झाले. मोपले मुस्लमान होते. ते शेतकरी होते. त्यांच्या जमिनी मोपल्यांनी उठाव केला परंतु ते मुस्लमान म्हणून चिरडून टाकण्यात आला.

तंट्या भिल्ल हा शेतकऱ्यांचा आद्यक्रांतीकारक असल्याचे शरद जोशी म्हणतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मध्यभारतात त्याने केलेला उठाव अभूतपूर्व होता. इंग्रजांना त्यांची धास्ती वाटायची. त्याला पकडून चुन्याच्या भट्टीत टाकून मारण्यात आले.

१७७० पासूनची आंदोलने ग्रामीण भागात एकमेका विरूद्ध होती. परंतु १८५७ साली पहिल्यांदा त्याचा रोख सरकारकडे वळला. पुन्हा एकमेकाविरूद्ध लढाया सुरु झाल्या. १९२० साली महात्मा गांधी भारतात आले. पहिलं आंदोलन त्यांनी चंपारणमध्ये कलं. चंपारणचा गांधींजींनी चंपारण आणि बारडोलीत शेतकऱ्यांच्या आंदोलना नवी दिशा दिली. हे आंदोलन जरी स्थानिक प्रश्नाभोवती फिरताना दिसत असले तरी ते शासनाविरूद्ध महसूल न देण्यासाठीच होते.

१९२० ते १९५० हा गांधी युगाचा कालखंड मानला पाहिजे. गांधीजींनी देशभरातील सर्व शेतकरी समाजाला त्यांच्या कच्च्या मालाची इंग्रज सरकार कशी लूट करीत आहे हे समजावून सांगितले. शेतीवर जगणारे घटक एकमेकाशी भांडत बसले तर त्यांचे प्रश्न कदापी सुटणार नाही. सरकार जबाबदार असल्यामुळे इंग्रज गेल्या शिवाय प्रश्न सुटणार नाही, अशी भूमिका त्यांनी मांडली. गांधीजींच्या नेतृत्वाखालील आंदोलनाला राष्ट्र आंदोलनाचे स्वरूप आले आणि अवघ्या तीस वर्षात भारतीय जनतेच्या मनातील असंतोषाला टोक आले. पंजाब – पाकिस्तान सरहद्दीत तर छोटीराम शेतकऱ्यांचे नेते होते. ते जोपर्यंत जिवंत होते तोपर्यंत शिख, मुस्लमाना व हिंदू शेतकरी एकत्र होत. त्यांच्या मृत्यूनंतर मात्र विषारी ,द्वेष पसरला.

४७ साली देश स्वतंत्र झाला. ४८ साली गांधीजींची हत्या झाली. देशाचे नेतृत्व नेहरुंकडे आले. नेहरुंवर समाजवादी विचारांचा प्रभाव होता. ते रशिया पाहून भारावून गेले होते. गांधीजींच्या नेतृत्वाखाली सहणानंद सरस्वती, डॉ. रंगा ही माणसे उभं राहिली. त्यानी किसान सभेची स्थापना केली. नेहरुंनी औद्योगिकरणाला प्राधान्य दिले. मजूर स्वस्त मिळावा यासाठी अन्नधान्याच्या किंमती खालच्या पातळीवर रहाव्यात असे अधिकृत धोरण ठरविण्यात आले. सत्ताशाहीचा प्रभाव वाढला आणि पुन्हा एकदा शेतकरी समाज विस्कटून गेला. जमिनीच्या फेरवाटपाचे खूळ नेहरुंना होते. परिणाम असा झाला की, जमिनीचे तुकडे तुकडे झाले. अल्पभूधारक, भूमिहीन, दलित, बागायतदार, कोरडवाहू, दक्षिणेचा, उत्तरचा असे नाना भेद पाडले गेले. अनुदान आणि भिकेवर जगणारा समाज निर्माण करण्यात आला. गांधींचा वारसा घेवून सत्तेत आलेल्या नेहरुंनी गांधींना नेमका उलटे केले. गांधीजी शेती, शेतकरी, गांव म्हणत. नेहरु मात्र औद्योगिकरण, शहरे आणि कामगार अशी भाषा वापरू लागले. शेतकरी आणि शेतमजूर यांच्यात संघर्ष असल्याची व जमिनदार आणि कारखानदार यांचे हितसंबंध सारखे असल्याची अजब साम्यवादी भाषा रूढ झाली.

१९४७ नंतर गांधींच्या नेतृत्वाखाली एकत्र आलेला शेतकरी समाज दुभंगला गेला व गोऱ्या इंग्रजांची निती काळया इंग्रजांनी पुढे चालविली. ४७ ते ७० या कालावधीत शेतकऱ्यांची छुटपूट आंदोलने निरनिराळया प्रदेशात झाली. परंतु ती गावातील अंतर कलहाशी संबंधित होती. आंध्र प्रदेशातील तेलंगणा भागात शेतकऱ्यांचा मोठा उठाव झाला. परंतु तो

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

लवकरत चिरडून टाकला गेला. ७० नंतर पुन्हा शेतकरी एकत्र यायला सुरुवात झाली. अर्वाचीन शेतकरी आंदोलनाचे भिष्मपितामह नारायण स्वामी नायडू यांनी तामिलनाडूत वीज बिलाच्या दराच्या संदर्भात मोठे आंदोलन करून शेतकऱ्यांच्या असंतोषाचे तोंड सरकारकडे वळविले. बैलगाड्या आणून रस्ते अडविण्याची पद्धत त्यांनीच सुरू केली.

याच काळात (७२–७३) पंजाबमध्ये शेतीबाडी युनियन सक्रिय झाली. नारायण स्वामी नायडू देशभर फिरले. त्यांनी विविध राज्यतील शेतकरी संघटनांना एकत्र करण्याचा प्रयत्न केला. त्यातून भारतीय किसान युनियनचा जन्म झाला. परंतु दुर्दैवाने नारायण स्वामी नायडू यांच्या हयातीत शेतकऱ्यांचे राष्ट्रव्यापी आंदोलन उभे राहू शकले नाही.

महाराष्ट्रात शेतकरी कामगार पक्ष शेतकरी आणि कामगार यांच्या हिताचे कंकण बांधून जन्माला आला. शेती व्यवस्थेतील शेतकरी आणि उद्योग व्यवस्थेतील कामगार यांचे हितसंबंध सारखे आहेत असे गृहित धरून हा पक्ष सुरू झाला. त्यातील कांही नेत्यांना शेतकऱ्यांबद्दल तळमळ होती परंतु वैचारिक सुसंगतीच्या अभावामुळे तो निष्प्रभ ठरला. शेवटी कांही व्यक्तींचा प्रभाव क्षेत्रात त्याचे अस्तित्व टिकले. (शेतकरी कामगार पक्षाचे मूल्यमापन करणे हा एक स्वतंत्र विषय आहे.)

८० नंतर

केंद्रात जनता पार्टीचे सरकार होते. कांद्याच्या किंमती वाढू लागल्या म्हणून सरकारने निर्यात बंद केली. नाफेडने खरेदी थांबविली. शरद जोशींच्या नेतृत्वाखाली चाकण भागातील शेतकऱ्यांनी रस्ता रोको आंदोलन केलं. या आंदोलनाच्या प्रेरणेतून संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकऱ्यांमध्ये आशेचा नवा किरण दिसला. पहिल्या दिवसा पासून हे आंदोलन सरकारच्या धोरणा विरूद्ध होते. नंतर ऊसाचं आंदोलन झालं, कर्नाटक आणि महाराष्ट्राच्या सीमेवर तंबाकूचे आंदोलन झाले, कपाशीच्या प्रश्नावर रस्ता रोको झाला आणि राजीव वस्त्रांच्या होळीचा कार्यक्रम घेण्यात आला. अशा निरनिराळ्या आंदोलनातून ही बाब स्पष्ट करण्यात आली की, शेतकऱ्यांच्या दुरावस्थेला आणि देशाच्या दारिद्र्याला सरकारचे धोरण जबाबदार आहे.

शरद जोशी हे शेतकरी कुटुंबात जन्मलेले नाहीत. अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून कांही दिवस कोल्हापूरात काम केल्यानंतर ते टपाल सेवेत रूजू झाले. त्यातच ते संयुक्त राष्ट्र संघात गेले. विकसनशील राष्ट्रांच्या दारिद्र्याचा अभ्यास करताना त्याना दारिद्र्याच्या करणाचा शोश शेतीत घेण्याची गरज वाटली. ७८ च्या सुमारास त्यांनी पुण्यापासून ३० किलोमीटर अंतरावरील अंबेठाण येथे कोरडवाहू जमीन घेतली. शेतीचा व्यवहार नीट नोंदवून करायला सुरु केला. त्यांच्या असे लक्षात आले की, उत्पादन खर्च भरून निघेल एवढा सुद्धा भाव मिळत नाही. दर वर्षी हाच अनुभव येत गेला. उत्पादनखर्च भरून निघेल एवढा भाव का मिळत नाही? शरद जोशींनी शास्त्रशुद्ध पद्धतीने अभ्यास करून भाव मिळू नये साठी सरकार काय काय

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

करते याची यादी तयार केली. कपास असो की, ऊस, ज्वारी असो की तंबाकू सर्व पिकांच्या बाबतीत सरकारचे सारखेच धोरण आहे ही बाब गेल्या दहा वर्षात स्पष्ट झाली. ८४ च्या समुारास उत्तर प्रदेशातील मुजफ्फर नगर जिल्ह्यात महेंद्रसिंग टिकैत यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन झाले. दिल्ली जवळ असल्यामुळे मोठा गाजा वाजा झाला. परंतु वैचारिक अधिष्ठान नसलेले हे आंदोलन कालांतराने विरूने गेले.

शेतकरी संघटनेच्या आंदोलनाचे वेगळेपण

शेतकरी संघटनेच्या आंदोलनाचे वेगळेपण काय आहे?

(१) हे आंदोलन सरळ सरळ भौतिक जीवनाशी निगडीत आहे. ते शेतकऱ्यांच्या जीवन शैलीला उदात्त मानत नाही. कवी कल्पना करीत नाही. स्वार्थ ही वाईट गोष्ट आहे, असा प्रचलित समज त्याने नाकारला आहे. तरी ते ट्रेड युनियनं नाही. तत्त्वज्ञानाच्या पातळीवर ही चळवळ सरळसरळ अध्यात्मिक मंडळींशी फारकत घेणारी आहे.

(२) स्वातंत्र्योत्तर काळात झालेल्या कोणत्याही आंदोलनापेक्षा शेतकरी आंदोलनात उतरलेल्या लोकांची संख्या जास्त आहे. रस्ता रोको, रेल रोको, अशा प्रकारच्या आंदोलनात मोठ्या हिरीरीने लोक उतरतात एवढेच नव्हे तर स्त्रीया ही उतरतात परंतु या आंदोलनाचे दैदिप्यमान यश यातील बळीची संख्या फार कमी आहे हे होय. छुटपुट आंदोलन झाले तरी पांच पन्नास मुडदे पडतात परंतु शेतकऱ्यांचे एवडे मोठे आंदोलन झाले तरी गेल्या १४ वर्षांतील बळींची संख्या १९ एवढी राहिली. अहिंसा आणि सत्याग्रह या मार्गाने हे आंदोलन चालले.

(३) शेतकऱ्यांची अनेक आंदोलने झाली. इतिहासाच्या प्रत्येक कालखंडात शेतकऱ्यांच्या असंतोषाच्या ठिणग्या उडाल्या. परंतु या असंतोषाला समग्र वैचारिक अधिष्ठान नव्हते. महात्मा जोतिबा फुले आणि महात्मा गांधी यांच्या विचाराचा वारसा घेवून शरद जोशी यांनी शेतकऱ्यांच्या लुटीची वैचारिक मांडणी केली हे या आंदोलनाचे सर्वांत मोठे वैशिष्टये मानले पाहिजे. गेली कित्येक शतके चालत आलेल्या आंदोलनांना सैद्धांतिक पाया दिला.

मार्क्सवादाची भुरळ पडलेली देशी मंडळी नव्याने विवचार करायला तयार नव्हती. शरद जोशींनी कर्मठपणे आपली भूमिका मांडली व मार्क्सवादाच्या आर्थिक सिद्धांत उखडून टाकला.

(४) शेतकरी संघटनेने शेतकऱ्यांचे व्यापक आंदोलन केले त्याच बरोबर महिलांच्या सहभागाला ही महत्व दिले. महिलांच्या सहभागातून महिलांचे स्वतंत्र प्रश्न पुढे आले आणि शेतकरी महिला आघाडी अस्तित्वात आली. शेतकरी महिला आघाडीच्या व्यासपीठावर अनेक महिलांच्या कृतत्वाला संधी मिळाली आणि असंख्य महिलांना अभिव्यक्तीचे ठिकाण मिळाले. शेतकऱ्यांच्या सोबत महिलांची संघटना उभी रहाणे हे आंदोलनाचे वैशिष्ट्ये आहे. जे अन्य राज्यात दिसून येत नाही.

'लक्ष्मी मुक्ती' हा स्त्रीयांना मालमत्तेचा अधिकार देणारा कार्यक्रम आणि दारू दुकान

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

॥ १८ ॥

छात्रभारती : एक प्रभावी युवक चळवळ

प्रा. अर्जुन जाधव

****

भारत वर्षातील सर्व छात्रांना संघटित करू पहाणारी ग्रामीण गरीब अंगमेहनती विद्यार्थ्यांची संघटना म्हणून छात्रभारती महाराष्ट्रात नावारूपाला आली आहे. १८ डिसेंबर, १९८३ रोजी जळगाव येथे छात्रभारतीची रीतसर स्थापना झाली. लोकशाही–समाजवाद, धर्मातीत समाजरचना, विज्ञानाभिमुख दृष्टीकोण आणि राष्ट्रवाद या भारतीय घटनेतील पाच तत्त्वांवर निष्ठा ठेवून संघटना काम करते. ही विद्यार्थ्यांची संघटना आहे. शिक्षक किंवा प्राध्यापकांची भूमिका मदत करण्याची आहे. राजकीय पक्षाशी बांधिलकी नाही. पण राजकारणाचा अभ्यास केला जातो आणि योग्यवेळी राजकीय निर्णयपण घेतला जातो. संघटना मानवता धर्माचा पुरस्कार करते. त्यामुळे छात्रभारतीमध्ये सर्व जाती–धर्माचे विद्यार्थी–विद्यार्थीनी दाखल होतात. संघटनेतील विद्यार्थी सभासद आणि शिक्षक सभासद यांनी प्रथम आपले कर्तव्य (अभ्यास करणे व शिकविणे) पार पाडण्याचे बंधन आहे. त्यानंतर राहिलेल्या वेळेचे नियोजन करून छात्रभारतीसाठी वेळा दिला जावा असा संकेत आहे. 'विज्ञानयुगातील विद्यार्थ्यांची समतावादी संघटना' हे घोषवाक्य घेऊन जन्मास आलेल्या छात्रभारतीने अकरा वर्षांच्या कालावधीत महाराष्ट्रातील शिक्षण क्षेत्रात एक वेगळा ठसा उमटवला आहे. संघटनेने स्विकारलेली विचारधारा पुढील प्रमाणे आहे.

लोकशाही–समाजवाद

समाजवादाचा आशय या विषयावर तत्त्वचिंतनात किंवा व्यवहारामध्ये संपूर्णपणे एकमत दिसून येणे कठीण आहे. हेच या विचारसरणीच्या जिवंतपणाचे व परस्थितीच्या देशकाल सापेक्षतेचे गमक मानता येईल. पण तरीही काही स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वे छात्रभारती समोर आहेत.

व्यक्तिस्वातंत्र्याचा पाया लोकशाही अबाधित राखून समाजवादी समाजरचना आपणास साध्य करावयाची आहे. अशा लोकशाहीवर ज्यांचा विश्वास बसत नाही व संसदीय लोकशाही हे केवळ आपले मर्यादीत स्वार्थी हेतू साधण्यासाठी किंवा हुकूमशाही स्थापन करण्याचे साधन म्हणून जे वापरतात त्या सर्व प्रकारच्या संघटनांना कडवा विरोध राहील. या देशातील लोकशाही समाजवादाची आजची परिस्थिती अत्यंत दयनीय आहे. तरीही हे क्रांतीकारक ध्येय साध्य करण्यासाठी कार्यक्रमाच्या कोणत्याही टप्प्यावर विध्वंस आणि हिंसा अटळ आहे ही गोष्ट छात्रभारतीला अमान्य आहे.

व्यक्तिस्वातंत्र्याची बूज राखणाऱ्या संसदीय लोकशाहीच्या मर्यादा या देशात लक्षात

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

घेतल्या की, लोकशाही अपुरी पडेल अथवा चुकीच्या मार्गाने जाऊ शकेल याची जबरदस्त शक्यता वाटते. यावेळी तिला योग्य मार्गावर आणण्यासाठी व कार्यप्रवण करण्यासाठी जनआंदोलनाची आवश्यकता राहील, अशी छात्रभारतीची धारणा आहे. किंबहुना अशा जनआंदोलनाची आवश्यकता हा संसदीय लोकशाहीचा एक महत्वाचा भागच आहे. जनमत जागृत करणे, संघटित करणे व आपल्या न्याय्य हक्कासाठी अहिंसक, लढ्याला, सत्याग्रहाला सिद्ध असण्याचे जनतेला शिक्षण देणे हा समाजवादी लोकशाही क्रांतीचा भारतात प्रमुख मार्ग आहे. याची जाणीव छात्रभारतीच्या क्रियाशील कार्यकर्त्याला करून देणे ही संघटनेची बांधिलकी आहे. याबाबतचे या देशातील पूर्वीचे अनुभव आणि त्यातील गुणदोष लक्षात घेऊन आणि सध्याची परिस्थिती आणि छात्रभारतीचे सामर्थ्य या बाबींचा विचार करून छात्रभारती नव्या अर्थाचे सत्याग्रह जरूर लढवेल. कारण त्यामुळे लोकशाही समाजवादाच्या प्रस्थापनेच्या या देशातील मार्ग सुकर होणार आहे. आज ही विचारसरणी साम्राज्यवादी भांडवलशाही ढंगानी काळवंडून गेलेली असली तरी उद्याच्या बदलाची बीजे लोकशाही– समाजवादी विचारात आहेत अशी छात्रभारतीची श्रद्धा आहे. पण यासाठी भगिरत प्रयत्नाची गरज आहे याचे आत्मभान ही संघटनेला आहे.

भारतातील व्यक्तिस्वातंत्र्याला प्रत्यक्ष व्यवहारात जवळ–जवळ अर्थ नाहीच. अनेक बाजूंनी नाकेबंदी झालेली आजची जनता आपले मत प्रभावीपणे उठवू शकत नाही आणि लोकशाही समाजवादाचा गाभा असलेले हे बलस्थान त्यामुळे अत्यंत दुर्लक्षित राहिले आहे. ही गोष्ट अमूलाग्र बदलणे यावरच या देशाच्या लोकशाही समाजवादाचे भवितव्य अवलंबून आहे, अशी छात्रभारतीची धारणा आहे.

सर्व समाज सुखी व्हावा ह्या प्रामाणिक भावनेची बैठक हाच समाजवादाचा पाया आहे. ह्या सर्वांच्यामध्ये जे मूळातच अधिक रंजले गांजलेले आहेत त्यांना अर्थातच ह्या गोष्टींची अधिक गरज आहे. सुख म्हणजे केवळ आर्थिक सुबता आणि समाजवाद म्हणजे सर्वांना भाकरी मिळवून यावयाचे तत्त्वज्ञान एवढेच नाही याची जाणीव छात्रभारतीला आहे. किमान आर्थिक पातळीही अत्यावश्यक आहेच. पण त्याबरोबरच सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि शैक्षणिक या क्षेत्रातील विकासाची सर्वदारे या वर्गाला उघडली जातील यासाठी घटना दुरूस्तीसह सर्व कायदेशीर व प्रत्यक्ष लढ्याचे सर्व संघर्षमय मार्ग जरूर हाताळेल. ही दारे समर्थपणे ठोठावण्याची क्षमता त्यांच्या अंगी येण्यासाठीही बराच कालावधी लागेल याची छात्रभारतीला जाणीव आहे. लोकशिक्षणाचा मार्ग प्रभावीपणे हाताळल्यास ही जागृती आणि ही ताकद उभी करता येईल, अशी छात्रभारतीची खात्री आहे. दलितांचे हक्क त्यांना भूतदयावादी दृष्टीकोनातून न मिळता मूलभूत मानवी हक्क आणि भारतीय नागरिकत्वाचे लक्षण म्हणून मिळावयास हवेत. हक्काची जाणीव देत असतानाच कर्तव्याची आणि जबाबदारीचीही जाणीव देण्याबाब छात्रभारतीचा आग्रह राहील.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

धर्मातीत समाजरचना

जाती आणि धर्म यांच्यामधील वैरभाव हा भारतात लोकशाही समाजवादाच्या मार्गातील सर्वात मोठा अडथळा आहे. शेकडो जाती–जमाती आणि अनेक धर्म यांनी स्वत:च्या धर्माच्या आचरणाचा फाजील आग्रह धरून आणि प्रसंगी आक्रमक वृत्ती धारण करून या देशातील समाजाच्या असंख्य चिरफाळ्या केल्या आहेत. राजकीय पक्षांनी स्वत:च्या स्वार्थांसाठी ही परिस्थिती अधिकच बिघडवली आहे. अज्ञानी लोकांना गोंधळात टाकणाऱ्या धर्मांध व जातीयवादी शक्ती संघटित होत आहेत. ताकद वाढवत आहेत, ही चिंताजनक गोष्ट आहे. एकसंघ राष्ट्र आणि लोकशाही समाजवाद निर्माण करण्यासाठी या प्रवृत्ती विरूद्ध ठामपणे आणि समर्थपणे उभे राहण्याची छात्रभारतीची जिद्द आहे.

छात्रभारती धर्मापेक्षा राष्ट्र मोठे मानते, राष्ट्राच्या उन्नतीआड धर्म, जात, प्रांत, भाषा यासारखे शुद्र अभिमान येऊ नयेत यासाठीच धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाचा ती पुरस्कार करते. आज धर्माच्या पायावर राष्ट्राची उभारणी करू इच्छिणाऱ्या फुटीर व जातीयवादी संघटना देशाच्या विकास कामात अडथळे आणत आहेत. छात्रभारतीला या देशविघातक शक्तिशिही लढा द्यायचा आहे. त्यासाठी जनजागरण करायचे आहे. आधुनिकीकरणाची प्रक्रिया जितक्या लवकर व वेगाने समाजात चालू होईल तेवढ्या जास्त वेगाने ही दरी बुजण्यास मदत होईल. यासाठी छात्रभारतीची स्वत:ची काही तत्त्वे व कार्यक्रम आहेत.

(१) जातीय तेढ व धर्माधर्मातील वैमनस्य वाढवणाऱ्या समाजातील सर्व प्रकारच्या संघटनांना, उपक्रमांना जागृत समाज व सरकार यांच्या मदतीने छात्रभारती कडवा विरोध करत राहील.

(२) अस्पृश्यता पाळणे हा एक मोठा कलंक आहे असे मानून त्याविरूद्ध काही प्रत्यक्ष कार्यक्रम छात्रभारती हातात घेईल.

(३) समाजातील धर्मात, जातीत ज्या कारणाने परस्परांबद्दल दुजाभावनिर्माण होतो. त्या कारणाबद्दल त्या समाजातील तरूण पिढीला समजावून सांगण्याचा प्रयत्न छात्रभारती करील. विधायक मार्गाने सर्व धर्मीय जातीय लोक एकत्र येऊन राष्ट्रीय एकतेचा आणि मानवतेचा समान धागा गुंफण्यासाठी छात्रभारती प्रत्यक्ष कार्यक्रम आयोजित करील.

(४) घटनेने सर्वांना समान कायदा लावावा ही छाभारतीची भूमिका राहील.

(५) सर्व धर्मांना वैयक्तिकरीत्या स्वत:च्या मन:शांतीसाठी अथवा आध्यात्मिक विकासासाठी धार्मिक आचारण करण्यास हरकत नाही. दुसऱ्याच्या धार्मिक भावनांचा आदर केला जाईल. सार्वजनिकरित्या अथवा सरकारीरित्या धर्मविधीचे आचरण (कर्मकांड) (उदा. सरकारी रस्त्याचे भूमिपूजन इ.) टाळले जावे ही छात्रभारतीची भूमिका राहील. ही श्रद्धा छात्रभारतीच्या कार्यकर्त्यात रूजविणे थोडे अवघड असले तरी छात्रभारती त्यासाठी प्रयत्नशील राहील.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

थोडक्यात सामाजिक विवेकाचा पाया धर्म हा न राहाता मानवतावादी आणि समाज धारणेसाठी सुसंगत आवश्यक असा दृष्टीकोण राहावा म्हणून जाणीवपूर्वक सामाजिक जबाबदारीची कल्पना समाजाला विशेषतः तरूणांना यावी यासाठी छात्रभारती प्रयत्नशील राहील. (उदा. चोरी करणे हे धर्मात पाप सांगितले म्हणून करू नये असे नव्हे तर दुसऱ्याने कष्टाने कमवलेल्या पैशाचा हा अपहार चूक आहे ही जाणीव निर्माण करणे)

विज्ञानाभिमुख दृष्टिकोण

प्रतिगामी शक्ती देशातील जवळ–जवळ सर्व प्रमुख शक्तीचा ताबा घेऊ पहात आहेत. या देशातील बहुसंख्य जनता ही निरक्षर, अडाणी, अंधश्रद्ध आणि धर्मभोळी आहे. ज्या गोष्टींना वैज्ञानिक आधार नाही अशा अनेक गोष्टीच्या साह्याने या देशातील जनतेवर प्रभुत्व गाजविणे प्रतिगामी शक्तींना सोपे जात आहे. स्वतःचे हितसंबंध सुरक्षित राखण्यासाठी भरल्यापोटी मानसिक शांतीची तहान लागलेला सुशिक्षित श्रीमंत वर्ग हा अंधश्रद्ध कल्पनांचा प्रभाव वाढावा यासाठीच मदत करीत आहे. समाजातील मूलभूत समस्या लक्षात घेऊन त्या वस्तुनिष्ठपणे सोडविणे याचा विसर पाडला जात आहे. मानसिक उन्नती सर्वांनाच हवी असली तरी त्या नावाखाली चाललेल्या या भोंदूगिरीला विरोध करणे आवश्यक आहे. कर्मविपाक सिद्धांत व पुनर्जन्म कल्पना ही या सर्व विचारांच्या मुळाशी असलेली गोष्ट आहे. या जन्माच्या दुःखाचे मूळ या आधीच्या जन्मात आहे. असे सांगितले की, या जन्मातील दारिद्र्याचे दुसरे कारण शोधावयास नकोच आणि पर्यायाने स्वतःच्या हितसंबंधाना धक्काही लागावयास नको. या जन्मी पुण्य केले की पुढच्या जन्मी फळ मिळणार या आशेवर जगायचे म्हणजे कर्तृत्वाला कोठे आवाहनच नाही. कारण फळ मिळणार पुढच्या जन्मी. त्यातही पुण्य याची व्याख्या काय? तर ब्राम्हण भोजने घाला, त्यांचे पाय धुऊन प्राशन करा, त्याला गोदान करा, गोमुत्र प्राशन करा. यासारख्या प्रतिगामी गोष्टी. अशी अनेक उदाहरणे दाखवता येतील. येथल्या दुःखाचे मूळ येथील अन्याय समाज रचनेतच आहे, ते तू शोध व त्यात बदल कर हे तरूणांना समजावणे आवश्यक आहे.

आजचे युग विज्ञानाचे युग आहे. प्रत्येक क्षेत्रात विज्ञानाच्या कसोटीवर घासून पुसून अशा गोष्टी घेण्याची तयारी तरूण पिढीने दाखविलेली पाहिजे. धर्मभेद, जातीभेद, त्यातून उद्भवणाऱ्या दंगली, अस्पृश्यावरील व स्त्रियांवरील अत्याचार, वाढती लोकसंख्या या आव्हानांना समर्थपणे सामोरे जाऊन साधु, संत, स्वामी, बुवा, शंकराचार्य त्यांचे यज्ञयाग या प्रत्येक बाबतीत काळजीपूर्वक तपासणी करून त्यांची भोंदुगिरी वेशीवर टांगणे आणि समाजाला या दैववादापासून परावृत्त करून विज्ञानवादला लावणे, सर्व धार्मीक वादांवर हे उत्तर आहे की, लोकांनी धर्माच्या पलीकडे जाऊन जीवनाकडे पाहण्याचा विवेकी व शास्त्रीय दृष्टीकोन अंगिकारला पाहिजे यासाठी छात्रभारती विज्ञानाभिमुंखतेचा स्विकार करते.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

राष्ट्रवाद

समाजवादाची मूलभूत प्रेरणा ही मानवतावादी असली तरी सध्याच्या परिस्थितीचा विचार करता आंतरराष्ट्रीय एकत्वाच्या भावना व राष्ट्रवादी निष्ठा यामध्ये छात्रभारती प्रथम राष्ट्राचा विचार करील. हा देश स्वतंत्र सार्वभौम राहावा यासाठी इतर कोणत्याही गोष्टीचा त्याग करण्यास तरूण पिढी तयार करावी लागेल. आक्रमक–राष्ट्रांना छात्रभाती आपला शत्रू समजे. राष्ट्रवाद याचा अर्थ सर्व धर्माच्या लोकांनी, सर्व प्रांताच्या लोकांनी आपापले वैशिष्ट्य ठेवूनही आणि व्यक्तिस्वातंत्र्य मानूनही या देशाचे स्वातंत्र्य आणि त्यासाठी कमवावे लागणारे सामर्थ्य याला आपली निष्ठा प्रथम वाहिली पाहिजे. हा राष्ट्रवाद जातीधर्मातीत, विज्ञानाभिमुख, दलितांना सर्वांगिण विकासाची संधी देणारा, लोकशाही समाजवाद देशात अस्तित्वात आला तरच चांगल्या प्रकारे रूजेल, वाढेल ही छात्रभारतीची श्रद्धा आहे.

सिंहावलोकन व वाटचाल

भारताच्या संदर्भात आपल्यापुढे युवक चळवळीचे दोन कालखंड स्पष्ट दिसतात. एक स्वातंत्र्यपूर्व काळ व दुसरा स्वातंत्र्य संपादनानंतरचा काळ. स्वातंत्र्यपूर्व काळातील साहसी आव्हानाबरोबरच परकीय राजवटीपासून देशाला स्वातंत्र्य करण्याचे ध्येय हे देखील सहजपणे आकृष्ट करणारे होते. हे आव्हान समर्थपणे पेलून स्वातंत्र्य चळवळीतील आणला वाटा युवकांनी उचलला पण हे ध्येय अंतिम नव्हते. तर भारतीय जनतेला आर्थिक, सामाजिक व राजकीय न्याय मिळवून देणाऱ्या समाज रचनेकडे नेणाऱ्या मार्गावरचा तो एक महत्वाचा टप्पा होता याची जाणीव आम्हाला राहिली नाही. स्वातंत्र्योत्तर काळात आपले प्रश्न शासन किंवा सत्तारूढ पक्ष सोडवेल या आशेने परिवर्तनाच्या चळवळीस काहीसे शैथिल्य आले. इकडे शासन मात्र काही वर्गाचे, गटाचे हितसंबंध सांभाळण्या पलिकडे काही करू शकले नाही आणि स्वांतंत्र्यपूर्व काळापेक्षाही स्वतंत्र भारताच्या कालखंडात परिवर्तनापुढे अधिक बिकट अशी समस्या उभी राहिली.

१९६० नंरतच्या १५ ते २० वर्षाचा काळ या दृष्टीने महत्वाचा आहे. या काळात महाराष्ट्रात बाहेर गुजराथ, बिहार, इत्यादी राज्यात युवक उत्स्फूर्तपणे स्वयंनेतृत्वाने काही समस्या सोडविण्यासाठी सघर्षाचा पवित्र घेऊन पुढे आल्याचे दिसते. महाराष्ट्रात तर युवक चळवळीने संघटना मधून काम करत राहिला आणि जरा बारकाईने पाहिले तर दिसेल की, हा युवक प्रामुख्याने विद्यार्थी वर्गच होता. जरी यातील विद्यार्थी वर्गाचे प्रमाण एकूण विद्यार्थी संख्येच्या मानाने कमी असले तरीही महाराष्ट्रात युवक चळवळ खऱ्या अर्थाने विद्यार्थी चळवळच होती.

या काळात जी आंदोलने झाली ती प्रामुख्याने स्थानिक प्रश्नावरच. नामांतर, कॅपिटेशन फी, अभ्यासक्रमात सुधारणा, राखीव जागा इ. प्रश्नांवर महाराष्ट्रात आंदोलने झाली. परंतु ती कधीच व्यापक पायावर उभी राहू शकली नाहीत. भ्रष्टाचार विरोधी किंवा चुकीच्या शिक्षण पद्धतीत बदल यासारख्या व्यापक बदलास ती आंदोलने हात घालू शकली नाहीत. निव्वळ

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

विद्यार्थ्यांचा असंतोष ह्यातून व्यक्त झाला. इतर राज्यातही थोड्याफार फरकाने हीच अवस्था होती. १९७४ मधील गुजराथ व बिहार–मधील आंदोलनाचा काय तो अपवाद.

हे असे होण्यामगो व्यापक विचारसरणीचाच अभाव. राजकीय पक्षाशी बांधिलकी व अनुभवी नेतृत्वाचा अभाव ही कारणे होती. आणीबाणीच्या काळात या सर्वच संघटनांची ताकद क्षीण बनली आणि पुन्हा एकदा आजवर तिला शैथिल्य आले. जोवर युवक पुन्हा संघटितरित्या पुढे येत नाही तोवर आपल्या समोरील समस्या व परिवर्तनाची जबाबदारी वाढतच जाणार आहे.

आजचा युवक

आजची परिस्थिती काय आहे? युवकांना ही सामाजिक जाणीव आहे काय? त्यांच्यामध्ये परिवर्तनासाठी आत्मविश्वास आहे का? याबाबींचा विचार करता या प्रश्नांची उत्तरे निराशजनकच मिळतात.

सर्वच क्षेत्रातील वाढती स्पर्धा, एकाच वर्गतील वाढते दारिद्य व आर्थिक शोषण यामुळे एक तर युवक शिक्षणापासून वंचित राहिले आहेत. जे काही शिकले ते देखील मिळेल्या कामधंद्यामागे लागले आहेत. किंवा बेकार होऊन कामाच्या शोधात फिरत आहेत. कामाची हमी नाही. घरच्या जबाबदाऱ्या यामुळे त्यांची सर्व बाजूनी कोंडी होत आहे आणि अशा परिस्थितीतून वैफल्य येऊन व्यसनाधिनतेच्या किंवा गुंडागिरीच्या मार्गास लागत आहे. तसेच प्रतिगामी संघटना आपल्या स्वार्थासाठी त्यांच्या मानसिक असहाय्यतेचा फायदा उठवून त्यांची शक्ती वापरत आहेत.

विद्यार्थी युवकांची परिस्थितीही फारशी वेगळी नाही. अभ्यास व अभ्यासेत्तर उपक्रमात त्याचा थोडाफार सहभाग आहे पण त्यांच्यात ध्येयवाद रूजू शकत नाही. सामाजिक जाणीवा नाहीत. त्यांच्यासमोर, योग्य आदर्श नाहीत. परिस्थिती योग्य मार्गाने बदलवून टाकता येऊ शकते असा विश्वास नाही अशा रितीने युवक स्वत: एक समस्या बनला आहे.

याला जबाबदार कोण?

एक तर या परिस्थितीस जबाबदार आहे ती मूल्यांची घसरण झालेला समाज. आज लोकावरील जुन्या मूल्यांचा प्रभाव कमी होत चालला आहे व हा एक संक्रमणाचा काळ आहे व अशा परिस्थितीत आधुनिक मूल्यांच्या अधारे समाज परिवर्तन घडवून आणावयाचे असेल तर सर्व लोकांत सामाजिकता मूल्य बनवावे लागेल. युवकांच्या ह्या परिस्थितीस दुसरे कारण आजची कुटुंबव्यवस्था. आपल्या मुलांना कुटुंबापुरताच अथवा फार तर जाती पुरत्याच निष्ठा जोपासते. या परंपरेने आजची मुले देखील न कळत व्यक्तिवादी व जातीयवादी बनत आहे. याला हे तिसरे महत्वाचे कारण म्हणजे सभोवतालचे वातावरण. सध्या आपल्या देशातील वातावरणात अशी हवा पसरली आहे की, या समाजात विषमता आहे, भ्रष्टाचार आहे. मूल्य व आदर्शांना किंमत नाही.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अशा परिस्थीतीमुळे युवकांना आपल्या भविष्याबाबत उदासीनता वाटते. या सर्वांच्या परिणामातून आजचा युवक काहीसा स्वार्थी, अगतिक व अकाली प्रौढ झाला आहे.

अशा परिस्थितीतही ज्या काही संस्था विधायक व रचनात्मक काम दिर्घकाळ करत आहेत. त्यात अनेक तरूण स्वतःला झोकून देत आहेत. थोड्याफार प्रमाणात का होईना पण ठिकठिकाणा काही युवक स्वतःच्या हिमतीवर, लौकिक सुखाकडे पाठ फिरवून तळागाळातील लोकांबरोबर कामासाठी उभे आहेत. प्रस्थापिताविरूद्ध खंबीरपणे लढा देत आहेत. पण ही कामे अगदी विस्कळीत स्वरूपात असल्याने व त्यास सर्वसमावेशक पाया नसल्याने तितकी प्रभावी ठरू शकत नाहीत.

या साऱ्या पार्श्वभूमीवर छात्रभारती व्यापक चळवळीच्या स्वरूपात समाजाच्या मुख्यतः शैक्षणिक क्षेत्राच्या माध्यमातून विद्यार्थी व प्राध्यापकांसमोर येत आहे. सहभाग–शिक्षण– समता ही छात्रभारतीची त्रिसूत्री आहे. विद्यार्थी व शिक्षक हे समाजाचे महत्वाचे घटक आहेत. त्यात संक्रमणाच्या उंबरठ्यावर उभा असलेला युवक अत्यंत महत्वाचा आहे. त्यात सामाजिक जाणीव निर्माण करून त्यांने सामाजच्या सुख–दुःखात सहभागी होणे छात्रभारतीला अपेक्षित आहे व ती त्या दृष्टींने सातत्याने ठोस उपक्रम राबवीत आहे. शिक्षण हा एकूणच छात्रभारतीच्या कार्यपद्धतीचा पाया राहील. याठिकाणी शिक्षण म्हणजे केवळ पुस्तकी ज्ञान किंवा विद्यालयात दिले जाणारे शिक्षण अभिप्रेत नसून एक जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन अंतभूत आहे. राष्ट्राच्या उज्जवल भवितव्यासाठी येथील जनतेत राष्ट्रप्रेम, सामाजिकता व इहवादी दृष्टीकोन रूजला पाहिजे. त्यासाठी लोकशिक्षण हाच पर्याय असू शकतो त्याचा छात्रभारती पुरस्कार करते.

वैयक्तिक विकास व समताधिष्ठित समाज परिवर्तन साध्य करण्याची क्षमता असलेली शिक्षण पद्धती छात्रभारतीला अपेक्षित आहे. असे शिक्षण समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्याचा तिचा प्रयत्न राहील. विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासाच्या दृष्टीने शिक्षणाची वाटचाल असावी. कारण अशा व्यक्तिविकासातूनच राष्ट्रविकास साधला जातो यावर छात्रभारतीचा विश्वाम आहे.

वरील विचारसरणीच्या कसदार मातीत छात्रभारतीचे रोपटे लाऊन आज अकरा वर्षे पूर्ण झाली आहेत. एक तप काम केल्यानंतर संघटनेने मूळ धरले आहे. चांगले बाळसे येऊ लागले आहे. अनेक आंदोलनाचा, शिबीराचा व संघर्षाचा इतिहास पाठीशी आहे. कोणत्याही राजकीय पक्षाशी बांधिलकी न मानता पण राजकारणाचा अभ्यास करणारी, कोणताही रूढ धर्म न माणणारी पण मानवता धर्माचा पुरस्कार करणारी, प्रथम आपल्या कर्तव्याचे पालन करणारी, अंगमेहनती ग्रामीण गरीब विद्यार्थ्यांची संघटना म्हणून छात्रभारती महाराष्ट्रात नावारूपाला आली आहे.

भारतात आणि महाराष्ट्रात विद्यार्थी संघटना काही कमी नाहीत. पण अशा बहुसंख्य विद्यार्थी संघटना कोणत्याणा कोणत्या राजकीय पक्षाला बांधिल आहेत. अथवा कुठल्या तरी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

धर्माचा विचार प्रमाण माणून झापडबंद पद्धतीने काम करीत आहेत.त्यांना आपला स्वतःचा चेहराच नाही. छात्रभारतीने आपली अंगमेहनती, ग्रामीण, गरीब विद्यार्थ्यांची संघटना म्हणून प्रतिमा जाणीवपूर्वक जोपासली आहे. कोणत्याही साखर कारखाना अथवा राजकीय पक्ष पाठीशी नसताना संघटनेचे काम चालते कसे? असा प्रश्न बहुतेक लोक विचारतात. विकेकशील समाजमन हा संघटनेचा कामाचा खरा आधार आहे. याच उर्जेवर संघटनेने अनेक लढे लढविले, त्यांची प्रेरणा आणि प्रोत्साहन हाच आमच्या विकासाचा धागा आहे.

यशस्वी आंदोलने

संघटनेचा एक तपाचा काळ मोठा वाटत असला तरी संघटनेच्या जीवनातील हा अल्प काळ आहे. तरी पण छात्रभारतीने अनेक आंदोलने छेडली अन् तडीस नेली. दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांना फी माफी मिळावी म्हणून संघटनेने यशस्वी आंदोलन केले पण तेवढ्यावरच न थांबता काही दुष्काळग्रस्त तालुके निवडून तेथे खेड्यातून परीक्षेसाठी येणाऱ्या दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी जेवण व राहण्याची व्यवस्था केली. नाशिक जिल्ह्यात सिन्नर तालुक्यात एकमूठ धान्याचा कार्यक्रम राबविला म्हणजे संघटनेच्या कार्यकर्त्यांनी सिन्नर तालुक्यात घरा–घरातून एक–एक मूठ धान्य गोळा केले याप्रमाणे अकरा क्विंटल धान्य या कार्यक्रमासाठी मिळविले तसेच मुंबईतून याच पद्धतीने दोन क्विंटल तांदूळ गोळा केला यातून परीक्षेला आलेल्या मुलांच्या जेवणांचा प्रश्न सोडविला. बी.एड. विद्यार्थ्यांनी देणग्या परत द्या. अन् परीक्षा घ्या म्हणून लढा उभारला तेव्हा छात्रभारतीनंच आधार व नेतृत्व दिलं. जमीन व दागिने गहाण टाकून बी.एड. साठी प्रवेश मिळविलेल्या या गरीब मुला–मुलींच्या आंदोलनानं नव्या शिक्षण धोरणालाच आव्हान दिले. अनेक बुद्धीवंत अन् संघटना विरोधात असताना उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालल साथ दिली. अखेर बोगस संस्था बंद पडल्या. मराठवाडा विद्यापीठाने बी.एड. प्रश्नांच्या संदर्भात छात्रभारतीचे संस्थापक सल्लागार डॉ. ना.य. डोळे यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त केली. डॉ. डोळे समितीच्या अहवालानंतर मराठवाडा व कोकणातल्या विद्यार्थ्यांना देणग्या परत मिळाल्या. तसेच महाराष्ट्र शासनाला कॉं पिटेशन फी विरोधी कायदा करावा लागला. रात्रशाळेतील शिकणाऱ्या अंगमेहनती विद्यार्थ्यांना छात्रभारतीनंच संघटित केले. सरकारनं गरीब मुलांच्या या शाळा बंद करण्याच्या इराद्यानं अनुदान कपातीचा फतवा काढला. तेव्हा छात्रभारतीच्या हाकेला प्रतिसाद देऊन मुंबईतील वीस हजार रात्रशाळा विद्यार्थी रस्त्यावर आले. मुंबईच्या इतिहासातला तो पहिला रात्र मोर्चा. मोर्चानं मंत्रालयाची दारं रात्री पुन्हा उघडायला लावली. सरकार अखेर झुकलं. अनुदान कपातीचा फतवा मागे घेतला अन् सर्व रात्रशाळा विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके मोफत देण्याचं मान्य केलं. तीस हजार विद्यार्थ्यांना पंधरा लाख रूपयांची पुस्तके वाटली गेली. विनाअनुदानित शाळा–महाविद्यालयाचा प्रश्न छात्रभारततीनंच ऐरणीवर आणला. विनाअनुदान विरोधी– परिषद व पन्नास हजारांचा प्रचंड मोर्चा संघटित करून शिक्षकांच्या लढ्याला समर्थ साथ दिली. मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रमाणपत्राच्या नव्या अटीमुळे वैद्यकीय व अभियांत्रिकी शाखेतील राखीव जागा संकटात आल्या. तेव्हा छात्रभारतीनंच पाच विद्यार्थ्यांचे प्रवेश मोकळे करून दिले. पॉलिटेक्निक विद्यार्थ्यांच ए. टी. के. टी. चा प्रश्न, आय. टी. आय. विद्यार्थ्यांचे अनेक प्रश्न कोकणातील विद्यार्थ्यांच्या अनेक अडचाणी व मुंबई विद्यापीठाच्या उपकेंद्राचा प्रश्न छात्रभारतीनेच धसास लावला. किमान कोशल्यावरील आधारीत शैक्षणिक प्रश्नासाठी नागपूर अधिवेशनावर मोर्चा नेला. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाची मागणी व त्यासाठी आंदोलन छात्रभारतीनेच केले. तसेच नांदेड विद्यापीठाची मागणी सातत्याने संघटनेने केली आहे. छात्रभारतीच्या अथक प्रयत्नामुळेच या दोन्ही विद्यापीठांची निर्मिती झाली असे म्हटले तर ते वावगे ठरू नये. मराठवाड्यातील विद्यार्थ्यांना अन्य विभागातील काही विद्यापीठांत प्रवेश मिळविताना दहशतवादाचे बळी व्हावे लागले पण कोल्हापूरात असे घडले तेव्हा छात्रभारतीच्याच कार्यकर्त्यांनी त्यांना संरक्षण दिलं आणि प्रवेशही मिळवून दिला. इ.स. १९८६ मध्ये सातारा येथे महाराष्ट्र व्यापी धर्मांधता निमूर्लन परिषद घेतली व चार हजार युवक युवतींनी राष्ट्रीय एकात्मतेची शपथ घेतली. प्राथमिक शिक्षण हा छात्रभारतीचा जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. कारण तेथे बहुजनांची मुले शिक्षण घेतात. यासाठी संघटनेने महाराष्ट्रातील पाचशे प्राथमिक शाळांची पहाणी केली. पहाणीत किमान चौथी पर्यतच्या विद्यार्थ्याला मूळाक्षरे व शंभरपर्यंतचे अंकज्ञान नाही हे समजले. त्यासाठी संघटनेने "चौथीच्या विद्यार्थ्याला साक्षर करा" अशी घोषणा दिली. विद्यार्थी क्षेत्रात काम करायचे तर विद्यार्थ्यांचा रोष पत्करून चालत नाही तरीही त्यांच्या भल्यासाठीच संघटनेने "कॉपी करणार नाही, करू देणार नाही" अशी घोषणा देऊन दरवर्षी परिषदा घेतल्या जातात. अज्ञानामुळे बहुजन सामाजाचीच बहुसंख्य मुले कॉपी करतात व आपल्या पायावर दगड मारून घेतात हे त्यांना परिषदातून सांगितले जाते. कॉपीचा प्रश्न ज्वलंत असताना काही शाळा– महाविद्यालयातून प्राध्यापक–शिक्षक अजिबात शिकवत नाहीत, प्राक्टिकल घेत नाहीत, खाजगी शिकवण्या घेतात व परीक्षेत कॉपी पुरवितात अशा तक्रारी वाढत्या प्रमाणात संघटनेकडे येत आहेत. प्राध्यापक शिकवत नाहीत म्हणून काही विद्यार्थीही वर्गात बसत नाहीत असे हे दुष्ट चक्र आहे. हे दुष्टचक्र भेदण्यासाठी संघटनेला "शिका व शिकवा" ही चळवळी हाती घ्याची लागली आहे. बेकारीच्या प्रश्नासाठी ३० हजारांचा मोर्चा ३१/१०/९४ रोजी मंत्रालयावर नेण्यात आला. तर १८,१९,२० नोव्हें. ९४ रोजी पुणे, महाराष्ट्र, पातळीवरील युवती शिबीर पार पडले.

शैक्षणिक कार्याशिवाय सामाजिक प्रश्नांच्या बाबतीत संघटना आघाडीवर राहिली आहे. वासनाकांड, जातीय– धार्मिक दंगली यावेळी संघटनेने न्याय भूमिका घेतली आहे. मराठ्वावातील उस्मानाबाद आणि लातूर जिल्ह्यात भूकंप झाला. हजारो निरपराध जीव गाडले गेले तेव्हा जगातून लोक मदतीसाठी धावले. या नैसर्गिक आपत्तीच्या प्रसंगी छात्रभारती स्वस्थ बसणे शक्य नव्हते. भूकंप झालेल्या क्षणापासून संघटना भूकंपग्रस्त भागात या क्षणापर्यंत कार्यरत आहे. पहिल्या आठ दिवसात स्थानिक छात्रभारतीने शैक्षणिक पहाणी केली. नंतर महाराष्ट्र आरोगय मंडळ, पुणे यांच्या मदतीने उमरगा तालुक्यात भूकंपग्रस्त तीस गावांत

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

"भूकंपग्रस्त युवा दक्षता समित्या" स्थापन केल्या. या समितीमध्ये गावातील सर्व जाती–धर्मांच्या युवक–युवतींचा समावेश जाणीवपूर्णक करून घेतला. या समित्यांनी ('Watch Dog') ची भूमिका बजावली व जनतेला न्याय मिळवून दिला. गावात पडझड झाली पण मनुष्य हानी नाही म्हणून काही गावांचा शासनाने यादित समावेश केला नाही. अशा ४५ गावांच्या ४००० लोकांची उपेक्षित भूकंपग्रस्त परिषद घेण्यात आली. महाराष्ट्र आरोग्य मंडळाच्यावतीने अल्पखर्चात भूकंपरोधक घरे बांधून देण्याचा प्रकल्प लोहारा व विलासपूर पांढरी येथे चालू आहे. याठिकाणी ९० घरे बांधली आहेत. उस्मानाबाद येथे एका घराचे काम चालू आहे याचे सर्व व्यवस्थापन छात्रभारती करत आहे. जागतिक बँकेच्या प्रतिनिधी समोर भूकंपग्रस्त भागातील समस्या सातत्याने मांडण्याचे काम छात्रभारतीचे ज्येष्ठ कार्यकर्ते मराठवाडा विभागाचे माजी प्रमुख श्रीशैल्य बिराजदार यांनी केले. तर घरबांधणी प्रकल्प संघटनेचे सल्लागार सुभाष वारे यांच्या मार्गदर्शनाखाली उस्मानाबाद जिल्हाध्यक्ष श्री. संभाजी शिंदे पहात आहेत.

नव्या लढयाची हाक

१९८६ मध्ये जाहिर झालेल्या कै. राजीव गांधी यांच्या नव्या शैक्षणिक धोरणला छात्रभारतीने प्रथम पासूनच विरोध केला. असे शेकडो विरोध मोडित काढून नवीन शिक्षण विषयक धोरण राबविले जात आहे. गरिबांच्या मुलांचे शिक्षणच बंद करण्याचा प्रयन नव्या शिक्षण विषयक धोरणाने चालविला असताना गरिबांच्या पोरांनी स्वस्थ बसून चालणार नाही! सर्वांनीच शिकण्याची गरज काय? अशी नवी टूम (आतल्या गोटातील भाषा) सुरू झाली आहे. प्राथमिक शिक्षणाची प्रचंड दुर्दशा चालूच आहे. कॅपिटेशन फीवर बंदी आणण्याची भाषा करीत असतानाच विना अनुदानाची संस्कृती जाणीवपूर्वक वाढविली जात आहे. सर्वांसाठी समान शिक्षण याऐवजी गुणवानासाठी उच्चशिक्षण आणि पैसा फेंका–शिक्षण घ्या, या नव्या घोषणा फी वाढीच्या प्रस्तावाबरोबर रूढ होत आहेत. गरिबांच्या पोरांची चहुबाजूने अशी नाकेबंदी सुरू असताना त्या विरोधात आता त्यांनाच उभे राहावे लागणार आहे. छात्रभारती या नव्या लढ्याचा एल्गार घेऊन येत आहे.

आजच्या युवा पीढी समोरील सर्वांत भीषण समस्या रोजगाराची आहे. प्राप्त वेतनदाराला काम करण्याची शारीरिक व मानसिक तयारी आहे पण कामकरण्याची संधीच नाही. ही केवढी भीषण परिस्थिती म्हणायची! विकसित देशात बेकारीची समस्या आ वासून उभी आहेच, पण त्यापेक्षा विकासोन्मुख देशीतील तिचे स्वरूव विक्राळ आहे! उदा. भारतात १९५६ मध्ये बेकारांची संख्या ५३ लक्ष होती. १९९३ मध्ये ३ कोटी ६२ लक्ष इतकी झाली. याचा अर्थ ३४ वर्षात भारतातील बेकारी ५०० % वाढली आणि तीही भारताने या काळात आपल्या सात पंचवार्षिक योजनात आर्थिक विकासाचा कार्यक्रम राबवून! बेकारांची वरील आकडेवारी रोजगार विनिमय केंद्रात नोंदविलेली आहे. परंतु ज्या बेकारांनी आपली नावे रोजगार विनिमय केंद्रात नोंदविली नाहीत. त्यांचा विचार केला तर तज्ज्ञांच्या मते १९९३

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मध्ये भारतात बेकारांची संख्या सहा कोटींच्या घरात जाऊन पोहोचते. भारत सरकारने डंकेल प्रस्ताव स्किारल्यामुळे आणि खाजगीकरण व खुले आर्थिक धोरण स्विकारल्यानंतर या बेकारीत भरच पडणार आहे. हे आव्हान छात्रभारती समोर आहे.

आपण बेकार आहोत आणि याला कारण राखीव जागा अथवा मंडल आयोग जबाबदार नसून प्रचलित अर्थव्यवस्था आणि तंत्रविज्ञान जाबाबदार आहे.ह्याची जाणीवच ग्रामीण भागात फारशी नाही. गतजन्मीचे पाप म्हणून हे सर्व सोसतात हे आश्चर्य नसून त्यांना शिकले– सवरले लोक तसे सोसू देतात हे खरोखरच आश्यर्च आहे ! नवी अर्थव्यवस्था व समुचित तंत्रविज्ञान निर्माण केल्या शिवाय या भीषण प्रश्नाला हातसुद्धा लागणार नाही.

जुन्या काळात मुलगा का शिकतो असे विचारले तर नोकरीसाठी, असे उत्तर मिळे. आता का शिकतो विचारले तर सांगितले जाते की, नोकर मिळत नाही म्हणून ! काळ वेगाने बदलत आहे. त्यासाठी छात्रभारतीने आपली एक मागणी बुलंद केली पाहिजे. कामाचा अधिकार मूलभूत अधिकारात समाविष्ट करण्याची मागणी केली पाहिजे. कामाचा अधिकार मान्य करायचा तर आजची अर्थव्यवस्थेची भ्रष्ट चौकट बदलावी लागेल. यासाठी खंबीर पण विवेकी मनाची गरज आहे.

आजच्या भारतीय युवा मनाचे चित्र छिन्न भिन्न आहे. शहरी युवा,ग्रामीण युवा, विद्यार्थी युवा, विद्यार्थी तर युवा पुरूष, युवा, महिला युवा, कर्मचारी युवा, बेकार युवा, विविध राजकीय पक्षाशी–धर्माशी संबंधीत युवक संघटना तसेच जात, धर्म, वंश, भाषा यामुळे युवक विभक्त झालेला आहे. भारतीय युवा जीवनाचे हे संदर्भ लक्षात घेतले तर भारतीय युवाशक्ती संघटित करणे हे कर्तृत्वाला मोठेच आव्हान आहे. ते छात्रभारतीला समर्थपणे पेलावे लागेल.

तर दुसऱ्या बाजूला माणसांचे प्रश्न तीव्र बनत असताना राजकर्ते आणि शोषकवर्ग जात, धर्म व पंथाच्या नावाखाली गरीबांमध्ये भांडणे लावत आहेत. त्यांना गरिबांची एकजूट नको. पण भ्रष्टाचारी शासनकर्ते आणि जातीयवाद्यांचा हा डाव गरिबांच्या श्रमणाऱ्यांच्या एकजुटीनेच हाणून पाडता येईल! पण या दुर्बल अंतरमेहनती वर्गाला संघटित करणारा लोकशाही– समाजवादी पक्ष दुर्देवाने या देशामध्ये प्रभावी नाही. तो पर्यंत छात्रभारतीला शिक्षण क्षेत्रातील प्रश्नांच्या विरोधात संघर्ष करत असतानाच छात्रभारतीतून विद्यार्थी अवस्था संपून बाहेर पडलेल्या तरूणांचा एक समर्थ असा प्रभावी दबावगट तयार करून शासनकर्त्यांवर अंकुश ठेवण्याचे आव्हान स्विकारावे लागणार आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

॥ १९ ॥

परिवर्तन कोणाचे, कसले आणि कशाला ?

विश्वास नाईकनवरे

अनेक लोक गंभीर चेहेऱ्याने विचारतात की परिवर्तन परिवर्तन म्हणजे काय भनगड आहे आणि ते हवेच कशाला? त्याच्या अभावी समाज चाललाच आहे ना? मग उगाच तुम्ही लोक फुले–आंबेडकर उकरून काढून काय म्हणून आरडाओरड करत असता?

अशा भाबड्या लोकांना सांगितले पाहिजे की परिवर्तन म्हणजे जीवनदृष्टीत मूलभूत बदल हा अर्थ असून तसा तो झालेला नाही आणि तसा जबरदस्त बदल झाल्याशिवाय आपल्यापुढचे कोणतेच प्रश्न सुटणार नाहीत. स्त्रियांची घराघरातून चाललेली वेठबिगार तुम्हाला दिसत नाही का? जातीजातींच्या उच्च नीच उतरंडी व त्यामुळे जोपासला जाणारा उच्चवर्णीयांचा अहंकार उघड स्वरूपात खेड्यात आणि सुप्त रितीने शहरातल्या सुशिक्षितात आजही खुशाल नांदतो आहे हे नाकारता येईल काय? अस्पृश्य समाजातल्या सुशिक्षित, स्वच्छ आणि सुसंस्कृत मंडळींना देखील आपण आजसुद्धा मनातून जवळ केले आहे काय? अशा रीतीने माणुसकीला मुकलेल्या या समाज व्यवस्थेत समानता आणि स्वातंत्र्य कुठे आहे? उगीच नाही कवी वसंत बापट कविता म्हणून दाखवत की "स्वातंत्र्य कुठे स्वातंत्र्य ? कुणा स्वातंत्र्य?" या भयाण वास्तवाची दाहकता ज्याना प्रकर्षाने पदोपदी बोचते त्यानाच ते दुःख कळणार. बाकी इतरानी कितीही म्हटले तरी "परदुःखे शीतल" हेच खरे आहे.

परिवर्तनाच्या या प्रदीर्घ लढाईला आता चांगले लढवय्ये देखील कंटाळत चालले आहेत. फार प्रयत्नांनी फारच थोडे यश हाती लागते याची त्यांना खंत आहे. "मला आता बैद्धिक म्हातारपण आले आहे" असे निराशेचे उद्‌गार मी परवाच ऐकले. म्हणून कमरा कसून सर्व राजकीय व इतर गटात विभागलेल्या परिवर्तनवाद्यांनी एक झाले पाहिजे व परस्परात सौहार्द निर्माण करून चळवळी आखल्या पाहिजे. परंपरागत पद्धती उदाहरणार्थ लेख, पुस्तके, मासिक, भाषणे यांच्या जोडीला दृक्‌श्राव्य माध्यमांचा कुशलतेने उपयोग करून घेतला पाहिजे. रेडिओ आणि दूरदर्शन ही तर अत्यंत अभावी माध्यमे आहेत. सरकार आपल्या परीने त्यांचा वापर प्रबोधनासाठी काही प्रमाणत करते आहे. त्याला आपणही बाहेरून साथ दिली पाहिजे. खांडेकर म्हणाले होते की, मनुष्य हा काही परिस्थितीचा गुलाम नाही. तो आपल्या मनाचा गुलाम आहे. आणि मनाच्या शृंखला वाङ्‌मयच तोडू शकते. तेव्हा या वाङ्‌मयात आता तंत्रज्ञानाच्या प्रगतीनंतर नव्या साधनांचाही वापर करून नव्या आयुधांचा समावेश करून या. समाजाचे ऋण आपण लागतो. सावरकर, आगरकर अशी मंडळींनी ते मानले. आपणही आपला खारीचा वाटा उचलू या. परितर्वनाची लढाई जोमाने लढू या. माघारीला जागाच नाही.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

॥ २० ॥

समाज परिवर्तनाच्या चळवळी आणि मराठी साहित्य

प्रा. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले

प्रस्तुत लेखामध्ये महाराष्ट्रामध्ये झालेल्या समाज परिवर्तनाच्या सर्व चळवळी आणि साहित्य यांच्या परस्पर संबंधाचा आढावा घ्यावयाचा नाही. तर सामाजिक परिवर्तनाच्या चळवळींकडे मराठी लेखक कशा प्रकारे पाहातो, तसेच या चळवळींमुळे निर्माण झालेल्या समाज वास्तवाच्या संदर्भात त्याचा प्रतिसाद कसा असतो ते येथे पाहावयाचे आहे. अर्थात अशा प्रकारचा प्रयत्न करण्याअधी काही प्रश्नांची सोडवणूक करणे आवश्यक ठरते.

समाज परिवर्तनाला सामोरे जाणारे साहित्य तेवढेच चांगले किंवा श्रेष्ठ असते का? किंवा साहित्याचे श्रेष्ठत्व ठरविण्यासाठी हा एकमेव निकष मानता येईल का? याच अनुषंगाने आणखी एक प्रश्न उपस्थित होऊ शकतो. तो असा की समाज परिवर्तनामध्ये साहित्याचा वाटा कितपत असू शकतो? तसेच समाजाच्या स्थितीचा, गतीचा आणि साहित्याचा काही संबंध असू शकतो हेच ज्यांना मान्य नाही ते मीमांसक असेही म्हणू शकतील की कलाकृतीचे म्हणून एक विश्व असते आणि त्यात समाज परिवर्तनाच्या चळवळींचा संदर्भ येईलच असे नाही. म्हणजेच कलाकृतीमध्ये जे सांगितलेले नाही त्याचा संदर्भ काय म्हणून घ्यायचा असेसुद्धा ते म्हणू शकतील.

हे आणि या साखरे आणखीही काही प्रश्न निर्माण होऊ शकतात. तरीही असे म्हणता येईल की, कलाकृतीत जे सांगितले आहे, त्याच्याच परिघात विचार करणे हे एका मर्यादे पर्यंतच शक्य होते. कारण तो अनुभव व्यक्त केलेला असतो. त्याच्याशी संवादी होणारे किंवा त्या अनुभवाला अधिक भरघोस रूप देणारे इतर अनेक अनुभव घटक असू शकतात त्याचे कारण असे की वाङ्मयातून प्रकट होणारे अनुभव शेवटी मानवी जीवनातीलच असतात. आणि मानवी जीवन काही सरळ रेषेत उलगडत जाणारी बाब असत नाही. पुष्कळदा परस्पर विरोधी धाग्यांनी जीवनाची वीण अनाकलनीय होऊन जाते. एखादी घटना घडण्यासाठी किती तरी छोट्या मोठ्या घटनांचा समुच्चय त्या ठिकाणी कार्यरत झालेला असतो. म्हणून ज्या अनुभव विश्वाचे चित्रण करावयाचे आहे. त्या अनुभव विश्वातील असंख्य बाबी लेखकाला समजावून घ्याव्या लागतात. तसेच निर्मित कलाकृती समजावून घेण्यासाठीही रसिकाला असंख्य गोष्टींची जाणीव करून घेणे आवश्यक असते. उदा. दलित साहित्यातील वास्तवाचे स्वरूप समजून घ्यावयाचे असेल तर येथील पारंपारिक जटिल जातिव्यवस्था, म. फुले–म.गांधी–डॉ.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आंबेडकर यांचे कार्य स्वातंत्र्योत्तर काळातील लोकशाही व्यवस्था, वाङ्मयातल्या आणि जीवनातल्या असंख्य चळवळी या आणि यासारख्या असंख्य गोष्टी समजावून घ्याव्या लागतात किंवा शाहिरी वाङ्मय समजावून घ्यावयाचे असेल तर मध्ययुगीन सरंजामदारी समाज रचना लक्षात घ्यावीच लागते. तसेच एखाद्या कलाकृतीतून प्रकट झालेले वास्तव परिपूर्ण आहे की, नाही हे शोधायचे तर त्या वास्तवाच्या भोवतीचे इतरही काही पदर लक्षात घ्याचे लागतात. म्हणजे मग लेखकाकडून कोणते पदर सुटून राहिले आहेत किंवा कोणते पदर लक्षात घेतले असते तर अनुभवाला परिपूर्णता आली असती हेही लक्षात येऊ शकते.

म्हणून कलाकृतीचा सामग्रयाने विचार करताना कलाकृतीमध्ये काय येणे आवश्यक होते यासारख्या गोष्टींचाही विचार करावाच लागतो. म्हणून सामाजिक वास्तवाच्या निर्मितीमध्ये ज्या समाज परिवर्तनाच्या चळवळींचा फार मोठा वाटा असतो त्या चळवळींचा विचार करावाच लागतो.

२

ललित साहित्यातून सामाजिक परिवर्तनासंबंधीच्या भूमिका मांडल्या गेल्या तर परिवर्तन होते का? असाही एक प्रश्न उपस्थित होऊ शकतो. अर्थात साहित्यातून अशा भूमिका मांडल्या गेल्या अगर त्यांच्या अनुषंगाने ललितकृती निर्माण झाल्या तर एका क्षणात परिवर्तन होते असा भाबडा आशावाद बाळगणारे अनेक असले तरी ती वस्तुस्थिती असत नाही. समाज परिवर्तनाचा गाडा मोठा संथ गतीने पुढे जात असतो. पुष्कळदा या गाड्याच्या चाकाचा एक फेरा पूर्ण होण्यासाठी शतका एवढाही काळ जावा लागतो. तसेच समाज परिवर्तन प्रक्रियेमध्ये असंख्य घटक कारणीभूत होत असतात. समाज सुधारकांच्या चळवळींबरोबरच आर्थिक ताणतणाव आणि राजकीय इच्छाशक्ती हे दोन घटक समाज परिवर्तन प्रक्रियेत अतिशय महत्वाचे असतात. ही प्रक्रिया घडत असताना आधी परिवर्तनाचा उद्‌गार निघतो आणि पुढे त्याला चळवळींचा आकार येण्याची शक्ती असते. पण एवढ्याने भागत नाही. या चळवळींच्या मागे समूह शक्ती उभी राहणे आवश्यक असते. अशी समूहशक्ती उभी राहिली की राजकीय इच्छशक्ती निर्माण होते. उदा. म. जोतीराव फुले यांच्यापासून अस्पृश्यतेचा आणि स्त्रियांच्या गुलामगिरीचा प्रश्न उपस्थित झालेला आहे. या प्रश्नांसाठी पुढे अनेकांनी जागृती केली. कार्यही केले. परंतु हे प्रश्न सुटावयास प्रारंभ झाला तो स्वातंत्र्योत्तर कालखंडातच. स्वातंत्र्योत्तर कालखंडात नवी घटना आणि नवे कायदे आले. लोकशाहीच्या या नव्या युगात हे सगळेच प्रश्न सुटले पाहिजेत, असा राजकीय निश्चय झाला. म्हणजे राजकीय इच्छाशक्ती किती महत्वाची असते हेच यावरून लक्षात येईल. अर्थात विपरित दिशेने राजकीय इच्छाशक्ती जाणारच नाही असे नाही. म्हणून राजकीय इच्छाशक्तीला विपरित वळण लागू नये यासाठी त्यावर सामाजिक चळवळींचा अंकुश हवा असतो. ज्या कालखंडात सामाजिक चळवळींचा अंकुश संपतो, त्या काळातील राजकीय वास्तव भयावह रूप धारण करते. सध्याची भोवतीची परिस्थिती पुष्कळशी अशीच आहे, असे म्हणावयास हरकत नाही.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

याचा अर्थ असा की सामाजिक परिवर्तनामध्ये राजकीय इच्छाशक्तीला अतिशय महत्त्व असते. तसेच आर्थिक घडामोडीही सामाजिक परितर्वनात फार मोठा वाटा उलत असतात. किंबहुना भारतातील एकत्र कुटुंब व्यवस्थेला तडा जाण्याचे कारण बदलती अर्थव्यवस्था हेच आहे, असे दिसेल. ही गोष्ट लक्षात घेतल्याशिवाय 'पण लक्षात कोण घेतो'? या कादंबरीचे पुरेसे आकलन होणार नाही. याचा अर्थ असा की समाजात जी परिवर्तने होत असतात त्यात सामाजिक चळवळी, राजकीय इच्छशक्ती, आर्थिक स्थिती–गती हे आणि यासारखे असंख्य घटक कारण होत असतात. मग यात वाङ्मयाचा वाटा किती? वाङ्मयाची स्वायत्तता घोषित करणारे असेही म्हणतील की वाङ्मयामुळे कसले परितर्वन होते? एकच प्यालाचे हजार प्रयोग पाहूनही दारू न सोडणारे आढळतीलच. तेव्हा वाङ्मयाचा मुद्दा या पद्धतीने सोडविता येणार नाही. वाङ्मय ही संवेदन,ा भावना आणि विचार यांच्या आधाराने उभी राहणारी बाब आहे. कलावंत या सगळ्याच बाबींची अशा पद्धतीने निर्मिती करतो की, वाचकाच्या मनावर त्याचा परिणाम व्हावा. पुष्कळदा एखादी परिणामकारक कलाकृती पाहून वाचक अंतर्मुख होतो. जीवनासंबंधी विचार–पुनर्विचार करायला लागतो. त्याला वाटायला लागते की, अरे, आपण या दृष्टीने जीवनाचा कधी विचारच केला नव्हता. या पद्धतीने जीवन चांगले समजून घेता येते की! याचा अर्थ असा की वाङ्मयाचा मनावर होणारा परिणाम मोठा संथ असा असतो. पुष्कळदा एखादी कलाकृती वाचकाला कृतीप्रवण करीत नसली तरी कृतीप्रवणतेची मनोवस्था निर्माण करीत असते. फुलाचा सुगंध सहजपणे आणि हळूहळू हवेमध्ये विरून जावा आणि तो नेमका कुठे आहे हे कळूही नये अशी काहीशी वाङ्मयाच्या परिणामाची अवस्था असते. महाराष्ट्रापुरते बोलायचे तर महाराष्ट्र हा भारतातील इतर प्रातांच्या तुलनेत पुष्कळ उदारमतवादी, पुरोगामी आहे असे म्हटले जाते. स्त्रियांना पुष्कळ स्वातंत्र्य आहे (असंख्य हुंडाबळी जात असले तरी) असेही म्हटले जाते. दलितांची परिस्थिती पुष्कळ सुधारली आहे, असेही सांगितले जाते. अर्थात या साऱ्याच म्हणण्यात पुष्कळ तथ्य आहे. परंतु हे का झाले? याचा शोध घेताना समाज प्रबोधनाला आणि इतर गोष्टींना आपण महत्त्व देत असलो तरी महाराष्ट्रात ही जी परिवर्तन प्रक्रिया सुरू झाली त्या प्रक्रियेला लोकमानस अनुकूल व्हावे असा अल्प का होईना प्रयत्न वाङ्मयातून–वाङ्मयाच्या संस्कारातून झाला आहे हे मात्र नक्की. विशेषतः केशवसुत, हरिभाऊंच्या काळामध्ये आणि स्वातंत्र्योत्तर काळामध्ये असे दिसेल की साहित्याचा एक परिणाम जनमानसावर नक्कीच झाला आहे. मराठीत वाचकांची संख्या किती हा प्रश्न बाजूला ठेवला तरी असे दिसेल की विविध समाज घटकांमध्ये सौहार्दाचे वातावरण निर्माण करण्यात साहित्याच्या संथ संस्कारांचा वाटा आहेच हे कबूल करावे लागते. अर्थात अशा संस्कार करणाऱ्या वाङ्मय कृती कमीच असतात. मराठीमध्ये त्या अधिकच कमी का आहेत याचा विचार पुढे करावयाचा आहेच.

अर्थात समाज परिवर्तन चळवळ असो की, समाजात घडणारी एखादी घटना असो, त्यावर लेखकांनी एखादी कलाकृती त्वरित निर्माण करावी अशी कधी अपेक्षा असत नाही.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

युद्ध सुरूझाले की समरगिते निर्माण होतात. युद्ध चालू असे पर्यंत अशी गिते परिणामकारकही वाटतात. परंतु युद्ध संपले की ती पुष्कळशी पोचट आणि प्रत्ययहीन वाटायला लागतात. म्हणून चटकन वाङमय निर्मिती व्हावी, अशी कुणी अपेक्षा करीत नाही. दुष्काळ पडला की लिहि कथा–कविता, भूकंप झाला की लिहि कादंबरी, अशी तडकाफडकी निर्मिती व्हावी अशी कुणी अपेक्षा करीत नाही। किंबहुना अशा निर्मितीतील पुष्कळशी निर्मिती तात्कालिक आणि चमकदार असू शकते. हे सगळे मान्य करूनही असे म्हणावे लागते की, लेखक भोवतीच्या चळवळींना कसा प्रतिसाद देतो हे महत्वाचेच असते. येथे एखाद दुसऱ्या लेखकाचा प्रश्न असत नाही. तर एकूण लेखकवर्ग कशाप्रकारे विचार विचार करतो हे महत्वाचे असते. महाराष्ट्रात वेळोवेळी असंख्य प्रश्न निर्माण झाले, बऱ्याच चळवळी झाल्या पण या सर्व गोष्टींचा किती लेखकांवर परिणाम झाला? लेखक संवेदनशील असतो ना? मग किती संवेदनशील लेखकांच्या संवेदनेवर ओरखडे उठले हा प्रश्न सोडवायला लागलो की मग लेखक स्वभाव लक्षात यायला लागतो. येथे 'लेखक स्वभाव' ही संज्ञा व्यापक समाजिक संदर्भात समजावून घ्यावी लागते. ज्या प्रमाणे आपण 'समाजपुरूष' अशी संज्ञा वापरतो, त्या प्रमाणेच 'लेखक स्वभाव' ही संज्ञाही वापरावी लगते. त्या त्या कालखंडातील एकूण लेखकांचे लेखन लक्षात घेऊन 'लेखन स्वभाव' निश्चित करता येतो. तसेच प्रत्येक कालखंडातील लेखनातून पुष्कळादा काही समान गोष्टी प्रकट होत राहतात. त्यातून काही एक 'कालस्वर' लक्षात यायला लागतो. पुष्कळदा लेखक स्वभाव आणि कालस्वर सुसंवादी असतात. मात्र मराठी पुरते बोलायचे झाले तर पुष्कळदा हा कालस्वर भोवतीच्या वास्तवाच्या विरोधीच असतो. एकंदरीत काय की या दोन संज्ञाच्या अनुषंगाने वाङमय समजावून घेता येते. तसेच मूल्यमापनही करता येवू शकते.

तेव्हा एकंदरित सामाजिक घडामोडी आणि परिवर्तनाच्या चळवळी यांना लेखक कसे सामोरे जातात हा प्रश्न महत्वाचाच ठरतो. यावरून लेखनाचे मोठेपण/ खुजेपणही ठरू शकते.

एक मुद्दा नेहमीच मांडला जातो की, लेखन प्रक्रिया ही एक गूढ प्रक्रिया आहे. प्रतिभेच्या झपाट्यात लेखक लेखन करीत असतो, लेखन प्रक्रिया अनाकलनीय असते इ. लेखन प्रक्रियेच्या गूढतेचा मुद्दा मान्य करूनही असे म्हणता येते की लेखनकृती साकार होतानाची प्रक्रिया गूढ– अनाकलनीय असली तरी ही मनोवस्था निर्माण होण्यासाठी असंख्य घटक कारण होत असतात. लेखक ज्या भाषिक परंपरेत लिहित असतो, त्या भाषिक परंपरेला एकूण लेखन प्रक्रियेत अतिशय महत्वाचे स्थान असते. त्याबरोबरच तो ज्या लेखन प्रकारात (Form) निर्मिती करू इच्छितो, त्या लेखन प्रकाराचीही एक परंपरा असते. या शिवाय त्या लेखकाचे व्यक्तिमत्व ज्या समाजात घडले, ज्या कुटुंबात घडले, या गोष्टींनाही लेखन प्रक्रियेत प्रत्यक्ष अप्रत्यक्ष महत्व असतेच. एका सरळ रेषेत या बाबींचे आणि लेखनाचे संबंध दर्शविता येतीलच असे नाही. परंतु असे संबंध असतात हे मात्र खरे. एवढेच काय समाजाची अभिरूची आणि लेखकाची अभिरूची या घटकांनाही लेखन प्रक्रियेत आणि लेखन व्यवहारात महत्वाचे स्थान असते. या दृष्टीने विचार करताना आणखीही काही गोष्टी आपल्या हाती लागतात. म्हणजे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

एखाद्या काळात तृतीय श्रेणीचे वाङ्मयसुद्धा महत्वाचे का मानले जात होते हे जसे आपल्या लक्षात येते. त्या प्रमाणेच एखाद्या श्रेष्ठ लेखकाचीही का उपेक्षा झाली असावी हेही लक्षात येते. उदा. १९२० नंतरच्या काळात फडके लोकप्रिय ठरतात आणि केतकरांसारख्या लेखकाची फारशी दखल घेतली जात नाही याचे कारण त्यांच्या काळातील लेखाच्या आणि समाजाच्या अभिरूचिमध्येच सापडू शकते. एकूण काय की निर्मिती प्रक्रिया गूढ असली तीही या प्रक्रियेच्या संदर्भात असंख्य घटक महत्वाचे ठरतात. म्हणूनच सामाजिक परितर्वनाच्या चळवळींची आणि त्यानुषंगाने निर्माण होणाऱ्या सामाजिक वास्तवाची दखल घेणे लेखकाच्या दृष्टीने अपरिहार्य ठरते. किंबहुना असे वास्तव लक्षात घेतल्याशिवाय कलाकृतीला पूर्णता प्राप्तच होऊ शकत नाही.

३

'वाङ्मयीन महात्मता' या ग्रंथामध्ये बा. सी. मर्ढेकरांनी मराठी वाङ्मयाला जागतिक वाङ्मयाच्या पातळीवर मानाचे तर सोडाच, पण नामाचेही स्थान नाही अशी खंत व्यक्त केली होती. तसेच हे वाङ्मय का श्रेष्ठ होऊ शकत नाही, त्यात वाङ्मयीन महात्मता का निर्माण होऊ शकत्र नाही याची मीमांसा करताना मराठी वाङ्मय परभृत आहे आणि तिच्यात आत्मनिष्ठेचा अभाव आहे असे म्हटले होते. हे दोन्ही मुद्दे मान्य करूनही असे म्हणावे लागते की वास्तवाची विविध परिमाणे समजून घेण्याच्या प्राथमिक पातळीवरच मराठी लेखक कमी पडतो. त्यामुळेही लेखनाला फारसे चांगले रूप प्राप्त होऊ शकत नाही. हा मुद्दा स्पष्ट करून सांगण्यासाठी गंगाधर गाडगीळ यांच्या सुप्रसिद्ध आणि बहुचर्चित अशा 'दुर्दम्य' या कादंबरीचे उदाहरण घेता येईल. मराठीतील आगळी–वेगळी चरित्र कादंबरी म्हणून अनेकांनी या कादंबरीचा गौरव केला आहे. खुद्द गंगाधर गाडगीळ यांना सुद्धा ही एका वेगळ्या प्रकारची प्रायोगिक कादंबरी आहे असे वाटते. चरित्रावर भर देऊन 'निर्मिती' न करता कादंबरी लिहिण्याचा त्यांचा प्रयत्न आहे असे त्यांना वाटते.

ही चरित्रात्मक कादंबरी आहे हे मान्य. कल्पिताचा त्यांनी फारसा आश्रय घेतला नाही हेही मान्य करायला हरकत नाही. आणि त्यामुळेच लो. टिळकांच्या जीवनात जे काही घडले ते नीट मांडायची जबाबदारी आपोआपच लेखक म्हणून गंगाधर गाडगीळ यांच्यावर येऊन पडते. ही जबाबदारी गंगाधर गाडगीळ पार पाडू शकले आहेत का? नसतील तर का नाही?

ही कादंबरी १९७० साली म्हणजे लो. टिळकांच्यामृत्यूनंतर पन्नास वर्षांनी प्रसिद्ध झाली. म्हणजे समकालितांवर ज्या प्रमाणे दबाव असू शकतो तो दबाब गंगाधर गाडगीळावर असण्याचे कारण नाही. परंतु घडते ते मात्र नेमके उलट लो. टिळकांच्या व्यक्तिमत्वाने गाडगीळ इतके भाराऊन गेले आहेत की, लेखकाला जी तटस्थता हवी असते, ती येथे दिसतच नाही.

आणखी एक गोष्ट नेहमीच लक्षात घेतली पाहिजे की, कोणताही महापुरूष त्याच्या काळाच्या चौकटीतच कार्य करीत असतो. त्यामुळे त्या त्या व्यक्तिच्या कार्याला काळाच्या मर्यादा पडतच असतात. संत हे कितीही मोठे असले तरी ते विज्ञानपूर्व कालखंडातील आहेत याचे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भान ठेवलेच पाहिजे. हे भान ठेवूनच त्यांची बुद्धीनिष्ठा तपासावी लागते. दुसरी गोष्ट अशी की, काळाच्या चौकटीचे संदर्भ लक्षात घेतले म्हणून काही त्या त्या व्यक्तीच्या श्रेष्ठत्वाला बाधा येते असे नाही. नेमके हेच गंगाधर गाडगीळ विसरतात आणि लो. टिळकांच्या दृष्टीने ज्या गोष्टी फारश्या गौरवाच्या नाहीत त्या गोष्टीही ते गौरवास्पद म्हणून मांडतात. उदा. पंचहौद मिशन प्रकरणानंतर लो. टिळकांवर बहिष्कार घालण्याची अगर त्यांना जातिबहिष्कृत करण्याची धमकी देण्यात आलेली होती. यातून सुटण्यासाठी लो. टिळक काशीला जातात आणि प्रायश्चित घेतल्याचे प्रमाणपत्र घेऊन येतात. तसेच बहिष्काराचा निर्णय ज्या सभेत घेतला जाणार असतो, त्या सभेचे कामकाज सुरू होण्यापूर्वीच ते पत्र सादर करतात आणि सगळ्या ब्रम्हवृंदाची फजिती होते हा प्रसंग गंगाधर गाडगीळ मोठ्या चविष्ठपणे चित्रित करतात. वस्तुतः ही कृती त्या काळात जरी मुत्सदेगिरी प्रकट करणारी वाटत असली तरी आगरकरांच्या तुलनेत लो. टिळक यांची सामाजिक भूमिका कशी मागासलेपणाची आहे हेच लक्षात येते. परंतु स्वतः च बाजी मारल्याच्या थाटात गंगाधर गाडगीळ हा प्रसंग उभा करतात तेव्हा लेखकाला आवश्यक असणारी तटस्थता टिकवता आली नाही असेच म्हणावे लागते.

ऐतिहासिक व्यक्ती आणि घटनांबद्दल लिहित असताना विरोधी अशा गोष्टी असल्या तरी त्या लिहिण्याचे धाडस दाखविले पाहिजे. त्या घटनामुळे चित्रित व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाला बाध येईल असे निदान लेखकांनी तरी मानू नये. लो. टिळकांचे भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील स्थान महत्वाचे आणि निर्विवाद आहे यात शंका नाही. परंतु आयुष्यांच्या उत्तरार्धात लो. टिळक डाव्या विचारसरणीकडे आकर्षित झाले होते, त्यातून ते व्यापक जनाधार मिळवू पहात होते हेही एक सत्य आहे. मात्र ही बाब गंगाधर गाडगीळांच्या फारशी लक्षात आलेली दिसत नाही. किंबहुना आपल्या स्वतःच्या चौकटीत लो. टिळकांना बसविण्याच्या घाईत असंख्य महत्वाच्या गोष्टींकडे गंगाधर गाडगीळ दुर्लक्ष करतात. (यालाच लेखकाचे स्वातंत्र्य म्हणतात का?) उदा. सामाजिक परिषदेतील अस्पृश्यतेच्या ठरावावर त्यांनी सही करावयास नकार दिला होता. ही गोष्ट भारतीय इतिहासाच्या दृष्टीने महत्वाची आहे. परंतु गाडगीळांना या बाबींचे गांभीर्य लक्षातच आले नाही. एवढेच काय पण लो. ठिळक संमती वयाच्या संदर्भात जी भूमिका घेतात ती निश्चितच गौरवास्पद नाही. पण त्याही पुढे जाऊन ते केशवपनाचेही समर्थन करतात, या गोष्टी गाडगीळांच्या गावीही नाहीत. याशिवाय बहुजन समाजातील लोक लोकप्रतिनिधी म्हणून काम करू शकरणार नाही, यातून शेती बुडेल, अशी जाहीर विधाने लो. टिळकांनी अथनी येथील सभेत केली होती. याबद्दल गाडगीळ मौन पाळतात. कोकणातल्या खोतांचा प्रश्न निर्माण झाला तेव्हा लो. टिळक कोणती भूमिका घेतात याची दखल घ्यावी असे गंगाधर गाडगीळांना वाटत नाही. एवढे कशाला, 'वेदोक्त की पुराणोक्त' प्रकरणातून सारा महाराष्ट्र ढवळून निघाला, परंतु हे संपूर्ण प्रकरण गांभिर्याने पाहिले पाहिजे असे गंगाधर गाडगीळांना वाटतच नाही. चांभाराचा गणपती लोकमान्य टिळकांनी आपल्या गणपतीबरोबर विसर्जनासाठी नेला होता अशी एक

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

हकीकत सांगितली जाते. निदान ही गोष्ट तरी दुर्दम्य मधून यायला हरकत नव्हती. परंतु येत नाही. या आणि यासारख्या असंख्य गोष्टी अशा आहेत की, त्या या चरित्रात्मक कादंबरीत येणे आवश्यक होते. त्या आल्या असत्या तर लो. टिळकांच्या श्रेष्ठत्वाला कुठे उणेपणा येण्याचे कांहीच कारण घडले नसते. त्या काळाच्या मर्यादा आहेत असे म्हणता आले असते. परंतु असे या कादंबरीत घडत नाही. टिळकांचे श्रेष्ठत्व सिद्ध करण्याची जबाबदारी आपल्यावरच आहे असे लेखकाने गृहीत धरल्यामुळे वास्तवाकडे केवढे दुर्लक्ष झाले आहे!

येथे आपोआपच असे लक्षात येईल की जे सांगितले गेले नाही ते किती महत्वाचे आहे. तत्कालीन वास्तव समजावून घेण्याच्या दृष्टीने तर या सगळ्याच गोष्टींना अतिशय महत्व आहे. परंतु गंगाधर गाडगीळ यांना हे सगळेच लक्षात घ्यावेसे वाटत नाही ते का असा खरा प्रश्न आहे. येथे गंगाधर गाडगीळ यांच्या रूपाने मराठी 'लेखक–स्वभाव' दिसतो.

वस्तुतः इंग्रजांच्या आगमनाबरोबर या देशात प्रचंड उलथपालथींना प्रारंभ झाला. आमची संपूर्ण व्यवस्था हादरून गेली. केवळ सत्तेत बदल झाला असे नाही तर धर्माचाही आपण पुर्विचार करू लागलो. आर्यसमाज, ब्राम्हो समाज, प्रार्थना समाज, परमहंस मंडळी, सत्यशोधक समाज यासारख्या धर्मसुधारणाच्या चळवळी याच काळात फार मोठ्या प्रमाणात झाल्या याचे कारणही इंग्रजांचे या देशातील आगमन हेच होय. त्या बरोबरच बहुजन समाजाच्या आणि स्त्रियांच्या मुक्तीच्या चळवळीही इंग्रजांच्या आमनानंतरच वेगवान झाल्या ही ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळेच या काळात समाजात एक चमत्कारिक ताण निर्माण झाल्याचेही दिसून येते. तो असा की संस्थानिक आणि उच्च वर्णीय इंग्रजांच्या विरोधात आहेत, परंतु बहुजन समाज मात्र असे म्हणतो की इंग्रज आहेत तो पर्यंत सुधारणा करून घ्या– उच्च वर्णियांच्या जोखडातून स्वतःची मुक्तता करून घ्या.

उच्च वर्णीय आणि बहुजन समाज यांच्यामध्ये निर्माण झालेला हा तणाव समजून घेतल्याशिवाय आपणास सामाजिक इतिहास कळणारच नाही. परंतु दुर्दैवाने हा सामाजिक इतिहास समजून घेण्याची कुणाची फारशी तयारी नाही. त्यामुळेच समाज परिवर्तनाच्या असंख्य चळवळी होऊनही त्याला मराठी लेखकांनी फारसा प्रतिसाद दिला असे दिसत नाही. निदान त्यांच्याकडे भुवया उंचावून पहाण्याचे कष्टही मराठी लेखकांनी घेतले नाही. १९२० पर्यंतच्या मराठी लेखनाचा आढावा घेतला तर अगदी हाताच्या बोटावर मोजावेत एवढेच लेखक सामाजिक चळवळी आणि त्यामुळे निर्माण झालेले सामाजिक वास्तव समजावून घेताना दिसतील. अगदी प्रारंभीचा बिंदू म्हणून 'यमुना पर्यटन'चा उल्लेख करता येईल. पुढे हरिभाऊ, केशवसुत, कवी बी आणि वामन मल्हार जोशी अशा काही लेखक कवींचा उल्लेख करता येईल. त्यातही केशवसुत वगळून बाकी सगळ्या लेखकांच्या गावी म. फुले होते की नाही शंकाच आहे. म. फुले यांचे नाव नकतीच ऐकलेले असणार. कारण चिपळूणकरांच्या टीकेचे लक्ष म. फुले होते आणि निबंधमाला वाचणे हा त्या काळातील मानदंड होता. तरीही आपल्या दृष्टीकक्षेत काही गोष्टी येऊ द्यावयाच्याच नाहीत असे मराठीलेखकांनी ठरविलेले असावे, अशी परिस्थिती

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आहे. या काळात केवळ म. फुलेच आहेत असे नाही. त्यांच्यापूर्वी लोहहितवादी, विष्णुबुवा ब्रम्हचारी आहेत. त्यांच्याबरोबर आगरकर, नारायण मेघाजी लोखंडे आणि इतर असंख्य कार्यकर्ते आहेत. त्यांच्यानंतर कृष्णराव भालेकर, विठ्ठल रामजी शिंदे आहेत. या साऱ्याच बंडखोर माणसांनी आपापल्या भूमिका मोठ्या जोरकसपणे मांडल्या आहेत. परंतु त्यांच्या कार्यामुळे मराठी जनजीवनात जी हालचाल झाली त्याचे पुसटसे संदर्भही मराठी साहित्यात येऊ नयेत याला काय म्हणावे? अर्थात अपवादात्मक लेखकांनी आपले नाते परिवर्तनाशी जोडले आहे हा भाग वेगळा.

१९२० नंतर अनिल, कुसुमाग्रज, मुक्तिबोध, करंदीकर, काही प्रमाणात मर्ढेकर यासारख्या कवींनी आणि केतकरांसारख्या कादंबरीकारांनी आपले नाते समाजाच्या स्थिती गतीशी, सामाजिक चळवळींशी जोडून घेण्याचा प्रयत्न केला. परंतु सामजिक चळवळीचे आणि मराठी साहित्याचे खऱ्या अर्थाने, नाते जुळले ते १९६० नंतरच असे म्हटले तर वावगे ठरू नये. विशेषत. दलित साहित्यच्या चळवळीने स्पष्टपणे आपले नाते म.फुले यांच्यपर्यंत नेऊन भिडविले. त्याचा परिणाम म्हणून स्त्रियांकडे पाहण्याची आपली दृष्टीही पुष्कळशी उदार झाली. दलित साहित्य चळवळीच्या पाठोपाठ इतरही साहित्य चळवळी आकाराला येऊ लागल्या. . भटक्या विमुक्तांच्या साहित्याची चळवळ आकाराला आली आणि वाहरू सोनवणे, भुजंग मेश्राम, यांच्यासारखे दमदार कवी लिहू लागले. स्त्री–मुक्तीच्या आणि देवदासी मुक्तीच्या चळवळी सुरू झाल्या आणि राजन गवस सारखा लेखक 'चौंडक' आणि 'भंडारभोग' यासारख्या वेगळेच जीवनदर्शन घडविणाऱ्यां कादंबऱ्या लिहितो. सामाजिक– राजकीय जीवनातील उलथापालथीशी एक नाते प्रस्थापित करीत भानू काळे लेखन करू लागतात ते याच काळात. ग्रामीणाच्या मुक्तीचा उद्‌घोषही याच काळात सुरू झाला. या सगळ्यांचाच परिणाम म्हणून जुन्या लेखकांच्या लेखकामध्येही बदल झालेला दिसतो.

एकंदरित काय की १९६० नंतरच्या लेखक कवींनी समाज प्रबोधन परंपरेशी आपले नाते जोडून घेतले आणि त्यामुळेच या लेखक कवींना आपला सामाजिक सांस्कृतिक वारसाही नीट कळू शकला.

४

आपल्याकडील प्रबोधन चळवळींचा रोख प्रामुख्याने जातिव्यवस्थेविरू होता तेव्हा त्या संदर्भातील आणखी काही निरिक्षणे येथे सांगता येऊ शकतील.

त्यातील एक गोष्ट अशी की ज्या ज्या लेखकांनी आपले नाते सामाजिक–सांस्कृतिक वारशाशी आणि सामाजिक परिवर्तनाशी सांगितले त्या त्या लेखकांचे लेखन काळावर ठसा उमटवणारे ठरले आहे. त्यामुळेच केशवसुत–हरिभाऊ आपणास महत्वाचे वाटतात.

दुसरी गोष्ट अशी की ज्या ज्या काळात जातिसंस्थेला आव्हान मिळाले त्या त्या काळातील वाङमय आपल्या वेगळ्याच सौंदयाने झळाळून निघाले. १९६० नंतरच्या दलित

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आणि ग्रामीण साहित्य चळवळींतून जे साहित्य आले ते असेच जीवनाचे प्रखर वास्तव प्रकट करणारे म्हणून परंपरेत मोलाची भर घालणारे ठरले. याला अगदी समांतर उदाहरण म्हणून बाराव्या तेराव्या शतकातील वाङ्मयाचे देता येईल. वारकरी आणि महानुभाव संप्रदायांच्या मुक्ती चळवळींचा एक परिणाम असा झाला की, वेगवेगळ्या जाती–जमातीतील कवी आणि स्त्रिया लिहायला लागल्या हे सगळेच कवी केवळ लिहू लागले असे नाही तर चांगले आणि महत्वपूर्ण लिहू लागले.

जातीसंस्था आणि मराठी लेखन या संदर्भात मोठे मूलगामी असे विवेचन सुप्रसिद्ध लेखक बाबूराव बागूल करीत असतात. त्या सर्व विवेचनाचा संदर्भ येथे घेण्याचे कारण नाही. परंतु जातीव्यवस्थेमधून लेखनाला फार मोठ्या मर्यादा पडतात यात मात्र शंका नाही.

या सर्व विवेचनाचा अर्थ असा की मराठी लेखक आपणच आपल्या भोवती एक वर्तुळ आखून घेतो त्यातच तो बंदिस्त होऊन पडतो. म्हणून तो जोपर्यंत अशा वर्तुळांच्या बाहेर येऊन भोवतीचे वास्तव नीट समजावून घेत नाही, सामाजिक–सांस्कृतिक चळवळी तो नीट समजावून घेत नाही. तोपर्यंत त्याला जीवनातले खरे प्रश्नही कळणार नाहीत. खरे वास्तवही कळणार नाही.

आपल्या जीवनातील बहुसंख्य व्यवहार हे जातीच्या आणि धर्माच्या वर्तुळातच होत असतात. फक्त आपण सामाजिक जीवनात मात्र आणि तेही केवळ बोलण्याच्याच पातळीवर जाती धर्मनिरपेक्ष भूमिका घेत राहतो. वस्तुतः ही फार मोठी गफलत आहे. ही गफलत दूर होणे आवश्यक आहे. ही गफलत नीट न कळल्यामुळे 'जातियता वाईट पण जातिव्यवस्था काही वाईट नाही' अशी विधाने मोठमोठी साहित्यिक मंडळी करीत असते. ही विधाने मोठी धोकादायक असतात. कारण जातियता ही शेवटी जातिव्यवस्थेतूनच निर्माण होत असते. याचा अर्थ असा की जातिमुक्त होणे. निदान मानसिक पातळीवर तरी– ही फार मोठी साधना आहे. तपश्चर्या आहे. या जातिमुक्तीच्या तपश्चर्येत जो यशस्वी होईल, त्याच्यापुढेच जीवन आपले रहस्य उलगडून दाखवील !

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

॥ २१ ॥

सत्यशोधक समाज : परिवर्तनवादी चळवळ

प्रा. डॉ. राम वाघ

★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★

सामाजिक चळवळीची पार्श्वभूमी

सामाजिक चळवळीची सुरूवात होण्याअगोदर भारतातील समाजजीवन अतिशय पीडादायी होते. एकतर ब्रिटीशांची सत्ता व शोषन चालू होते. ख्रिश्चन धर्मीयांनी आपल्या धर्मतत्त्वाचा प्रभावी प्रचार करण्यास सुरूवात केली होती. सामान्य माणसाला जीवन जगणे अशक्य झाले होते. धर्ममार्तन्डाच्या आणि दलालाच्या वर्तनाला सामान्य माणूस बळी पडत होता. अंधश्रद्धा आणि कर्मकांडाचे स्तोम माजले होते. एक प्रकारे धार्मीक विडंबण निर्माण झाले होते. अज्ञान, दारिद्रय, निरक्षरता, विषमता, जातीयता, धर्मवाद, पांथीक भेद, स्त्री–पुरूष असमानता, अस्पृश्य व स्त्रीयांना शिक्षणास बंदी या सारख्या समस्याच्या विळख्यात भारतीय समाज जीवन सापडले होते. तसेच बालविवाह, विधवा पुनर्विवाह बंदी, सती प्रथा, दूर्बलाची पीळवणूक, हुंडाप्रथा, गुलामी पद्धती वगैरे सामाजिक समस्या निर्माण झालेल्या होत्या. यामुळे समाजाच्या विकासाला तर खीळ निर्माण झालीच होती. पण समाजाची घडी विस्कळीत बनून असंतोष आणि अशांतता निर्माण झाली होती. ही स्थिती बदलण्याचा विचार समाजातील कांही व्यक्तिनी सामाजिक चळवळी उभारून केला. अर्थात हे सर्व करतांना विरोध; रोष पत्करावा लागला; त्रास सहन करावा लागला.

चळवळीची सुरूवात

भारतीय समाजातून अस्पृश्यता व इतर समस्यांचे उच्चाटन व्हावे म्हणून एकोणीसाव्या शतकाच्या पहिल्या अर्ध शतकात कांही सुशिक्षित व्यक्तींनी सामाजिक सुधारणेच्या चळवळीला सुरूवात केली. दूसऱ्या अर्ध शतकात या सामाजिक चळवळीने क्रान्ती केली. यासाठी पाश्चिमात्य विचारसरणी, इंग्रजी शिक्षण, ब्रिटीश सत्तेची प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष मदत यामुळे भारतीय चळवळीला गती प्राप्त झाली. या सामाजिक चळवळीचे प्रणेते राजाराममोहन रॉय यांनी ब्राह्मो समाजाची स्थापना करून कार्य करण्यास सुरूवात केली. याबरोबरच अनेक नामवंत सुधारक व चळवळीचे नेते म्हणून महात्मा ज्योतिबा फुले, न्यायमूर्ती रानडे, स्वामी दयानंद सरस्वती, डॉ. भांडारकर, धो. के. कर्वे, विठ्ठल रामजी शिंदे, गोपाळ गणेश आगरकर, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी शाहू यासारख्या अनेक विभुतींचे योगदान अत्यन्त मोलाचे ठरते. या प्रत्येक सुधारकाच्या प्रेरणा, प्रयत्न

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आणि मार्ग निराळे असतील पण ध्येय मात्र समान होते.

चळवळीची कार्यवाही

सामाजिक चळवळीचे प्रणेते राजा राममोहन रॉय यांनी ब्राह्मो समाजाची स्थापना करून धार्मिक सुधारणा, सती प्रथबंदी, बालविवाह बंदी, यासारख्या अनेक अनिष्ठ प्रथा नष्ट करण्याचा प्रयत्न केला. स्वामी दयानंद सरस्वती यांना आर्यसमाजाची स्थापना करून कर्मकांड, कडक आचारसंहिता, धर्मशुद्धी, धर्मान्तराला विरोध, अस्पृश्यता निवारण यासारख्या अनेक समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला. महात्मा ज्योतिबा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना करून अस्पृश्यता निवारण, स्त्रीशिक्षण, शेतकऱ्याचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला. देव व मानव यातील दलालीला विरोध केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित नेतृत्वाची धूरा सांभाळून पीडीत, दूर्लक्षीत समाजाला समता, स्वातंत्र्य, न्याय प्रदान करण्याचा प्रयत्न केला. आतापर्यंत चालविण्यात येणाऱ्या सामाजिक चहवळीचा मुख्य हेतु समाजाची पुनर्रचना करणे, समानतेचे तत्त्व व न्यायाची संकल्पना तयार करून लढा देणे होता. यातूनच समाजात वैचारिक जागृती झालेली दिसून येते. भारतीय समाजात दोन प्रकारची गुलामगिरी ही एकीकडे ब्रिटीशांची राजकीय सत्तेची गुलामगिरी तर दुसरीकडे स्वकीयांची सामाजिक गुलामगिरी होय. यात सामान्य दुर्बल, पददलित समाज मोठ्यां प्रमाणात बळी पडत होता. म्हणून सामाजिक चळवळीच्या माध्यमातून समाजात समता, न्याय, बंधूभाद, धर्मनिरपेक्षता, लोकशाही यासारख्या मानवी मूल्यांची रूजवणूक केली जावू लागली. पारंपारिक सनातनी विचारसरणीच्या विरोधात लढा देवून आधुनिक पुरोगामी विचारसरणीचा प्रसार व प्रचार केला. या सर्व सामाजिक चळवळी एक प्रकारे वैचारिक क्रांतीचे पर्व समाजल्या गेल्या. या मागचा मुख्य उद्देश मानवतेच्या मुल्याची रूजवणूक करने आणि समाज जीवनातील अनिष्ठ बाबींना आळा घालून योग्य दिशा देणे होय.

याबरोबरच नवीन वैज्ञानिक मुल्ये, आधुनिक शिक्षण, औद्योगिकरण, नागरीकरण, पाश्चिमात्तीकरण यासारख्या अनेक प्रक्रिया व दळणवळणाची साधने आणि सोयी यामुळे आज सामाजिक चळवळींना बऱ्याच प्रमाणात यश मिळाले. मात्र आज दुर्दैवाने असे म्हणावे लागते की, सामाजिक चळवळींना आज अपेक्षित गती राहिली नाही. बऱ्याच चळवळी आज फक्त नाममात्र राहिलेल्या आहेत. मात्र अशा चळवळीनेच सामाजिक आंदोलनाची संकलपना तयार करून समाजाची पुनर्रचना व सुधारणा घडवून आणणे काळाची गरज आहे.

सत्यशोधक समाज

महात्मा ज्योतिबा गोविंदराव फुले या महान मानवतावादी विचारवंतांचा व सुधारकाचा जन्म १८२७ साली एका माळी समाजात झाला. त्यांचे मुळ नाव गोरवे होते. या काळात अस्पृश्यता, मूर्तीपूजा, कर्मकांड, ईश्वर व मानव यातील दलाली करणारी ब्राह्मण्यवादी वृत्ती, स्त्री शिक्षणाची समस्या व पिळवणूक, ब्राह्मण–ब्राह्मणेत्तर वाद शिगेला पोहंचला होता. धार्मिक विडंबन मोठ्या प्रमाणात निर्माण झाले होते. अस्पृश्यांना शिक्षण व इतर संधीपासून

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वंचीत ठेवले होते. जातीवर आधारीत विषमता होती. शिक्षणाचा संबंध आध्यात्म होता. यामुळे सामान्य बहुजन समाजाचे मोठ्या प्रमाणात खच्चीकरण झाले होते. सनातनी वृत्ती, दैववाद, अंधश्रद्धा यामुळे प्रगती कुंठीत झाली होती. सामाजिक विषमता नष्ट करण्यासाठी व दुर्बलांना जीवन जगण्यासाठी, उन्नती घडून आणण्यासाठी महात्मा फुलेंनी 'सत्यशोधक' समाजाची स्थापना केली. फुले खऱ्या अर्थाने ब्राह्मणांचे शत्रु नव्हते तर ब्राह्मण्यांचे ते खरे विरोधक होते. या चळवळीच्या आधारे मानवता व न्याय, समता, स्वातंत्र्य त्यांना प्रदान करावयाचे होते. याच ध्येयाने प्रेरीत होवून त्यांनी २३ सप्टेंबर १८७३ साली पुणे येथे 'सत्यशोधक' समाजाची स्थापना केली. इहवाद आणि बुद्धीवादाच्या आधारे समाजाचे, ईश्वराचे खरे रूप तपासण्या साठीच त्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. श्री. नारायणराव लोखंडे सारखे अनेक खंदे कार्यकर्त्यांचे पाठबळ या चळवळीला लाभले हे एक वैशिष्टय होय.

सत्यशोधक समाजाचे उद्दिष्टये

धर्माची खरी संकल्पना :– महात्मा फुलेंच्या मते मानवता खरा धर्म आहे. धर्म माणसा–माणसात भेद करीत नाही. जे सत्य असेल तो खरा धर्म होय. इश्वर एकच आहे. तो सर्वव्यापी, निर्गुण, निराकारी आणि सत्यरूपी आहे. सर्व मानवजात तिची लेकुरे आहेत. प्रत्येक माणसाला त्याची आराधना करण्याचा अधिकार आहे. त्यांच्या मते ज्याप्रमाणे आई वडिलाची प्रार्थना करण्यास मुलाला मध्यस्थीची गरज नसते. त्याप्रमाणे ईश्वराची प्रार्थना करण्यास भट–भटजीची गरज नसावी. कोणतीही व्यक्ती आपली धार्मिक विधी स्वतःच करू शकते. सत्यशोधक समाजात बरेच कार्यकर्ते ब्राह्मण होते. धर्मातील दलाली करणारे धर्ममार्तंड आणि कर्मकांडाचा अतिरेक याला ज्योतिबांचा कडा विरोध होता. नव्हे सामान्य माणसाला धर्माच्या विडंबनातून मुक्त करण्यासाठी आणि सत्यधर्माची ओळख होण्यासाठीच म्हणजे धार्मिक सुधारणा करण्यासाठी सत्यशोधक समाजाची स्थापना केली होती.

स्त्री शिक्षण व स्त्री जीवनाची उन्नती :– महाराष्ट्राच्या सामाजिक व शैक्षणिक इतिहासात १८४८ या वर्षाला अनन्य साधारण महत्व आहे. याच वर्षी महात्मा फुले यांनी स्त्रीशिक्षणा साठी विद्येचे माहेरघर समजल्या जाणाऱ्या पुण्यात वयाच्या फक्त २१ व्या वर्षी मुलींसाठी स्वतंत्र शाळा काढली. जागतिक भांडवलशाहीला हादरा देणारा व कामगार, श्रमिकाच्या जीवनात नवा प्रकाश देणारा "कम्युनिष्टांचा जाहिरनामा" हा ग्रंथ कार्ल मार्क्सने प्रसिद्ध केला. तसेच फ्रान्समध्ये तिसरी प्रजासत्ताक क्रांतीही याच वर्षी झाली. याच धर्तीवर भारताच्या इतिहासात शैक्षणिक कार्याची सुरूवात या शाळेच्या स्थापना रूपाने महात्मा फुलेनी सुरु केली.

जिथे शाळेत मुली शिकण्यासाठी पाठविण्याची वृत्ती नव्हती. अशा अवस्थेत सावित्रीबाई फुले या विदुषीने या कठिण कार्याची धुरा आपल्या खांद्यावर घेतली. ही कल्पना महात्मा फुलेनी अहमदनगर येथील ख्रिश्चन मिशनरीमधील मिस फॅरार या स्त्रीने चालविलेल्या शाळेतून सूचली असे फुले प्रतिपादन करतात. त्यांना पुण्यातील बुधवार पेठेतील भिडे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

यांच्या वाड्यात श्री. यशवंत परांजपे, सदाशिव हाटे, सदाशिव गोवंडे यांच्या आर्थिक मदतीने मुलींच्या शाळेची सुरुवात केली. याबाबतच्या विचाराची पक्की बैठक तयार झाली होती. "राईटस ऑफ मॅन" ग्रंथातील मानवी हक्काचे विचार वाचल्यानंतर होय. उत्तर वैदिक काळापासून विशेषतः मनुस्मृतीच्या काळात स्त्री जीवनाची अतिषय दुर्दशा झाली. स्त्रीयांना शिक्षण देणे पाप आहे. या सदराखाली समाजातील अर्धे मनुष्यबळाचे खच्चीकरण चालविले होते.

अस्पृश्यता निवारण :– महात्मा ज्योतिबा फुले हे समतावादी तत्त्वाचे पूरस्कर्ते होते. अस्पृश्यता निवारणासाठी अनेक सामाजीक चळवळीचे योगदान महत्वाचे ठरते. यापैकी महात्मा फुले प्रत्यक्ष कृतीवर भर देणारे होते. सन १८६८ साली त्यांनी आपल्या घराज़वळील स्वतःचा पाण्याचा हौद अस्पृश्यांना पाणी भरण्यास खुला केला. कनिष्ठ व शूद्र लोकांना जर खरे स्वातंत्र्य मिळावयाचे असेल तर शैक्षणिक सवलती देवून त्यांना ज्ञानाचे दालन खुले करण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. त्यांना मानवी हक्कांची जाणीव करून देणे, ब्राह्मण पुरोहिताकडून होणारी पिळवणूक बंद करणे, धर्मग्रंथ आणि कडक आचार संहितेच्या गुलामगिरीतून मुक्त करणे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते. सत्यशोधक समाजाच्या शिकवणूकीचा बहुजन समाजातील व आठरापगड जातीच्या तरूणा मोठी जागृती झाली. शूद्र ब्राह्मणाचे दास आहेत, असा ब्राह्मणी ग्रंथातील उल्लेखाचा ज्योतिबांनी धिक्कार केला. या चळवळीच्या रूपाने हरिजनापासून ते मराठा कुणब्यापर्यंत ब्राह्मणोत्तर जातीच्या आशा आकांक्षा प्रगट झाल्या.

परमेश्वराच्या दारी सर्व माणसे सारखीच असतात. माणसा–माणसात भेदनीती निर्माण करून श्रेष्ठ–कनिष्ठता पाळणाऱ्या ब्राह्मण्यनीतीला त्यांचा पूर्ण विरोध होता. त्यांच्या मते अस्पृश्यांच्या गुलामीत राहून शूद्रांना स्वाभिमानाने व आत्मविश्वासाने जीवन जगता येत नाही. सत्यशोधक समाजाचा प्रमुख हेतु चातुवर्णित जातीभेदाला मूठमाती देणे होय. समतेवर व मानवतेवर आधारीत सामाजिक पुनर्रचना करण्यासाठी सत्यशोधक समाजाचे योगदान महत्वाचे ठरते.

शैक्षणिक कार्ये :– सत्यशोधक समाजा अंतर्गत स्त्री–शिक्षण; अस्पृश्यांना शिक्षणाची संधी देण्यासाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न केले गेले. शिक्षणाशिवाय सामान्यांचा उद्धार संभवत नाही. सन १८८२ साली सर विल्यम हंटर कमिटीसमोर साक्ष झाली यात ज्योतिबानी प्राथमिक शिक्षण मोफत आणि सक्तीचे करावे अशी मागणी केली. सर्वासाठी शिक्षणाची संधी असावी. असे प्रतिपादन केले. स्त्रीयांना शिक्षण देण्यासाठी सावित्रीबाई फुलेंच्या मदतीने शिक्षण देण्यास सुरूवात केली. १८४८ साली पुण्यात मुलींसाठी स्वतंत्र शाळा सुरु केली. त्यानंतर सन १८५२ मध्ये अस्पृश्य मुलांसाठी एक शाळा सुरू केली. या ज्योतिबाच्या शैक्षणिक कार्याकडे इंग्रज सरकारचे ही लक्ष वेधले. या अस्पृश्य मुलांची परिक्षा २१ मार्च १८५३ रोजी सुरू झाली. पण निम्न स्तरातील माणसाला शिक्षणाविषयी जागृती नव्हती.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

यासाठी सत्यशोधक समाजातर्फे लोकशिक्षण आणि लोकजागृती घडवून आणण्याचा प्रचार सुरू केला. त्यांच्या मते शिक्षणाशिवाय माणसाला माणसाचे जीने प्राप्त होत नाही. आपल्या हक्क आणि कर्तव्याची जाणीव निर्माण होत नाहीत. याबाबत त्यांनी लिहीलेली कविता अतिशय महत्वाची ठरते.

विद्या विना मती गेली
मती विना नीती गेली
नीती विना गती गेली
गती विना शूद्र खचले
एवढे सर्व एका अविद्येने केले.

असे ज्योतिबा प्रतिपादन करतात. शिक्षणाशिवाय अज्ञान व अंधश्रद्धा कमी होणार नाही. पददलीत समाजातील मुले शाळेत पाठविण्यासाठी लहुजी साळवे (मांग) यांनी ज्योतिबाला सहकार्य केले. अशा रीतीने स्त्रीया व अस्पृश्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली.

गुलामगिरी विरूद्ध लढा :– महात्मा फुले यांनी १८७३ साली 'गुलामगिरी' हा ग्रंथ लिहिला. याचा मुख्य हेतु समता, स्वातंत्र्य, बंधूता या तत्त्वाचा प्रचार करणे होता. प्रत्येकाला स्वातंत्र्य देवून अन्यायी जुलमापासून मुक्त करणे मानवाचे परोपकारी कर्तव्य असते. या काळात शेतकरी, कष्टकरी, मजुर, कामगार यांची भांडवलदार, जमीनदार, सरकारी अधिकारी मोठी पिळवणूक करीत असत. त्यांना मुलभूत हक्क व अधिकार उपभोगण्याची संधी दिली जात नसे. जादा कर बसविणे, अपार कष्ट घेणे, कर्जबाजारीपणा, फसवणूक यासारख्या अन्यायाला बळी पडावे लागत असे.

सत्यशोधक समाजाच्या कार्याचा एक भाग म्हणून ज्योतिबाचे स्नेही नारायणराव लोखंडे यांच्या मदतीने गिरणी कामगाराची चळवळ उभारली होती. विविध व्याख्याने, कविता, लेख लिहून सामान्य माणसापर्यंत पोहचून देवून रंजलेल्या व गांजलेलया लोकांसाठी कार्ये होती घेतले.

ज्योतिबांनी सतत २५ वर्षे मानवतावादी विचारांचे चा पुरस्कार ब्राह्मणवादी वृत्तीचा धिक्कार करने, स्त्रीयांच्या अन्यायाला वाचा फोढणे, शिक्षणाचा प्रसार करणे यासाठी संघर्ष केला. यासाठी शाहू महाराज, सयाजीराव गायकवाड यांची मोलाची मदत झाली. सत्यशोधक समाजाच्या चळवळीचा मुख्य हेतु समाजाला अनिष्ठ रूढीपासून मुक्त करने, पुनर्रचना घडवून आणने, समाजातील सामान्य माणसाचे, दीन दुबळयांचे प्रबोधन घडवून आणने यामुळेच त्यांना ११ मे १८८८ रोजी मुंबई येथील कोळीवाड्यात सत्कार होवुन "महात्मा" ही पदवी देवुन त्यांचा सन्मान केला. याला देखील सनातन्यांचा मोठा विरोधच होता. पण महात्मा फुले यांच्या सत्यशोधक समाजाचे तत्त्व आणि कार्य प्रणाली इतकी वस्तुनिष्ठ आणि प्रकाशाइतकी स्वच्छ होती की, दुधाचे दूध आणि पाण्याचे पाणी झाले. याचे कारण महात्मा फुलेसारखा 'राजहंस' या चळवळीचा प्रणेता होय.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

॥ २२ ॥

मुस्लिम सत्यशोधक चळवळ : काल, आज आणि उद्या

प्रा. एस. एम. तांबोळी

★★

इस्लामचा उदय एक क्रांतीकारी विचाराच्या स्वरूपात झाला. इस्लाम धर्म स्थापणेपूर्वी सर्वत्र अराजकता, अंधकार आणि अत्याचार होत असत. गुलामांच्या बरोबरच, स्त्रियांचेही बाजार भरत असत. सर्वत्र ''बळी तो कान पिळी'' अशी अवस्था. स्त्रियांकडे एक उपभोक्ती वस्तूच्या दृष्टिकोनातून पाहिल्या जात, अनेक स्त्रियांशी लग्न करायचे, सोडून दयायचे प्रमाण अधिक, सर्वत्र अज्ञान, अंधश्रद्धा आणि अन्याय पसरलेला, अनेकेश्वरवाद, आणि आदिवाशी स्वरूपाचे जीवन लोक जगत असत. या परिस्थितीत इस्लामचा उदय होणे आणि मोहंमद पैगंबराचे कार्य हेच क्रांतीकारी म्हटले पाहिजे. शांतता, शिक्षण आणि समंजसपणा शिकवणारा धर्म म्हणून इस्लामची निर्मिती झाली. अनेक स्त्रियांची लग्न, वाटेल तेंव्हा ''तलाक'' आणि अराजकतेवर नियंत्रण आणण्यासाठी पैगंबरानी प्रयत्न केले. दहा–वीस स्त्रियांशी लग्न करण्याचे प्रमाण अधिक होते. ते ''जास्तीत जास्त चार स्त्रियांशी लग्न करावे'', असे ठरले आणि या स्वरूपाच्या अनेक सुधारणा त्या काळाशी सुसंगत होत्या.

आज एकविसाव्या शतकात ''उपाय म्हणून निर्माण झालेल्या तरतुदी समस्या झाल्या आहेत'' औषध हेच आजार झाले आहे. धर्म अतिशय साचेबंद आणि अपरिवर्तनीय झाल्यामुळे आज धर्मनिरपेक्ष, समाजवादी, विश्वबंधुत्व आणि समता, स्वातंत्र्य, यांच्याशी समायोजन करू शकत नाही. बदलत्या समाजानुरूप बदलण्याची क्षमता नसल्यामुळे मागासलेपणा आणि धर्मांधता वाढत असतांना दिसते.

सध्या अस्तित्वात असणारी बहुपत्नित्व, तोंडी तलाक, उर्दु माध्यमाचा आग्रह आणि बुरखा, गोषा, पडदा पद्धत कालबाह्य झाली आहे. परंतु आपले वेगळेपण (Separate Indentity) जपण्यासाठी मुस्लिम समाज आधुनिक विचारापसून अधिकाधिक दूर जातांना दिसत आहे. ''कुराण आणि शरियत'' यांना चिकटून बसल्यामुळे बदलत्या काळाची गरज ओळखून आत्मविकासापासून वंचीत झाला आहे.

धर्माचा चिकित्सक अभ्यास, धर्म आणि समाज सुधारणेस प्रचंड विरोध होतो. हिंदू समाजात धर्मसुधारणा आणि समाज सुधारणा करणाऱ्या विविध व्यक्ति आणि संघटना अस्तित्वात आल्या. सुमारे दोनशे वर्षापुर्वीपासून राजाराम मोहन रॉय, महात्मा फुले, शाहू महाराज, आगरकर, आंबेडकर आणि यासारख्या समाज सुधारकांनी परिवर्तन व प्रबोधनाची चळवळ उभी केली. अशा प्रकारच्या सुधारणावादी विंचाराचा अभाव हे मुस्लिम समाजाच्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

साचेबंद स्वरूपास कारण आहे. वास्तविक पाहता, डॉ. एम. आर. ए. बेग, डॉ. एम. सी.. छगला, डॉ. मौलाना आझाद, प्रा. मुजीब यांच्यासारख्या पुरोगामी व्यक्तित्वांनी समाजास योग्य दिशा देण्याचा प्रयत्न केला. परंतु धर्माच्या नावाने समाजाची दिशाभूल करणाऱ्या आणि धर्माच्या नावाने राजकारण करणाऱ्यांना या थोर तत्त्ववेत्याचे विचार आवडले नाहीत. त्यांनी या विभूतींना आपले नेतृत्व घेवू दिले नाही.

१९४७ साली स्वातंत्र्य मिळत असतांना धर्माच्या नावाने पाकिस्थानची मागणी केली आणि हिंदु–मुस्लिम समाजात एकमेकांविषयी दरी निर्माण केली. स्वतंत्र भारतात सध्या एकूण लोकसंख्येच्या सुमारे ११.५ टक्के लोकसंख्या मुस्लिम आहे. पाकिस्तान, बांगला देश या इस्लामिक देशापेक्षाही भारतातील मुस्लिम संख्या अधिक आहेत. धर्मनिरपेक्षता, सर्व–धर्म समभाव, अल्पसंख्यांकास संरक्षण या धोरणाच्या चांगल्या परिणामा बरोबरच कांही वाईट परिणाम झाले. धर्मनिरपेक्षतेच्या नावाखाली धर्माच्या नावाने वेगळे कायदे निर्माण झाले. हे कायदे अन्यायकारक, जाचक आणि मानवी हक्कांपासून वंचीत ठेवणारे असतांनाही सर्वधर्म समभावाच्या उदार दृष्टीकोणाने ते पचवण्याचा प्रयत्न केला.

जमाते इस्लामी, मुस्लिम लीग, तबलिक जमात या यासारख्या संघटनांनी व पक्षांनी मुस्लिम समाजाची सातत्याने दिशाभूल केली. मुस्लिम समाजास मुख्य प्रवाहात मिसळण्यास प्रेरणा दिली नाही. कालबाह्य, विसंगत आणि अन्यायकारक प्रथा, परंपरांनी समाजास बांधून टाकले. अनेक वेळा आक्रमक पवित्रा घेवून हिंदु–मुस्लिम दंगली घडवल्या आणि मुस्लिम समाजाची प्रगतीची कवाडे बंद केली. याचे गंभीर परिणाम सर्वसामान्य मुस्लिम समाजास भोगावे लागणार याची जाणिव स्वातंत्र्यानंतर प्रथमतः हमीद दलवाई यांना झाली.

हमीद दलवाई हे राष्ट्र सेवादलाच्या परिवारातले, स्वतः पत्रकार आणि साहित्यीक, मराठा, वृत्तमान पत्रात ते लिहित असत. त्यांनी "इंधन", "लाटा", मुस्लिम जातीयतेचे स्वरूप व उपाय, "मुस्लिम पॉलिटिक्स इन सेक्युलर इंडिया, अशी अनेक पुस्तके लिहिली. हिंदू आणि इतर धर्मातील समाज सुधारकाचा अभ्यास केला आणि हे विचारप्रवाह मुस्लिम समाजात रूजवण्याचा प्रयत्न केला.

१९७० च्या सुमारास श्री. हमीद दलवाई आणि त्यांच्या निवडक मित्रांनी संघटना स्थापन करण्याचे ठरवले. यापूर्वी अनेक बैठका झाल्या. मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या स्थापनेसाठी श्री भाई वैद्य, डॉ. बाबा आढाव, श्री. यदुनाथ थत्ते, प्रा. अ. भि. शहा यांच्या सारख्या विचारवंताचा मोठा हातभार आणि मार्गदर्शन लाभले.

हमीद दलवाई नेहमी म्हणत "मुसलमानांना चिकित्सेचा अंगीकार करायला लावणे हे काम इतके मोठे आणि कठीण आहे की, कोणीही एक माणूस त्याला पूरा पडणार नाही याची मला जाणीव आहे. पण म्हणून या समाजाच्या प्रगतीच्या दृष्टिने या कामाचे महत्व किती आहे. हे ओळखणाऱ्या प्रत्येक व्यक्तिने हे काम हाती घेतले पाहिजे. मी माझ्या अल्प कुवतीनुसार या कामाला वाहून घेतले आहे, हाच माझा लढा आहे. आणि एक मुसलमान

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

म्हणून मी तो लढवणार आहे". मुस्लिम समाजाबद्दल हमीद दलवाई म्हणत "... मोकळ्या मनाने विचार करणारी, आत्मनिरीक्षणाची सवय असलेली. अंतर्मुख बनलेली आणि धर्मातीत विचार करणारी माणसे मुस्लिम समाजात बोटावर मोजण्या इतकीच सापडतील. यासाठी आवश्यक असलेल्या निरपेक्ष, आत्मनिरीक्षणपर, बौद्धिक आणि सांस्कृतिक पातळीचा अभाव मुस्लिम समाजात मोठ्या प्रमाणात आहे; असे मला खेदाने म्हणावे लागते."

भारतीय मुस्लिम समाजाला प्रगतीच्या मार्गाकडे वळवण्यासाठी, समाजाचे तथाकथीत व कुचकामी नेतृत्व संपवण्यासाठी, मुस्लिम समाजात असणारी विसंगती आणि दरी स्पष्ट करणे गरजेचे आहे. धर्मांतर्गत सुधारणे बरोबरच आर्थिक व शैक्षणिक विकास व सामाजिक सुधारणा घडवून आणून मुस्लिम समाजाला धर्मांधतेच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी, आधुनिक लोकशाही, समाजवादी मुल्य, धर्मनिरपेक्षता वाढवण्यासाठी २२ मार्च १९७० साली मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना झाली.

मंडळाच्या स्थापनेपासून दलवाई बरोबर सुरूवातीपासून बाबूमियाँ बँडवाले, सय्यदभाई, हुसेन जमादार, वजीर पटेल यांनी बहुमोल कार्य केले. त्यांच्यासोबत अमीरशेख, अन्वर शेख, बशीरशेख, रसूलशेख, बशीर तांबोळी, ॲड. नजमा शेख आणि त्यांच्या सारखे अनेक कार्यकर्ते होते. दलवाईंच्या निधनानंतर अन्वर राजन, विलायम शेख, ॲड. अब्दूल शेख, आयशा जामदार, ऐनूल आतार, नाईक, बेग, प्रा. एस. एम. तांबोळी, रशिद शेख, डॉ. एस. एम. शेख आणि इतर अनेक तरूण कार्यकर्ते मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या कार्याकडे आकर्षित झाले. मंडळाच्या शाखा मुंबई, कोल्हापूर, पुणे, अहमदनगर, श्रीगोंदा, अमरावती, इचलकरंजी आणि ठिकठिकाणी स्थापन झाल्या.

मुस्लिम सत्यशोधक मंडळाची प्रमुख उद्दिष्टे

(१) राष्ट्रीय एकात्मता व भिन्न धर्मिय समाजात बंधूभाव प्रस्थापित करणे.

(२) जागतिक व धर्मनिरपेक्षतावादी विचारांचा समाजात प्रसार करणे व मुस्लिम समाजाची, धर्ममार्तंडांच्या तावडीतून सुटका करणे.

(३) मुस्लिम समाजाला कुटूंब नियोजनाबाबत जागृत करणे.

(४) मुस्लिम महिलांना सामाजिक न्याय कायद्याच्या आधारे मिळवून देण्याची मागणी करणे.

(५) जबानी तलाकची प्रथा बंद व्हावी, बहुपत्नीत्व यावर बंदी यावी आणि तलाक पिडीत महिलांना पूर्वीप्रमाणे (क्रि.फ्रो.को १२६) पोटगीचा हक्क मिळावा अशी मागणी करणे.

(६) मुल दत्तक घेण्याचा अधिकार प्राप्त होण्यासाठी कायद्यात तरतुद करणे.

(७) प्रामुख्याने प्रादेशिक भाषांतून मुस्लिमांना शिक्षण देणे.

(८) मुस्लिम सामाजातील अंधश्रद्धा दुर करून वैज्ञानिक दृष्टिकोणाचा विकास करणे.

(९) मुस्लिम समाज हा भारतीय समाज परंपरेचा एक अविभाज्य घटक आहे. म्हणून त्यांच्या बद्दलचा संशय दूर करण्याचा प्रयत्न करणे.

(१०) समाजाच्या प्रगतीच्या आड येणाऱ्या सद्य परिस्थितीत विसंगत असणाऱ्या प्रथा नष्ट

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

करून समाजाच्या आर्थिक व सामाजिक सुधारणेस हातभार लावणे.

या मानवतावादी आणि राष्ट्रवादी उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी मंडळाने अनेक उपक्रम राबवली आहेत.

मंडळाच्या स्थापनेनंतर २८ नोव्हेंबर १९७० साली मुस्लिम सत्यशोधक मंडळ आणि इंडियन सेक्युलर सोसायटीच्या संयुक्त विद्यमाने पुण्याच्या नेहरू स्टेडियमवर अखिल महाराष्ट्र मुस्लिम परिषद घेण्यात आली. त्यानंतर लागलीच डिसेंबर १९७१ साली नवी दिल्ली येथे ''ऑल इंडिया कॉन्फरन्स फॉर फॉरवर्ड लुकिंग मुस्लिमस्'' आयोजित करण्यात आली. ज्यामध्ये अनेक प्रांतातून मुस्लिम प्रतिनिधी उपस्थित होते. नंतर लगेचच २७–२८ डिसेंबर १९७१ ला पुण्यात मंडळाने इंडियन सेक्यूलर सोसायटीच्या सहकार्याने ''मुस्लिम महिला परिषद'' घेतली ज्यामध्ये अहमदाबाद, दिल्ली, कलकत्ता, त्रिवेंद्रम, इंदूर या राज्याबाहेरील सुमारे १७६ महिला उपस्थित होत्या. या परिषदेस वाकडेवाडी येथील ''जमेतूल मुस्लिममिन'' जमातीने बहिष्कार टाकूण अनेक स्त्रियांना परिषदेत उपस्थित राहण्यास प्रतिबंध केला. याच जमातीने मंडळाचे सुरूवातीपासूनचे कार्यकर्ते आणि नंतरचे सरचिटणीस श्री. सय्यदभाई यांना त्या ट्रस्टचे १९६५ साली सदस्य म्हणून नियुक्त केले.

१९७३ च्या जानेवारीत ''ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड'' या सनातनी मुस्लिमांच्या संघटनेने समान नागरी कायद्यास विरोध करण्यासाठी एक परिषद भरवली तेंव्हा मंडळाच्या कार्यकर्त्यांनी निषेधात्मक निदर्शने तर केलीच शिवाय, जातीयवाद्यांच्या या परिषदेला आव्हान देण्यासाठी ११ मार्च १९७३ साली मराठा मंदिर, मुंबई येथे ''महाराष्ट्र मुस्लिम सामाजिक परिषद'' मंडळाने भरवली. ३०–३१ डिसेंबर १९७३ साली मंडळाने कोल्हापूर येथे मुस्लिम शिक्षण परिषद घेतली. ज्यामध्ये महाराष्ट्राच्या विविध भागातील ८०० प्रतिनिधी उपस्थित होते. त्यातील सुमारे २५० स्त्रिया होत्या. दि. १ जून १९७४ साली चिपळून येथे मुस्लिम महिलांचा मेळावा घेण्यात आला. यावेळी सनातनी मंडळींनी दंगा करून दलवाईंची गाडी निकामी केली. १९७४ ते १९७७ या काळात दलवाई आजारी असतांनाही अनेक ठिकाणी ''जिहाद – ए – तलाक'' परिषदा घेतल्या. दलवाई आजार वाढला व ३ मे १९७७ या दिवशी हमीद दलवाईंचा मृत्यु झाला.

विरोधकांना दलवाईंच्या मृत्युनंतर फार आनंद झाला. त्यांनी ठिकठिकाणी पेढे वाटले. नगर परिषदा, महापालिकेतील शोक प्रस्तावाला मुस्लिम जातीयवादी नगर सेवकांनी विरोध करून आपल्या कोत्या वृत्तीचे दर्शन घडवले. एवढेच नव्हे तर आता इस्लामचा शत्रू गेला. त्याचे मूठभर साथीदार काय करणार? ''मूरगी मरी, बच्चे दानादान'' अशी अवस्था होईल, मंडळ संपेल असा अपप्रसार सुरू केला. परंतु दलवाई यांनी लावलेल्या या सुधारणेच्या रोपट्यास कार्यकर्त्यांनी ध्येयवेडे होवून जपले आणि वाढवले, श्री. सय्यदभाई यांनी सरचिटणीस पदाची सुत्रे स्विकारली आणि त्यांच्यासोबत अन्वर राजन, हुसेन जमादार, दलवाई भाभी, मकबुल तांबोळी, सय्यद मुनिद, अमीर शेख, अन्वरशेख, वजीर पटेल अशा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अनेक कार्यकर्त्यांनी डोक्यावर कफन बांधून कार्याची धूरा सांभाळली आणि मंडळाचा विस्तार केला.

कोल्हापूर येथील कार्यकर्ते आणि मंडळाचे सध्याचे सरचिटणीस हुसेन जमादार यांनी १९८३ साली तलाकपिडीत महिलांच्या मुलांसाठी वसतिगृह सुरू केले. १९८२ साली "पुरोगामी मुस्लिम" हे नियतकालिक सुरू केले. मुस्लिम समाज शिक्षण व प्रबोधन संस्था सुरु केली. तलाकपिडीत महिलाद्वारे "भाजीभाकर केंद्र" सुरू केले. सामाजिक परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक परिस्थितीचा शिवाजी विद्यापीठाच्या सहकार्याने मुस्लिम समाजाचा सर्वे केला. नुकतेच त्यांनी लिहिलेले आत्मचरित्रात्मक "जिहाद" हे पुस्तक प्रकाशित झाले आहे.

मंडळाने २२ मे १९८५ रोजी पुण्याच्या हमाल भुवनात राज्यव्यापी सामाजिक परिषद भरवली. १७ ऑगस्ट १९८५ रोजी मुंबईच्या मराठा मंदिरात पोटगी बचाव परिषद घेतली.

शहाबानोच्या संदर्भात न्या. चंद्रचूड यांनी दिलेला निर्णयाचे मंडळाने स्वागत केले. शहाबानोच्या निकालाच्या बाजूने जनमत संघटित करण्यासाठी "जूबानी तलाक बंद करा" "द्विभार्या प्रतिबंधक कायदा लागू करा" या मागण्या घेऊन मंडळाने ३ नोव्हेंबर ते १८ नोव्हेंबर १९८५ या काळात महाराष्ट्र भर "तलाक मुक्तिमोर्चा" काढून जन अभियान चालवले. या आंदोलनात कार्यकर्त्यांना ठिकठिकाणी त्रास झाला. दगडफेक, मारहाण करण्याचा सनातन्यांनी प्रयत्न केला.

२१ व २२ फेब्रुवारी १९८६ रोजी महाराष्ट्रातील तलाकपिडीत महिला, कार्यकर्ते आणि मुस्लिम स्त्रियांनी १९८६ च्या तलाक हक्क संरक्षण विधेयकास विरोध करण्यासाठी राष्ट्रपती, पंतप्रधान, कायदामंत्री यांना भेटण्यासाठी याच वर्षी (१९८६–एप्रिल) विविध समविचारी संघटनांच्या सहकार्याने सुमारे २००० मुस्लिम महिला विविध प्रांतातून एकत्र आल्या आणि तलाक हक्क संरक्षण कायदा, १९८६ मागे घेण्याच्या मागणीसाठी मोर्चा व निदर्शने करून पंतप्रधान व राष्ट्रपतींना निवेदने दिली. यासारखी सभा सम्मेलने, चर्चा, शिबीरे, धरणे, लेखन या माध्यमाने मुस्लिम सत्यशोधक मंडळाने आपले कार्य वाढवले आहे.

मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या कार्याचे व्याप वाढले, मंडळाच्या मार्फत महाराष्ट्रात ठिकठिकाणी आणि महाराष्ट्राबाहेर, कर्नाटक, तामिळनाडू, गुजराथ, उत्तरप्रदेश आणि इतर राज्यात "मुस्लिम महिला मदत केंद्रे" निर्माण केली.

मुस्लिम महिला मदत केंद्रामार्फत स्त्रियांना आधार, मार्गदर्शन आणि कायद्याचा सल्ला दिला जातो. अनेक वेळा पुरूष आपल्या बायकोला टाकून देतो. तलाकही देत नाही अशा प्रसंगी "तलाक" मिळवून देण्याचा प्रयत्न केला जातो. महिला मदत केंद्रातून कौटुंबिक प्रश्न सोडवून, पति–पत्नीमधील समझोता करण्याचा प्रयत्न केला जातो. त्याचबरोबर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शिक्षण, कुटूंब नियोजन, हिंदु–मुस्लीम ऐक्य, आणि स्त्रियांच्या विविध प्रश्नावर जनजागृती केली जाते.

शहाबानोच्या प्रकरणानंतर देशाच्या विविध भागातून मंडळाला चांगला प्रतिसाद मिळाला. या विखुरलेल्या समविचारी, पुरोगामी विचारांच्या मुस्लिमांना एकत्र आणण्याचा प्रयत्न झाला आणि यातूनच सुधारणावादी चळवळीस राष्ट्रीय पातळीवरील कायमचे व्यासपीठ निर्माण करून देण्यासाठी "ऑल इंडिया प्रोग्रेसिव्ह मुस्लिम कॉन्फरन्स" ची स्थापना १९८५ साली करण्यात आली. या व्यासपिठामार्फत मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे महाराष्ट्रातील कार्य आता राष्ट्रीय पातळीवर गेले असून जनजागृती व समाज प्रबोधनाच्या कार्याला गती मिळाली आहे. मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे संघटन श्री. सय्यदभाई हे अखिल भारतीय पुरोगामी मुस्लिम परिषदेचे सरचिटणीस आहेत. भारताच्या विविध भागात परिषदेच्या शाखा निघाल्या आहेत.

या परिषदेमार्फत १९८७ साली महाराष्ट्रात कोल्हापूर येथे पहिले अधिवेशन घेण्यात आले. त्यात मुस्लिम समाजाच्या सामाजिक प्रश्नांचा विचार झाला. दुसरे अधिवेशन १९८८ साली गुजरात मध्ये अहमदाबाद येथे झाले. त्यात प्रामुख्याने महिलांच्या समस्यांचा विचार करण्यात आला. तिसरे अधिवेशन १९८९ साली कर्नाटकात बंगलोर येथे व चौथे १९९० साली तामिळनाडूत मदूराई येथे घेण्यात आले. परिषदेचे पाचवे अधिवेशन ३० व ३१ मे ९२ रोजी "भारत इंग्लीस स्कुल, पुणे" येथे झाले. यात ६०० हून अधिक प्रतिनिधी उपस्थित होते. ज्यांत ६० टक्केहून अधिक महिला होत्या. या अधिवेशनातून मुस्लिम महिलांच्या प्रश्नांखेरीज, राष्ट्रीय एकात्मता, काश्मिर प्रश्न, रामजन्मभूमी, बाबरी मुस्जिद वाद, शिक्षण या प्रकारच्या प्रश्नांवरही विचार–विनिमय झाला. राष्ट्रीय पातळीवरील अधिवेशनां बरोबर "प्रांतिय पातळीवरील" विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. परिषदेच्या ज्या राज्यात शाखा आहेत. त्या ठिकाणी "मुस्लिम महिला मदत केंद्र" चालवले जाते. नुकतेच सय्यदभाईच्या पुढाकाराने लखनौ येथे २३ मे ९३ रोजी मुस्लिम महिला मदत केंद्राची स्थापना झाली आहे.

मंडळामार्फत दुसरा महत्वाचा उपक्रम म्हणजे "हमीद दलवाई पुरस्कार". हा पुरस्कार दरवर्षी दलवाईंच्या पुण्यतिथीदिनी म्हणजेच ३ मे रोजी दिला जातो. मंडळाप्रमाणेच मंडळाशी सुसंगत काम करणारे अनेक व्यक्ति समाजात आहेत, साहित्य, कला, शिक्षण व सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या पुरोगामी विचारांच्या मुस्लिम व्यक्तिस हा पुरस्कार दिला जातो. मंडळाचे कार्य वाढवण्यासाठी आणि या प्रकारच्या व्यक्तिंची समाजाने नोंद घ्यावी यासाठी हा पुरस्कार दिला जातो. या पुरस्कारामध्ये रूपये १०००/– आणि स्मृतीचिन्ह देऊन सत्कार करण्यात येतो. पहिला पुरस्कार मंडळाच्या कार्यकर्त्या प्रा. रहिमतपूरे मुमताज यांना मरणोत्तर देण्यात आला. हा पुरस्कार डॉ. बाबा आढाव यांच्या हस्ते कोल्हापूर येथे देण्यात आला. दुसरा पुरस्कार बोहरा समाजातील सुधारणावादी विचारवंत ताहेर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पुनावाला यांना श्रीगोंदा येथे मा. नानासाहेब गोरे यांच्या हस्ते दिला. तिसरा पुरस्कार चित्रपट दिग्दर्शक आणि पुरोगामी विचारवंत डॉ. जब्बार पटेल यांना पुण्यात थोर नाटककार व विचारवंत विजय तेंडूलकर यांच्या हस्ते देण्यात आला. चौथा पुरस्कार न्या. ऐहतेशामोद्दिन देशमुख यांना कोल्हापूर येथे मा. यदुनाथ थत्ते यांच्या हस्ते देण्यात आला आणि पांचवा पुरस्कार समारंभ पुण्यात ३ मे १९९३ रोजी संपन्न झाला. हा पुरस्कार थोर संस्कृत पंडित श्री. गुलाम दस्तगीर बिरासदार यांना सुप्रसिद्ध अभिनेते डॉ. श्रीराम लागू यांच्या हस्ते देण्यात आला. अध्यक्षस्थानी मा. निळू फुले होते. सन १९९४ चा पुरस्कार जेष्ठ साहित्यीक व पुरोगामी कार्यकर्ते श्री. फ. म. शहाजिंदे यांना दिला.

मागच्या कांही वर्षात देशातील धर्मांधता वाढली असून, हिंदु–मुस्लिम समाजात एकमेकांविरूद्ध गैरसमज पसरले आहेत. याचा परिणाम हिंदु–मुस्लिम दंगे वाढवण्यात झाला. दोन्ही समाजातील फंडामेंन्ट्यालिस्ट प्रवृत्तीने आपली ताकद पणाला लावून देशाचे अखंडत्व धोक्यात आणले आणि राष्ट्रीय एकात्मता कोंढीत सापडली. मंडळ आयोग, शहाबानो प्रकरण, पंजाबमधील असंतोष, काश्मिर मधील बंड, राजीव गांधी यांची हत्या, रामजन्म भूमी बाबरी मस्जिद वाद आणि यासारखे असंख्य प्रश्न निर्माण झाले. या दृष्टीकोनातून "राष्ट्रीय एकात्मता आणि हिंदु मुस्लिम ऐक्य" हे कार्य अधिक मोलाचे वाटले. माणसं जिवंत राहिली तर प्रबोधनाचे कार्य करता येईल. म्हणून मंडळाने १९९१–९२ हे वर्ष राष्ट्रीय एकात्मता वर्ष म्हणून साजरे केले. यामध्ये ठिकठिकाणी शिबिरे, व्याख्याने, परिसंवाद घेण्यात आले. ज्यामध्ये डॉ. विजय तेंडूलकर, श्री. निळू फुले, दिग्दर्शक सय्यद मिर्झा, मा. नानासाहेब गोरे, श्री. विनायकराव कुलकर्णी, अरविंद लेले, प्रा. एच. एम. शेख, असगरअली इंजिनिअर, प्राचार्य सत्यरंजन साठे, नरूभाऊ लिमये, मा. बाळासाहेब भारदे, मा. डॉ. बाबा आढाव, मा. भाई वैद्य, प्रा. अजित अभ्यंकर, मा. यदुनाथ थत्ते, ताहेर पुनावाला आणि इतर विचारवंताबरोबरच मंडळाच्या जेष्ठ कार्यकर्त्यांनी ठिकठिकाणी मार्गदर्शन केले.

१९९२–९४ हे वर्ष "तलाक पिडीत मुस्लिम महिला वर्ष" म्हणून साजरे करण्याचे ठरवण्यात आले होते. परंतु ६ डिसेंबर ९२ रोजी "बाबरी मस्जिद उध्वस्त करण्यात आली आणि हिंदु–मुस्लिम प्रश्न अधिकच गंभीर झाला. अयोध्येनंतरच लागलीच मुंबई आणि देशातील विविध भागात दंगली पेटल्या, असंख्य निरापराध लोकांना प्राण गमवावे लागले. पाकिस्तान येथील मुस्लिमांना चिथावण्या देतच होता. नंतर बॉम्ब स्फोट आणि इतर अनेक दुर्दैवी घटना घडल्या. या सर्वांचा परिणाम राष्ट्रीय एकात्मतेस आव्हान मंडळाने पुन्हा १९९३–९४ हे वर्ष हिदु–मुस्लिम सामंजस्य व राष्ट्रीय एकात्मतेसाठी कार्य करण्याचे ठरवले. या निमित्ताने विविध कार्यक्रम आणि उपक्रम घेण्यात येत आहेत.

मंदिर–मस्जिद सुलाह कमिटी

बाबरी मस्जिद आणि रामजन्मभूमी यांचा वाद तसा फार जूना आहे. परंतु ६ डिसेंबर रोजी बाबरी मस्जिद उध्वस्त झाल्यानंतर या पोहचले आहेत आणि यावरील उलट

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सुलट प्रतिक्रयेतून हजारो नागरिकांच्या कत्तली झाल्या. कोट्यावधी रूपयाला देशाला आर्थिक फटका बसला. या सर्व प्रकरणातून जागतिक पातळीवर भारताची मोठी मानहानी झाली. मुंबईत तर ६ डिसेंबर ९२, ६ जानेवारी ९३ व १२ मार्च ९३ रोजी घडलेल्या वाईट घटनांची इतिहासात नोंद होईल.

हिंदु–मुस्लिम सलोख्याच्या संदर्भात अनेक विषयापैकी बाबरी मस्जिद रामजन्म भूमीचा वाद हा फार महत्वाचा विषय आहे. मंदीर–मस्जीद वादातून हिंदु–मुस्लिम दोन्ही समाजाने बाहेर पडून राष्ट्रीय अस्मिता व राष्ट्रीय एकात्मता यांच्या बांधणीसाठी एकत्र येण्याची अतिशय गरज आहे म्हणून देशातील हिंदु–मुस्लिम समाजातील पुरोगामी विचारवंत आणि समतावादी कार्यकर्ते यांनी एकत्र येवून राष्ट्रीय पातळीवर "मंदिर – मस्जिद सुलाह कमिटी" या नावाची समिती स्थापना दिनांक १८ एप्रिल ९३ रोजी पुण्यात करण्यात आली.

या कमिटीची तीन कलमी योजना खालील प्रमाणे आहे.

(१) बाबरी मस्जिद वरील हक्क मुस्लिम समाजाने सोडावा.

(२) हिंदुत्ववाद्यांनी भविष्यकाळात देशातील इतर कोणत्याही मस्जिदीच्या ठिकाणी मंदिर असल्याचा हक्क सांगू नये व त्यावर आंदोलन करू नये.

(३) मंदिर मस्जिद वादाच्या बाबतीत अग्रभागी असणाऱ्या हिंदु–मुस्लिम समाजातील संघटनांनी मंदिर–मस्जिद च्या बाबतीत असनारी १९४७ ची परिस्थिती मान्य करावी आणि शासनाने या संबंधात पास केलेल्या विधेयकांचे काटेकोर पालन करावे.

मंदिर–मस्जिद वादाच्या संदर्भात अग्रभागी असलेले, बाबरी मस्जिद ॲक्शन कमिटी, बाबरी मस्जिद कोऑर्डीनेशन कमिटी, विश्व–हिंदु परिषद, शिवसेना, स्वयंसेवक संघ, बजरंग दल, भारतीय जनता पक्ष या संघटनांच्या नेत्याशी चर्चा करून ही तीन कलमी योजना राष्ट्रहिताच्या दृष्टीने मान्य करावी यासाठी प्रयत्न करणार.

या कमिटीत माजी न्यायमूर्ती श्री. व्ही. एम. तारकुंडे, ॲड. सी. आर. दळवी, डॉ. श्रीराम लागू, श्री. निळू फुले, माजी कुलगुरू देवदत्त दाभोळकर, नरेंद्र दाभोळकर, श्री. रा. प. नेने, ताहेर पूनावाला आणि इतर राष्ट्रीय पातळीवरील नेते आहेत. सध्या राष्ट्रीय पातळीवरील अध्यक्ष म्हणून श्री. सय्यदभाई, उपाध्यक्ष म्हणून डॉ. श्रीराम लागू आणि चिटणीस म्हणून हुसेन जमादार यांची निवड करण्यात आली आहे.

या कार्यक्रमास मौलाना वहिबुद्दिखान व त्यांच्यासारख्या मान्यवरांनी सक्रीय पाठिंबा दिला आहे. या कमिटीची स्थापना मुस्लिम सत्यशोधक मंडळ व ऑल इंडिया प्रोगेसिव्ह मुस्लिम कॉन्फरन्स यांच्या पुढाकारातून झाली असली तरी मंडळ व परिषदेच्या उद्दिष्टांसाठी सदर कमिटीचा वापर केला जाणार नाही असे स्पष्ट करण्यात आले आहे.

राष्ट्रीय एकात्मता वाढवण्यासाठी विविध कार्यक्रम राबवण्यात येत असतात. लवकरच मंदिर–मस्जिद सुलाह समितीच्यावतीने सहयांची मोहिम हाती घेण्यात येणार आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मुस्लिम सत्यशोधक मंडळाची आयडिऑलॉजी – तत्त्वविचार

कोणत्याही धर्माचे ऐहिक आणि पारलौकिक विचार असतात. रोजच्या जीवनातील व्यववहार आणि परमेश्वर आणि प्रार्थने संबंधीचे नियम व कर्तव्य यालाच मुस्लिम समाजात "आदत" आणि "इबादत" म्हणतात. सत्यशोधक मंडळाचे कार्य "आदत" शी अधिक प्रमाणात संबंधीत आहे. "इबादत" म्हणजेच नमाज, रोजा, जकात, पैगंबरावर आणि श्रद्धेच्या कुराणावर विश्वास या बाबी जोपर्यंत श्रद्धेच्या असतात व निरूपद्रवी असतात तोपर्यंत त्यात बदल व्हावा असा हट्ट करणे अव्यवहारिक आहे. "आदत" म्हणजे रोजचे व्यवहार राज्यामध्ये हिंदु–मुस्लिम संबंध, व्यवसाय, शिक्षण, दिनचर्या, कायदे आणि ऐहिक जीवन यांचा समावेश असतो. स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टीकोन, तोंडी तलाक पध्दत, बहुपत्नीत्व, पोटगी, बुरखा, गोषा, कुटूंब नियोजन या गोष्टी "आदत" शी निगडीत असल्याने त्या काळाप्रमाणे बदलल्या पाहिजेत असे मंडळास वाटते.

सध्या मुस्लिम समाज झापड लावलेल्या घोड्याप्रमाणे वागत आहे. "जे कुराणात आहे ते इस्लामिक, आणि जे कुराणात नाही ते इस्लाम विरोधी" अशा प्रकारची मानसिकता झाल्यामुळे, धर्मनिरपेक्षता, समान नागरि कायदा, कुटूंब नियोजन, आणि नविन, आधुनिक कल्पना कुराणात नसल्यामुळे याकडे उदासिनतेने पाहण्याचा प्रयत्न होतो.

वास्तविक पाहता कुटूंब नियोजन आणि कुराण याचा संबंध नाही. इस्लाममध्ये कुटूंब नियोजनाचे समर्थनच केले आहे. त्या प्रमाणे अनेक इस्लामिक देशांमध्ये शासकीय पातळीवरून कुटूंब नियोजनाचा प्रसार केला जातो. आपल्या देशात मात्र तथाकथित पुढाऱ्यांनी समाजाची दिशाभूल करून कुटूंबनियोजन इस्लामच्या विरूद्ध असल्याचा खोटा प्रसार करतात व समाजाच्या आर्थिक व सामाजिक प्रगतीस प्रतिबंध करतात. पाकिस्तानात, बांगला देशात स्त्रिया पंतप्रधान होवू शकतात. भारतातही अनेक मुस्लिम स्त्रिया आमदार, खासदार आणि मंत्री होतात. शिक्षणात गुणवत्ता यादीत येतात. तरीही त्यांना दुय्यम स्थान देण्यात आले आहे. वाटेल तेंव्हा तलाक देण्याची आणि पाहिजे तेंव्हा दुसरे लग्न करण्याची व्यवस्था कायद्याने मान्य केली आहे. यामुळे मुस्लिम स्त्रियांच्या डोक्यावर तलाक आणि बहुपत्नीत्वाची तलवार सतत टांगत ठेवली आहे. धर्मनिरपेक्ष राज्यामध्ये प्रत्येकाच्या धर्मानुसार वागण्याची व व्यक्तिगत कायद्याची तरतुद, सर्वधर्म समभावाच्या नावाखाली राबवली जाते, ही धर्मनिरपेक्षतेची थट्टा नाही का? मुस्लिम समाजात मूल होत नसेल तर मूल दत्तक घेण्याची कायद्याने तरतूद नसल्याने बहुपत्नीत्वाचे प्रमाण वाढते आहे. तलाक दिल्यानंतर नवऱ्याने पोटगी देण्याचे रद्द झाल्यापासून (शहाबानो प्रकरणानंतर) तलाक देण्याचे प्रमाणही वाढले आहे. या सर्वांवर एक उपाय म्हणून मानवी मुल्यावर आधारीत समान नागरी कायद्याची आवश्यकता आहे.

राष्ट्रीय एकात्मता ही काळाजी गरज आहे. सर्वधर्म पंथाच्या लोकांनी आपला वैयक्तिक सवतासूभा बाजूला सारून राष्ट्र बांधणीसाठी आणि एकात्मता टिकविण्यासाठी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सर्वांनी एकत्र येवून काम करण्याची आवश्यकता आहे. मुस्लिम धर्मामध्ये "दारूलहर्ब" आणि "दारूल इस्लाम" या संकल्पना अतिशय महत्वाच्या आहेत. इस्लाममध्ये व्यक्तिचे खाजगी, सामाजिक आणि राजकीय क्षेत्र परस्परांशी संबंधीत आहेत. "दारूलहर्ब" म्हणजे मुस्लिम शासन, किंवा इस्लामिक राज्य नसलेले बिगर मुस्लिमांचे राज्य आणि "दारूल इस्लाम" म्हणजे मुस्लिम प्रतिनिधींचे राज्य, इस्लामिक शासन. प्रत्येक मुसलमानाने "दारूल इस्लाम" निर्माण करण्यासाठी प्रयत्न करावा आणि ते त्यांचे कर्तव्य आहे असे मानले आहे. भारतातील परिस्थिती ही "दारूल हर्ब" सारखी आहे, येथे "दारूल इस्लाम" व्हावे हे मुसलमानाचे स्वप्न आहे. वास्तविक पाहता भारत हा "दारूल आमन" असणारे राष्ट्र आहे. धर्मनिरपेक्ष राष्ट्र आहे. परंतु इस्लामिक्षेत्र आणि सेक्यूलॅरिझम ह्या दोन टोकाच्या भूमिका आहेत.

सध्या भारतातले आणि जेथे मुस्लिम अल्पसंख्यांक असतात. त्या ठिकाणी धर्मनिरपेक्षता हा त्यांचा आधार आहे, मित्र आहे. दुर्दैवाने भारतात आपणास असे चित्र दिसते की "ज्या ठिकाणी मुस्लिम बहुसंख्यांक आहेत त्या ठिकाणी इस्लामलिझम चा पुरस्कार करायचा आणि ज्या ठिकाणी मुस्लिम अल्पसंख्यांक आहेत त्याठिकाणी धर्मनिरपेक्षतेचा पुरस्कार करायचा' म्हणजेच धर्मनिरपेक्षेतेचा आपल्या सोयी प्रमाणे वापर करायचा. इस्लामिक राष्ट्रामध्ये सेक्यूलॅरिझमचे तत्त्वज्ञान फार कमी प्रमाणात वापरले जाते कारण "पॅन इस्लामिझम", जागतिक पातळीवर इस्लामचे शासन निर्माण करण्याचे स्वप्न पाहिले जाते आणि त्या प्रकारच्या तत्त्वज्ञानातूनच राष्ट्रीय एकात्मतेस धोका निर्माण होत असतो. भारतात हिंदू-मुस्लिम सामंजस्य आणि राष्ट्रीय एकात्मता निर्माण करायची असेल तर आपला अलगतावाद बाजूला सारून भारतीय मुस्लिमांनी, कुटूंब नियोजन, आधुनिक शिक्षण, समान नागरीकायदा स्विकारून राष्ट्राच्या मुख्य प्रवाहात येण्याची आवश्यकता आहे.

मुस्लिम समाजाच्या आर्थिक आणि सामाजिक प्रगतीसाठी, प्रादेशिक भाषेचा स्विकार, आधुनिक आणि व्यवसायाभिमुख शिक्षणाची जोड आवश्यक आहे. मुस्लिम सत्यशोधक मंडळास सातत्याने असे वाटते की, मुस्लिम समाजाने उर्दू माध्यमाचा केवळ अस्मितेसाठी आग्रह न करता आपल्या विकासासाठी प्रांतीय भाषेतून शिक्षण घ्यावे. जास्तीत जास्त तरूणांनी व्यवसायाभिमुख, तांत्रिक, वैज्ञानिक शिक्षणाकडे वळावे. मुस्लिम स्त्रियांना जास्तीत जास्त शिक्षण देवून त्यांना स्वावलंबी करावे. कारण शिक्षणाच्या अभावामुळेच अनेक आर्थिक समस्या निर्माण झाल्या आहेत. व्यक्ति, कुटूंब, राष्ट्र यांच्या विकासासाठी शिक्षण हेच प्रभावी साधन आहे. त्यासाठी मुस्लिम समाजाने पारंपारिक दृष्टिकोणाचा त्याग करून आधुनिक शिक्षण स्विकारून काळाबरोबर चालण्याची गरज आहे. आधुनिक शिक्षण घेतल्यामूळे आपल्या धार्मिक श्रद्धांना तडे जाईल या भिती पोटी तथाकथित मुस्लिम नेते आधुनिक शिक्षणास विरोध करतात. सर्वसामान्य मुस्लिम समाजाने उर्दू माध्यमातून शिक्षण घ्यावे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

असा आग्रह धरतात आणि स्वतःच्या मुलांना मात्र "इंग्रजी माध्यमाच्या "शाळेत पाठविले जाते. उर्दू माध्यमाच्या शाळांमधून आपले आगळेपण टिकवण्याचा प्रयत्न केला जातो. अनेक ठिकाणी विज्ञान,.गणिताच्या तासांचा वेळ कमी करून धार्मिक शिक्षण दिले जाते. याशिवाय उर्दू माध्यमाच्या शाळांमधून उच्च शिक्षणाची सोय नसल्याचे गळतीचे प्रमाण वाढते आणि नोकरी मिळण्यास सुद्धा अडचणी येतात. पर्यायाने समाज शिक्षणापासून वंचीत होतो आणि पुन्हा आपल्या मागासलेपणास आमंत्रण मिळते.

मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या कार्यात अनेक अडचणी आहेत? हा प्रवाहाच्या विरुद्ध दिशेने पोहण्याचा प्रयत्न आहे. परंतु मंडळाने स्विकारलेले काम जिद्दीने पुढे नेण्याचा प्रयत्न होत आहे. हमीद दलवाई नेहमी म्हणत असत "भारतातील मुस्लिम संस्कृतीने मला घडविले आहे, ह्या संस्कृतीने ज्या चांगल्या गोष्टी निर्माण केल्या आहेत त्याचा मला अभिमान आहे आणि ज्या विद्रूप गोष्टी आहेत. त्या बदलल्या पाहिजेत."

मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या कार्याचा धागा नावाप्रमाणेच महात्मा फुलेंच्या कार्याशी जोडला आहे. सध्याच्या परिस्थितीत या प्रकारच्या विचाराची गरज आहे. मुस्लिम स्त्रियांमध्ये अनेक ताहेराबी, हमीदनबी आणि शहाबानो निर्माण होण्याची आणि बंड करण्याची आवश्यकता आहे. सध्या समाज अधिकाधिक अंतर्मुख होतांना दिसत आहे. शिक्षणाचे प्रमाण वाढले आहे. कुटूंब नियोजनाचे प्रमाण वाढले आहेत. तरूण मुख्य प्रवाहात येण्याचा प्रयत्न करीत आहेत. जागतिक पातळीवर "वुमेन अंडर मुस्लिम लॉ" नावाची संघटना काम करित आहे. महाराष्ट्रात मुस्लिम मराठी साहित्य सम्मेलन होत आहेत, मौलविनी एकावेळी एका बैठकीत तिनदा तलाक शब्द उच्चारून तालक देणे अवैध ठरवण्याचा फतवा काढाला आहे. या सर्व पार्श्वभूमीचा परिवर्तनाच्या चळवळीशी संबंध आहे आणि ह्या प्रकारचे बदल पुरोगामी विचाराचे पाऊल पुढे पडण्याचे चिन्ह आहे. याचा आनंद वाटतो.

सध्या पुण्यात चार ठिकाणी म्हणजे रास्तापेठ, गणेशपेठ, खडकी, दांडेकर पूल या ठिकाणी मुस्लिम महिला मदत केंद्र चालवले जाते. सय्यदभाई, प्रा. तांबोळी, रशिद शेख, डॉ. एम. एस. शेख, बानो सय्यद, गफूरभाई, अन्वरराजन, चौदसाब आणि इतर कार्येकर्ते काम करतात. कोल्हापूर येथे संघटनेचे सरचिटणीस हुसेन जमादार, बाबासाहेब काझी, प्रा. नाईक, प्रा. आय,एन.बेग, प्रा. ऐलून आतार, पेंढारी आयशा जमादार आणि इतर कार्यकर्ते मंडळाची धूरा सांभाळतात, तर मुंबईला कार्याध्यक्षा मेहरून्नीसा दलवाई, पठाण खान आणि शेख काम करतात. फलटण येथे उपाध्यक्ष प्रा. वि. अ. शेख, प्रा. मोदी, प्रा. डांगे काम करतात. याचप्रमाणे श्रीगोंदा येथे समीर मणीयार बाबूमियाँ बँडवाले (सुरूवाती पासूनचे अध्यक्ष), पठाण टेलर, आणि इतर कार्यकर्ते आहेत. सांगली, इचलकरंजी भागात बशीर तांबोळी, गाझीउद्दीन सलाती, डॉ. पठाण काम करतात आणि या महाराष्ट्राच्या कामबारोबरच भारतातील इतर राज्यामध्ये ऑल इंडिया प्रोग्रेसिव्ह मुसिलम कॉन्फरन्सने सत्यशोधक विचारासाठी व्यासपीठ निर्माण केले आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

या विकासाबरोबरच संघटनात्मक पातळीवरील अडचण म्हणजे, सुरूवातीच्या काळात मंडळाबरोबर असणारे कार्यकर्ते, काही दिवसानंतर सत्ता आणि प्रतिष्ठा याकडे आकर्षिले जातात आणि मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या अवघड कामापासून सूटका करून घेण्याचा प्रयत्न करतात. मंडळामध्ये सुरूवातीपासून असणारे प्रा. फकूद्दिन बेन्नूर आणि अमरावतीचे वजीर पटेल, यांनी मंडळाचे परिवर्तनवादी काम पुढे घेवुन जाण्याऐवजी .... ज्या कामातून सहज सत्ता आणि प्रतिष्ठा मिळेल; अशा प्रकारच्या कार्यक्षेत्राकडे वळले आहेत. अर्थात बाजूला जावून मंडळाच्या विचाराशी पूरक असणारे काम केल्यास मंडळास त्याचा अभिमान आहे. परंतु काही वेळा त्यांच्या कडून मंडळाबद्दल टीका होते. (मुस्लिमांची खोटी सहानुभूती मिळवण्यासाठी) हे मंडळाचे दुर्दैव म्हटले पाहिजे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

॥ २३ ॥

कामगार चळवळ : काल, आज आणि उद्या

ॲड. भगवानराव देशपांडे

☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆

भारतामध्येही आज संघटित कामगार चळवळ ाढ त असल्याचे व प्रभावी होत असल्याचे दिसत आहे. भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीमधूनच येथील कामगार चळवळ आकार घेत आलेली आहे. म्हणून या चळवळीचा इतिहास हा उज्वल आहे. स्वातंत्र्याच्या संग्रामात आजच्यासारखे कामगारांचे अनेक मागण्यांचे प्रश्न चळवळीचे उद्दिष्ट नव्हते. देशाचे स्वातंत्र्य ही एकमेव प्रेरणा कामगार चळवळीची प्रेरकशक्ती होती. पहिले महायुद्ध संपल्यानंतर जगभरच क्रांतिकारक उठावांना सुरूवात झाली. युरोपमधील देशात कामगार वर्ग समाजवादाच्या प्रस्थापनेसाठी उठाव व लढे करीत होता तर भारतासारख्या गुलाम देशातील कामगार इतर जगतासोबत स्वातंत्र्यासाठी उठाव करत होता. सो. रशियांची यशस्वी कामगार क्रांती या घटनांना स्फूर्ती देत होती. कार्ल मार्क्सचे तत्त्वज्ञान व लेनिनचे पुढारीपण या सर्व चळवळींना सामर्थ्य प्राप्त करून देत होते. याच काळात लो. टिळक यांचे वास्तव्य इंग्लंडमध्ये बराच काळ राहिले.

अवलोकन

इंग्लंड व युरोपमधील कामगारांची एकजुटीची चाललेली चळवळ, तेथील कामगार वर्गाचा मालकशाही विरूद्ध चाललेला लढा व कामगार वर्गाची प्रचंड शक्ती याचे बारकाईने टिळकांनी अवलोकन केलेले होते. मुंबईत टिळकांची एक प्रचंड सभा झाली. या सभेत त्यांनी कामगार चळवळींच्या या सामर्थ्याचे मर्म व या चळवळीची स्वातंत्र्यासाठीची पूरकता विशद केली. रशियातील कामगार वर्गाच्या नेतृत्वाखाली झालेल्या क्रांतीचाही त्यांनी उल्लेख केला. भारतामध्ये अशीच संघटित कामगार चळवळ साम्राज्यशाहीचे जोखड फेकून दिल्याशिवाय राहणार नाही असा आत्मविश्वास व्यक्त केला. भारतीय संघटित कामगार चळवळीची हीच मुहूर्तमेढ ठरली व लो. टिळकांचे आवाहन ही प्रेरकशक्ती ठरली. म्हणूनच भारतीय इतिहासातील व या शतकातील १९२० साल कामगारांच्या उठावाचे साल ठरले. नेल डॉग्स, पोस्ट छोट्या-छोट्या प्रेस, ट्राम, पोर्ट ट्रस्ट, वर्तमानपत्रे या सर्व क्षेत्रातील कामगार संघटित होत होते. भारतातील सर्व औद्योगिक केंद्रातील सर्व कामगार संघटित होऊन उठाव करीत होते व गौरवाची व भूषणाची बाब म्हणजे हे सर्व कामगार स्वराज्याच्या मागणीची घोषणा करीत होते. या सर्व विखुरलेल्या कामगारांना संघटित करण्यासाठी व स्वातंत्र्य चळवळीतील एक संघटित शक्ती म्हणून आकार देण्यासाठी अखिल भारतीय पातळीवर कामगार संघटनेची निकड राष्ट्रीय पुढाऱ्यांना जाणवू लागली. पहिले कामगारांचे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अधिवेशन १९२० साली मुंबईला भरले. या पहिल्या अधिवेशनाचे अध्यक्ष होते लाला लजपतराय यांचे युरोपात बराच काळ वास्तव्य राहिलेले होते. युरोपाच्या अनेक देशात जाऊन त्यांनी तेथील बलाढ्य कामगार चळवळ पाहिली होती. रशियामध्ये झालेल्या कामगार क्रांतीचा वृत्तांत त्यांनी युरोपात ऐकलेला होता व त्याचा त्यांनी अभ्यासही केलेला होता. त्यांचे अध्यक्षीय भाषण समाजवादी विचारांनी भारावून गेलेले होते. त्यांनी आपल्या भाषणामध्ये फार मौलिक विचार मांडले. भारताची पुरातन संस्कृती, महान तत्त्वज्ञान सुंदर कला व भारतीय जनतेला संघटित भांडवलाने निष्प्राण करून टाकलेले आहे. लष्करशाही व साम्राज्यशाही ही भांडवलशाहीची जुळी अपत्ये आहेत. या तिघांची सावली, त्यांची फळं, त्यांची सर्व सईच विषारी आहे. या विषाला जालीम औषध सापडले आहे. आणि हे जालीम औषध म्हणजे संघटित कामगार. यापुढे जाऊन लाला लजपतरायांनी सांगितले की, जागतिक पायावर भांडवल संघटित झाले आहे. कल्पनातीत असे आर्थिक व राजकीय सामर्थ्य त्यांच्या पाठीशी उभे आहे. सबंध जगाला या संघटित भांडवलाचा धोका आहे. हे धोके टाळण्यासाठी भारतातील श्रमिकांना भारताबाहेरील श्रमिकांबरोबर हातमिळवणी करावी लागेल. कारण जगभरच्या श्रमिकांचे हितसंबंध सारखेच आहेत. लाला लजपतराय यांचे हे भाषण कामगार चळवळीचे स्त्रोत ठरले आहे. संघटित कामगार चळवळीने साम्राज्यशाहीविरूद्ध उठाव केला पाहिजे तसेच भांडवलशाही विरूद्धही लढा दिला पाहिजे असे त्यांनी प्रतिपादन केले. देशाचे स्वातंत्र्य व स्वतंत्र देशातील शोषणमुक्त समाज हे कामगार चळवळीचे उद्दिष्ट या पहिल्या अधिवेशनातून निश्चित झाले व भारतातील कामगार चळवळीची परंपरा व त्याचा इतिहास या ध्येयाने प्रेरित झालेला आहे याची साक्ष पटते. यातून कामगारवर्गीय जाणीव व त्यांचे आंतरराष्ट्रीय अध्येयाने प्रतीत होते.

वैमनस्य

स्वातंत्र्या आगेदर सुद्धा आजच्या सारखे जातीय व धार्मिक वैमनस्य निर्माण करण्याचे प्रयत्न केले जात होते. या समाजाविघातक व विघटनकारी शक्तींचाही मुकाबला कामगार चळवळीने केला आहे. स्वतांत्र्याच्या चळवळीची जनतेची एकसंघ शक्ती विघटित व्हावी म्हणून साम्राज्यातर्फे धार्मिक व जातीय कलह निर्माण करण्याचे प्रयत्न केले जात होते. तर श्रमिकांची एकजूट मोडण्याचे प्रयत्न हितसंबंधीयांकडून केले जात होते. जातीय चळवळीमुळे कष्टकरी जनतेत फूट पडते व शोषणाविरूद्धचा लढा कमकुवत होतो व पिळवणूक करणाऱ्यांचे फावते हे त्या वेळच्या कामगार चळवळीने हेरलेले होते व हिंदू आणि मुसलमान जनतेसाठी १९२७ साली एक जाहीरनामा प्रसिद्ध केलेला होता व त्यामध्ये हिंदू आणि मुस्लिम दोन्ही कष्टकऱ्यांचे या जातीय वैमनस्यात हित नाही असे दाखवून दिले. दंगल होऊन रक्त सांडलेच तर दोन्ही जातीतील श्रमिकांचे रक्त सांडेल. हिंदू जनता व मुस्लिम जनता दोहोंचीही सामाजिक पिळवणूक होत आहे. आपल्या राजकीय आणि आर्थिक अवस्थेतून मुक्तता मिळवण्यासाठी लक्षावधी शोषित जनतेने आपल्या मूलभूत सामाजिक हिताची जाणिव

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ठेवली पाहिजे, ही स्वातंत्र्याच्या लढ्याची पहिली अट आहे. हिंदू आणि मुस्लिम दोन्ही धर्मांचे कष्टकरी आर्थिक गुलामगिरीच्या, सामाजिक आणि राजकीय पिळवणूकीच्या धाग्याने बांधले गेलेले एकसंघ जनसमुदाय आहोत. ही जाणिव ठेवली पाहिजे, असे आवाहन भारतीय श्रमिक जनतेला कामगार चळवळीने केल्याचा इतिहास आहे. जातीय व धार्मिक ऐक्य व धर्मनिरपेक्ष राजकीय व आर्थिक संग्राम करण्याची भारतीय कामगार चळवळीच्या उज्वल परंपराचे स्मरण करणे आज अगत्याचे झालेले आहे. कारण आजही देशात सर्वत्र फुटीरतावादी व विघटनवादी जातीय व धार्मिक शक्ती थैमान घालीत आहेत. जनतेचे ऐक्य भंग होत आहे. याला आळा घालू शकणारी जनतेची कोणतीही संघटित शक्ती नाही. आज भारतामध्ये प्रचंड प्रमाणात फोफावलेली कामगार चळवळ अस्तित्वात आहे. एका सामायिक व समान उद्दिष्टाने ती बांधलेली आहे व अनेक जाती धर्मांच्या कामगारांनी ती गुंफलेली आहे. तेंव्हा हीच कामगारांची संघटित शक्ती विघटनवादी शक्तींना पायबंद घालू शकेल अशी जनतेला आशा वाटते. देशाच्या स्वातंत्र्याच्या चळवळीतील कामगार चळवळीचा गौरवशाली इतिहास पाहता या चळवळींकडून ही अपेक्षा करणे अस्थानी ठरणार नाही. हे ऐतिहासिक कार्य पार पाडण्याची जबाबदारी कामगार चळवळीने घेतलेली आहे असे वाटते.

भारतातील कामगार चळवळीचा आपल्या समाज जीवनातील अनेक क्षेत्रांमध्ये प्रभाव दिसून येतो. राष्ट्रीय स्वातंत्र्याबरोबरच आर्थिक पिळवूणक व सामाजिक विषमते विरूद्धही कामगार चळवळीने आवाज उठवलेला आहे हे नाकारता येत नाही. स्वातंत्र्याच्या चळवळीमधून आकारलेली व भारतीय राज्यघटनेमध्ये ग्रंथित केलेली राष्ट्रीय उद्दिष्टे कामगार चळवळीशिवाय शक्य झाली असती असे वाटत नाही. या चळवळीचा अंशत: यात सहभाग आहे. म्हणूनच भारतीय राजयघटनेच्या मार्गदर्शक तत्त्वाच्या परिच्छेदामध्ये काही तत्त्वे सांगण्यात आलेली आहेत. घटनेच्या कलम १९ मध्ये सामान्यांच्या योग्य राहणीमानासाठी काही तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. कलम ४१ मध्ये कामाचा हक्क उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करण्याची शिफारस करण्यात आलेली आहे. कलम ४३ मध्ये कामगारांना जीवनवेतनाची हमी देण्याची शिफारस करण्यात आली व कलम ४३–अ प्रमाणे उद्योगाच्या व कारखान्याच्या व्यवस्थापनामध्ये कामगारांचा सहभाग ठेवण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. राज्यघटनेतील या सर्व तरतुदी घटनाकारांच्या विशाल दृष्टीची द्योतक मानली तरी स्वातंत्र्य पूर्व काळातील कामगार चळवळींच्या या मागण्या होत्या हे विसरता येत नाही. भारतातील आजच्या कामगार चळवळीचे उद्दिष्ट राज्यघटनेतील या शिफारसवजा तरतुदी श्रमिकांचे मूलभूत हक्क बनावेत व त्याचा लाभ विस्तृत जनसामान्यांना मिळावा असे असावे जनतेला वाटल्यास अस्थानी ठरणार नाही. यामुळेच भारतातील कामगार चळवळ अधिक प्रगल्भ अधिक समाजाभिमुख व जनताभिमुख ठरेल व कामगार चळवळीचा पाया अधिक व्यापक, विस्तृत व भक्कम होईल. ही अशी व्यापक कामगार चळवळ राष्ट्रीय ऐक्याला पोषक तर ठरेलच पण त्याचसोबत सामाजिक परिवर्तनाची ती एक क्रांतीकारी शक्तीही ठरेल.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

काळाची गरज

कामगार चळवळीची स्वातंत्र्य चळवळीतील उज्वल परंपरा व राष्ट्रीय ऐक्याचे व सार्वभौमत्वाचे संरक्षण हे सांप्रतचे ऐतिहासिक कार्य पार पाडीत असतांना सध्याच्या भांडवलशाहीच्या व साम्राज्यवादी शक्तींच्या आर्थिक नीतीचा भारतीय परिस्थितीवरील प्रभाव, जनसामान्यांना जाणीव करून देणे व या नीतिविरूद्ध एक संघटित लढा उभा करणे हीही एक काळाची गरजच आहे. भाषिकवाद, धार्मिक पुनरूज्जीवनवाद, विघटनवाद हे सर्व सामाजिक व राष्ट्रीय ऐक्याला बाधक ठरत असलेले वाद हे आजच्या आर्थिक परिस्थितीच्या अगतिकतेतून निर्माण झालेले आहेत. तेंव्हा हा आर्थिक लढा हा सर्व प्रकारच्या विघातकवादी शक्तींच्या विरूद्धचा आधारभूत लढा आहे आणि याचे नेतृत्व स्वाभाविकपणेच कामगार चळवळीला करावयाचे आहे. आजची शासनाची आर्थिक नीती ही बड्या घराण्यांची व मक्तेदार घराण्यांची नफेखोरी वाढवण्याप्रत जात आहे हे स्पष्ट आहे. त्यामुळे भांडवलाचे केंद्रीकरण होण्याची प्रक्रिया आज देशात सुरू झाली आहे. मागील चार वर्षातील आर्थिक धोरणाचा आढावा घेतल्यास बहुराष्ट्रीय कंपन्याचे भारताच्या आर्थिक क्षेत्रातले प्राबल्य व त्यांच्या गुंतवणूकीचे प्रमाण वाढत असल्याचे दिसून येते. नफ्याचे वाढते प्रमाण, स्वस्त श्रमशक्ती, नागरी व मध्यमवर्गीय जनतेच्या भोगवस्तू हव्यासाला चालना व नव्या तांत्रिक ज्ञानाची आयात आणि यासाठी निरनिराळ्या बहुराष्ट्रीय कंपन्यांना मिळत जाणारे स्वैर परवाने व अनेक सवलती हे आजचे शासनाचे आर्थिक धोरणाचे स्वरूप राहात आलेले आहे. जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यांच्याकडून होणाऱ्या कर्ज पुरवठ्या सोबतच लादल्या जाणाऱ्या अटी देशाच्या स्वतंत्र आर्थिक धोरणाला धोका निर्माण करीत आहेत. भारतीय राज्यघटनेमध्ये अर्थकारणाचे केंद्रीकरण होऊ नये व संपत्तीचे न्याय्य विभाजन व्हावे अशी मार्गदर्शक तत्त्वांमध्ये एक अपेक्षा व्यक्त करण्यात आलेली आहे. शासनाचे सध्याचे धोरण घटनेतील या तरतुदींशी अगदी विसंगतच नव्हे तर अगदी विरोधी दिशेने जात आहे.

बदलता अर्थ

देशाचे आर्थिक धोरण मिश्र अर्थव्यवस्थेचे व त्यामध्ये सार्वजनिक क्षेत्राला महत्वाचे व मोलाचे स्थान देणारे आहे. हे धोरण रद्द करण्यात आलेले नसले तरी त्याचा अर्थ मात्र बदलत चालला आहे. सार्वजनिक क्षेत्रामध्ये एकतर भांडवलदारांचे भांडवल घुसवण्याचा प्रयत्न तरी केला जात आहे किंवा त्याला बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या स्पर्धेमध्ये तरी सोडले जात आहे. काही सार्वजनिक क्षेत्रांचे खाजगीकरण करण्याचेही प्रयत्न चालू आहेत. स्कूटर्स इंडिया, भारत इलेक्ट्रॉनिक्स काही खत कारखाने यांचे खाजगीकरण ही नव्या धोरणाची उत्तम उदाहरणे म्हणता येतील. धोरणामध्ये असे बदल व्हावेत हा जागतिक बँकेचा दृष्टिकोन आहे. त्याप्रमाणे हे घडत आहे. सार्वजनिक क्षेत्रातील व्यवस्थापन हे जाणून बुजून निकृष्ट दर्जाचे केले जात आहे. सार्वजनिक क्षेत्रातील कामगारांचे प्रश्न तीव्र बनत चाललेले आहेत

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

व शासन हे सोडवण्यास उत्साही दिसत नाही. आयात धोरणातील शिथिलता, बहुराष्ट्रीय कंपन्यांना व मक्तेदार भांडवलदारांना कर व पतपुरवठ्यामधील, सवलती, अनेक औद्योगिक प्रतिष्ठापनांचे गैरव्यवस्थापन, भ्रष्टाचार व नव्या तंत्रज्ञानाची आयात या कारणांमुळे अनेक क्षेत्रातील औद्योगिक आजारपणाची लागण सुरू झाली आहे. आज देशात साधारणत: दीड लाखाच्या वर औद्योगिक प्रतिष्ठाने बंद आहेत. यातून बेकारीची भयानक समस्याही निर्माण होत आहे. यातून लहान व मध्यम उद्योगधंदे आर्थिक दृष्ट्या संकटात येत आहेत. कार्यप्रवण असलेल्या उद्योगधंद्यांमध्ये कामगार कपात, वेतनकपात, कामाचे प्रमाण वाढवणे इत्यादी कामगार विरोधी प्रकार प्रत्ययाला येत आहेत. या सर्व परिस्थितीमुळे देशाच्या औद्योगिक क्षेत्रात अशांतता व अगतिकता निर्माण झालेली आहे. हे स्वरूप केवळ कामगार चळवळीला ज्ञात होऊ शकते व संघटित कामगार चळवळच आपल्या चळवळीच्या सामर्थ्याने याचा विरोध करू शकते. केंद्रीय कामगार संघटनेच्या समन्वय समितीने याची गंभीर दखल घेतलेली आहे व त्यासंबंधी संघटित लढाही होत आहे. याची जाणीव शासनाला असल्यामुळेच कामगार चळवळीवर निर्बंध लादण्यासाठी कामगारविषयक अनेक कायद्यांमध्ये नवनव्या जाचक तरतुदी करण्याचे शासन प्रयत्न करीत आहे. संघटित कामगार सामर्थ्यांमुळे शासनाला अजून तरी यश आलेले नाही. देशापुढे निर्माण झालेल्या बिकट आर्थिक धोरणाचे व शासनाचे कामगार चळवळ दडपण्याचे धोरण हे एक आव्हान म्हणून कामगार चळवळीने स्वीकारणे आवश्यक आहे. ते केवळ कामगार चळवळी याच हिताचे आहे असे नसून राष्ट्रीय उद्दिष्टांसाठी, घटनेतील तत्त्वांसाठी व देशातील आम जनतेच्या हितांसाठी आवश्यक आहे. कामगार चळवळीपुढील हे आव्हान संघटित औद्योगिक कामगारांनी ग्रामीण श्रमिकांच्या सहकार्यानेच करणे आवश्यक आहे. हे कामगार चळवळीला आज पटलेलेही आहे. भांडवलदारी धोरणामुळे व भांडवलदारी विकासाच्या दिशेने देशाचे आर्थिक धोरण राबवले जात असल्याने ग्रामीण भागातील एक भांडवली शेतकरी वर्ग निर्माण होत आहे व ग्रामीण जनता अधिकाधिक शोषक व श्रमिक होत चाललेली आहे. ग्रामीण विकासाचे प्रश्नही भयानक होत चाललेले आहेत. याचा फायदा घेऊन कांही लोक ग्रामीण भारत विरूद्ध शहरी भारत असा प्रश्न निर्माण करीत आहेत. यातून भांडवलदारी दिशने होणारा आर्थिक विकास व त्यातून उद्‌भवलेले हे गंभीर प्रश्न यापासून जनतेला विचलित करावयाचे आहे. परंतु ग्रामीण व शहरी दारिद्रय, बेकारी, शोषण व अन्याय हे एकाच प्रकारच्या आर्थिक विकासापासून निर्माण झालेले आहेत व या धोरणाच्या विरूद्ध ग्रामीण व शहरी श्रमिक जनतेने एकत्रित सामायिक व संघटित लढ्याने चळवळ केल्यास देशाच्या आर्थिक धोरणाची दिशा बदलले व त्यातच श्रमिक जनतेला जीविताचे संरक्षण मिळेल असा विश्वास निर्माण होणे आज आवश्यक आहे. म्हणून आजचा कामगार व ग्रामीण श्रमिकांचा लढा देशाचे आर्थिक धोरण बदलण्याचा लढा आहे. भांडवलदारी विकास पद्धतीने देशाचे प्रश्न सुटणार तर नाहीतच पण ते अधिक तीव्र होतील. देशातील सर्व केंद्रीय कामगार संघटनांच्या समन्वय समितीने

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अशा एकजुटीच्या लढयाचे आव्हान केले आहे ते रास्तच आहे. म्हणून कामगार चळवळीने आर्थिक लढयाचा घेतलेला मार्ग केवळ देशाचे आर्थिक धोरण बदलण्याचेच नसून देशाच्या एकतेचे व सार्वभौमत्वाचे संरक्षण करण्याचा हेतूही त्यात अंतर्भूत आहे. कारण या विघटनवादी व फुटीरवादी शक्ती भांडवलदारी व्यवस्थेच्या अगतिकतेतून निर्माण झालेल्या आहेत. देशाच्या एकात्मतेचा व सार्वभौमत्वाचा लढा हा भांडवलदारी व्यवस्थेच्या विरूद्धच्या लढयाचाच एक अविभाज्य भाग आहे व हा संघटित लढा कामगार चळवळ व ग्रामीण व नागरी श्रमिकांच्या एकत्रित चळवळीनेच साध्य होणार आहे.

भारत सरकारच्या नव्या आर्थिक धोरणाने एक प्रकारची वेगळी अर्थव्यवस्था व त्यानुरूप नवे अर्थसिद्धांत भारतामध्ये रूजु पहात आहेत. खुली अर्थव्यवस्था व जागतीक अर्थ व्यवस्थेशी संलग्नता ही उद्दिष्टे सांगण्यात येत आहेत. सोविएट युनियनच्या पतनानंतर जागतिक पातळीवर एक अनिबंध भांडवली अर्थव्यवस्था प्रभाव गाजवत आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक व गॅट करार या तीन माध्यमांच्याद्वारे भांडवलदारी राष्ट्रे अविकसित राष्ट्रांना विकासाच्या नावाखाली भांडवलदारी, मार्गाचा अवलंब करण्यास भाग पाडत आहेत. पण या राष्ट्रातील भांडवलदारी, अर्थव्यवस्था देखील विकसित भांडवलदारी व्यवस्थेची आश्रित व्यवस्था अथवा परावलंबी अर्थव्यवस्था असे ह्या भांडवलदारी व्यवस्थेचे स्वरूप राहणार आहे. यालाच नववसाहतवाद म्हणतात. अविकसित राष्ट्रातील साधन संपत्तीची, नैसर्गिक संपत्तीची व कच्च्या मालाची अनिबंध निर्यात करून विकसित राष्ट्राच्या भांडवलदारी व्यवस्थेचे पोषण करावयाचे आहे व अविकसित राष्ट्रे विकसित राष्ट्रांच्या बाजारपेठा म्हणूनही वापरावयाचे आहेत. या नववसाहतवादाचे नवे स्वरूप आज प्रत्ययाला येत आहे. विकसित राष्ट्रातील अनेक बहुराष्ट्रीय कंपन्या अविकसित राष्ट्रामध्ये आज पाय रोवत आहेत. अशा प्रकारच्या औद्योगिकरणाने देशाचा आर्थिक विकास न साधता ती विकसित देशाची लाभक्षेत्रे ठरणार आहेत आणि यातून बेकारी, महागाई, नोकरकपात इ. संकटांची वर्तुळे निर्माण होण्याची भीती आहे. नवे तंत्रज्ञान, विज्ञान व आधुनिक उत्पादनसाधने यांचा आर्थिक विकासासाठी लाभ घ्यावा याबद्दल कुणाचे दुमत होणार नाही. जागतिक उत्पादन व वितरण व्यवस्थेमध्ये भारताचा महत्वाचा सहभाग असावा. याबाबतही दुमत होण्याचे कारण नाही. परंतु हे करीत असतांना आपल्या देशातील अफाट लोकसंख्या; रोजगार निर्मितीचे अवधान, बेकारी व ग्रामीण व विषम समाज व्यवस्था याचे भान ठेवणे आवश्यक आहे. हाच कामगार चळवळीचा आग्रह आहे. आपल्या विकासाचा स्वतंत्र मार्ग ठरवण्याचे स्वातंत्र्य अबाधित राहणे देशाच्या सार्वभौमत्वाच्या रक्षणासाठी आवश्यक आहे. यावर कामगार चळवळीचा भर आहे. नव्या तंत्रज्ञानाच्या आयातीसोबत अनेक अटींचा स्वीकार कराव्या लागत आहेत. रिझर्व्ह बँकेच्या अहवालाप्रमाणे विकसित राष्ट्राकडून आयात झालेल्या तंत्रज्ञानाच्या साहाय्याने झालेल्या उत्पादनावर अनेक बंधने लादलेली आहेत. अशा अनेक घटना नित्य घडत आहेत. भारताने केलेल्या १२८५ करारांमध्ये ९५६ करारांमध्ये यासंबंधीच्या अटी समाविष्ट

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

करण्यात आल्या आहेत. हे आपल्या निर्णय स्वातंत्र्यावरील बंधने आहेत. कामगार चळवळीला हे एक आव्हान आहे.

नव्या तंत्रज्ञानाच्या आयातीचा आपल्या देशातील रोजगार स्थितीवर विपरीत परिणाम होण्याचा धोका आहे. एवढेच नाही, तर कमीत कमी कामगारांच्या संख्येने नव्या उत्पादन तंत्राने जास्तीत जास्त उतपादन करावे हा बहुराष्ट्रीय कंपन्यांचा उद्देश आहे. यासंबंधी अमेरिकेतील एका कंपनीच्या अध्यक्षाचे मत यावर प्रकाश टाकणारे आहे.

"Let us be not evasive or timid on this point. Let us be frank, honest and realistic. Let us not hide automation's greatest potential benefit - the elimination of labour."

बेकारीची समस्या भारतामध्ये भयानक आहे. भारतीय संविधानाने दिलेले रोजगार संरक्षणाचे व रोजगार मिळण्याचे हक्क यामुळे निष्प्रभ ठरणार आहेत. भारतातल्या कामगार चळवळीने प्रदीर्घ काळातील कष्टाने व त्यागाने मिळवलेला तो एक हक्क आहे. नव्या तंत्र ज्ञानासंबंधी असे म्हटले जाते.

"It is becoming the most controversial economic concept of the age. Businessmen love it. Workers fear it. The government frets and investigates the wonders what to do about it."

या नव्या तंत्रज्ञानाच्या उत्पादनासंबंधी अविकसित राष्ट्रातील व भारतातील शासनाची अशी केविलवाणी अवस्था झालेली आहे आणि ते ही एक प्रकारच्या राजकीय व आर्थिक दडपणामुळे. कामगार चळवळीपुढील हे एक फार मोठे आव्हान आहे. उत्पादन प्रक्रियेतील नवे तंत्रज्ञान वापरण्याचा बहुराष्ट्रीय कंपन्यांचा हेतू स्पष्ट होत आहे व शासन हतबल आहे हेही स्पष्ट होत आहे. तेंव्हा कामगार चळवळीपुढील हे आव्हान मोठेही आहे व जागतिक पातळीवरचेही आहे. नव्या तंत्रज्ञानाचाच उत्पादन प्रक्रियेतील उपयोग हा एक नव्या आर्थिक नीतीचा भाग आहे. भांडवलदारी विकासाचे जे सिद्धांत आहेत, त्याच्याशी हे निगडीत आहे. सामाजिक न्याय, समान संधी, गरीबी निर्मूलन ही जी स्वातंत्र्य चळवळीची आणि भारतीय राज्यघटनेची उद्दिष्टये आहेत याच्याशी या नव्या आर्थिक नीतीचा सुतराम संबंध येत नाही. कामगार चळवळीने याचे भान ठेवणे आवश्यक आहे.

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर मित्र अर्थव्यवस्थेचे धोरण अवलंबण्यात आले. याला अनेक ऐतिहासिक कारणे होती. देशाचा आर्थिक मागासलेपणा व अविकसितपणा हा साम्राज्यशाहीचा वारसा होता. जलद आर्थिक विकस ही काळाची गरज होती. गतिमान, औद्योगिकरण व आर्थिक विकासाची संरचना याची नितांत आवश्यकता होती. म्हणून वित्तीय संस्था व औद्योगिकरणाला गतिमान करणाऱ्या अवजड उद्योगधंद्याची निर्मिती याला प्राधान्य देण्यात आले. सार्वजनिक क्षेत्रामध्ये त्याची निर्मिती करण्यात आली. या योगे औद्योगिक विकासाचा पाया रचण्यात आला. या सार्वजनिक क्षेत्रामुळेच अनेक बाबतीत व

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

संरक्षण क्षेत्रात देश स्वयंपूर्ण झाला. औद्योगिकरणाला गती मिळून रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या. या सार्वजनिक क्षेत्रामुळेच भारत हे जगामध्ये एक विकसित राष्ट्र म्हणून पुढे आले. या सर्व उपक्रमांना कामगार चळवळीचा फार मोठा पाठिंबा होता. या सार्वजनिक क्षेत्राचे खाजगीकरण करण्याचा आज प्रयत्न होत आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व जागतिक बँकेने विकासासाठी ही खाजगीकरणाची अटच घातलेली आहे. ही अनेक सार्वजनिक क्षेत्रे एक तर बहुराष्ट्रीय कंपन्याचे भागभांडवल वाढवले जात आहे. अनेक मार्गाने हे सार्वजनिक क्षेत्र संपुष्टात आणण्याचे प्रयत्न होत आहेत. भारताच्या कामगार चळवळीपुढे सार्वजनिक क्षेत्राच्या संरक्षणाचे मोठे आव्हान उभे आहे. जागतिक कामगार संघटनेनेहि याबाबत इशारा दिलेला आहे.

" ..... further economic and social progress can not be comtemplated without workers and peoples participation and democratic intervention. The trade unions must therefore be able to exercise their countervailing power in favour of a democratic orientation of economic management and against the autocratic profit centred orientation of Big capital.

"Fortunately, this is now the main trend within the different component of the trade union movement.'

केवळ भारतामध्येच नव्हे तर संबंध अविकसित राष्ट्रांमधून कामगार चळवळीपुढे हे आव्हान उभे राहात आहे. त्यासाठी जागतिक कामगार संघटनेने कामगार चळवळीपुढील भावी दिशा स्पष्ट करणारे निवेदन केलेले आहे. खाजगीकरणाचा हा प्रयत्न म्हणजे मक्तेदार भांडवलदारी घराण्यांना दिलेल्या सवलती आहेत. अनिर्बंध नफ्यासाठी शेतीसहित अनेक क्षेत्रे त्यांना खुली केली जात आहेत. कामगार चळवळीवर अनेक बंधने लादली जात आहेत. कामगार चळवळ हे आपल्या रोजगारालाच आव्हान आहे असे मानत नसून आर्थिक व सामाजिक प्रगतीला व देशाच्या उज्वल भवितव्यालाच ते आव्हान आहे असे समते. भविष्यातील कामगार चळवळीचा लढा हा देशाच्या सार्वभौमत्वाचा लढा आहे. कामगार चळवळच जनतेचे नेतृत्व करू शकते. कारण या चळवळीला क्रांतिकारी तत्त्वज्ञानाचा वारसा लाभलेला आहे, ती जागतिक पातळीवर संघटित असल्याने अनुभवाचाही साठा आहे. कामगार चळवळ ही प्रत्यक्ष उत्पादन प्रक्रियेत सहभागी असल्याने त्यातील मर्म ती जाणू शकते. न्याय व सामाजिक प्रतिष्ठा यासाठीचा संघर्ष हा तिचा बाणा आहे. भविष्यामध्ये देशाच्या एकात्मतेसाठी, सार्वभौमत्वाच्या रक्षणासाठी, सामाजिक न्यायासाठी व शोषणाविरूद्ध या चळवळीला संघर्ष करावा लागणार आहे. हे काळाचे आव्हान स्वीकारण्यास भारतातील कामगार चळवळ समर्थ आहे व प्रगल्भही आहे. याबद्दल विश्वास वाटतो.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

॥ २४ ॥

अंधश्रद्धा निर्मूलन चळवळ : काल, आज व उद्या

डॉ. नरेंद्र दाभोळकर

★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती तर्फे सत्यशोध संवाद यात्रेत प्रारंभ १२ जानेवारीला होत आहे. या मोहिमेचा वैचारिक आशय आहे. समाजाची दैववादी मानसिकता दूर करून प्रयत्नवाद रूजवणे, वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रसार करणे आणि सगळयात महत्वाचे म्हणजे महाराष्ट्रातील समाज सुधारकांचा वारसा जनसामान्यात कृतीशिल करणे. बुवाबाज तेथे जनसंघर्ष व चमत्काराला आव्हान हा त्यातील चळवळीचा भाग आहे. याच महिन्यात महाराष्ट्राच्या विचार विश्वास लक्षणीय ठरणारे महाराष्ट्र व्यापी विचारवेध संमेलन लातूर येथे होत आहे विषय आहे. 'या शतकातील महाराष्ट्रातील सामाजिक चळवळीची फलश्रुती'. याही चर्चेत अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीची आस्थेवाईक नोंद घेण्यात आली आहे. या साऱ्या पार्श्वभूमीवर म्हणूनच अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कार्याचा भूत, वर्तमान व भविष्य यातील आढावा महत्वाचा ठरतो.

महाराष्ट्रात या कार्याला मजबूत इतिहास आहे. क्षुद्र देवतांची नवस–सायासादी उपचारांनी केली जाणारी पूजा, कर्मकांडातून केली जाणारी सकाम भक्ती, चमत्कार, गुरूबाजी, बुवाबाजी अशा अंधश्रद्धावर संतांनी प्रखर हल्ले केले. संतांच्या अंधश्रद्धा निर्मूलनाचे स्वरूप दुहेरी होते. धर्मजीवनातील अपुरेपणाचा व अवैज्ञानिकतेचा त्यांनी निषेध केलाच पण त्याबरोबरच स्वतःच्या ग्रंथाद्वारे व आचरणाद्वारे मानवता, भूतदया, क्षमा, परोपकार, कर्तव्यनिष्ठ इत्यादी सद्गुणांची उपासना केली. कर्मठपणाचे बंड मोडले, डोळसपणाचा आग्रह धरला. विवेक आणि नीती याला मानाचे स्थान दिले. अर्थात संतांच्या चळवळीला त्या काळाच्या व परिस्थितीच्या मर्यादा होत्या. त्यांची चळवळ धार्मिक सुधारणापुरती आणि विचाराच्या परिवर्तनाची होती. परिस्थिती परिवर्तनाचा मार्ग त्याकाळी कोणालाच व्यवहारी वाटत नव्हता.

सामाजिक उच्च निचता ही ईश्वरी संकेतानुसार वा पूर्वजन्मीच्या संचितामुळे लाभते या आद्य अंधश्रद्धेवर जोतिराव फुले यांनी कठोर हल्ला केला. स्त्री क्षुद्रांच्या मानगुटीवर स्वार झालेल्या भ्रम मुलक मीथकाचे वाभाडे काढले. देव–दैव शरणता, फलज्योतिष, जारण–मारण, भूतबाधा, सोवळेपणा, विधी संस्कार, बुवाबाजी वगैरे अंधश्रद्धांचे आविष्कार कसे तर्कदुष्ट व खुळचट आहेत हे जनसामान्यांना पटवून दिले. धर्मग्रंथ रचणाऱ्यांची कारस्थाने वेशीवर टांगली. कर्मकांडांच्या जळमटातून मुक्त अशी ईश्वर कल्पना निर्मिकाच्या रूपाने उभी केली. प्रारब्धवादी मानसिकतेला सोडून स्वतःच्या बळावर आपले ऐहिक

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

जीवन सुखदायी करण्याचे आवाहन त्यांनी सामाजिक शोषितांना केले. पारंपारिक पद्धतीने या विधींचे कर्मकांड करण्या ऐवजी विवाह प्रसंगी वधूवरांचे अनुरूप गुण (कुंडलीतील गुण नव्हे) परस्परांबद्दल भिती, वय वगैरे सार्रास तपासून पाहावेत. वास्तुशांती ऐवजी गृहप्रवेशाच्या वेळी तिथे राबलेल्या श्रमिकांचा सन्मान करावा. मृत्यूनंतर पिंडदान किंवा श्रद्धादानावेळी ब्राम्हणाला शय्यादान, छत्रीदान वा जोडेदान न करता मृत आप्तांची आठवण रहावी. या दृष्टीने कांही कार्यक्रम करावा किंवा शाळेतील निराश्रित मुलामुलींना मदत करावी. अशा व्यवहार्य सूचना जोतीरावांनी केल्या आहेत. अंधश्रद्धेचे निर्मूलन ज्या व्यवस्थेने बहुसंख्यांना अगतिक, अज्ञानी, निरक्षर व दरिद्री ठेवले. त्या व्यवस्थेवर प्रहार करून व्यापक सामाजिक, आर्थिक परिवर्तन करून शोषणमुक्त समाजनिर्मिती मधूनच होईल याचे स्पष्ट भान फुले यांना होते.

लोकहितवाद्यांनी स्त्रीयांना दुय्यम स्थान देणारी रूढी, ज्योतिषावर विश्वास ठेवण्याची वृत्ती, साधू, बाबा, बैरागी यांच्यावरील श्रद्धा या सर्वांची खिली उडवली होती. त्यांच्यामते साधू अथवा बाबा हे आळशी, निरूद्योगी, अज्ञानी पशुसारखे मुर्ख असतात. जप, उपवास एखाद्या पुस्तकाचे जन्मभर वाचन, गोणीभर दगडांची पूजा यामध्ये ते आयुष्य घालवतात. त्यांचा लोकास काय उपयोग? यातील बहुतेक हे व्यभिचारी, लबाड, चोर असतात. हे साधू नव्हेत भोंदू आहेत असे लोकहितवादींचे रोखठोक प्रतिपादन होते.

सुधारककार आगरकरांनी लोकहो तुम्ही विचार करायला का घाबरता? असा खडा सवाल उभा केला. इष्ट ते बोलेन आणि शक्य ते करेन असा व्यवहारी मार्ग दाखवला. स्वातंत्र्यवीर सावरकरांना हिंदू संघटनेच्या कामास प्रारंभ केल्यावर त्यांना समाजातील जाचक रूढी, खुळचट धर्मकल्पना, अंधश्रद्धा, दैववादी वृत्ती, निर्बुद्ध वृतवैकल्य, विज्ञान पराङ्मुखता हे असंख्य दोष तीव्रतेने जाणवले. बुद्धीवादाचा पुरस्कार करत (परंतु हिंदु राष्ट्र निर्मितीसाठी) त्यांनी या सर्व सामाजिक दोषावर हल्ला चढवला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते 'खुळचट धर्मकल्पनांनी देश भिकेस लागतो.' कर्मकांडांनी ऐहिक जीवन व्यापून टाकले तर जीवनाच्या विकासासाठी अनेकविध गुणांची जोपासना करण्याची शक्यताच मावळते. याहीपुढे जाऊन ज्या धर्मात मानवता आणि समता नाही तो धर्म म्हणजे एक क्रुर अंधश्रद्धा ठरेल असे त्यांनी म्हटले आहे. गाडगे महाराजांनी आपल्या किर्तनातून पशुहत्या, सत्यनारायण, सकाममुर्तीपूजा यांच्यावर कडाडून टीका केली. स्वच्छता, साधेपणा, स्वावलंबन याची शिकवण दिली.

६० वर्षापूर्वी किर्लोस्कर मासिकाने एका बाजूला बुवाबाजीच्या दंभ स्फोटाची चळवळ चालवली तर दुसरीकडे बुद्धीवादी विचार महाराष्ट्रात सर्वदूर पोचवले. १९८२ साली केरळच्या बी.प्रेमानंदांची विज्ञान यात्रा महाराष्ट्रात अभूतपूर्व ठरली. या विषयावरही जनसंवादाला मिळणारा लोकांचा प्रतिसाद लक्षात आला. वादविवाद झडू लागले. अंधश्रद्धा विरोधाचे कांही संघर्ष लोकांचे मन वेधून घेऊ लागले. गेल्या दशकात याला चळवळीचे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

स्वरूप आले. अनेक अंगाने या कामाचा विस्तार झाला. त्यातून वर्तमानातील सद्य रूप चळवळीला प्राप्त झाले. कांही वर्षापूर्वी अंधश्रद्धा निर्मूलन जाहिरनामा परिषद झाली. त्यामध्ये महाराष्ट्रातील विविध क्षेत्रातील मान्यवरांनी सहभाग दिला. कृती कार्यक्रमाची एकरूपरेखाच त्यामुळे तयार झाली. स्त्रीया व अंधश्रद्धा स्वरूप, कारणे आणि उपाययोजना या विषयावर महाराष्ट्र व्यापी चर्चासत्र झाले. स्त्रीया या अंधश्रद्धेच्या केवळ बळी नसतात. तर वाहकही असतात. त्याबद्दल काय करावयास हवे याची सखोल चर्चा झाली. शिक्षण व अंधश्रद्धा निर्मूलन यावरही असेच विचारमंथन झाले. त्यामधून माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांसाठी सत्यशोध प्रज्ञा परीक्षा व प्राथमिक विद्यार्थ्यांसाठी सत्यशोध परिचय परीक्षा हे प्रकल्प आकारण्यात आले. त्यासाठी शिक्षकांची शिबीरे स्वयंसेवी पद्धतीने घेतली जातात व त्यांच्या मार्फत विद्यार्थ्यांच्यापर्यंत हा विचार पोचवला जातो. याला उत्तम प्रतिसाद मिळाला. गेल्यावर्षी अडिचशे केंद्रातून बारा हजार विद्यार्थी या परीक्षेस बसले तर यावर्षी ही संख्या ६०० व ३० हजार इथपर्यंत जाईल. शिक्षक व विद्यार्थी दोघांच्यातही हा उपक्रम वर्तन बदल घडवून आणण्यासाठी महत्वाचा ठरत आहे. बुवाबाजी विरूद्धचे संघर्ष तर सतत चालू आहेत. शेकडो बाबा, बुवा, मांत्रिक, देवऋषी यांची भांडफोड करण्यात आली आहे. भानामतीचे प्रकार नेहमीच गुढ भिती निर्माण करतात. आपोआप दगडे पडणे, कपडे पेटणे वा फाटणे, अंगावर बिब्याच्या फुल्या उठणे अशा बाबी समितीने शंभराहून अधिक ठिकाणी आव्हानपूर्वक थांबवल्या आहेत. जगात भूत कोठेच नसते. भूताचे दर्शन हा भ्रम असतो आणि पिशाच्याचा वा देवाचा संचार' ही बदमाशी अथवा मनोविकृती असते. मानसिक आजाराचे हे रूग्ण भूताने झपाटले या कल्पनेपायी भगत मांत्रिकाच्या मागे लागतात. वेळ, पैसा आणि आरोग्य यांची बरबादी करतात. समितीने यासाठी देवीचा संचार, मनाचा आजार आणि शोध भूताचा, बोध मनाचा. असे दोन उपक्रम व्यापक प्रमाणावर राबवले. त्यातून पुढे मानसिक आधार केंद्रे उभी करण्याचा प्रयत्न चालू आहे. चमत्कार हा नेहमीच जनमानसाच्या कुतूहलाचा आणि त्यांना देववादाकडे नेणारा विषय राहिला आहे. वैज्ञानिक दृष्टिकोन समिती मानत असल्याने ती चमत्काराच्या ठाम विरोधात उभी आहे. कोणत्याही स्वरूपात चमत्कार करू शकण्याचा दावा करणाऱ्या समितीचे पाच लाख रूपयाचे आव्हान आहे. महाराष्ट्रातील तीन साडे तीन हजार जत्रा–यात्रात नवसफेडण्याच्या नावाने फार मोठ्या प्रमाणावर पशुहत्या होते. गरीब कर्जबाजारी होतो, देवकल्पनेचे अवमुल्यन होते. या विरोधात समिती सतत कार्यरत आहे. अत्यंत कठीण असा हा लढा आहे. पन्नासहून अधिक अशा यात्रातही पशुहत्या बंद करण्यात समितीला यश आले आहे.

प्रबोधनाची चळवळ जोरात चालू आहेच. फलज्योतिषाचा फोलपणा, अशास्त्रीयता लोकांना पटवून दिली जात आहे. सर्पांविषयी असंख्य अंधश्रद्धा आढळतात. खरेतर सर्प हा पर्यावरणाचा मित्र आहे. सर्प यात्रा काढून व्याख्यानाद्वारे लोकांच्या मनातील सर्पाबद्दलची भिती व अज्ञान दूर करण्यास यश येत आहे. वयात येतांना तरूण–तरूणींच्यापुढे अनेक

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भाव–भावनांचा विचार कल्पनांचा भूलभुलैया तयार होतो. या अवस्थेची नीट ओळख पटणे खूप महत्वाचे असते. अंधश्रद्धा निर्मूलन समिती हे कार्य करते. सर्वात मोठा प्रश्न येतो वैचारिक पायाचा. अनेकांना वाटते प्रत्येक श्रद्धा ही अंधश्रद्धाच असते. समिती तसे मानत नाही. देव आणि धर्म याबाबत समितीची भूमिका चिकित्सेची पण विधायक आहे. अनेकांना वाटते देवधर्मावर मुले कुठारः आघात केल्याशिवाय अंधश्रद्धा निर्मूलन शक्यच नाही. याबाबत विवेक जागराचे जाहिरवाद संवाद मान्यवरांच्याबद्दल घडतात. त्याला प्रचंड प्रतिसाद मिळतो.

अनेकविध उपक्रमातून हे प्रबोधन साकारत जाते. त्यामध्ये पदयात्रा, सायकल फेऱ्या, स्वतःहून संकल्प स्विकारण्याचे 'युवा एल्गार' सारखे कार्यक्रम. महात्मा फुलेंच्या पद्धतीने मुहूर्ताशिवाय, भटजीशिवाय साधेपणाने विवाह करणे अशा अनेक बाबी असतात. दहा वर्षापूर्वी ही चळवळ चालू झाली त्यावेळी या विषयावर मराठीत पुस्तके नव्हतीच. दलित चळवळीबरोबर जसे दलित वाङ्मय आले तसे आता अंधश्रद्धा निर्मूलन विषयाचा विविध अंगाने वेध घेणारी अनेक पुस्तके निर्माण झाली. कांही राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावरील मासिकांनी देखील या चळवळीची दखल घेतली आहे.

खरा मुद्दा आहे तो या पुढच्या वाटचालीचा. त्याचे सुत्र आहे. महाराष्ट्रातील समाज सुधारकांचा वारसा त्यात कालेचित भर घालून कृतीशिल करणे. अंधश्रद्धेचे जे बुवाबाजी, भूत–भानामती, भविष्य, मंत्र–तंत्र, करणी, चेटूक असे उघड प्रकार आहेत. त्या विरोधातला संघर्ष हा या देशात अजून अनेक वर्षे योजनाबद्धपणे चालवावयास लागणार आहे आणि तो आम्ही करणार आहोतच. त्याबरोबरच संमोहनाचे हजार फायदे सांगणारी आधुनिक बुवाबाजी आणि शक्तिवर्धन टॉनीकच्या नावाने वैद्यकीय कंपन्याकडून होणारी सामान्यांची लुट याहीबाबत वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या आधारे जनसामान्यांचे प्रशिक्षण करावे लागेल. याबरोबरच जीवन सुखी करण्यासाठी, पर्यावरण समतोल राखण्यासाठी विज्ञानाचा उपयोग सामान्य माणूसही करू शकेल. असे तंत्रज्ञानही निर्माण करणे, प्रतिष्ठित करणे याचाही विचार करावा लागेल. भावी वाटचालीचा हा एक महत्वाचा भाग आहे.

आज जातीय अभिनवेश आणि धर्मांधता उफाळून आलेली दिसते. कर्मकांडाचे स्तोम वाढतांना दिसते. सार्वजनिक धार्मिक उत्सवाना उधाण आले आहे. त्यात अनेक अनिष्ट प्रथा शिरल्या आहेत. अशा वातावरणात व्यक्तीची प्रतिष्ठा, सामाजिक सलोखा, शांतता, प्रगती सारेच अशक्य बनले आहे. माणूस अधिकाधिक दैववादी बनत आहे. प्रयत्नवादाला सोडचिठ्ठी देतो आहे. अंधश्रद्धाचे उदात्तीकरण आणि धर्मश्रद्धांचे विकृतीकरण, गुन्हेगारीकरण, बाजारीकरण आणि राजकारण केले जात आहे.

हे घडू नये म्हणून कुठल्याही समाजात धर्मचिकित्सेचा प्रयत्न सतत चालू ठेवावा लागतो. ज्यांनी धर्म नाकारला त्यांना त्याची गरज वाटली नाही. ज्यांना धर्म स्वतःच्या मतलबासाठी वापरावयाचा होता. तो त्यांना आयताच मोकळा मिळाला. मूल्य परिवर्तनाचा हा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कृतीशिल संवाद साधण्यासाठी अंधश्रद्धा निर्मूलन चळवळ उपयोगी आहे असा अनुभव येतो. कारण अंधश्रद्धेच्या बहुसंख्य बाबी या ना त्या स्वरूपात धर्माशी निगडीत आहेत. समितीच्या भावी कामाची ही एक दिशा आहे. निकोप सामाजिकता, न्याय, कर्तव्य, समता, बंधुभाव, करूणा, सौदर्यविषयक मूल्ये यासाठी धर्माची खरे तर गरज नाही. मानवी विवेकाचे अधिष्ठान त्याला पुरेसे आहे. असे समितीला वाटते. पण कोणत्याही कारणाने ज्यांना हे धार्मिक अधिष्ठान महत्वाचे वाटत असेल त्याचा मूल्य .आशय सच्च्या नैतिकतेचा सहिष्णू असेल तर ते ही समाज परिवर्तनात सहकारी होऊ शकतात. हे मानस क्रियाशील करणे गरजेचे आहे.

या सर्वाबरोबर एक विचार पक्का हवा. नशिब, बुवाबाजी, चमत्कार, फलज्योतिष याकडे दुबळे, अगतिक मन वळत असते. हे मन विवेकाच्या आधारे बळकट करत असतांनाच जी परिस्थिती त्याला अंधश्रद्धेकडे ढकलते. ती बदलण्याचाही प्रयत्न हवा. एक उदाहरण घेता येईल. स्त्री अंधश्रद्धा जास्त बाळगते हे खरे आहे. पण तिचा दुय्यम कौटुंबिक दर्जा, आर्थिक असाह्यता, खोट्या पावित्र्य कल्पनेचे अवडंबर, धर्म व पुरूष प्रधान समाज व्यवस्थेने तीला दिलेले गौणत्व ही त्या अंधश्रद्धेची व्यापक कारणेही त्याहूनही खरी आहेत. ज्या प्रमाणात अेकीकडे अंधश्रद्धा निर्मूलन होईल. त्या प्रमाणात स्त्रीला मुक्तता मिळेल आणि दुसरीकडे ज्या प्रमाणात स्त्रीयांच्या मुक्ततेची चळवळ प्रभावी बनेल. त्या प्रमाणात आपोआप अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य गतीमान होईल असा हा परस्परावलंबी संबंध आहे.

या विचाराचे आणि आचाराचे सजग कृतीशील भान अंधश्रद्धा निर्मूलन चळवळ किती दाखविते यावर तिची भावी वाटचाल अवलंबून आहे.

SRI JAGADGURU VISHWARADHYA
JNANA SIMHASAN JNANAMANDIR
LIBRARY
Jangamawadi Math, Varanasi
Acc. No. ......6972..........

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मुखपृष्ठ
आर्टी कम्
उषाकिरण
मुखपृष्ठ
स्नेहा ऑप

मूल्य

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

संपादकाची अन्य प्रकाशने



नागोराव कुंभार

- तरूण मनाच्या वाटा आणि वळणे
- भ्रष्टाचारः स्वरूप आणि संदर्भ
- आचार्य श.द. जावडेकर : साहित्य सूची
- न्याय म्हमजे काय? (संपा.)
- धर्मनिरपेक्षता म्हणजे काय? (संपा)
- लोकशाही : स्वरूप व समस्या (संपा.)
- समताः स्वरूप व समस्या (संपा.)
- गं.बा. सरदारः व्यक्ती व विचार (संपा.)
- डॉ. राधाकृष्णनः व्यक्ति व विचार (संपा.)
- पं. नेहरूः विचार दर्शन (संपा.)
- ग्रामीण विकास : समस्या व उपाय (संपा.)
- प्रौढ शिक्षणः एक राष्ट्रीय समस्या (संपा.)
- समाज सुधारक म. फुले (संपा.)
- मंडल आयोग : शोध आणि शोध (संपा.)
- विश्लेशक तत्त्वज्ञान (संपा.)
- डॉ. आंबेडकर : विचार दर्शन (संपा.)
- उदारमतवाद (संपा.)
- शाहिर अण्णाभाऊ साठे (संपा.)
- न्या. महादेव गोविंद रानडे (संपा.)
- बहुजन महासंघ : संकल्पना व सिध्दी (संपा.)
- शैक्षणिक समस्या व उपाय (संपा.)
- आचार्य शं.द. जावडेकर : विचारदर्शन (संपा.)
- भूकंपः एक नैसर्गिक आपत्ती (संपा.)
- THE CONCEPT OF JUSTICE: BIBLIOGRAPHY

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi